Received 8th February 1905
Registered No 52/A of 1904/5

अ/2/32

गड आला पण सिंह गेला!!!

(एक ऐतिहासिक कादंबरी)

रचणार

हरि नारायण आपटे.

आह्मी शूर मर्द क्षत्री । नाहीं भिणार मरणाला ॥

तुळशीदास शाहीर.

प्रसिद्ध करणार


बाबाजी सखाराम आणि कंपनी,

इसुफ बिल्डिंग्स् काळकादेवी–मुंबई.

सन १९०४.

पुणें येथें
आर्यभूषण छापखान्यांत हरी नारायण गोखले
यांनीं छापिलें.

कै॰ ती॰ महादेव चिमणाजी आपटे.



संस्कृत विद्येच्या उद्धारार्थ

आनंदाश्रम

ही संस्था स्थापिली व तिजप्रीत्यर्थ

आपलें संपत्तिसर्वस्व सच्चिदानंदार्पण करून

ज्यांनीं स्वतःचें चिरकालिक स्मारक करून ठेविलें आहे

ते माझे परमपूज्य

पितृव्य तीर्थस्वरूप ब्रह्मीभूत आनंदसरस्वती स्वामी

महादेव चिमणाजी आपटे

यांचे चरणीं

हें पुस्तक

अर्पण केलें आहे.

गड आला, पण सिंह गेला !!!

प्रकरण १ लें.

कमलकुमारी.

गहन अरण्य– **अरवली** पर्वताच्या एका भागामधलें तें अरण्य. अर्थात् त्यांत मोठमोठाल्या वृक्षांची विलक्षण दाटी होती, आणि मध्यान्हीवर सूर्य आला असतांही त्या वृक्षांच्या निबिड छायेंतून त्याच्या प्रकाशाचा आंत प्रवेश होणें केवळ दुरापास्त होतें. वास्तविक पहातां या अरण्यांत भिल्लांखेरीज कोणीखुद्धां मनुष्य प्राणी रहाण्याचें साहस करीत नसे. नाहीं ह्मणायला क्वचित् स्थळीं गुहेंतून एखादद्सरा सिद्ध पुरुष आपलें पुरश्चरण करीत बसलेला दिसत असे. परंतु साधारणतः नगरवासी मनुष्यें कधीं त्या भागांत होनां होईतों येत नसत. सृष्टीचें रौद्र व भयानक स्वरूप या ठिकाणीं दिसे आणि त्यांत ज्यावेळीं क्रूर श्वापदें आपल्या भक्ष्यशोधार्थ इकडून तिकडे सैरावैरा हिंडतांना भयंकर गर्जना करीत असतील, तेव्हां तर ती रौद्रता विशेषच अनुभवास येई. तथापि अशा या अरण्यांतून शके १५९२ सालीं कार्तिक शुद्ध ९ मीला प्रातःकाळीं एक बैलाची गाडी चालली होती. तिच्याबरोबर चार केशरी पोषाख घातलेले रजपूत शिपाई व चार कालकूटापेक्षांही कृष्णवर्ण व करालमुख असे भिल्ल होते. एक वृद्ध रजपूत अंगांत केशरी झगा घातलेला, हातीं केशरी रंगाच्या म्यानाचीच तलवार घेतलेला असा, मोठ्या थोरल्या घोड्यावर बसून पुढें चाललेला होता. त्याचा चेहरा भव्य, तेजःपुंज, परंतु वार्धक्यानें आपली मुद्रा ठोकल्या कारणानें खुरकुत्या पडलेला असा दिसत होता. तो या वेळीं अतोनात चिंताक्रांत दिसला. कांहीं तरी दुःख होऊन त्याचें अंतःकरण अगदीं करपून गेलें असावें असें स्पष्ट दिसत होतें. त्या गाडीच्या योगानें बैलांच्या घुंगुरमाळांनीं व घोड्यांच्या टापांनीं जो काय आवाज होत होता तो, किंवा प्रातःकाळ झाल्याकारणानें जागृत होऊन भक्ष्यार्थ वनसंचार करावयास जाण्यापूर्वी आपल्या वासवृक्षांवरच बसून शब्द करीत असणाऱ्या पक्ष्यांचा श्रुतिमधुर किलकिलाट, यांवाचून दुसरा कोणचाही आवाज त्या स्थानीं त्या वेळीं होत नव्हता. त्या बैलगाडीबरोबर चाललेले

लोक आपापसांत बोलत नव्हते, किंवा बैलगाडीच्या आंतही कोणी बोलत असल्याचें ऐकूं येत नव्हतें. या बैलगाडीस बैलगाडी ह्मणण्यापेक्षां रथ ह्मटलें तर विशेष शोभेल. कारण ही प्राचीन काळच्या रथाच्या आकाराची व लहानसर असून हिच्या वरच्या बाजूस देवळाच्या शिखराच्या आकाराचा घुमट होता. घुमटावर सुंदर कळस आणि रथाच्या चारी कोंपऱ्यावरही कळस होते. सर्व रथावर चारही बाजूंनीं पडदे सोडले होते. मात्र त्या पडद्यांच्या प्रत्येक बाजूस, आंत साधारण उंचीचें मनुष्य बसलें असतां त्याच्या डोळ्याच्या बेताला येईल इतक्या बेताचीं झरोक्यासारखीं भोंकें असून त्यांत जाळीदार कापड शिवलेलें होतें. यावरून अर्थातच आंत कोणी तरी स्त्रिया असाव्या असें अनुमान सहज होई. प्रातःकाळची वेळ असल्या कारणानें, बैल मोठ्या हुशारीनें व आपल्या घुंगरांच्या तालावर चालत होते. जनावरांखेरीज इतर कोणाच्याही अंगांत हुशारी किंवा तोंडावर तजेला मुळींच दिसत नव्हता. प्रत्येक मनुष्य मोठा चिंताक्रांत व दुःखित दिसत असे. अर्थातच सभोंवतालची वनशोभा त्यावेळीं जरी मोठी प्रेक्षणीय होती, तरी या मंडळीचें अंतःकरण अत्यंत दुःखित असल्या कारणानें, त्यांचें लक्ष्य तिकडे जात सुद्धां नव्हतें असें दिसलें. त्यांचा मार्ग क्रमण्याचा झपाटा चालला होता.

सुमारें अर्ध प्रहर झाला तेव्हां तो पुढला वृद्ध रजपूत थोडा मागें वळून एका रजपूत शिपायास हळूच ह्मणतोः “ **पद्मनाभजी**, अजून ती जागा किती लांब आहे? तुझ्या सांगण्याप्रमाणें आपण या वेळीं त्या जागीं बहुतकरून येऊन पोहोंचलों असलों पाहिजे. पण अजून कांहीं तूं सांगितल्यास त्या खुणा दिसत नाहींत. ते जर आपल्या टापूच्या बाहेर निघून गेले होते, तर **वीरसिंहाला** तरी त्यांचा इतका पाठलाग करण्याची काय जरूर होती? परंतु कर्माच्या पुढें कोणाची धाव चालणार? त्याचें कर्म ओढवलें. **राजसिंह**महाराजांची आज्ञा केवळ आपापल्या हद्दी संभाळाव्या, एवढीच आहे. पण **वीरसिंह** जातीचा शूर, अविंध पाहिला कीं त्याला जसें स्फुरण चढे, तेव्हां प्रसंग येतांच त्यांना चेंचून टाकण्यासाठीं हद्द सोडून इतक्या दूरवर आला! पण तेवढ्यावांचून काय अडलं होतं?... ... ... ”

“ **संग्रामसिंह**जी, **वीरसिंहां**ची त्या वेळची वीरश्री कांहीं विलक्षण होती. एखाद्या उत्तम शिकाऱ्याला किती वेळांत कांहीं मिळूं नये आणि तो अगदीं निराश होऊन परत जाण्याच्या विचारांत आला असतां त्याला एखादा भला थोरला हत्तीसारखा प्रचंड रानडुकर दिसावा; आणखी मग तो जसा त्याच्या पाठीस लागतो, तसे **वीरसिंह**जी त्या मोंगलांच्या पाठीस लागले. आज किती दिवस ते या हद्दीला

येऊन बसले असून मोंगलांचें कोणी चिटूपांखरूंसुद्धां इकडे आलें नाहीं, ह्मणून त्यांना अगदीं वाईट वाटत असे. महाराज **राजसिंहां**नीं त्यांना येथें पाठविल्या वेळेपासून त्यांची इच्छा ही कीं, आपण येथें आल्यासारखी कांहीं तरी चकमक उडून एक दोन मोंगलांच्या टोळ्या पकडून महाराजांकडे पाठवाव्या; पण तें कांहीं होईना. त्यांनीं आह्मांला किती वेळां तरी टेहळणीसाठीं दूरदूर पाठविलें. आह्मी जाऊन टेहळणी करण्यालासुद्धां कंटाळलों. पण कधीं कांहीं मागमूस नाहीं. आणि परवां त्यांचीं तोंडें इकडे वळलीं आहेत, असें कळलें मात्र; **वीरसिंहां**चे बाहु स्फुरूं लागले. त्यांनीं आपलीं शस्त्रास्त्रें घेतलीं, आमची मंडळी चट्कन् जमण्यासाठीं शिंगें फुंकलीं आणि आह्मांला घेऊन ते निघाले, तों मोंगलांनीं याच बाजूला मोर्चा फिरविलेला कळला, आणि थोड्याच वेळांत त्या **शेरखाना**च्या टोळीची आणखी आमची जुंपून खूप चकमक झाली. मोंगलांनीं आपली पाठ फिरविली. थोडासा त्यांचा पाठलाग करून सोडून द्यायचें तें न करतां **वीरसिंह**जी त्यांच्या मागोमाग एकटेच फार पुढें गेले. गेले ते एकटेच आहेत, असें पाहून कोणी उलटला, कीं मधेंच कोठें कोणी लपून बसलेला होता, त्यानें त्यांच्या मागून येऊन, त्यांच्यावर हल्ला केला, कांहीं सांगतां येत नाहीं. पण आह्मी त्यांच्या मागोमाग जों पुढें जातों, तों त्यांच्या अंगावर सुमारें पंधरा वार लागलेले आणि ते अगदीं बेशुद्ध पडलेले! त्यांस शुद्धीवर आणण्याला व त्यांच्या जखमा बांधून रक्तस्राव कमी करण्याला आह्मीं पुष्कळ प्रयत्न केले, परंतु कांहीं उपयोग झाला नाहीं. शेवटीं त्यांच्या शवाला अग्नि देऊन आह्मी आपल्याकडे ही दुर्वार्ता सांगण्याला आलों. एकवार तें प्रेतच आपणाकडे घेऊन जावें, असा विचार आमच्या मनांत आला, पण सहा सात दिवसांची वाट, तेथपर्यंत त्याला दुर्गंधि खचित सुटली असती, तेथेंच ठेवून येणें अर्थातच गैर ह्मणून त्याला अग्नि दिला. आह्मी त्यांना 'आपण पुढें जाऊं नका,' असें पुष्कळ सांगितलें, पण त्यांनीं ऐकलें नाहीं. त्यांचें शौर्य जबर, साहसही जबर, पण त्यांत दुराग्रहही फार झाला."

हें **पद्मनाभजीं**चें बोलणें चाललें असतां, म्हातारा स्वस्थपणें ऐकत होता. मधून मधून त्याच्या डोळ्यांतून अश्रुबिंदुही बाहेर पडत. पण ते तसेच पडूं देऊन तो आपल्या पुढच्या मार्गाकडे लक्ष्य देऊन चालला होता. **पद्मनाभजीं**नीं ही **वीरसिंहा**च्या मरणाची हकीकत त्यांना आतां पहिल्यानेंच सांगितली असें नाहीं, चवथ्या पांचव्यांदा सांगितली असेल; पण ह्मातान्यास ती हकीकत ऐकण्याचा कधीं त्रास वाटला नाहीं. आपलें ज्याच्यावर अत्यंत प्रेम, तें माणूस मृत्यु पावलें असतां, त्याच्या मृत्यूची हकीकत वारंवार कोणाला तरी सांगितल्यानें, किंवा कोणी तरी

सांगूं लागलें असतां ऐकिल्यानेंही एक प्रकारें मनास बरें वाटत असतें. तीच स्थिति या वेळीं **संग्रामसिंहा**ची झाली होती.

ती गाडी व मंडळी आणखी कांहींसा मार्ग आक्रमून पुढें गेली, ती एका विशेष गर्द अशा झाडींत आली; तों तेथें एका ठिकाणीं एक राखेचा ढीग दिसला. इतक्यांत एक भिल्ल पुढें होऊन इकडे तिकडे पाहून एकदम ह्मणालाः " हीच ती जागा. " गाडी थांबली आणि त्या गाडीचे पडदे आंतूनच कोणी दूर केले व एक सुमारें बावीस तेवीस वर्षांची स्त्री बाहेर तोंड काढून इकडे तिकडे पाहून खालीं उतरली. हिची चर्या अतोनात दुःखित दिसली. ती उतरल्यावर तिनें पुनः एकदां पडदा दूर करून, हात पुढें करून दुसऱ्या एका तरुण स्त्रीस तिनें खालीं उतरविलें.

ही दुसरी तरुण स्त्री ह्मणजे करुणरसाची मूर्तिच दिसली. अगदीं शुभ्र असें एक वस्त्र ती नेसली होती. गळ्यांत एक मोत्यांचा सर होता व हातांत एक- एकच कंकण होतें. यावेळीं तिच्या नेत्रांतून अश्रु मुळींच येत नव्हते. परंतु एकवार त्यांचा पूर वाहून आतां त्या विशाल सुंदर नेत्रांत अश्रु ह्मणून राहिलाच नाहीं असें दिसत होतें. किंवा आतां अश्रु ह्मणून नेत्राबाहेर येऊंच द्यावयाचा नाहीं असा निश्चय करूनच तिनें ते अगदीं आंतल्या आंत दाबून टाकले असावे, असें दिसलें ह्मटलें तरी चालेल. तिच्या त्या दुःखाविष्ट चर्येवर, आपलें दुःख दुसऱ्याला दिसूं द्यायचें नाहीं, असा तिच्या मनाचा निश्चय पूर्णपणें दिसत होता. तिला गाडींतून उतरून घेणारी स्त्री लागलीच तिला घेऊन त्या राखेच्या ढिगाऱ्याजवळ जाऊन मोठ्यानें आक्रंदन करूं लागली. तो वृद्ध रजपूत सरदारही एके बाजूस जाऊन स्वस्थपणें उभा राहिला. त्याचप्रमाणें त्याचे बरोबरचे भिल्ल दूर उभे राहिले, आणि दुसरे रजपूत शिपाई होते, ते त्या वृद्ध रजपुताजवळ जाऊन अदबीनें उभे राहिले. प्रत्येकाच्या चर्येवर दुःखाची छाया स्पष्ट दिसतच होती. ती बावीस तेवीस वर्षांची स्त्री खेरीजकरून कोणाच्याही तोंडांतून शोकोद्गार बाहेर मात्र पडत नव्हते. ती तेवढी " **वीरसिंहजी, वीरसिंहजी** ! कसे आह्मांला टाकून गेलांत, **महाराजां**ची सेवा करायची एवढ्याकरितांच आपला जन्म ही गोष्ट खरी, पण तेवढ्याकरितां आपला जीव धोक्यांत घालण्याचें मुळींच कारण नव्हतें. तुह्मी आपल्या या बायकोला, आह्मांला, आपल्या वडिलांना कंटाळलां ह्मणून असं साहस केलं काय ?........." असे शोकोद्गार काढून मोठ्यानें आक्रंदन करूं लागली.

ती दुसरी तरुण स्त्री- वयानें वीस वर्षांची असेल नसेल- तिनें एकवार खालीं वांकून त्या राखेच्या ढिगाला वंदन केलें. त्यांतील एक चिमूटभर राख उचलून

घेतली आणि आपल्या कपाळास लाविली. तितक्यांत तिच्या डोळ्यांतून टपटप् अश्रु पडूं लागले आणि हुंदकाही बाहेर पडणार, तों तिनें अत्यंत प्रयत्नानें तो दाबून धरला. नंतर लागलीच तिनें आपले अश्रूही पुसले, आणि मोठा धीर करून अगदीं शांतपणें त्या आपल्या मैत्रिणीजवळ जाऊन तिनें उठण्यासाठीं तिचा हात धरून ती ह्मणाली, " **देवल देवी**, मीं तुला बरोबर आणली, **माजी**ला येऊं दिलें नाहीं, तें तूं इथें येऊन रडण्यासाठीं कीं माझी लवकर रवानगी करण्यासाठीं ? **पिताजी**, तुह्मी आतां उशीर कां करतां ? या भिल्लांना चिता रचण्यासाठीं इंधन आणण्याला कां सांगत नाहीं ? या, **मथुरानाथ**जी, तुह्मी उपाध्ये आहांत, तुह्मी मला मंत्र सांगून माझी बोळवणी कराल, ह्मणून बाबांच्याकडून मीं तुह्मांला मुद्दाम आणलें. आतां कोणी रडूं नका. मला तिकडच्या दर्शनाची अगदीं गर्दी झाली आहे. तुम्ही जों जों उशीर करितां आहां, तों तों माझ्या मनाला वेदना होताहेत. त्या वेदना कां होऊं देतां ? चल ऊठ, ऊठ, **देवल**, असा आळस कां करतेस ? "

तें तिचें धिटाईचें बोलणें ऐकून सर्वांना फार आश्चर्य वाटलें असावें; कारण **संग्रामसिंह** घरून **कमलकुमारी**ला घेऊन निघाला, तेव्हां त्याला अशी आशा वाटत होती कीं, या स्थानीं आल्याबरोबर किंवा येतां येतां वाटेंतच, **कमलकुमारी**चा आपल्या पतीबरोबर सहगमन करण्याचा निश्चय डगमगेल; परंतु आतां तसा कांहींच प्रकार दिसेना. तेव्हां त्याची त्या बाबतींत निराशा झाली, आणि त्यास मुळींच धैर्य न राहून तो अगदीं एखाद्या स्त्रीप्रमाणें रडण्याच्या बेतांत आला.

कमलकुमारी ही **संग्रामसिंहा**ची एकुलती एक मुलगी. ती त्यानें **मेवाड**चा राणा **राजसिंह** याचे घराण्यांतील **वीरसिंह** नांवाच्या एका पुरुषास दिली होती. **वीरसिंह** हा **राजसिंहा**च्या फार मर्जींतला असून मोंगलांचा मोठा द्वेष्टा. राणा **राजसिंह** याचे ठिकाणीं त्याची इतकी भक्ति होती– नव्हे निष्ठा होती –कीं, " **वीरसिंहा**, तूं आपलें शिर कापून ठेव, " म्हणून त्यानें याला आज्ञा केली असती, तरी सुद्धां यानें यत्किंचित् मागें पुढें न पाहतां ती अमलांत आणली असती. अशा तऱ्हेची स्वामिभक्ति ज्याच्या ठिकाणीं जागृत होती, त्याच्यावर स्वामीची कृपा असली, तर त्यांत नवल काय ? आपल्यास मोंगलांचें पारिपत्य करण्याची संधि यावी ही **वीरसिंहा**ची मोठी महत्त्वाकांक्षा, आणि ती तृप्त होण्याकरितां **राजसिंहा**पासून हद्दीवरलें काम त्यानें मागून घेतलें होतें. **औरंगजेबा**ला **राजसिंहा**चें राजपुतान्यांतलें वर्चस्व पाहून फार वैषम्य वाटत असल्यामुळें त्यानें आपले हेर व कांहीं सैन्य **मेवाड**च्या हद्दीवर नाना ठिकाणीं ठेवून संधि साधेल तेव्हां त्याच्या राज्यांत शिरकाव करण्याविषयीं

त्यांना हुकूम देऊन ठेवले होते. **राजसिंहा**च्या मनांत, आपल्या राज्यांत या लोकांचा शिरकाव यत्किंचित्सुद्धां होऊं देऊं नये, असें असल्यामुळें त्यानें हद्दींवर ठिकठिकाणीं ठाणीं ठेवून तीं चांगल्या शूर अशा रजपुतांच्या ताब्यांत दिलीं होतीं. त्यांत **अरवली**च्या वाटांपैकीं एका अत्यंत अवघड अशा जागीं **वीरसिंहास** ठेवलें होतें. त्या ठिकाणीं **वीरसिंह** असतांना त्यानें कशा प्रकारचें धाडस केलें आणि काय झालें हें वाचकांस **पद्मनाभजी**च्या भाषणावरून समजलें आहेच. **वीरसिंह** त्या आपल्या ठाण्यावर आला, तेव्हां त्यानें आपल्या पत्नीस बरोबर आणलें नाहीं. अर्थातच त्याचा तसा शेवट झाल्यानंतर सुमारें आठ दिवसांनीं तिला व तिच्या आईबापांला ती दुःखवार्ता कळली. ती वार्ता ऐकण्याबरोबर **कमलकुमारीनें** सती जाण्याचा कृतनिश्चय केला. सती जाण्यास पतीचें शव पाहिजे, परंतु तें तर त्याच्या बरोबरच्या लोकांनीं दहन करून नंतर ते त्याची निधनवार्ता सांगण्याला आले. तेव्हां ज्या ठिकाणीं पतीच्या शवाचें दहन झालें, त्याच ठिकाणीं जाऊन पतीची प्रतिमा करून त्या प्रतिमेबरोबर किंवा त्याच्या पादुका घेऊन त्यांबरोबर सती जाण्याचा तिनें निश्चय केला.

अकबर बादशहानें सती जाणें बंद करण्यासाठीं पुष्कळ खटाटोप केला, परंतु त्यांत त्यास यावें तसें यश आलें नाहीं. क्षत्रियांच्या स्त्रिया पतीबरोबर सहगमन करण्याविषयीं नेहमीं उत्सुक. त्याच्या मृत्यूनंतर आपण जगांत राहणें ह्मणजे आपण पापलोकांत राहून त्याच्याही आत्म्यास येथेंच अडकवून ठेवण्यासारखें होय, असें प्रत्येक साध्वीला वाटत असे व ती मोठ्या आनंदानें आत्मदहन करून घेत असे. **कमलकुमारी** तशीच मोठी निश्चयी व पतिनिष्ठ स्त्री होती. पतीची मृत्युवार्ता ऐकतांक्षणींच तिनें वर सांगितल्याप्रमाणें निश्चय केला आणि ताबडतोब सती जाण्यास निघण्याविषयीं आग्रह चालविला. एकुलती एक कन्या आपल्या डोळ्यां-देखत अग्निसात् व्हावी, असें कोणा आईबापांना वाटणार आहे? तेव्हां त्यांनीं व इतर आप्तइष्टांनीं आणि तिच्या मैत्रिणींनीं तिला आपला निश्चय सोडून देण्याबद्दल पुष्कळ सांगितलें, परंतु तिनें आपला एकच हेका धरला. सगळ्यांनीं नानाप्रकारांनीं तिची समजूत केली. कोणी पुराणांतरीं सती न जातां राहिलेल्या **कुंती,** आदिकरून स्त्रियांच्या कथा सांगितल्या, परंतु सर्व व्यर्थ गेलें. तिचा निश्चय अगदीं कायम. 'तुह्मी मला तेथें नेऊन सती जाऊं दिलें नाहीं, तर मी अन्नपाणी वर्ज करून प्राणघात करीन,' असें तिनें स्पष्ट सांगितलें व त्याप्रमाणें एक दिवस सबंध आठ प्रहरांत तिनें तोंडांत पाणीसुद्धां घातलें नाहीं. तेव्हां

आतां तिच्या मनाप्रमाणें करण्याखेरीज दुसरा कांहीं इलाजच नाहीं, असें पाहून तिच्या ह्मणण्यास **संग्रामसिंहानें** रुकार दिला. आपल्याबरोबर कोणी माणसांनीं येऊं नये, **माजी**- आई- नें तर मुळींच येऊं नये, तीं आल्यानें विनाकारण मोह उत्पन्न होईल, असाही तिनें आग्रह धरला. सती जावयाचें, तें वाजत गाजत, पुष्कळ लोक पोहोंचविण्यासाठीं बरोबर असून असें जावयाचें, परंतु **कमलकुमारीनें** त्यांपैकीं कांहींही आपल्याला नको, असा हट्ट धरला. सर्व बाबतींत **संग्रामसिंहानें** तिच्या इच्छेप्रमाणें करण्याचा बेत करून एक तिची मैत्रीण **देवल**देवी, एक **मथुरानाथ** उपाध्याय मंत्र सांगण्यासाठीं- तोही शूर शिपाईच होता- दुसरे **पद्मनाभजी**, जे **वीरसिंहा**बरोबर होते ते, दोन शूर रजपूत कडवे शिपाई व **चार** भिल्ल वाटाडे, इतकीच मंडळी घेऊन तिला प्रारंभीं सांगितलेल्या गाडींत बसवून **वीरसिंहा**च्या दहनस्थानाजवळ तो आला. तें स्थान पहाण्याबरोबर काय प्रकार झाला तोही वर आलाच आहे.

आणखी एकवार आपण आपलें वजन खर्च करून जर कांहीं झालें तर पहावें आणि तिचें मन वळवावें ह्मणून **देवलदेवी** आपला शोक आवरून **कमलकुमारी**ला ह्मणते, "**कमल**, तूं कांहीं वेडीबिडी आहेस तर अशा वयांत असा सती जाण्याचा हट्ट धरतेस? भगवान् **एकलिंगजी**च्या सेवेंत, आपला राहिलेला आयुष्यक्रम घालवला तर काय थोडें पुण्य लागेल ? **पिताजीं**ना, **माजीं**ना तूं सती गेल्यानें किती दुःख होणार आहे त्याबद्दल तुला कांहीं सुद्धां वाटत नाहींना ? तूं एकुलती एक मुलगी, तुझ्यावर सर्वांचा जीव कीं प्राण, आणखी तूं जर अशी प्राण देऊं लागलीस, तर त्यांनीं काय करावं ? वेडे त्यांच्या दुःखाकडे तुला पहायला नको का ?"

तें ऐकून **कमलकुमारी** एकदम हंसून ह्मणते, "**देवल**, तुझ्या बोलण्याचा बाई मला मोठा चमत्कार वाटतो. काय ह्मणतेस ? **पिताजीं**ना आणखी **माजीं**ना मी सती गेल्यानें वाईट वाटेल, आणखी मी भद्रकपाळी वैधव्याचा कलंक लावून घेऊन मरेपर्यंत रोज त्यांच्या अशी नजरेसमोर राहिल्यानें त्यांना संतोष होईल, असं ह्मणतेस? **देवल**, या तुझ्या बोलण्यानंच तूं वेडी का मी वेडी तें समजलं. ऊठ. आतां हीं असलीं वेडगळ बोलणीं बोलूं नकोस. माझी तयारी कर, त्या भिल्लांना इंधन आणायला सांग. बाबांना कांहीं त्रास पडूं देऊं नकोस. हे दुसरे दोघे आणखी **पद्मनाभ**जी ती चिता रचतील. **मथुरानाथ**जी, प्रतिमा करितां, कीं मी बरोबर आणलेल्या पादुका काढूं ? तुह्मी जसं सांगाल तसं करीन. पण हें हो काय! तुह्मीहीं रडायला लागलां ? या **देवल**देवीनं तुह्मांला सगळ्यांना

रडायला लावलं. हिला मी कुठून आणली असं मला झालं आहे. मी एकटी आलें असतें, तर बरं झालं असतं. "

"साध्वी **कमलकुमारी**," **मथुरानाथ** अत्यंत सद्गदित कंठानें ह्मणतात, "तुझ्या पुढें आह्मी काय माणसं? तुझं धैर्य पाहून आह्मी अगदीं चकित झालों. तुझा निश्चय हाच तुझा मंत्र. तुला आमच्या वैदिक मंत्रांनीं अधिक फलप्राप्ति काय होणार आहे? **संग्रामसिंहजी**, तुमच्या पोटीं ही **कमलकुमारी** नव्हे, कोणी तरी महादेवी उगीच जगताची लीला पाहण्याला आली आहे, असं समजून तुह्मी आपल्याला धन्य माना, आणि खरोखरच आपला शोक एका बाजूला सारून आतां हिच्या पाठवणीच्या तयारीला लागा. जा रे, ए भिल्लहो, जा इंधन आणून देण्याचं पुण्य तुह्मी घ्या. **देवल**, आतां शोक आवर. **कमलकुमारी** सामान्य स्त्री नव्हे. शाबास साध्वी, तुझ्यासारख्यांचं पुण्य तेंच **राजसिंहा**चं पुण्य. तुझ्यासारख्या स्त्रिया जोंपर्यंत **मेवाडां**त आहेत तोंपर्यंत या **मेवाडा**कडे वांकडी नजर करून तरी कोणाची पाहण्याची छाती होईल काय? चला आतां, आपण सगळेजण शोक आवरूं आणि पुढच्या उद्योगाला लागूं. आमची तरी पुण्याई जबर ह्मणून आह्मी या प्रसंगीं इथें आलों."

असें ह्मणून **मथुरानाथ**जी त्या बैलगाडीजवळ गेला व त्यांत जें काय साहित्य आणलें होतें तें त्यानें भराभर बाहेर काढलें. **देवल**देवी अजून तशीच स्वस्थ शोक करीत बसली होती, तिला त्यानें लवकर शोक आवरण्याविषयीं निक्षून सांगितलें आणि हातीं धरून उठविलेंच. तीही आतां थोडी शुद्धीवर आली. आपली प्रिय मैत्रिण **कमलकुमारी** आतां सती गेल्याखेरीज राहात नाहीं, असें तिला पक्कें वाटलें, तेव्हां तिनें आपला शोक आवरला आणि ती तिला मदत करण्यासाठीं पुढें सरसावली. सतीस लागणारें सगळें सामान **कमलकुमारी**नें आपल्याबरोबर घेतलें होतें. तिला या सर्व साहित्याची माहिती तरी कशी झाली याचेंच **मथुरानाथास** फार आश्चर्य वाटलें. परंतु जी सती जाण्याच्या निश्चयानें आली, तिला काय सुचावयाचें नाहीं? असें मनांत ह्मणून त्यानें **देवल**देवीच्या हातीं एक रक्तवस्त्र दिलें व तें वस्त्र **कमलकुमारी**ला नेसव, असें सांगितलें. नंतर तिच्या कपाळीं मळवट वगैरे भरण्याला, भांगांत कुंकू टाकून फुलें गुंफण्याला वगैरे सांगून, ते स्वतः चितेकडे गेले. सती जीवर जायची ती चिता कांहीं एका विवक्षित तऱ्हेनें रचावयाची असते, त्याप्रमाणें ती सर्वांनीं मिळून रचली. भिल्लांनीं पर्वतांतून वाळलेलीं चंदनाचीं लांकडेंच बहुतेक आणून टाकलीं होतीं. अशा तऱ्हेनें चिता तयार झाल्यानंतर

मथुरानाथजीनें "एकवार आपल्या बापाला भेट, **देवल**देवीला भेट, आपल्या मातेचें स्मरण कर आणि त्या पादुका हातांत घे, " असें **कमलकुमारीस** सांगितलें.

ती धैर्यानें सर्व कांहीं करीत होती. **संग्रामसिंह** कंबर मोडल्याप्रमाणें एका बाजूस बसला होता. तो शोकानें अगदीं व्याप्त झाला होता. जों जों चिता चढत चालली, तों तों त्याचें अंतःकरण फाटत चाललें. आपली कन्या आपल्या देखत विधवा होऊन आपल्याला हा असला प्रसंग पाहण्याचें नशिबीं यावें यासारखी शोकप्रद दुसरी कोणची गोष्ट असणार ? असे विचार मनांत येऊन तो शून्यदृष्टीनें इकडे तिकडे पहात होता. इतक्यांत त्याची ती वीरकन्या व वीरपत्नी **कमलकुमारी** त्याच्यापुढें येऊन उभी राहून नमस्कार करून ह्मणते, " **पिता**जी, मी आतां आपली आज्ञा घेतें. आपण ज्यांच्या पदरांत मला घातली, त्यांच्या सहवासांत इहपरलोकांत मीं रहावें अशा इच्छेनं घातलीना ? मग शोक करूं नका उठा, मला एकदां पोटाशीं धरा. विवाहाच्या दिवशीं माझं मुख कुरवाळून जसं मला " **कमल,** जा बरं, आपल्या सासऱ्यां जाऊन सुखानं नांद " असं म्हटलंत, तसं आतां ह्मणा. आणखी मला निरोप द्या कसा ! अगदीं अगदींसुद्धां दुःख करूं नका. मी मोठ्या आनंदानं तिकडच्या पादुका घेऊन सती गेलें, दुःखाचा एक सुस्कारासुद्धां टाकला नाहीं, असं **मा**जीला सांगा. आणखी सांगा कीं, आतां माझ्या ठिकाणचं तुझं सगळं प्रेम माझ्या **देवल**देवीच्या ठिकाणीं ठेव. ती तुला माझ्या ठिकाणीं आहे. तिला तूं सासरमाहेर कर. **पिताजी**, एवढं सांगालना ? असे कां बरं डोळे करतां ? " इतकें आपल्या बापाला बोलून ती त्याच्याकडून **देवल**देवीकडे फिरली आणि तिला ह्मणाली, " **देवल**, तूं आतां **पिता**जींना आणखी **मा**जीला माझ्या जागीं आहेस. तर आतां त्यांना संभाळ. माझी आठवण मुळींसुद्धां होऊं देऊं नकोस. यापेक्षां तुला आतां आणखी कांहींसुद्धां मला सांगायचं नाहीं. **मथुरानाथ**जी, तुह्मी आमचे उपाध्याय, तुह्मांला मी आधीं वंदन करतें. **माजी**चं स्मरण करून त्यांना नमस्कार करतें. **पिताजी**, तुह्मांला मी नमस्कार करतें. आतां मला आनंदानं निरोप द्या. "

असें बोलून व सर्वांकडे एकवार पाहून तिनें **मथुरानाथ**जीस आपले मंत्र वगैरे ह्मणण्यास व काय काय आपण करावयाचें, तें सांगण्यास पुनः सुचविलें. **मथुरानाथ**जी बिचारा इतका सद्गदित होऊन गेला कीं, त्याचे तोंडून एक तर शब्द लौकर उमटेनात आणि ते जेव्हां उमटूं लागले, तेव्हां ते अगदीं रोदनयुक्त स्वरांत बाहेर पडले. **कमलकुमारी** त्यांजकडे पाहून पुनः स्मित करून ह्मणते, "**नाथ**जी, असं काय करतां ? तुह्मीच शोक करूं लागलांत, तर **पिताजी** आणखी **माजी**

यांचं सांत्वन कोण करील ? आणखी तुह्मी जर नीट मंत्र ह्मटले नाहींत, तर मग मी यथाशास्त्र सती गेलें, असं मला वाटून समाधान कसं होईल ? सांगा, मी आतां काय करूं ? "

" **कमलकुमारी**, तूं परमसाध्वी, तुला आमच्या मंत्रांचा काय उपयोग? आह्मी तुला आशीर्वाद देण्याच्या ऐवजीं तुझ्याचपासून आह्मी आशीर्वाद मागायचा. तूं आह्माला वंदन करण्याच्या ऐवजीं आह्मीच तुला वंदन करावं. पण आतां तूं म्हणतेसच, तर ये अशी इथें उभी रहा. मी मंत्र म्हटल्याबरोबर ... ... पण हें काय लचांड आलं ? हे पांच पन्नास घोडेस्वार कोण इकडे येताहेत ? आलेच ते. "

मथुरानाथजी असें जों म्हणतात व सती जाण्यास सिद्ध झालेली **कमलकुमारी** वर पहाते, तों खरोखरीच पांच पन्नास घोडेस्वार त्या चितेजवळ येऊन उभे राहिले आणि " ये क्या ? ये क्या ? " करून त्यांनीं एकच गोंधळ केला.

तो विलक्षण प्रकार पाहून **कमलकुमारी** अत्यंत क्षुब्ध झाली. आपण सती जात असतां मध्येंच हें विलक्षण विघ्न आलें ! अविंध, ज्यांची अशा समयीं नुसती सांवलीसुद्धां पडूं नये, ते बेधडक चितेजवळ येऊन उभे राहिले, तेव्हां झाला हा प्रकार अत्यंत अशुभ झाला, आतां पुढें काय विघ्नें येतील कोणास ठाऊक, असें मनांत येऊन तिचें काळीज अगदीं चर्र होऊन गेलें. तरी पण ती धैर्य करून चितेजवळ जाऊं लागली व **मथुरानाथजी**स तिनें हांका मारल्या, तों त्या नवीन मंडळींपैकीं एक आपला घोडा पुढें घालून तिच्याजवळ आला व एकदम तिला ओळखून ह्मणतो, " कोण ! **कमलकुमारी** ! तूं सती जाते आहेस ! आणखी तुला कोण सती जाऊं देतो आहे ? हा तुझा पिता **संग्रामसिंह** ? वा ! "

आपलीं दोघांचीं नांवें घेणारा हा कोण म्हणून दोघेंही आश्चर्यानें त्याच्याकडे पाहूं लागलीं. परंतु त्यांना त्याची ओळख पटेना. तथापि **कमलकुमारी** एकदम त्याच्यापुढें जाऊन त्याला ह्मणते: " बाबारे, तूं कोणी जरी असलास, तरी माझ्या निश्चयाच्या आड येऊं नकोस. मोठ्या मिनतवारीनें, या सगळ्यांच्या मर्जीविरुद्ध मोठ्या कष्टानें त्यांची संमती मिळवून, मी सतीधर्मीप्रमाणें वागण्यास उभी राहिलें आहें. आतां अगदीं स्वर्गद्वारांत आपलं पाऊल पडलंच, अशा आनंदांत मी आहें तों तूं कां विघ्न करतोस ? तूं रजपूत असलास, तर मी तुझी धर्मभगिनी समजून मला माझ्या सतीधर्माप्रमाणें वागूं दे. रजपूत नसलास, तरी मला विघ्न करूं नको. "

कमलकुमारीनें हे शब्द इतक्या धैर्यानें उच्चारले कीं, तें तिचें

धैर्य पाहून त्या चितेच्या व तिच्यामध्यें उभ्या राहिलेल्या गृहस्थास आश्चर्य वाटून तो तिच्याकडे अगदीं स्तब्धपणें पहात उभा राहिला. न जाणों क्षणमात्र त्याला असेंही वाटलें असेल कीं, हिच्या धर्माचरणाच्या आड आपण खरोखरच येऊं नये. परंतु असा विचार आला असला, तरी तो क्षणभरच आला असेल नसेल. लागलींच तो आपल्या मनांतून जणूं काय घालवून देऊन **कमलकुमारीस** ह्मणतो, "**कमलकुमारी**, मी कोण आहें हें सांगण्याची वेळ ही नाहीं. सध्यां मी तुला सती जाऊं न देतां येथून घेऊन जाणार एवढीच गोष्ट खरी. तुह्मी सर्वजण जर शहाणे असलां, तर मुकाट्यानं माझं ऐकाल, नसलां.......

परंतु **संग्रामसिंह** तत्काळ पुढें होऊन त्याच्या अंगावर धांवून जाऊन ह्मणतो, " काय ? तुझी कोणाशीं गांठ आहे, हें तुला ठाऊक नाहीं वाटतं ? गरुड पक्ष्याच्या घरट्यांत जाऊन त्याच्या पिलाला ओढून नेण्याला गरुडाशीं झुंजावं लागतं. हरामखोरा, सतीधर्मांत विघ्न करणारा तूं अधमाहून अधम. तुला देहांत शिक्षा पाहिजे. "

हें बोलतांना संतापातिरेकानें ह्मातार्‍याचें सर्वांग लटलटा कांपूं लागून, शब्द कांपरेकांपरे आले. तरी पण त्यानें आपली ती तलवार उपसून त्याचे अंगावर वार केलाच. लागलींच दोनही पक्षांची चकमक सुरू झाली.

परंतु तो सतीधर्मांत विघ्न करणारा पुरुष कोण, त्यानें पुढें काय केलें व त्या चकमकीचा पुढें परिणाम काय झाला हें पुढील प्रकरणांत पाहूं. त्याचें नांव **उदयभानु** एवढेंच आतां येथें सांगतों.

प्रकरण २ रें.

उ द य भा नु.

एक रजपूत मुसलमान झाला, तर **औरंगजेब** बादशहास, आपला एक पितर स्वर्गांत गेल्याप्रमाणें-किंवा आपल्याला पुत्र झाल्याप्रमाणें आनंद होत असे, त्यांतून ज्या रजपूत घराण्यावर त्याचा मोठा दांत, त्यांतून एखादें चिटूपाखरूं जरी महंमदी धर्माला येऊन मिळालें, तरी बादशहा **अलमगीर** त्याबद्दल अगदीं महोत्सव करीत असे. **उदयभानु** हा खरोखर मोठ्या उच्च कुळांतला होता असें नाहीं. परंतु **मेवाड**च्या घराण्यांतल्या एका पुरुषाचा दासीपुत्र असल्यामुळें तो आपली जन्मकथा लपवून आपल्यास **मेवाड**च्या शूर घराण्यांतील एक पुरुष असेंच ह्मणवून

घेत असे. मनुष्य आपली पायरी सोडून इतरांवर वरचढपणा करूं लागला, ह्मणजे मग इतरही त्याचा मुलाहिजा राखीत नाहींत. हा आपल्यास राजकुलांतील मोठा मानकरी असें ह्मणवून घेऊन पुढें पुढें करूं लागल्याबरोबर, जो तो त्याची जन्मकथा बाहेर काढून त्याच्या तोंडावर त्याबद्दल चर्चा करूं लागला.

उदयभानु स्वतः अतिशय शूर, फार देखणा, भव्य, तेजःपुंज, हुशार आणि जबर महत्त्वाकांक्षी होता. परंतु त्याच्या गर्विष्ठपणामुळें त्याला **उदेपुर**च्या राज्यांत त्यास आपली महत्त्वाकांक्षा तृप्त करून घेण्यास कोठें वाव सांपडेना. आपल्यावर आपल्या जन्मसंबंधीं जो कलंक आहे, तो धुऊन जावा, आणि राजदरबारीं कांहींना कांहीं तरी मोठ्या मानाची अशी पदवी आपल्याला मिळावी, ह्मणून त्यानें अत्यंत प्रयत्न केला. परंतु त्याच्या मनाप्रमाणें झालें नाहीं. तो राजदरबारीं मानाची पदवी मिळविण्याचा खटाटोप करूनच स्वस्थ बसला नाहीं. तर राजघराण्याच्या तोलाच्या एका सरदार घराण्यांतील एका तरुण कुमारीशीं आपला विवाह व्हावा एवढ्याकरितांही त्यानें फार प्रयत्न केला. परंतु दासीपुत्र हा कलंक त्याला कायमचा लागला असल्यामुळें त्याच्या त्या प्रयत्नास मुळींच यश आलें नाहीं.

उदयभानूनें जिच्याशीं आपला विवाह व्हावा अशी महत्त्वाकांक्षा धरली, ती **संग्रामसिंह** नांवाच्या थोर सरदाराची एकुलती एक कन्या **कमलकुमारी** होय. **संग्रामसिंहा**जवळ जाऊन त्यानें आपलें हृद्गत कळविलें, तेव्हां त्यानें त्याची फारच हेटाळणी करून त्याला उत्तर दिलें: " हंसाची कन्या हंसकुलांतच दिली जाईल. कावळ्यानें कितीही आपले पंख चुन्यांत बुडवून पांढरे करण्याचा प्रयत्न केला, तरी त्याला हंसी मिळणार नाहीं. "

हें उत्तर मिळालें तेव्हांपासून तर **उदयभानू**ची तडफड फारच सुरू झाली. तशांत पुढें **कमलकुमारी**चा विवाह **वीरसिंहा**बरोबर झाला हें समजतांच त्याच्या संतापाग्नीचा भयंकर भडका झाला. **वीरसिंह** हा खरोखर राजकुलांतील होता. तो **उदयभानू**चा चुलतभाऊच ह्मटलें तरी चालेल. कारण **उदयभानू**चा बाप आणि **वीरसिंहा**चा बाप हे सख्खे बंधू होत. परंतु **उदयभानु** हा आपल्या बापाचा दासीपुत्र असल्यामुळें त्याला कोणी भाऊ ह्मणवीत नसे. **वीरसिंह** आणि **उदयभानु** या दोघांचीं वयें जवळ जवळ सारखीं, दोघांचें शिक्षण एकाच ठिकाणीं झालेलें, परंतु पुढें राजदरबारीं जाण्याच्या वेळीं **वीरसिंह** अस्सल क्षत्रिय ह्मणून त्यास मानकऱ्याची पदवी तेव्हांच मिळाली. इतकेंच नव्हे, तर **राजसिंहाचें** प्रेमही त्याज-

वर बसून तो पुढें पुढें सरसावत चालला. व त्यामुळें इकडे **उदयभानू**च्या अंगाचा तडफडाट झाला हें उघडच आहे.

अशा प्रकारें त्याची कोणच्याही तऱ्हेनें सरशी होईना, तेव्हां त्यानें कपटनाटकास आरंभ करण्याचें योजिलें आणि आपण आतां **राजसिंहा**च्या शत्रूस जाऊन मिळण्याचा घाट घातला. **औरंगजेबा**ची एकसारखी धडपड चालली होती कीं, या **राजसिंहा**ला आणि त्याच्या घराण्याला आपण पादाक्रांत करावें. परंतु **राजसिंह** ह्मणजे असा तसा पुरुष थोडाच होता! **राजसिंहा**ला स्वाधीन करून घेण्याची जितकी **औरंगजेबा**ची उत्कट इच्छा, तितकीच **राजसिंहा**ची उत्कट इच्छा कीं, आपण व आपल्या जातिबंधूंनीं एकवट होऊन **औरंगजेबा**ची खोडकी मोडावी, किंवा मोंगली राज्य हिंदुस्थानांतून नष्ट करून टाकावें.

औरंगजेबाचे मार्ग कधीं सरळ नसावयाचे. नेहमीं कांहींना कांहीं तरी वक्रनीति करून तो आपला हेतु सिद्धीस नेण्यास झटावयाचा. त्याप्रमाणेंच त्यानें सध्यां आपला उपक्रम सुरू केला होता. **राजसिंहा**च्या राज्यांत फंदफितुर उत्पन्न करून जर कांहीं फुटाफूट झाली तर पहावी, अशासाठीं त्याचा प्रयत्न सुरू झाला. आणि त्यास **उदयभानु** हें एक साधन मिळालें; मग काय विचारतां ? **उदयभानू**चें महत्त्व **औरंगजेबा**कडे फारच वाढलें. तें वजन वाढल्यामुळें ह्मणा, किंवा कशामुळेंही ह्मणा, **उदयभानु** फार मदोन्मत्त झाला, आणि त्याच्या वर्तनावरून त्याच्याबद्दल संशय येऊन **राजसिंहा**नें त्यास आपल्या राज्यांतून हांकून दिलें. वास्तविक पाहतां त्याचा शिरच्छेदच व्हावयाचा, परंतु, काय त्याचें नशीब जोरावर, त्याचा शिरच्छेद न होतां नुसत्या हद्दपारीवरच गेलें !

अर्थातच आतां तो उघडपणें दिल्लीस **औरंगजेबा**च्या दरबारीं जाऊन राहिला. तो दिसण्यांत फार सुंदर, जात्या विलक्षण शूर, बोलण्याचालण्यांत मोठा चतुर आणि कुटिलनीतींत अगदीं प्रवीण, यामुळें **औरंगजेबा**स फारच प्रिय झाला होता. त्यांत तो आपल्यास **मेवाड**च्या राजघराण्यांतला ह्मणवी आणि **औरंगजेबा**च्या मर्जीखातर मुसलमान झालेला, यामुळें तर **औरंगजेबा**च्या फार मर्जींतल्या सरदारांपैकीं एक सरदार तो होऊन बसला.

औरंगजेबास नेहमीं कुटिलनीतींतच मौज वाटे. राजपुतान्यांत रजपुतांचा बींमोड करण्याची जशी त्याला उत्कट इच्छा, तशीच दक्षिणेंत **शिवाजी**महाराजांचा उच्छेद करून त्यांनीं स्थापन केलेल्या राज्याचा अगदीं विध्वंस करून टाकावा हीही पण

त्याची फार जबर इच्छा. **शिवाजी**महाराज **दिल्ली**हून गुप्तपणें पळून गेल्यामुळें त्यास इतकें वाईट वाटलें कीं, कोणी प्रत्यक्ष त्याची दाढी उपटली असती, तरी सुद्धां तितकें वाईट वाटलें नसतें. आपण कुटिलनीतींत इतके निष्णात, मोठ्या शिताफीनें त्यास आपण येथें आणून पकडून ठेविलें आणि आपल्या हातावर तुरी देऊन तो गेला, यापेक्षां आपल्या फजितीची गोष्ट आणखी कोणची असावयाची ? परंतु सावज हातचें गेल्यानंतर शिकारीनें नुसतें हळहळत बसण्यांत अर्थ काय, असें म्हणून **औरंगजेब** स्वस्थ बसला असें मात्र नाहीं. त्यानें आपल्या कुटिलनीतीला लागलीच सुरुवात केली. प्रथम **शिवाजी**वर आपला राग नाहीं असें दाखविण्याकरितां त्यानें त्याच्याशीं तह वगैरे करण्याचें बोलणें सुरू केलें. आणि कांहीं किल्ले व परगणे व गांवें **शिवाजी** महाराजांचीं असेंही कबूल केलें, कांहीं प्रांत आपण त्याला दिले व कांहीं हक्कही नवीन दिले. हें सर्व करण्याचा हेतु **शिवाजी**ला कसा तरी पुनः आपल्या ताब्यांत आणावा एवढाच होय. **जसवंतसिंग** व **शहाजादा मुआज्जीम** यांस त्यानें आतून वारंवार असे हुकूम पाठवावे कीं, "साधेल तें करून एकवार **शिवाजी**ला कैद करा. तेवढें साधण्याकरितां वाटेल तीं वचनें द्यावीं लागलीं तरी द्या, काय वाटेल तें करा, वेळ पडली तर तुह्मी असेंही त्यास भासवा कीं, माझ्याशीं तुह्मी अगदीं विरुद्ध असून वेळीं माझ्या विरुद्ध बंडही करण्यास तयार आहां. हवा तसा विश्वासघात करा, पण त्याला एकदां कैद करून दिल्लीस घेऊन या ! "

परंतु **शिवाजी** महाराजांच्या धूर्तपणामुळें तें सगळेंच पारडें उलटलें. **शिवाजीमहाराजांनीं** तो त्याचा कावा जाणला आणि आपल्याकडूनही वाटेल त्या वेळीं बादशहाशीं केलेल्या तहावर कुन्हाड घालून आपला क्रम पुढें चालवावा असा त्यांनीं पक्का बेत केला.

इकडे आपण इतके दिवस **जसवंतसिंग** व **शहाजादा** यांस निरोप व हुकूम पाठवीत असतां त्यांची कांहींच हालचाल दिसत नाहीं असें पाहून **औरंगजेबास** अशी शंका आली कीं, हे दोघेही कदाचित् **शिवाजी**नें आपणास वश करून घेतले असतील. अशी शंका आल्याबरोबर मग काय विचारतां ? आपले सर्वच बेत ढांसळले असें वाटून, त्यानें आपल्यातर्फें आणखी एक माणूस दक्षिणेंत पाठवावयाचा, त्याच्याबरोबर सैन्य द्यावयाचें, आणि त्यानें आपल्या मुलावर व **जसवंतसिंगावर** नजर ठेवावयाची असें ठरविलें. या कामाला उत्तम माणूस कोण याचा विचार मनांत उभा रहातांच अर्थात् **उदयभानू**चें नांव व मूर्ति हीं बादशहाच्या मनापुढें उभीं राहिलीं. आणि त्यानें **उदयभानू**स बोलावून आणून सांगितलें, " तूं आपल्या

बरोबर सुमारें एक हजार रजपूत घेऊन दक्षिणेंत जा, आणि **जसवंतसिंग** व **शहाजादा** यांच्यासाठीं आणखी तीन हजार लोक घे. त्यांना मी देतों हा माझा खलिता देऊन तूं **कोंडाणे** किल्ल्यावर (हाच किल्ला पुढें **सिंहगड** नांवानें प्रसिद्ध झाला.) जाऊन रहा. त्या किल्ल्यावर कोणी तरी तुझ्यासारखा फार शूर सरदार पाहिजे. त्या कावेबाज **शिवाजी**शीं मीं तह केला, त्यांत **कोंडाणे** किल्ला त्यास दिला नाहीं याचें कारणच हें कीं, जोंपर्यंत तो किल्ला हातांत आहे, तोंपर्यंत तो प्रांत त्याचे हातीं असला तरी आपल्या हातांतच असल्याप्रमाणें आहे. माझा खलिता पोहोंचला आणि एकदां माझें हृद्गत काय आहे हें त्या काफरास कळलें, ह्मणजे त्याचा पहिला यत्न **कोंडाणे** किल्ला घेण्याकरितां होईल. एवढ्याकरितां तुझ्यासारखा माणूस तेथें पाठवितों. तूं तेथें जाऊन दुसरें काम हें कर कीं, **जसवंतसिंग** बेइमानपणा करून त्या काफराला मिळाला आहे कीं काय याची बातमी काढ. मला त्याबद्दलची इत्थंभूत बातमी दिलीस, आणि **जसवंतसिंगा**ची लबाडी सिद्ध करून दिलीस, कीं हा नांवाचा **अलमगीर** आहे. त्याचा अधिकारच काय, पण त्याचें राज्यसुद्धां तुला देईन. मग हे रजपूत लोक तुझ्या पायावर लोळायला येतील ! "

आपला अभ्युदय होण्याला अशी उत्तम संधि आलेली पाहून **उदयभानू**स अत्यंत आनंद झाला हें काय सांगावयास पाहिजे? **जसवंतसिंग** जर **औरंगजेबा**शीं लबाडीनें वागत असला, तर उत्तमच; आपल्याला त्याची बदनामी करण्याला कांहींच श्रम पडायाचे नाहींत, परंतु यदाकदाचित् तसें कांहीं नसलें, तरी आपल्या अलौकिक बुद्धीच्या जोरानें, आपणास त्यावर कुभांड रचतां येणार नाहीं असें थोडेंच आहे! आपण हरतऱ्हा करून त्याची नालस्ती करूं, वाटतील ते पुरावे आणूं आणि वाटेल तशी दगलबाजी करून, तो अगदीं पुरा बेइमान आहे असें बादशहास भासवून त्यानें आपल्यास कबूल केल्याप्रमाणें **जोधपूर**चें राज्य त्याच्यापासून घेऊं व दक्षिणचीं सुभेदारीही मिळवूं. असें अनेक प्रकारें त्यानें मनोराज्य उभारून पुढें काय काय करावयाचें त्याचा त्यानें व्यूह रचिला. बादशहानें त्याला स्वतःला एक हजार निवडक सैन्य घेण्यास सांगितलें होतें व त्याच्याबरोबर आणखी दोन तीन हजार सैन्य **जसवंतसिंगा**स कुमक ह्मणून घेण्यास सांगितलें होतें. मोंगली सैन्य एक हजार असलें, तर त्याच्याबरोबर बाजेलोक सुमारें दोन हजार असावयाचे, त्याप्रमाणेंच **उदयभानू**च्या बरोबरच्या सैन्याची स्थिति होती. त्यानें आपणासाठीं निवडक एक हजार लोक—अगदीं अस्सल रजपूत लोक घेतले, व **जसवंतसिंगा**साठीं ह्मणून बादशहानें तीन हजार लोक दिले. एकंदर सैन्य चार हजार

आणि त्यापेक्षां दुपटीनें दुसरे लोक झाले. असा तो जंगी फौजफाटा व लवाजमा घेऊन **उदयभानू**ची स्वारी आपण **जोधपुर**चे भावी महाराणे व दक्षिणेचे सुभेदार होणार, असे मनांत मांडे खात **दिल्ली** सोडून निघाली.

हलक्या प्रतीच्या माणसास थोडासा अधिकार प्राप्त झाला, ह्मणजे त्याला असें वाटतें कीं, आपल्याला ज्यांनीं पूर्वी हीनावस्थेत पाहिलें, त्यांचे पुढें आपल्या या नवीन अधिकाराचें प्रदर्शन करावें आणि त्यांचे डोळे दिपवावे व आपल्यापुढें ते मोठ्या नम्रपणानें येतील असें करावें. **उदयभानू**स दक्षिणेंत जावयाचें, तर त्यास सरळ मार्ग नव्हता असें नाहीं; परंतु त्यास नुसती इच्छा नव्हे, मोठी महत्त्वाकांक्षा उत्पन्न झाली कीं, आपण एकदां आपल्या या स्वारशिबंदीसहित **उदेपुर**च्या हद्दींतून जावें, ह्मणजे आपण आज केवढ्या बड्या अधिकारावर आहोंत हें तेथल्या लोकांच्या ध्यानांत येऊन ते आपणास फार मान देतील. तो आतां त्या सैन्याचा पूर्णपणें मालक बनला असल्यामुळें तो ज्या रस्त्यानें जाऊं ह्मणेल त्या रस्त्यानें जाण्यास त्याला मुळींच अडचण नव्हती. आणि त्याप्रमाणें हुकूम देऊन त्यानें **अरवली**च्या बाजूचा रस्ता धरला. मजल दरमजल करीत असतां, हे सेनाधिपति अगदीं चैनीनें चालले होते; जणूं काय एखाद्या मोहिमेवर जात नसून एखाद्या तरुण सुंदरीशीं विवाह लावायलाच चालले आहेत !

औरंगजेबाच्या वेळीं सगळें मोंगली सैन्य अगदींच चैनी, आळशी व व्यसनी झालें होतें. त्यांचें जिह्वालौल्य फार, लुटालुटी करण्याकडे नेहमीं दृष्टि, आणि त्या लुटालुटींत कनक आणि कांता यांच्यावर नजर मोठी. यामुळें जेथें हें सैन्य जाऊन तळ देईल तेथें त्या प्रांतांच्या शेतांची व गांवांची अगदीं नासाडी उडायचीच. अशाच थाटानें हें आमचें **उदयभानू**च्या बरोबरचें सैन्य चाललें होतें.

उदेपुरच्या **राजसिंहा**च्या निःस्पृहतेमुळें व स्पष्टवक्तेपणामुळें **औरंगजेबा**चे मनांत त्याचेबद्दल मोठा द्वेष. तेव्हां कोण्या वेळीं काय प्रसंग आपल्यावर ओढवेल याचा नेम नाहीं, ह्मणून तो आपल्या प्रदेशांत नेहमीं अगदीं जागरूक होता. ज्या ज्या ठिकाणाहून **औरंगजेब** अचानक आपल्या राज्यांत शिरेल ह्मणून त्याचें त्याला भय वाटत होतें, त्या त्या ठिकाणीं त्यानें आपल्या विश्वासाचे व स्वराज्यासाठीं आणि स्वधर्मासाठीं प्राण देण्यास सदैव तयार असे लोक ठेविलेले असत. **कमलकुमारी**चा पति **वीरसिंह** हा **राजसिंहा**च्या फार मर्जीतला, खरा रजपुताचा बच्चा, मोंगलांचा कट्टा शत्रु आणि मोठा बाणेदार वीर होता. त्यास **राजसिंहानें** मुद्दाम अशा एका हद्दीच्या जागेवर ठेविलें होतें. आपल्या

राज्याच्या अशा निरनिराळ्या हद्दींवर **वीरसिंहा**सारखीं माणसें ठेवण्यांत **राजसिंहा**चा हेतु एवढाच कीं, केव्हांही **औरंगजेबा**चें सैन्य कोठून आल्यास यांनीं त्या सैन्यास तोंड द्यावें व आपल्यास आंत वर्दी येऊन पोहोंचून आपण तिकडे अधिक सैन्य पाठवीपर्यंत किंवा अंतस्थ तयारी करीपर्यंत त्या सैन्याशीं झुंजत रहावें. तेव्हां वास्तविक पहातां **उदयभानू**नें आपणास दक्षिणेंत नेण्यासाठीं दिलेलें सैन्य या बाजूनें नेण्याचें व वेळ पडल्यास कोठेंही झुंजत बसण्याचें कांहींच प्रयोजन नव्हतें. परंतु त्याच्यासारख्या हलक्या मनुष्याला आपली प्रतिष्ठा वाढविण्यास दुसरा मार्ग काय ? ज्या राज्यांतून आपणास **राजसिंहा**नें हांकून दिलें, त्याच राज्यांत आज आपण इतकें सैन्य घेऊन येतों आहोंत असें दाखवावें आणि वेळ वखत पडली, तर एखाद्या ठिकाणीं पराक्रम गाजवून कांहीं प्रदेश काबीज करतां आल्यास करून कांहीं रजपूत वीरही पकडून बादशहाकडे पाठवून द्यावे; निदान आपण बादशहाचे अनुयायी झाल्यानें या स्थितीला पोहोंचलों, आपल्यासारखेंच इतर रजपुतांनीं करून बादशहाची मर्जी संपादन करावी, असें तरी लोकांस दाखवावें. एक ना दोन. अशा हजारों गोष्टी मनांत आणून त्यानें आपलें तें सैन्य घेऊन त्या बाजूनें दक्षिणेंत जाण्याचा कृतनिश्चय केला व तो ठिकठिकाणीं तळ देऊन चैन करीत चालला होता. आपल्यास सध्यां दैव फार अनुकूल आहे, तेव्हां आपल्या हातून यत्किंचित् कांहीं पराक्रम झाला, तरी आपल्यास त्यापासून फार मोठा लाभ होणार, असें त्याच्या मनास पूर्णपणें वाटूं लागलें होतें. आणि त्या धुंदींत तो आपला मार्ग क्रमीत असतां **मेवाड**च्या हद्दीवरील एका अरण्यांत येऊन थडकला. त्यानें एक चांगलीशी राई पाहून तेथें तो आपला प्रचंड सेनासमुद्र पसरून ठेविला आणि आपण मौजेनें शिकार करण्याकरितां ह्मणून त्या अरण्यांत शिरला. त्याचेबरोबर त्या वेळीं सुमारें पन्नास एक निवडक शिपाई होते. ते त्या अरण्यांत रानडुकरांच्या पाठीमागें धुडघूस घालीत असतां मागील प्रकरणांत सांगितल्याप्रमाणें जेथें ती स्त्री सती जाण्याच्या तयारींत होती, तेथें येऊन थडकले आणि तिच्या सती जाण्याला **उदयभानू**नें मागील प्रकरणीं सांगितल्याप्रमाणें अडथळा केला; तर आतां आपण तिकडेच वळूं.

कमलकुमारी आपल्या पतीचें चिंतन करून त्याच्या खडावा घेऊन मोठ्या आनंदानें त्या चितेंत प्रवेश करण्याच्या बेतांत होती, तोंच यानें व याच्या लोकांनीं मागील प्रकरणांत सांगितल्याप्रमाणें तिच्याभोंवतीं घेरा घातला.

ही कोण मंडळी एकाएकीं येऊन आपल्याभोंवतीं गराडा घालून उभी आहे,

याबद्दल **संग्रामसिंहा**चा किंवा त्याच्या इतर लोकांचा प्रथम कांहीं तर्क होईना. हिंदुस्त्री– रजपुताची– क्षत्रियाची स्त्री आपल्या पतीबरोबर सहगमन करीत असतां तिच्या त्या अत्यंत पवित्र कृत्यांत अशा प्रकारें विघ्न करणारा माणूस कोणी क्षत्रिय– रजपूत– किंवा हिंदु तरी असेल, हें त्यांस संभवनीय सुद्धां वाटलें नाहीं. अर्थातच तर्क असा कीं, हे कोणी तरी मुसलमान असावे; परंतु थोड्याच वेळांत त्यांचा तो गैरसमज दूर झाला. हल्ला करणाऱ्या लोकांचा मुख्य जरी अस्सल फारसींत आपल्या लोकांस हुकूम सोडीत होता, तरी त्याच्या त्या बोलण्याच्या व आवाजाच्या ढबीवरून हा जातीचा मुसलमान नव्हे, असें स्पष्ट दिसून आलें; आणि मागील प्रकरणांत सांगितल्याप्रमाणें **कमलकुमारी**शीं त्यांच्या मुख्याचें भाषण झालें; त्यानें सर्व शंका दूरच झाली. परंतु ती वेळ व तो प्रसंग, आपल्याला विघ्न करणारे कोण व कोण जातीचे लोक, हें पहाण्याचा किंवा त्याबद्दल तर्क करण्याचा नव्हता, तर त्यांचा मारा चुकवून उलट त्यांना ठार करण्याचा व आपल्यावरलें संकट टाळून आपल्या मुलीच्या सहगमनाचा विधि यथासांग पार पाडण्याचा होता. तेव्हां **संग्रामसिंह** स्वतः आपली तरवार उपसून **उदयभानू**वर तुटून पडला, आणि त्यानें आपल्या लोकांस जिवावर उदार होऊन त्या नव्या शत्रूंशीं झुंजण्याला उत्तेजन दिलें. **कमलकुमारी**सारखी साध्वी आपल्या स्त्रीधर्मास योग्य अशा प्रकारें पतीबरोबर सहगमन करीत असतां तिला अविंधांकडून असा अडथळा आपल्यादेखत यावा, याहून रजपुतास चिडण्यास मोठें कारण कोणचें होणार ? ते आठच असामी, परंतु अतोनात चिडून जिवावर उदार झाले आणि खरोखर त्या पन्नास असामींस त्यांनीं पुरेपुरेसें केलें; पण एकास सहा असें जेथें प्रमाण पडलें, तेथें त्या लोकांनीं किती वेळ टिकाव धरावा ? त्यांपैकीं कमलकुमारी व तिची मैत्रीण **देवलदेवी** ह्या दोघी स्त्रिया व **कमलकुमा**रीचा बाप **संग्रामसिंह** मात्र तेवढा जखमी होऊन पडल्यामुळें कैद केला गेला. बाकी सर्व मंडळी मृत्यु पावली.

मग काय विचारतां ! **उदयभानू**चा चेहरा आनंदानें मध्यान्हभानूसारखा दैदीप्यमान् झाला. त्यास अर्धबोट स्वर्ग उरला आणि आपल्याला या मार्गानें दक्षिणेंत जाण्याची बुद्धि सुचली, यांत कांहीं तरी दैविक योजनाच होती, असें त्यास वाटलें व सध्यां आपले ग्रह खरोखरच मोठे उच्चीचे असून, यावेळीं आपण माती हातीं घेऊं तर तिचें सोनें होऊन जाणार आहे, असेंही त्यास वाटूं लागलें. आपण दक्षिणेंत जाण्याकरितां निघालों असतां **कमलकुमारी** आपल्या हातीं सांपडेल, असें त्याच्या स्वप्न स्वप्नांतरींसुद्धां आलें नव्हतें, इतकेंच नव्हे तर कोणी ज्योतिष्यानें जर

असें होणार, ह्मणून भविष्य वर्तवून त्यास आधीं सांगितलें असतें, तर त्याला तें खरें वाटलें नसतें. परंतु आज जो आकस्मिक प्रकार झाला, त्याचे योगानें त्यास अगदीं स्वर्गाचें राज्य मिळाल्याप्रमाणेंच होऊन तो त्या जखमी झालेल्या **संग्रामसिंहा**च्या जवळ जाऊन त्यास ह्मणतो :

" कां मामा, हंसी हंसकुळांतच यायची, कावळ्याच्या कुळांत यायची नाहीं, असा तुमचा निश्चय. पण आतां कसें काय होणार ? ज्या हंसाला ही हंसी दिलीत, तो हंस तर केव्हांच मानससरोवराला गेला, आणि ही आपली व त्याची हंसी आतां कावळ्याच्या हातांत सांपडली. ती आपल्याकडून त्या हंसाच्या मागोमाग जाणार होती, पण तिच्या नशिबीं कावळ्याशींच संसार करायचा लिहिलेला आहे. तेव्हां आतां कसें काय ? आतां त्या कावळ्याच्या हातांतून निसटायला कांहीं मार्ग आहे का ? कां मामा– आतां आपण या कावळ्याचे मामाच झालां !– आतां कां बोलत नाहीं ? "

संग्रामसिंहाला फार मोठी जखम झाली होती व **कमलकुमारी** आणि **देवला** या दोघी त्याच्याजवळ बसून आपल्या वस्त्रांचे पाट फाडून त्याची जखम बांधीत होत्या. हें या चांडाळाचें भाषण ऐकून त्यांस फार वाईट वाटलें; परंतु उपयोग काय ? दुष्ट माणसाशीं भाषण करणें ह्मणजेच आपला अधिक अपमान करण्यास त्यास साधन करून देण्यासारखें होय, असें जाणून **कमलकुमारी** आपल्या बापाच्या जखमा बांधीत बसली व रक्तस्रावानें हलक होत चाललेला **संग्रामसिंह** डोळे मिटून स्वस्थ पडून राहिला होता. **देवलदेवी** कांहीं बोलणार तों **कमलकुमारी**नें तिला दाबलें.

दुष्ट मनुष्य आपल्या शत्रूला उपरोधिक व मत्सरपूर्ण भाषणें बोलूं लागला, ह्मणजे त्यांत त्याचा हा एक मोठा हेतु असतो कीं, आपल्या प्रतिपक्ष्यानें आपल्याशीं अधरोत्तर करावें, ह्मणजे मग आपलेंही गालिप्रदानास्त्र वाटेल तसें सोडण्यास त्यास हरकत वाटत नाहीं. पण तोच जर प्रतिपक्षी अगदीं गप्प बसला, आपल्या मर्मच्छेदक भाषणावर कांहींच बोलला नाहीं, तर याला फार फार वाईट वाटून त्या प्रतिपक्ष्याचा दसपट अधिक तिट्कारा येतो याप्रमाणेंच **उदयभानू**ची या वेळीं स्थिति झाली. **संग्रामसिंह**, त्याची कन्या **कमलकुमारी** किंवा तिची सखी **देवलदेवी**, कोणीच आपल्या मर्मच्छेदक भाषणावर कांहीं प्रत्युत्तर देत नाहीं, हें पाहून तो फार चिडला आणि पुनः **कमलकुमारी**कडे व **संग्रामसिंहा**कडे पहात ह्मणतो, " **संग्रामसिंह**, तूं गप्प बसलास, ह्मणून आतां पुढें जें काय व्हायचें तें टळणार आहे, असें समजूं नकोस. **राजसिंहा**चा

मोठा अभिमानी तूं, त्या तुला मीं पकडलें आणि बादशहापुढें नेलें, कीं बादशहा अतोनात खुष होईल, आणि तुला बंदीखान्यांत टाकून ही तुझी हंसी माझ्या स्वाधीन करून देईल. मग हो **उदयभानु** तुझ्या मतानें जरी कावळा असला, तरी ही तुझी हंसी त्यालाच माळ घालील. तिनें घातलीच पाहिजे. तसें केल्याखेरीज तिला दुसरें गत्यंतरच नाहीं. जें तुझ्या मनांत माझ्यापासून दूर ठेवावयाचें होतें, तें परमेश्वराच्या–परवरदिगार अल्लाच्या–मनांत मलाच द्यायचें. पण तूं मधें आडवा येऊन आजचें उद्यांवर मात्र टाकलें होतेंस. चल, मी तुला आणि आतां माझी पत्नी होणारी जी ही **कमलकुमारी** तिला घेऊन परत बादशहाकडे जातों आणि त्याला सगळी हकीकत निवेदन करून त्याच्यापासून मी हिला आपली पत्नी करून घेतों. ''

संग्रामसिंहाच्यानें आतां राहवेना. जखमेंतून रक्तस्राव होतच होता, परंतु त्या दुष्टाच्या बोलण्यानें त्याला संताप येऊन तो एकदम उठून उभा राहून त्वेषानें **उदयभानू**स ह्मणतो, "**उदयभानु**, तूं जातीचा रजपूत ह्मणवतोस, क्षत्रिय वीर ह्मणवतोस, आणखी सतीच्या पवित्र धर्माला विघ्न करतोस ! जी पतीबरोबर सहगमन करून त्याच्याबरोबर कैलासास **एकलिंगजी**महाराजांच्या समोर जाण्याच्या तयारींत होती, तिच्या मार्गांत येऊन उभा राहून तिला त्या दुष्ट, अधम, पितृघातकी, भ्रातृघातकी चांडाळापुढें नेणार ! असाच का तूं क्षत्रिय ! असाच का तूं रजपूत ! हाच का तुला हिंदुधर्माचा अभिमान ! यापेक्षां तूं......''

हें **संग्रामसिंहा**चें भाषण ऐकून **उदयभानु** अतिशय उपरोधिकपणें मोठ्यानें हंसला आणि ह्मणतो, "**संग्रामसिंह**, आज तुला मी खरा रजपूत, खरा क्षत्रिय वाटतों अं ? मी कोण आहें याचें आपल्याला विस्मरण झालें वाटतें ? मी आपल्याला स्मरण करून देतों. पंख चुन्यांत बुडवून पांढरे करून येणारा कावळा मी आहें. क्षत्रिय नव्हें. ज्या वेळीं मी या **कमलकुमारी**ला मागणें घालण्याला आलों, त्यावेळीं आपण काय दुरुत्तरें केलीं ? माझी आई दासी होती, हा माझा दोष नव्हे. पण त्या दोषामुळें मी कावळा झालों, आतां पारडें बदललें. तेव्हां पूर्वीं जी हंसी मला तुह्मी देत नाहीं ह्मणून साफ सांगितलेंत, तीच आज तुमच्यासुद्धां माझ्या तावडींत सांपडल्याबरोबर मी क्षत्रिय, मी रजपूत ! मामा ! सांगतों ऐका. मी आतां रजपूत नाहीं, मी मुसलमान झालों आहें. आणि या **कमलकुमारी**बरोबर बादशहाच्या समक्ष मी निका लावून हिला मी आपल्याबरोबर दक्षिणेंत **कोंडाणें** किल्यावर घेऊन जाणार. समजलांत ! ''

इतकें बोलून मर्मच्छेद होईल अशा तऱ्हेनें पुनः एकदां तो विकटपणें हांसला.

प्रकरण ३ रें.

औरंगजेबापुढें.

उदयभानूला खरोखर हर्षातिरेकच झाला होता. **कमलकुमारी** आपल्यास मिळावी अशी त्याच्या मनांत फार पूर्वींची इच्छा, परंतु **वीरसिंहाचा** व तिचा विवाह झाल्यानंतर त्या इच्छेचा उपयोग काय होता? तो निराश होऊन **औरंगजेबा**कडे जाऊन त्यानें मुसलमानी धर्म स्वीकारला व हलक्यासलक्या मुसलमानांच्या मुलींशीं लग्नें केलीं. परंतु न जाणतां एकाद्या कल्पतरूखालीं बसावें आणि जें इच्छावें, तें अकल्पितपणें मिळावें, तशीच त्याची या वेळीं अवस्था झाली. असा कांहीं विलक्षण योग येईल, आणि आपल्यास ज्यानें अगदीं तुच्छ करून सोडलें होतें तोच आपले तावडींत सांपडेल, ही कल्पनासुद्धां कधीं त्या बिचाऱ्यास नव्हती. अशा वेळीं अचानक वाढून आलेल्या अमृताच्या ताटाप्रमाणेंच त्याला तो सर्व प्रकार भासला. मग काय विचारतां? असें हातीं आलेलें निधान वायां दवडावें असें कोणी मनांत तरी आणतो? त्यानें लागलीच **संग्रामसिंहास** आणि **कमलकुमारी**स ह्मटलें, "**संग्रामसिंह**जी, पुनः तुह्माला सांगतों आतां व्यर्थ त्रास करून घेऊं नका. तुह्मी आतां माझ्याबरोबर या आपल्या मुलीला घेऊन चला. मी आपला कावळा खरा, परंतु आज इतके दिवस चुन्यांत बुडवून बुडवून आपले पंख पांढरे फटफटीत केले आहेत; तेव्हां मी बाहेरून तरी निदान आतां हंस झालों आहें. आतां ही हंसी मला देण्याला कांहीं हरकत नसावी. तिला आतां **अलमगीर** बादशहाकडे घेऊन चला कसे! या बाकीच्या मंडळींनीं आपला गाशा गुंडाळलाच आहे. आतां तुह्मी, तुमची मुलगी आणखी ही दुसरी कोण मुलगी तिच्याबरोबर आहे ती, अशीं तिघें मजबरोबर चला. नाहीं तर या दुसऱ्या मुलीच्या मनांत जर परत जायचं असलं, तर तसं कळलं ह्मणजे मी तिची रवानगी करून देतों."

देवलदेवी अर्थातच कांहीं केल्या एकटी जाईना. **कमलकुमारी**ला सोडून मी कधींही जायची नाहीं, अशी तिनें **उदयभानू**च्या देखत शपथ घेतली. ती अतिशय संतापली व त्यास ह्मणतेः "**उदयभानु**, तुला आह्मी नीच व दुष्ट तर समजत होतोंच; पण तुझा नीचपणा इतक्या परमावधीला गेला असेल असं आह्मांला कधीं वाटलं नाहीं. काय? तूं अशा वेळीं पुढें येऊन इतक्या माणसांचे प्राण घेऊन सती जाणाऱ्या साध्वीला विघ्न करून तिच्याविषयीं पापवासना धरावीस? या पापाचा जबाब देशील तरी कसा?"

उदयभानु पुनः अगदीं शांतपणें हांसून ह्मणतो, " **देवलदेवी**, **कमलकुमारी**ला, **वीरसिंहा**च्या प्रेताबरोबर किंवा पादुकांबरोबर सती जाण्याचा मुळींच अधिकार पोंचत नाहीं, ती त्याची पत्नी नव्हेच. मी तिला मनानें त्याच्यापूर्वी कधींच वरलें होतें. तेव्हां मी तिच्या सती जाण्याच्या आड येण्यानें तिला खरोखर अधर्मापासून राखलें. समजलीस ? तूं भलतेंसलतेंच मनांत आणून तिच्याबरोबर येऊं नकोस. ती आतां सर्वांसमक्ष माझी पत्नी होणार. जें सुख मिळण्याकरितां मी आपले प्राणसुद्धां एकवार खर्ची घातले असते, तें सुख मला आज अनायासानें मिळतें आहे, यांतच परमेश्वराची खरी खरी इच्छा काय, ती आज दिसून आली. आतां मी तुमच्याबरोबर अधिक वेळ बोलत बसत नाहीं. तुह्माला सरळ गोष्टी दिसायच्या नाहींत. त्याला माझा इलाज नाहीं. माझें ऐकशील, तर तूं आतां जा. मी तुला माझ्या शिपायांपैकीं एक शिपाई पोहोंचविण्याला देतों, तो तुला तुझ्या नवऱ्याकडे नेऊन पोहोंचवून येईल. " इतकें बोलून तो आपल्या बाकी राहिलेल्या शिपायांकडे वळून कांहीं चौकशी करूं लागला.

कमलकुमारीनेंही पाहिलें कीं, हा दुष्ट आतां आपणास सोडीत नाहीं. आपली आतां नानाप्रकारांनीं विटंबना करणार. ईश्वरेच्छेपुढें इलाज नाहीं तेव्हां आतां आपण आपल्यावरच काय काय संकटें येतील तीं भोगावीं. **देवलदेवी**ला आणखी कशाला त्यांत गुंतूं द्यावी ? असा विचार करून ती **देवलदेवी**ला ह्मणते, " **देवल**, तूं आतां कां आपला जीव माझ्यामुळें अडचणींत घालतेस ? हे जर तुला पोंहोंचवून यायला तयार आहेत, तर तूं जाशील तेंच चांगलं. तूं मजबरोबर असल्यानं मला काय फायदा होणार आहे ? माझ्या शरीराची जी काय विटंबना व्हायची माझ्या नशिबीं असेल ती होईल. तूं जर परत गेलीस, तर कोणाला कांहीं सांगून कांहीं उपाय करतां आला, तर कदाचित् सुटका तरी होईल. तर माझं ऐक, आणखी तूं आपली जा. दुसरं कांहींसुद्धां तुझ्या हातून होईलसं मला वाटत नाहीं. **पिताजीं**ची तरी काय अवस्था होणार आहे कोणाला ठाऊक ! "

इतकें ह्मणून **कमलकुमारी** आपल्या बापाकडे पहाते, तों **संग्रामसिंह** अगदीं बेशुद्ध होऊन पडला होता. तो आतां या तडाक्यांतून वांचतो कीं नाहीं, याचीच शंका वाटूं लागली. तेव्हां **देवलदेवी कमलकुमारी**ला ह्मणते, " **कमल**, तूं कांहीं जरी ह्मटलंस, तरी माझ्या जीवांत जीव आहे तोंवर मी कांहीं तुला सोडून जाणार नाहीं. मला यांनीं ठारच मारली, तर गोष्ट निराळी; पण जोंपर्यंत या माझ्या कुडींतून प्राण गेले नाहींत तोंपर्यंत आजपासून मी तुझ्याजवळून क्षणभर

सुद्धां दूर होणार नाहीं. ज्या कांहीं हालअपेष्टा व्हायच्या असतील, त्या तुझ्या आणखी माझ्या एकदम होऊं देत. बरं, जर सुटका करून घ्यायची संधि आली, तर तुझी आणखी माझी एकदम करून घेऊं."

हें या दोघींचें बोलणें चाललें असतां तिकडे **उदयभानूचें** लक्ष्य नव्हतें ह्मणून बरें झालें. तो आपल्या कांहीं लोकांस छावणींत जाऊन दोन तीन डोल्या घेऊन येण्याविषयीं हुकूम देत होता. तें हुकूम देण्याचें काम संपल्यानंतर तो पुनः या दोघींजवळ येऊन त्यानें **संग्रामसिंहाचें** कसें काय आहे ह्मणून विचारलें. **संग्रामसिंह** अगदीं निश्चेष्ट होऊन पडला होता. त्याला आपल्या सभोंवार काय चाललें आहे तें समजतसुद्धां नसावें असें दिसलें. तो मरतो कीं काय अशी भीति **उदयभानूस** पडली. तो मेल्यानें ह्मणजे त्यास फार वाईट वाटणार होतें असें थोडेंच होतें, परंतु 'केवढा **मेवाड**चा शूर रजपूत आपण धरून आणला,' अशी **औरंगजेबापुढें** फुशारकी मारण्याला सांपडली असती, ती हा मेल्यानें नाहींशी होईल एवढीच काय ती त्याला भीति पडली होती ! तेव्हां **औरंगजेब बादशाहा**च्या पुढें नेऊन उभा करीपर्यंत त्यानें मरूं नये अशी त्याची इच्छा व ती इच्छा सफल व्हावी ह्मणून त्याचा खटाटोप ! आतां येथून ठाणें हलेपर्यंत आपण या मुलींशीं कांहीं बोलूं नये असा विचार करून, आपल्या सोबत्यांपैकीं कांहींशीं बोलण्याचें मिष करून त्यांच्यापासून थोड्या अंतरावर उभें राहून त्यानें वेळ काढिला.

थोड्या वेळानंतर डोल्या आल्या. त्या तीन डोल्यांत **संग्रामसिंह, कमलकुमारी** व **देवलदेवी** या तिघांनीं बसावें असें **उदयभानूनें** ठरविलें. परंतु **देवलदेवी** कांहीं केल्या ऐकेना. ती ह्मणे आम्ही दोघी ज्या रथांत आलों, त्याच रथांत **संग्रामसिंह**जीलाही ठेवून आह्मी दोघी बसूं. त्यांच्याजवळ आह्मी दोघी असल्याशिवाय चालावयाचें नाहीं. **उदयभानूनें** पाहिलें कीं, या कामांत आपण दुराग्रह करूं नये. तेव्हां त्या चकमकीच्या वेळीं उधळून गेलेले बैल पकडून आणण्यास त्यानें माणसें पाठविलीं, आणि ती जोडी मोठ्या मिनतवारीनें पकडून आणून रथ जोडून **देवलदेवी**च्या इच्छेप्रमाणें आंत **संग्रामसिंह**जींस ठेविलें आणि मग त्या दोघी आंत चढून दाटीवटीनें कशा तरी बसल्या.

थोड्याच वेळांत कैदींची गाडी मध्यभागीं घालून ती मंडळी निघाली. **उदयभानु** आपल्या छावणींत आला व आपल्या हाताखालच्या सेनाधिपतीला कांहीं हुकूम देऊन बरोबर निवडक ४०।५० स्वार, तीन डोल्या व ती बैलगाडी इतका लवाजमा घेऊन **दिल्ली**कडे चालला. **दिल्लीस** परत जाण्याचे वेळीं आतां सबंध

सैन्य असणें ह्मणजे फारच मूर्खपणा होईल. आपण उभ्या उभ्या जाऊन सरळपणें बादशहास झालेली हकीकत सांगून त्याचा हुकूम घेऊन परत दक्षिणेंत जावें असा त्याचा बेत. त्याप्रमाणें त्यानें आपल्या छावणींत येण्याबरोबर आपल्या दुय्यमास हुकूम दिला तो असा कीं, आतां **उदेपुर**च्या प्रांतांतून जाण्याच्या मानगडींत तुह्मी पडूं नये. झालेला प्रकार **उदेपुरास** कळल्यावर जर आपण त्यांच्या तावडींत सांपडलों, तर काय प्रसंग ओढवेल आणि काय नाहीं, कांहींच सांगतां येणार नाहीं. करितां कांहीं रस्ता माघारी जाऊन नेहमींच्या रस्त्यावर येऊन छावणी देऊन तेथें मी **दिल्ली**हून येईपर्यंत वाट पहावी. असें सांगून त्यानें **दिल्ली**ची वाट धरली. मध्येंच **संग्रामसिंहा**ला कांहीं होऊं नये ह्मणून त्यानें त्याच्यासाठीं एक सैन्यांतला वैद्य आपल्याबरोबर घेतला होता. त्या वैद्यानें आपल्याकडून शिकस्त करून **संग्रामसिंहा**च्या जखमांतून होणारा रक्तस्राव बंद केला, तेव्हां अंमळ त्याचा जीवाची आशा वाटूं लागली. मजल दरमजल करीत करीत स्वाऱ्या **दिल्लीस** येऊन पोहोंचल्या व **उदयभानूनें** बादशहाकडे आपण कां परत आलों वगैरे निरोप पाठविला.

या दरम्यान इकडे अशी मौज झाली होती कीं, **उदयभानु** गेल्यानंतर बादशहास त्याच्याहीबद्दल कांहीं संशय आला ह्मणून ह्मणा, किंवा त्याला कांहीं आणखी हुकूम द्यावयाचा होता ह्मणून ह्मणा, पण त्यानें त्याच्या मागोमाग एक हेजीब पाठविला होता. त्या हेजिबानें पांच सात मुक्कामांपर्यंत जाऊन **उदयभानू**चा शोध काढला, परंतु शोध लागेना, आणि कितीही जलदीनें जरी सैन्य गेलें, तरी इतक्या जलद कांहीं सात मुक्कामांच्या पलीकडे कोणी जाऊं नये असें पाहून त्यानें परत येऊन बादशहास सांगितलें कीं, **उदयभानु** कांहीं दक्षिणेच्या वाटेनें गेला नाहीं. शोध करतां असेंही कळून आलें कीं, तो **अरवलीकडे** गेला. तेव्हां आपला हुकूम तोडल्याबद्दल बादशहाला अतोनात राग आला, आणि **उदयभानूस** अर्ध्या वाटेवरूनच परत येण्याबद्दल हुकूम पाठवावा, व येथें येण्याबरोबर त्यालों शिक्षा करावी अशा विचारांत बादशहा होता. तोंच **उदयभानू**चा निरोप घेऊन त्याचा दूत आला. प्रथम आपली नाराजी दाखविण्याकरितां बादशहानें सात दिवसपर्यंत त्याची भेट घेतली नाहीं किंवा त्यास कोणत्याही तऱ्हेचा हुकूम दिला नाहीं. शेवटीं आठव्या दिवशीं त्याला भेटीला बोलाविलें आणि आपला हुकूम तोडून भलत्याच मार्गानें गेल्यानें दक्षिणेंत जाण्यास उशीर लावला याबद्दल, त्याला तो अतोनात बोलला. आपण अमक्यास धरून आणलें वगैरे सांगितल्याबरोबर बादशहाचा राग कमी होऊन तो आपल्याला

तेव्हांच क्षमा करील इतकेंच नव्हे, तर शाबासकी देईल असें जें **उदयभानूस** वाटत होतें, तें अर्थातच जेथल्या तेथें जिरलें. त्यानें आपल्याकडून जितक्या अतिशयोक्तीनें करावयाचें तितक्या अतिशयोक्तीनें आपल्या त्या चकमकीचें वर्णन करून असें दाखविलें कीं, **संग्रामसिंहास** पकडण्यांत आपल्यास आपल्या चातुर्याची कमाल करावी लागली. बादशहा कांहीं कमी वस्ताद नव्हता. त्यानें सर्व खरा प्रकार ओळखला आणि **कमलकुमारीस** व तिच्या बापास आपल्या समोर हजर करण्याचा **उदयभानूस** हुकूम केला.

उदयभानूस आतां मोठी पंचाईत पडली, **कमलकुमारी**ला आपण बादशहाच्या पुढें उभें केलें आणि बादशहानें तिचें सौंदर्य पाहून त्यावर लुब्ध होऊन आपल्याच जनान्यांत तिला नेऊन ठेविलें तर ? पण तसें त्याच्या मनांत येऊन काय उपयोग होता ? मुकाट्यानें बादशहाच्या हुकुमाप्रमाणें तिला व तिच्या पित्याला बादशहाच्या पुढें आणून उभें करणें त्यास भाग पडलें, आणि त्यानें त्याप्रमाणें त्यांना आणून उभें केलेंही. **संग्रामसिंह** तर अगदीं मरणोन्मुखच झाला होता. त्यास नुसतें बोलतांसुद्धां येत नव्हतें. **कमलकुमारीनें** मात्र मनाचा निश्चय असा केला होता कीं, बादशहाच्या पुढें आपणास उभें केलें असतां, आपण निर्भीडपणें त्यास आपली स्थिति, आणि या दुष्टाची कृती हीं कळवावयाचीं, आणि आपणास सोडून देण्याबद्दल विनवणी करावयाची. बादशहा दुष्ट आहे, त्याला हिंदु धर्माचा मोठा तिट्कारा, तेव्हां तो आपली विनवणी मान्य करील, हें संभवनीय नाहीं हें तिला उघडउघड दिसतच होतें. परंतु बुडणारास कोळ्याच्या सुताचाही आधार वाटतो, तशीच तिची स्थिती होऊन तिनें तो निश्चय कायम केला होता. बादशहाच्या पुढें उभी केल्याबरोबर ती एकदम त्यास ह्मणाली, " बादशहा **औरंगजेब**, तुझा धर्म कसाही असला, आणखी इतरांच्या धर्माचा कितीही तूं द्वेष करीत असलास, तरी पण पातिव्रत्य हें तर तुझ्या आणखी आमच्या धर्मांत एक आहे ना ? त्या पातिव्रत्य धर्माला उचित असा सतीधर्म मी आचरीत होतें, आणखी अशा पवित्र प्रसंगीं या दुष्टानं मला पकडून तुझ्यापुढें आणलं. अशा स्थितींत तूं मला मोकळं करून याला दंड करावास हेंच योग्य. तुझ्या धर्मांतसुद्धां स्त्रियांना पातिव्रत्य हा मोठा धर्म असं सांगितलं आहे ना ! मग मला तूं आपली मुलगी समज आणि एवढं दान दे. वाटलं तर एक वेळ याला शिक्षा करूं नको, पण माझी सुटका कर."

तिचें तें धीटपणाचें भाषण ऐकून **औरंगजेबास** किंचित् आश्चर्य व कौतुक वाटलें, पण तो ह्मणजे सगळ्या दुष्टांतला दुष्ट. तो कांहीं अशा बोलण्याला बधतो !

शिवाय **उदयभानू**सारख्या सरदारावर उपकार केले, असें दाखवून त्याची कृतज्ञता संपादावयाची ही वेळ. ती संधि फुकट जाऊं द्यायची ह्मणजे काय? कौतुक किती ? क्षणभर; पण तो क्षण निघून गेल्याबरोबर त्या भोळ्या बिचाऱ्या **कमलकुमारी**च्या बोलण्याचें व तिनें केलेल्या निर्भीडपणाचें त्याला हंसूं आलें व तो ह्मणतो, " ऐ परी, तूं ह्मणतेस तें तुझ्या दृष्टीनं बराबर. पण तुझ्यासारख्यांनीं आपल्या वेडगळ धर्माच्या नांवानं आपलं सुंदर शरीर जाळून घ्यावं, हें परमेश्वराला मुळींच पसंत नाहीं. समजलीस? हा **उदयभानु** कांहीं असा तसा मनुष्य नाहीं. फार शूर, फार चतुर, फार धोरणी आहे. तेव्हां तुझा आणखी त्याचा निका लागला, तर त्यांत पाप मुळींच लागायचं नाहीं. त्यांत धर्माच्या विरुद्ध कांहीं नाहीं. पण तुझा पति नुकताच वारला आहे, तेव्हां पहिल्या महिन्यांतच दुसरं लग्न लावणं तुला बरं वाटत नसेल, ह्मणून मी तुला आजपासून तीन महिन्यांची मुदत देतों. आणखी तीन महिनेपर्यंत तुला यानं बिलकूल कोणच्याही प्रकारचा त्रास देऊं नये. त्यानंही माझा हुकूम तोडल्याबद्दल मला त्याला शिक्षा करायचीच आहे. तेव्हां तूं त्याच्याबरोबर असून आजपासून तीन महिनेपर्यंत त्यानं तुझ्याशीं नुसतं भाषणसुद्धां करतां कामा नये हीच त्याला शिक्षा. **उदयभानु**, तूं हुकूम तोडलास त्याबद्दल तुला वास्तविक देहांतशिक्षा द्यायची. पण तुझ्यावर माझं प्रेम व विश्वासही आहे, एवढ्याकरितां मी तुला एवढीच शिक्षा करतों. ही मुलगी तुला योग्य आहे. ती मी तुझ्या स्वाधीन करतों. पण एवढी इथें माझ्या मस्तकाची शपथ वहा कीं, ' आजपासून दोन महिन्यांच्या आंत **कोंडाण्यास** जाईन आणि तेथें गेल्यावरही बरोबर एक महिनापर्यंत ह्मणजे आजपासून बरोबर तीन महिने होईपर्यंत मी हिच्याशीं संभाषणसुद्धां करणार नाहीं. ' पुरे तीन महिने झाले कीं, त्या दिवशीं रात्रीं मध्यानीचा ठोका वाजतांच पाहिजे तर तूं **काजीला** बोलावून आणून हिच्याशीं निका लाव. पण तोंपर्यंत जर कांहीं गडबड केलीस, तर हा नांवाचा **अलमगीर**बादशहा आहे, तुझे राईराई एवढे तुकडे करीन. नाहीं तर तुला जिवंतपणीं कोल्ह्यां कुत्र्यांकडून खाववीन. "

बादशहानें याप्रमाणें बोलून त्याच्याकडून आपल्या मस्तकाची शपथ वाहवून घेतली आणि ती शपथ त्यानें वाहिल्यानंतर तो हंसत हंसत ह्मणतो, " ही शपथ वाहवून घेण्यांत आणि तीन महिन्यांची मुदत देण्यांत माझा हेतु होता, तो एवढाच कीं, तीन महिने तरी तूं आपल्या कामांत जागृत राहशील. तिथें गेल्यावर एक महिना

तरी नीटपणें मीं सांगितलें त्याप्रमाणें काम करशील. काय करतोस त्याची मला ताबडतोब बातमी कळली पाहिजे अं ? "

नंतर तो **कमलकुमारी**कडे वळून ह्मणतो, " जा बेटा, आपलं शरीर क्रूरपणानं जाळून घ्यायला सांपडत नाहीं, तें जाळून घ्यायला बादशहा परवानगी देत नाहीं, म्हणून त्याला शिव्या शाप देऊं नको; उलटं त्याचं अभीष्ट चिंतन कर. समजलीस ? तीन महिने गेले ह्मणजे तुझं तुलाच झालं तें बरं झालं, असं वाटेल. बराबर तीन महिने कधीं होतात तें तुला सांगूं का ? पण तुला आमची मुसलमानी तवारीख काय समजायची ? दम धर, पंडितांकडून तुला तुझ्या शकाची तवारीख सांगतों. " असें ह्मणून त्यानें एका हिंदु पंडितास बोलावून आणून आज तुमची तिथि कोण ह्मणून विचारलें, तेव्हां त्यानें कार्तिक वद्य ९ मी असें सांगितलें. त्याबरोबर आपणच तेथून तीन महिने मोजून **बाहशहा** हंसत हंसत व दुष्टपणानें डोळे मिचकावून **कमलकुमारीस** ह्मणतो, " माघ वद्य ९ मीला तुझे तीन महिने पुरे होतात बरं का ? त्या दिवशीं तुझं पहिल्या पतीबद्दलचं पातिव्रत्य संपलं पाहिजे. " इतकें तिला उद्देशून बोलून तो पुनः **उदयभानू**कडे वळून ह्मणतो, " ऐकलंरे बोआ, माघ वद्य ९ मी पर्यंत तूं हिच्या वाटेस जाशील तर माझ्या शपथेचा तुझ्या हातून भंग होईल. तर ती अवधि लक्ष्यांत धर. आतां हिला घेऊन जा. या **संग्रामसिंहा**ला माझ्याच जवळ ठेव. मी त्याला बरा करवीन. मग पुढें काय त्याचं करायचं तें करूं. जा आतां. परवां सकाळाला तूं **दिल्ली**त उपयोगी नाहींस. "

"हिला घेऊन जा आणि **संग्रामसिंहा**ला ठेव" असे शब्द कानीं पडण्याबरोबर अंगावर वज्र पडल्याप्रमाणेंच **कमलकुमारी**ला झालें आणि ती " नका हो ! माझ्या **पिताजी**पासून–ते असे आजारी असतांना त्यांच्यापासून–मला दूर नेऊं नका. " असें आक्रोशानें विनवूं लागली. परंतु तिचें कोण ऐकतो ! बादशहानें कुत्सितपणें " तूं अगदीं काळजी करूं नकोस. तुझ्या बापाला लवकर बरा करून तुझ्या लग्नासाठीं **कोंडाण्या**वर पाठवून देतों. " असें ह्मणून त्यानें, नौकरांस **संग्रामसिंहास** आपल्या महालांतील एका विवक्षित खोलींत नेऊन ठेवण्यास सांगितलें. **संग्रामसिंहास** नेण्याबरोबर हताश झालेल्या **कमलकुमारीस** मुकाट्यानें **उदयभानू**बरोबर परत जावें लागलें.

कमलकुमारी सती जात होती त्या दिवसापासून बरोबर पंधरा दिवसांनीं वर सांगितलेली हकीकत घडून आली हें वाचकांच्या ध्यानांत आलेंच असेल. **उदय-**

भानु दिल्लीस आल्यानंतर त्यानें आपल्या घरांतच त्या कैद करून आणलेल्या मंडळीस ठेविलें होतें.

इकडे **कमलकुमारी**, **देवलदेवी** व **संग्रामसिंह** या मंडळींना त्या रानांतून पकडून नेल्याची बातमी लवकरच त्यांच्या घरोघर गेली. दुर्वार्ता नेहमीं वायूइतक्या झपाट्यानें धांवत असतात असें ह्मणतात तें कांहीं खोटें नाहीं. त्यांच्या बरोबरीचीं सर्व माणसें मारलीं गेलीं, तरी त्या बाजूनें सहज जाणाऱ्या एका भिल्लानेंच तो सर्व प्रकार पाहून हद्दीवर कळविला, आणि हद्दीवरून तो भिल्ल कामाकरितां आंत गेला तसतशी ती बातमी पसरत चालली. सर्व मंडळींच्या अंगाचा संताप झाला. पण करणार काय, इकडून कोणी पाठलाग करण्यास जाणार, तों **उदयभानु** वगैरे मंडळी **दिल्लीस**ही पोहोंचली. **राजसिंहा**पर्यंत ती बातमी गेली. त्यानें आपले लोक शोधास पाठविले, परंतु शत्रु पार निघून गेला एवढीच बातमी लागली. शेवटीं संतापून **राजसिंहानें औरंगजेबास** एक पत्रही लिहिलें. त्यांत त्यानें "रजपूत स्त्री सती जात असतां तिचें हरण करून तिला नेणें म्हणजे केवढें नीचपणाचें काम आहे ! तुझ्या सारख्या बादशहानें अशा कामीं फार कडक शिक्षा ठेवावी" असा मजकूर लिहिला. आणि तें पत्र हरकाऱ्या बरोबर मुद्दाम पाठवून दिलें. ज्या दिवशीं **उदयभानू**च्या स्वाधीन बादशहानें **कमलकुमारीस** केलें तेच दिवशीं सायंकाळीं तें पत्र येऊन पोंहोंचलें. बादशहानें तें वाचून त्याच्या चिंधड्या चिंधड्या केल्या आणि तिरस्कारानें हंसून तो आपल्याशींच पुटपुटलाः "हरामजादा, एकवार त्याचा जय झाला ह्मणून असलीं पत्रं लिहितो. पाहून घेऊं. मी खरा **अलमगीर** असेन तर या **मेवाड**च्या घराण्याचीं पाळं मुळं खणून काढीन."

राजसिंहाचा हरकारा येण्याचे आधीं एक दिवस आणखी एक रजपूत **मेवाडाहून दिल्लीस** आला होता. त्यानेंही या मंडळीचा शोध केला. एखादी गोष्ट होणार असली म्हणजे अशी मौजेनें होते कीं कांहीं विचारूं नये. तो रजपूत आला त्याच्या दुसऱ्या दिवशीं **उदयभानूला बादशहानें** बोलावून नेलें व **संग्रामसिंह** आणि **कमलकुमारी** यांस हजर करण्याविषयीं हुकूम केला त्यावरून **उदयभानु** आपल्या घरीं जाऊन त्या माणसांस घेऊन बादशहाकडे जाण्यास निघाला. त्यांची निघण्याची गडबड चालली होती, दोन तीन पालख्या दारांत आल्या होत्या. अशा वेळीं हा रजपूत सहज त्याच्या दाराजवळ गेला. त्या वेळीं **देवलदेवी बादशहाकडे** जाणाऱ्या मंडळींना दारापर्यंत पोहोंचविण्यासाठीं म्हणून आली असतां तिनें त्या रजपुतास पाहून ओळखलें आणि एकदम थांबण्याविषयीं खूण केली. तो अर्थातच

थांबला. एवढें बरें झालें कीं ती तिची खूण कोणा पहारेकऱ्यानें पाहिली नाहीं. **उदयभानु** त्या मंडळीस घेऊन गेल्यानंतर **देवलदेवीनें** दारावरच्या माडींत जाऊन एका चिठोऱ्यावर कांहीं लिहून त्या चिठोऱ्याची गोळी करून पडद्याआडून तिनें अशा बेतानें फेंकली कीं, नेमकी त्या रजपुताच्या अंगावरच पडावी. ती तशी पडली व त्यानें पाहून उचलली. तींत एवढेंच लिहिलें होतें कीं, " उद्यां तुह्मी भिकाऱ्याचा वेष घेऊन भाकरी मागण्याच्या मिषानें सकाळीं दोन वाजतां दारांशीं या. मी स्वतः भाकरी आणून वाढीन तींत चिठी असेल तीवरून सर्व काय तें समजेल." **देवलदेवीनें** ही दुसरी चिठी लिहिली त्यावेळीं जितकी हकीकत तिला ल्याहावयाची होती त्यापेक्षां त्या संध्याकाळीं तिला किती तरी अधिक हकीकत ल्याहावी लागली. ती लिहून तिनें एक भाकरी तयार करून तींत घातली. " दर दशमीच्या दिवशीं आपण स्वतः भाकरी करून स्वतःच भिकाऱ्याला एकदां सकाळीं व एकदां संध्याकाळीं घालावयाची " असा माझा नेम आहे अशी थाप ठेवून देऊन तिनें दुसरे दिवशीं नेमक्या वेळीं तो भिकारी आल्याबरोबर त्यास ती भाकरी घातली. आणि त्यास संध्याकाळीं पुनः दुसरी भाकरी नेण्यास बोलाविलें. त्याप्रमाणें तो आला त्या वेळीं भाकरी घेतांना त्यानें एक चिठोरें चोरून तिच्या पायाशीं टाकलें.

परंतु या चिठोऱ्यांत काय होतें आणि हा रजपूत कोण होता हें पुढें कळेल.

ती रात्र उलटल्यावर चंद्रोदयीं **उदयभानु कमलकुमारीस** व **देवलदेवीस** घेऊन दक्षिणेकडे जाण्यास निघाला.

प्रकरण ४ थें.

लग्नाचें आमंत्रण.

—:o:—

उमराठें गांव तें केवढें ! परंतु त्या गांवांत माघ शुद्ध नवमीच्या दिवशीं ह्मणजे मागील प्रकरणांत सांगितलेल्या हकीकतीनंतर अडीच महिन्यांनीं अगदीं गर्दी उडून गेली होती. कोंकणची वस्ती, फार दाट नव्हे, तरी पण **शिवाजीमहाराजांचा** जिवलग स्नेही—केवळ उजवा हात—जो सुभेदार **तानाजी मालुसरे,** त्याचें तें गांव असल्यामुळें साहजिकच सध्यां त्या गांवची वस्ती वाढली होती. तशांत सुभेदार **तानाजी** हल्लीं कांहीं कारणाकरितां महाराजांपासून रजा घेऊन **उमराठ्यास** आले होते, त्यामुळें आसपासच्या गांवची मंडळीही तेथें आली होती. सुभेदारांबरोबरही बरेच शिलेदार आणि बारगीर होते, यामुळें एक लहानशी छाव-

णीच सध्यां **उमराठें** गांवास पडली होती असें ह्मटलें तरी चालेल. आपल्या गांवचा **तानाजी** हा आतां मोठा सुभेदार होऊन **शिवाजी**महाराजांच्या गळ्यांतला ताईत झाला आहे, हें पाहून गांवांतील आबालवृद्ध स्त्रीपुरुषांस अतोनात आनंद व अभिमान वाटत असे. त्याच्या शौर्याच्या गोष्टी ऐकून वृद्ध मंडळी त्याचें कौतुक करीत; आपल्याला त्याच्या हाताखालीं महाराजांच्या लष्करांत बारगिरी मिळेल, ह्मणून तरुण मंडळींना, मोठी आशा उत्पन्न होऊन, आपणही एक दिवस असेच सुभेदार होऊन आपल्या गांवास परत येऊं, अशी महत्त्वाकांक्षाही त्यांच्या अंतःकरणांत निपजे. मुलें तर **तानाजी**, **शिवाजी**महाराज, मोंगलबादशहा, विजापुरचा बादशहा वगैरेंचीं सोंगें घेऊन राज्यस्थापनेचे, किल्ले सर करण्याचे, असेच खेळ खेळत. सारांश, एक मोठा शूर पुरुष त्या महाडाखालच्या अगदीं यःकश्चित् खेड्यांत निपजल्याकारणानें त्या सगळ्या टापूंतील लोकांत किती तरी अभिमान जागृत झाला होता व किती महत्त्वाकांक्षा उत्पन्न झाली होती त्याचें वर्णन करून सांगणें केवळ अशक्यच आहे. त्यांतून तो शूर पुरुष चार दिवस गांवांत स्वस्थ राहण्यासाठीं आलेला. मग काय विचारतां ? त्याला एकवार पहावें, त्याच्याशीं भाषण करण्यास सांपडलें, तर फारच चांगलें, पण निदान त्याच्या तोंडून महाराजांच्या कथा तरी ऐकाव्या, एवढ्या हेतूनें आज पंधरा वीस दिवस **तानाजी**च्या घरीं जणों मोठी थोरली जत्रा भरल्याप्रमाणें लोक येत होते. परंतु आज ह्मणजे माघ शुद्ध नवमीच्या दिवशीं तर सगळा गांव **तानाजी**च्या घराशीं लोटला होता. आणि ज्याच्या त्याच्या चेहऱ्यावर अगदीं आनंदी–आनंद दिसत होता. सुभेदार **तानाजी** पोषाख घालून घोड्यावर स्वार होऊन आपली भालाबरची सरसावून घेऊन दुसऱ्या एका त्याच्याचप्रमाणें घोड्यावर स्वार होत असलेल्या अत्यंत वृद्ध मनुष्याशीं कांहीं बोलत होते. त्याच्या पलीकडे एक सुमारें ८ वर्षांचा मुलगा **तानाजी**प्रमाणेंच अगदीं हुबेहुब पोषाख करून व त्यांच्याप्रमाणें आपलीं लहान लहान हत्यारें सरसावून ऐटीनें एका लहानशा घोड्यावर स्वार होण्यासाठीं धडपड करीत होता. त्या मुलाच्या चेहऱ्याकडे पाहून एकवार **तानाजी**च्या चेहऱ्याकडे पाहिलें पुरे, कीं हे बापलेक आहेत हें शब्दांनीं सांगण्याची मुळींच जरूरी रहात नसे. **रायबा**–हें त्या छोटेखानी सरदाराचें नांव–चेहऱ्यानें आपल्या बापाची अगदीं प्रतिमा असे. आणि आपला बाप जसें करील तसें हुबेहुब करण्याच्या मुलांच्या स्वभावाला अनुसरून त्यानें बापाप्रमाणेंच हुबेहुब पोषाख वगैरे करून घोड्यावर स्वार होऊन त्याच्याबरोबर तो जाईल तिकडे जाण्याचा हट्ट धरला

होता. त्याचें तें मराठेशाही कंगणीदार चिमुकलें पागोटें, त्याच्या दोन पट्या कानावरून हनवटीखालून घेऊन त्या वेळच्या शिपायी गड्याप्रमाणें बांधलें होतें. त्यानें एक मांडचोळणा चढविला होता. अंगांत रूमरी अंगरखा कमरेपर्यंत लांबीचा आणि छातीवर पेलेदार शिवणीचा असा बंदांनीं बांधलेला होता. कमरेस कमरबंद असून त्यांत एक चिमकुली तरवार बांधलेली होती. हातांत एक त्याच्याचजोगा भाला आणि पाठीला ढाल बांधली होती. अशा तऱ्हेनें हा चिमुकला सरदार तयार होऊन बापाच्या पुढें आपला घोडा दवडण्यास अगदीं उत्सुक झाला होता. गांवांतल्या सगळ्या बायका त्याच्याकडे मोठ्या प्रेमभरित दृष्टीनें पाहून, आपापल्या मुलांना घट्ट पोटाशीं धरून आनंद व प्रेमाश्रु ढाळीत होत्या. कित्येक ह्मातान्या बाया, या पोराला दृष्ट लागेल ह्मणून दुरूनच त्याच्यावरून हात ओंवाळून 'इडापिडा टळो,' असें ह्मणून आपापल्या कानशिलावर बोटें मोडीत होत्या. **तानाजी**ची मातुःश्री सगळ्यांत पुढें होती, ती **रायबा**च्याजवळ जाऊन त्याच्या तोंडावरून हात फिरवून त्यास ह्मणते, " पुरे. नाहीं का झाली हौस अजून पुरेशी ? उतर आतां खालीं. तिकडे महाराजांकडे गेलांत, तर महाराज आतांच तुमचं शौर्य पाहून तुह्माला कुठें मोहिमेवर पाठवतील ! "

तें तिचें बोलणें ऐकून जवळची सर्व मंडळी हंसली; परंतु तो चिमुकला रणधीर ह्मणतो, " मग मी कांहीं लढाई मारणार नाहीं का काय ? महाराजांनीं त्या **अफझुलखाना**ला मारला तस्सा अगदीं मी कोणा तरी खानाला मारीन " असें ह्मणून त्यानें गुलामानें आपल्या कमरेच्या तरवारीस हात घातला. त्या वेळची त्या मुलाची ऐट पाहून सर्व मंडळींस फारच मौज वाटली आणि एकच हशा पिकला. कित्येक ह्मातान्या लोकांच्या डोळ्यांतून तर अश्रुसुद्धां आले.

त्या मुलाला उतरवून घेण्याचा हा आपला यत्न फसला असें पाहून त्याची वृद्ध आजी त्याला पुनः ह्मणते, " तूं आपल्या लग्नाचं आवतण द्यायला तूंच जातोस ? महाराज काय ह्मणतील तुला ? अगदीं वेडा आहे ह्मणतील. शुद्ध वेडा ! आणखी ह्मणतील अशा वेड्याचं कशाला लगीन काढलंत ? कांहीं याचं लगीन करूं नका. आणखी याला इथेंच ठेवा. "

" मग मी रहाणार नाहीं का ? " मुलगा अगदीं गंभीरपणानें ह्मणतो:, " मी राहीन आणखी त्यांना ह्मणेन, ' महाराज मला न्या आपल्याबरोबर लढाईला. मग महाराजांच्या एका बाजूला बाबा आणि एका बाजूला मी असे आह्मी जाऊं लढाई करायला. मी मग आपली तरवार अशी उपसून हातांत धरून चालेन ! "

तो त्या वेळचा त्या मुलाचा आविर्भाव पाहून आणि खरोखरीच त्यानें आपली ती छोटी तरवार उपसलेली पाहून तर मंडळींना फारच कौतुक वाटलें. इतक्यांत तो घोड्यावर बसलेला वृद्ध गृहस्थ त्या वृद्ध स्त्रीकडे वळून ह्मणतो, "**जानकी**आका, तो कांहीं ऐकायचा नाहीं. तूं कां उगीच त्याला ठेवून घ्यायला पाहते आहेस ? येऊंदे गुलामाला. एकदां त्याचला त्रास पाहिला ह्मणजे पुनः कांहीं कधीं मी येतों ह्मणून हट्ट करायचा नाहीं. दम धर गुलामा, तुला एक दिवस आतां फांका पडला पाहिजे, ह्मणजे समजेल सुख काय आहे तें ! **ताना**, आतां उगीच का मंडळीशीं बोलत वेळ घालवतो आहेस ? चल. "

हा वृद्ध गृहस्थ ऐशीं वर्षांच्या वर उमरीचा होता, पण अजून त्याचें शरीर कसें पीळदार व कसलेलें दिसत होतें ! त्याचे केंस पांढरे झाले होते, एवढीच कायती ह्मातारपणची कळा त्याच्या अंगावर दिसत होती. बाकी दृष्टि अगदीं घारीसारखी तीक्ष्ण होती. दांत सगळे शाबूत आणि अंगांत तरतरी अगदीं पंचविशीच्या भरांत असलेल्या तरुणासारखी. हा **तानाजी**चा **मामा** होय. याला सगळ्या गांवांत **शेलारमामा** ह्मणत, आणि त्याची बहीण **तानाजी**ची मातुःश्रीही त्याला विनोदानें त्याच नांवानें हांक मारी.

वरील बोलणें बोलून **शेलारमामांनीं** आपल्या घोड्यास टांच देऊन जरा घोडा पुढें काढण्याची आपली उत्सुकता दर्शविली. इतक्यांत **तानाजीनें** आपल्या मातुःश्रीकडे पाहून एकवार लवून नमस्कार करून व सर्वत्र मंडळींसही रामराम करून आपल्या चिरंजिवास, " हं चला, **रायबा शिलेदार** !" असें ह्मटलें. **रायबानें**ही मोठ्या औत्सुक्यानें आपला घोडा पुढें काढला. मंडळी निघाली, तेव्हां जमलेल्या लोकांपैकीं बऱ्याच जणांनीं ओरडून त्या दोघांस ह्मटलें,"**तानाजी**, अगदीं चांगला आग्रह करा बरं का. महाराज आले पाहिजेत. आह्मी सगळी मंडळी तुमची वाट पहातों. महाराजांचे पाय इथें या आमच्या गांवाला लागले पाहिजेत. पाहूं आतां तुमचं काय वजन महाराजांजवळ आहे तें. **शेलारमामा**, हो **शेलारमामा**, आपण जातां आहां, अपेश घेऊन येऊं नका. आह्मी सगळे तुमच्या वाटेकडे डोळे लावून बसूं. परत याल ते महाराज येताहेत ह्मणून सांगायला या. नाहीं तर याल कांहीं तरी सबब घेऊन.......”

एक **शेलारमामा**च्या बरोबरीचा ह्मातारा तर ओरडून ह्मणाला, " **शेलार-मामा**, महाराजांना सांगा कीं, आमच्या गांवचे आणखी आसपासच्या गांवचे बारगीर निदान एक हजार तरी आपल्याकडे आहेत, तेव्हां त्यांची सेवा मनांत आणून एकदां याच. नाहीं ह्मणूं नका. "

तेव्हां **शेलारमामा**ही त्याला ह्मणतो, " अरे **काळदादा**, त्याची नको तुला काळजी ! महाराजांला आवातण करून त्यांनीं नाहीं तर ह्मणूं दे, कीं मग हा **शेलारमामा** उगीच बसायचा नाहीं. ह्मणेन महाराजा, तुला आमच्या गांवाला आलं पाहिजे. मी ८० वर्षांचा ह्मातारा तुझ्या बापासारखा आहें. माझीं तीन पोरं तुझ्या तैनातीला आहेत. हा **तान्या** भाचा तर मुंडी हातावर घेऊन उभा आहे, आणखी त्याच्या मुलाच्या लग्नाला ये ह्मटलं तर नाहीं ह्मणतोस ? मग आह्मी आपल्या गांवाला तोंड वांकडं करून जावं होय ? आन् मग लोक काय ह्मणतील ? **काळदादा**, बघ असं बोलन्, गप्प नाहीं बसायचा. धन्याची हमेष चाकरी करावी अन् मग एक दिवस आमच्याच् आवातण्याला मान देऊं नये धन्यानं ! इतकं बोलल्या-वर मग काय बिसाद् आहे **शिवाजी**महाराजांची नाहीं ह्मणायची ? तुह्मी छान तयारी ठेवा. ते आमच्या **रायबा**च्या लग्नाला येणार. अगदीं खचित येणार. हा **शेलारमामा** कधीं तसा हात हालवीत यायचा नाहीं. त्यांना बजावून सांगन दहा बारा दिवस आधीं आलों आहें आवातण द्यायला. काय कामं बिमं असतील त्यांची वेळींच तजवीज लावून या. आमच्या गांवीं चार दिवस तरी राह्यलं पाहिजे."

काळूदादा शेलारमामाचें तें भाषण ऐकून मनांत आनंदला; पण **शेलार-मामास** आणखी चिडविण्याकरितां ह्मणतो, " **शेलारमामा**, इथें तर खुप लांबलांब गप्पा मारतो आहेस, पण त्या गप्पांप्रमाणं तिथें बोलून महाराजांला आण ह्मणजे झालं. नाहीं तर **शिवाजीराजा**ला काम फार, तो तुला शेलामुंडा-शाचा पोषाख देईल, आणखी तूं त्यांतच खूष होऊन येशील परत. "

" अरे जा मर्दा, **शिवाजीराजा**नं नाहीं तर ह्मणूं दे ह्मणजे मग सांगन त्याला. तूं आमचं ऐकत नाहींस, तर आह्मी का तुझ्यासाठीं मरावं ? तो काय नाहीं ह्मणतो रे, त्याच्या बाला मी भ्यायचा नाहीं बोलायला, तो काय त्याला भितों ! माझ्या आवातण्याला मान देऊन येणार तो. तुह्मी अगदीं निश्चित असा."

तें बोलणें ऐकल्यावर जरा **काळूदादा**चें समाधान झालें. आतां हा **शेलार-मामा शिवाजी**महाराजांपासून होय असा जबाब घेतल्यावांचून येत नाहीं, अशी त्याची खात्री झाली आणि सर्वत्रांनाही तसें समाधान झालें. आपल्या गांवच्या **तानाजी**च्या इथें **शिवाजी**महाराज लग्नाला येणार ही भुमका उठल्याबरोबर जो तो अतोनात आनंदला. महाराज आले असतां आपल्या घराला कसें सजवा-यचें, गुढ्यातोरणें कशीं उभारायाचीं, याच्याबद्दल सगळे लोक विचार करूं लागले.

शिवाजीमहाराज ह्मणजे प्रत्यक्ष **शिवाचा** अवतार. मोंगलांपासून देशाला फार त्रास झाल्यामुळें त्या त्रासापासून गरीबगुरीबांना सोडवण्यासाठीं प्रत्यक्ष **शंकरच** त्यांच्या रूपानें पृथ्वीवर अवतरले असें ज्याला त्याला वाटे, आणि सर्वत्रांच्या ठायीं त्यांच्यासंबंधानें इतकी पूज्यबुद्धि असे कीं, ते ज्या गांवाला जातील, त्या गांवाचें मोठें भाग्य, असें सर्वांस वाटून आपल्या गांवचें कधीं असें सुदैव उघडेल तें उघडो. आपल्यास त्या पुरुषाचें दर्शन कधीं होईल, तो सुदिन असें प्रत्येक व्यक्तीस वाटे. अर्थातच **उमराठ्या**च्या लोकांना अतोनात आनंद झाला आणि त्यामुळें **तानाजी, शेलारमामा** व **रायबा राजगडा**कडे जाण्यास निघण्यापूर्वीं आणि ते गेल्यानंतरही कित्येक दिवसपर्यंत लोकांच्या बोलण्याचा विषय **शिवाजी**महाराजांचें भावी आगमन एवढाच होता. सकाळीं उठल्यापासून तों रात्रीं निजेपर्यंत महाराजांचा **उमराठ्या**च्या मंडळींना नुसता निदिध्यास लागून राहिलेला होता; आणि आजूबाजूस सुमारें तीस चाळीस कोस प्रांतांत ती महाराजांच्या भावी आगमनाची आनंदवार्ता पसरल्यापासून तेथल्या लोकांनींही महाराजांस पहाण्यास येण्याचे बेत चालविले.

परंतु आपण आतां या मंडळीस त्यांच्या आनंदांत सोडून, महाराजांस आमंत्रण देण्यासाठीं निघालेल्या **शेलारमामा, तानाजी** व **रायबा** यांच्याबरोबर **राजगडा**कडे जाऊं.

या तीन मूर्ति वर सांगितल्याप्रमाणें पोषाख करून व हत्यारबंद होऊन पुढें चालल्या होत्या व त्यांचे मागून सुमारें दहा शिलेदार व चाळीस बारगीर चालले होते. सुभेदारांनीं आपल्याबरोबर इतका सुद्धां लवाजमा घेण्याचें योजलें नव्हतें, परंतु कांहीं तरी लोक असावे असें मनांत येऊन त्यांनीं तितके लोक बरोबर येऊं दिले.

ती त्रयी पुढें चालली होती. तिघांच्याही मनांत त्या वेळीं एकाच मूर्तीचें चिंतन चाललें होतें. वार्धक्य, तारुण्य आणि बाल्य तीन अवस्था जणूं काय मनुष्यरूप घेऊन त्या वेळीं तेथून चालल्या होत्या. **शेलारमामा** सुमारें ८० वर्षांचा, **तानाजी** सुमारें ४० वर्षांचा व **रायबा** ८ वर्षांचा.

परंतु आपापल्या परीनें ते तिघेही **शिवाजी**महाराजांच्यासंबंधानेंच विचार करीत होते. आपण स्वतः आलों आहोंत, तेव्हां **शिवाजी**महाराज आमंत्रणाला मान देणारच. आपण त्यांला स्पष्टपणें आणि निःस्पृहपणें बोलूं. त्याच्या आईला—

जिजाबाईला—आपण सांगूं, आणि तिला देखील घेऊन येऊं. असे विचार **शेलारमामा**च्या मनांत चालले होते. **तानाजी**च्या मनांत हल्लीं महाराज काय विचारांत असतील, आपण गेल्याबरोबर काय काय बातम्या आपल्या कानीं येतील, **दिल्ली**च्या बादशहाची आतां काय चळवळ चालली असेल, **विजापूर**ची काय हालहवाल असेल, इत्यादि गोष्टींचा विचार चालला होता. आणि **रायबा** अगदीं लहान बालक, पण तो प्रत्येक बाबतींत आपल्या बापाचें अनुकरण करण्याचा यत्न करीत होता. आपल्या बापानें घोड्याचा लगाम कसा धरला आहे, तसा आपण धरावा; त्यानें भाला कसा धरला आहे, तसा आपण धरावा; असें त्याचें काम चाललें होतें. मधून मधून **शिवाजी**-महाराज कसे असतील, आपल्याला काय ह्मणतील, मग आपण काय उत्तर देऊं, याबद्दलही त्याच्या चिमुकल्या मनांत विचार येतच होते. अशा तऱ्हेनें ती स्वारी चालली होती. **तानाजी**विषयीं तिकडल्या प्रांतांत फार मान. तेव्हां **राजगडा**कडे येतांना जीं जीं गांवें त्यांना लागलीं, तेथले तेथले लोक त्यांना भेटून सामोरे जाऊन **शिवाजी**महाराजांनीं यावेंच अशा प्रकारचा आग्रह करण्याविषयीं त्यास व **शेलारमामास** विनंति करीत. **रायबा** लहान, त्यास एकदम **राजगडा**-पर्यंतची मजल व्हायची नाहीं आणि तशी मजल करण्याची तितकी तातडीही नव्हती, यामुळें त्यांनीं तेवढ्या त्या अंतरांतच तीन मुक्काम करण्याचें योजिलें होतें.

घाट चढूं लागल्यापासून सुमारें दोन कोस जाईपर्यंत कोणी कांहीं बोललें नाहीं; परंतु मग **तानाजी शेलारमामा**स ह्मणतो, " मामा, देवानं या पुरुषाला आयुष्य मात्र पुरं द्यावं. हा मोंगलांचं चंदन उडवून आपलं स्वराज्य स्थापून **रामराज्या**-सारखं सगळ्यांना अगदीं सुख देईल बघ. अरे, आह्मी लहानपणचे सौंगडी, पण तेव्हांपासून त्यानं आह्मांला काय वाटेल तें सांगावं अन् आह्मी तें मुकाट्यानं करावं असं आम्हांला वाटे. तेव्हांपासून आह्मी त्याला आमचा राजा म्हणायचे. त्याच्या एकेक युक्त्या आठवल्या कीं, अगदीं धन्य वाटते बघ. अन् पुनः जीवाला जीव ह्मणजे कसा द्यायचा कीं, प्रत्यक्ष आपला भाऊ असला, तरी सुद्धां तो इतका देणार नाहीं. आतां सहज मला आठवलं, एकदां अगदीं लहानपणीं, आह्मी असूं असे १८।१९ वर्षा-च्या वयाचे—सुलतानगड घेतल्याच्या आधीं थोडे दिवस—स्वराज्याचं तोरण बांधलं तेव्हांच ह्मणेनास—पुरंदरावर **श्रीधरस्वामीं**ना त्या मुसंड्यांनीं कैद करून ठेवलं. तेव्हां काय सोळा आणे युक्ति करून सोडवलं आहे महाराजांनीं ह्मणतोस त्यांना ! आह्मी तर अगदीं चकित झालों बोआ. तसंच परवां नुकता **अफझुल**-

खानाचा कांटा उपटून काढला, तो तरी काय शिताफीनं! गुलाम, महाराजांचा प्राण घेण्यासाठीं काय युक्ति करून आला होता! किती लबाडी त्यानं केली होती. काय साखर पेरली होती! त्याच्या मनांत महाराजांना बेसावध गांठून त्यांचा पुरा घात करावा. पण महाराज कसले वस्ताद! ते ह्मणाले कीं, या गुलामाचा कांहीं नेम नाहीं. गाईच्या पुढें खाणं ठेवून तिला तोडणारे लोक हे, यांच्याशीं नेहमीं सावधपणानंच वागलं पाहिजे. आपण आपले जय्यत तयारी करून जाऊं. वेळ प्रसंग आला, तर आपली तयारी असावी. ती त्यांची तयारी त्यांना आयत्या वेळीं उपयोगी पडली. त्या **अफझुलखाना**ला कोण मद चढलेला, गुलाम काय मत्त झाला होता! महाराजांना अगदीं कस्पटाप्रमाणें मानून आला. आणखी भेट घेण्याच्या मिषानं त्यानं महाराजांना धरून त्यांची मुंडी काखेंत दाबूं लागला. मग काय, महाराज असें कांहीं तरी होणार हें जाणूनच होते. लगेच त्यांनीं प्रसंगाला योग्य तें करून त्या विश्वासघातक्याचा घात केला. मी बरोबर होतों. कोणच्याही कामांत किंवा कसल्याही संकटांत डगमगणं-भिणं हें कसं तें त्यांच्या गांवींसुद्धां नसतं. बस् सेवाचाकरी करावी, तर अशाच राजाची करावी. **शेलारमामा**, मला जर त्यांनीं असं सांगितलं, 'आत्तां या कड्याखालीं उडी टाक,' तर टाकीन, कधीं असं कसं करावं असंसुद्धां मनांत आणायचा नाहीं. **शिवाजी**राजाची चाकरी बजावतां बजावतां जर मृत्यु आला, तर त्यांत किती तरी आनंद आहे! पण जिवावरचं काम आमच्यावर सोंपवायपूर्वीं आपणच ते पुढें होतात. आतां जर कांहीं कामगिरी त्यांनीं काढिली, तर त्यांना मी सांगणार आहें कीं, आपण जागचे हलूं नये. मग मी कामगिरीला हात घालीन. तूंच बघ मामा, अरे, आमच्यासारखा चचला तर त्यांत काय व्हायचं आहे? आणखी शेंकडों पुढें येतीलन् कामगिऱ्या करतील. पण यांच्याच जिवाला जर कांहीं झालं, तर बाकीच्यांची काय अवस्था होणार? बोल, मी ह्मणतों तें खरं का खोटं तें?"

शेलारमामा त्यावर ह्मणतो, "अगदीं बरोबर. त्यांनीं आतां नुसता हुकूम सोडावा. मीं आतां त्यांना असाच सल्ला देईन. पर कायरे, ते **रायबा**च्या लग्नाला येतील का? अन् **जिजाबाई**साहेबाला बोलावायला **जानकी**आका आली असती तर बरं झालं असतं न्हाई? ती एक धन्य माउली आहे, तिची लई दिसांत भेट नाईं झाली. आतां भेटली तर तिला म्हणन्, 'बया! धन्य मावली तूं, तुझ्या पोटीं हा **शिवाजी** नाहीं, प्रत्यक्ष **महादेव** आला आहे **महादेव-सांब** अ.ऱा आहे.' कायरे **राया**, अरे दमलास का? थूः ल्येका, तूं म्हणतोसना मी असं

करीन न् तसं करीन्. तरी सांगत होतों कीं, तूं येऊं नको आमच्याबरोबर. रिकामा त्रास घेऊं नको. पण ऐकतोस कुठें ?"

रायबा लागलीच जरा तरतरी धरून ह्मणतो, "मी थकलों ! मी नाहीं बा मुळींच थकलों. वा ! मी आणखी पंधरा कोस तुमच्याबरोबर येईन. बाबा, मी थकलों आहें काहो ?"

थंडीचे दिवस. परंतु कोंकणांत त्या प्रांतीं तशी थंडी नसते. त्यांतून ही मंडळी निघाली, ती चांगली दिवस उगवल्यावर निघालेली. यामुळें कांहीं वेळानें ऊन कडक होत चाललें, तेव्हां उन्हाचा त्रास होऊं लागला. **शेलारमामा** आणि **तानाजी** यांना त्या उन्हाचें कांहींच वाटत नव्हतें. प्रसंगीं तसल्या उन्हांतच ते पंचवीस पंचवीस कोससुद्धां गेले असते. परंतु बरोबर त्या पोराला घेतलें होतें, तेव्हां अर्थातच त्यांना तितकी दांडगाई करतां येईना. यामुळें धीरेधीरेच स्वाऱ्या चालल्या. मजेदार छाया कोठें दिसली कीं, तेथें जरा उतरावें, **रायबाला** कांहीं खायाला द्यावें, त्याची थट्टा करावी, मौजेंत थोडा वेळ घालवावा आणि पुढें चालावें. असें करीत करीत घाट वगैरे चढून ती तीन मंडळी आपल्या लवाजम्यासकट **राजगडा**जवळ येऊन थडकली. **शिवाजी**राजे त्यावेळीं **राजगडास** होते, आणि कर्मधर्मसंयोगानें त्यांच्या मातुःश्रीही **प्रतापगडा**हून तेथेंच आलेल्या होत्या. गडाच्या पायथ्याशीं मंडळी आली, तेव्हांच ही बातमी त्यांना समजली. त्यामुळें **शेलारमामास** विशेष आनंद झाला.

गडाच्या पायथ्याशीं येतांच त्यांनीं आधीं रीतीप्रमाणें वर वर्दी पोहोंचविली आणि हळूहळू ते गड चढूं लागले. **शिवाजी**राजे या वेळीं काय उद्योगांत असतील, आणि आपण जाऊन पोहोंचतांक्षणीं आपल्याला काय ह्मणतील, याविषयीं तर्कवितर्क **तानाजी**चे मनांत चालले होते. महाराज कधीं अगदीं स्वस्थ बसलेले असे आढळायचेच नाहींत, ही त्याच्या मनाची खात्री होती. **शेलारमामा**, आपण आतां **शिवाजी**राजाच्यापुढें गेल्यावर काय बोलावें आणखी कसें बोलावें याबद्दल विचार करीत होते. आणि **रायबाला** गड चढणें अशक्य–निदान इतकी मजल मारून आल्यावर त्याला चढूं देणें वाजवी नाहीं, ह्मणून त्याला एका गड्याच्या खांद्यावर बसवून चालविला होता. तो इतका उत्सुक झाला होता कीं, तो गडी आणि आपले वडील व आजोबा यांच्यापेक्षां चौप्पट वेगानें चालून एकदम महाराजांच्या पुढें जाऊन उभें राहावें, असेंच त्याला वाटत होतें.

होतां होतां मंडळी वर गेली. महाराज सदरेलाच बसलेले होते. **तानाजी** आले आहेत अशी वर्दी चोपदारानें देतांच त्यांनीं त्यांना तावडतोब येण्याबद्दल सूचना पाठविली आणि लागलीच ती मंडळी महाराजांच्या पुढें येऊन उभी राहिली. **शेलारमामा** अगदीं लवून रामराम करायला वांकणार, तोंच **शिवाजी**महाराज आपण होऊन उठले व त्यांनीं एकदम **शेलारमामा**चा हात धरला आणि "**मामा**-साहेब, आह्मी राजे झालों तरी तुह्माला नाहीं हो राजे ! इतरांना राजे. तुह्माला आह्मी आपले लहान तुमच्या मुलासारखेच. आपण आह्मांला आमच्या वडिलांसारखे. आपल्या आशीर्वादानें तर आह्मी या थोर पदवीला येऊन पोंहोंचलों. असे बसा या इथें गादीवर. "

असें ह्मणून **शेलारमामास** त्यांनीं आपल्या उजव्या बाजूस बसविलें. तो आदर पाहून त्या वृद्ध मामास अतिशय आनंद झाला व एकदम प्रेमाश्रु येऊन त्यानें त्या प्रेमाच्या भरांत महाराजांच्या पाठीवर शाबासकी दिल्याप्रमाणें हात मारून ह्मटलें, " **शिवाजी**राजा, आह्मासारखीं गरीब माणसं, केवळ वृद्ध ह्मणून तूं आमचा इतका आदर करतोस, तेव्हां तुला कधीं सुद्धां कुठें अपेश यायचं नाहीं. देशांतल्या ह्मातान्या लोकांचे आशीर्वाद ज्याला मिळतील त्याला अपेश शिवायचंसुद्धां नाहीं. मी आज तुला आवातण द्यायला आलों आहें. **रायबा**, ये महाराजांना दंडवत घाल. हा तुझ्या **तानाजी**चा मुलगा. **जानकी**आकानं याचं लगीन काढलं आहे. लगीन धरलं आहे या महिन्यांत काळोख्या पंधरवड्यांत नवमीचं. तर तुला आलं पाहिजे. चार दिवस मांडवशोभा केली पाहिजे. गरिबाचं घर ह्मणून नाहीं ह्मणूं नको. "

शेलारमामा हें बोलत असतां **रायबा**नें महाराजांस साष्टांग दंडवत घातलें, तों त्याची ती गोजिरवाणी मूर्ति पाहून **शिवाजी**महाराजांस फारच कौतुक वाटलें आणि त्यांनीं त्यास एकदम आपल्याजवळ ओढून घेऊन ह्मटलें, " अरे वा ! हे आमचे छोटे सुभेदार काय ? काय हो तुह्मी आपल्या लग्नाचं आमंत्रण आपणच द्यायला आलां का ? पाहूं पाहूं, तुमची तलवार तर पाहूं ! " असें ह्मणून महाराजांनीं त्याच्या तलवारीस हात लावला. त्याबरोबर **रायबा**च्या मनास काय वाटलें तो एकदम ह्मणतो, " महाराज, मला एक खरी तलवार द्याहो, ह्मणजे मी बाबाबरोबर जाऊन मोंगलांशीं लढाई करीन. "

" हं हं ? अरे वा ! मग आह्मी तुह्माला छोटे सुभेदार ह्मटलं तें उगीच का ?

काय **तानाजी**राव, ही स्वारी तर तुमच्याहून सवाई शूर होणार असं दिसतं. आतां लग्न काढलं आहेतना त्याचं ? काल आईसाहेबसुद्धां तुमची आठवण काढीत होत्या. "

" सरकार, आईसाहेब आणखी आपण हुकूम फर्मावाल तेव्हां मी अगदीं हजर ! आतां या घटकेला कांहीं हुकूम असला तर सांगावा. "

" या घटकेला आतां हुकूम एवढाच कीं, तुह्मी आतां स्नानापानाच्या तयारीला लागा. तुमचं जेवण वगैरे झालं, ह्मणजे मग बोलूं आपण. आंत आईसाहेबांना वर्दी पोहोंचवली कारे कोणी ? "

महाराज एकीकडे असें बोलत व एकीकडे त्या मुलाला कांहीं विचारीत आहेत तों " एक हेजीब कांहीं फार महत्त्वाचें काम घेऊन आला आहे, भेटूं इच्छितो " असा चिटणिसांकडून निरोप आला, तेव्हां महाराज लगबगीनें आपल्या खास महालांतील एकांतांत बसण्याच्या खोलींत गेले.

प्रकरण ५ वें.

दक्षिणेस पोहोंचला.

औरंगजेबाच्या अशा कडक हुकुमापुढें **उदयभानू**चें काय चालतें ? आपलें नशीब थोर, ह्मणून आपण थोडक्यांतच सुटलों, नाहीं तर हा बादशहा लहरीनें आपणास तुरुंगांत सुद्धां टाकण्यास कमी करताना; किंबहुना त्याची तशीच लहर लागती, तर ठारही करता. तेव्हां आपण आतां आपला गाशा गुंडाळावा तेंच शहाणपणाचें होणार आहे, असा विचार करून त्यानें तिसऱ्या प्रकरणांत सांगितल्याप्रमाणें **दिल्ली** सोडली. त्याच्याबरोबर **कमलकुमारी** होतीच. बादशहानें तिच्या बाबतींत आपली मोठी निराशा केली, नाहीं तर आज आपण कोणच्या स्थितींत असतों, असें वारंवार त्याच्या मनांत येऊन त्यास फार पश्चात्ताप होई. आणि एकदां दोनदां नव्हे, पंचवीसदां त्याला असें वाटलें कीं, आपण फाजील शहाणपणा करून जर तिला व तिच्या त्या ह्मातान्या बापाला **औरंगजेबा**पुढें नेलेंच नसतें, तर आपण तिचें काय वाटेल तें केलें असतें, तरी आपण आपले मुखत्यार होतों. परंतु रजपूत लोकांना पकडून आणून आपण केवढें शौर्य केलें, तें दाखविण्यासाठीं आपण जो खटाटोप केला, तो या अशा

रीतीनें आपल्याच गळ्याशीं आला, याबद्दल त्याला वारंवार वारंवार फार वाईट वाटे, आणि त्यामुळें त्यानें आपल्याशींच खूप तडफड केली. आपण मार्गांत कांहीं केलें, तरी **औरंगजेबास** काय कळणार आहे, असेंही त्याच्या मनांत येऊन तसा कांहीं उपक्रम करण्याचा त्यानें विचार केला. परंतु **औरंगजेब** किती संशयी! आपला हुकूम पाळला जातो कीं नाहीं हें पहाण्यासाठीं त्यानें कांहीं हेर आपल्यावर नेमले नसतील ह्मणून कशावरून, असेंही पण त्याच्या मनांत येऊन त्यानें तो आपला विचार निदान कांहीं दिवस तरी रहित केला. आणि मजल दरमजल करीत स्वारी जितक्या लवकर दक्षिणेंत जातां येईल, तितक्या लवकर चालली. मनांतला हेतु हा कीं, आपण खूप जलद जाऊन एकदां लवकर पोहोंचून एकदां बादशहास लिहून पाठवूं कीं, आपल्या आज्ञेप्रमाणें येथें येऊन सर्व कांहीं गोष्टी पाहिजे तशा झाल्या. शिवाय कांहीं अंशीं त्याला असेंही वाटलें कीं, आपण दक्षिणेकडे जात असतां एखादें रजपूत सैन्य आपल्या मार्गांत आडवें येऊन आपल्यापासून **कमलकुमारी**ला नेणार नाहीं ह्मणून तरी कशावरून ? एखादें सैन्य जरी यदाकदाचित् आलें नाहीं, तरी **कमलकुमारी**चा कोणी नातलग आपला पाठलाग करीत येऊन तो कांहीं तरी क्लृप्ति काढून आपल्यास ठार मारणार नाहीं कशावरून ? असे नानाप्रकारचे कुतर्क त्याच्या मनांत उभे राहिले आणि त्यानें एकच गोष्ट मनांत आणली कीं, आपण होतां होईल तों आतां या प्रांतांतून खालीं निघून जावें तें चांगलें. आपण एकदां तिकडे गेल्यावर आपले मालक आपणच! मनुष्यानें भिण्याजोगें एखादें कृत्य केलें असलें, ह्मणजे नसत्या कारणानें सुद्धां भीति वाटूं लागते. वास्तविक पहातां **उदयभानू**स आज कशाचेंही इतकें भय बाळगण्याचें कारण नव्हतें. बरोबर चार हजार सैन्य, तेव्हां कोणी आपल्यावर हल्ला करील आणि आपल्यापासून **कमलकुमारी**स हिसकावून नेईल ही भीति किती व्यर्थ होती! त्याचप्रमाणें आपल्या पाठोपाठ कोणी येऊन आपला खून करील, ही तरी भीति किती चमत्कारिक होती! त्यानें आपल्याभोंवतीं वाटेल तसल्या कडव्या लोकांचा पहारा ठेवून कोणा परक्यास आपल्यासमोर फिरकूं द्यावयाचें नाहीं, असा एकसहा हुकूम सोडला असता ह्मणजे पुरे होतें, आणि त्यानें त्याप्रमाणें व्यवस्था केलीही. **कमलकुमारी**बरही तसाच सक्त पहारा ठेविला होता. **कमलकुमारी**कडे आपण ढुंकून पाहिलें नाहीं, असें दाखविण्यासाठीं, तो फार जपे व चोरून मारून तिच्यावरील पहारेकऱ्यांस फितूर करून कोणी आंत आपला शिरकाव करून घेऊं नये, त्याबद्दल त्याला अतोनात जपावें लागत होतें. तसें जपून तिला एकदां किल्ल्यावर नेऊन ठेविली, ह्मणजे मग काय?

तिचे महिना पंधरा दिवस उरले आहेत ते एकदां गेले– तिची ती **औरंगजेबानें** दिलेली मुदत भरली– कीं, आपण वाटेल तें करण्यास मुखत्यार आहों, असें त्यानें आपल्या मनास वारंवार शिकवून ठेवलें होतें.

एक दोन वेळां त्याला अशी शंकाही आली, किंवा त्याला असा भास झाला कीं, आपल्या सैन्याच्या छावणींतच कोणी तरी चोरून आला असून तो आपल्यास मारण्यास टपला आहे. पण अधिक शोध करितां तसा खास पुरावा त्यास कांहीं सांपडेना आणि ज्या माणसाबद्दल असा कांहीं संशय आला तो माणूसही पुढें कोठें त्यास पुनः दिसला नाहीं.

कमलकुमारीचे बाबतींत कडकपणा त्यानें धरलाच होता, परंतु मौज ही कीं, थोडासा कोमलपणाही धरण्याचें त्यानें मनांत आणलें. एक वेळ **नर्मदे**च्या काठीं छावणी देऊन तो राहिला असतां रात्रीं चांदणें उत्तम पडलें होतें आणि त्याच्या मनांत एकदम असें आलें कीं, **कमलकुमारीस** आपल्यासमोर बोलावून आणून सौम्य शब्दांनीं तिचें मन वळविण्यास सांपडलें तर पहावें. परंतु पुनः त्यास असें वाटलें कीं, आपणच तिच्या डेऱ्यांत जाऊन तिची मनधरणी करावी. त्याच्यासारख्या वेडप्यांस काय, जें ज्या वेळीं मनांत येईल तें तत्काळ करावयाचें. ती चांदण्याची प्रशांत रमणीय वेळ आणि असा विचार मनांत आलेला, मग काय विचारतां ? लागलीच तो **कमलकुमारी**च्या डेऱ्यांत आला. बाहेरच्या पहारेकऱ्यांस त्यानें गडबड न करण्याबद्दल दटावलें आणि एकदम **कमलकुमारी**च्या अंतःपुराच्या पडद्याजवळ जाऊन उभा राहिला. आतां पडदा दूर सारून आंत पाऊल घालणार, तों **कमलकुमारी** मोठमोठ्यानें हुंदके काढते आहे आणि **देवलदेवी** तिचें समाधान करते आहे, असें त्याच्या कानीं आलें. "**कमल**, तूं अशी निराश होऊं नको. ज्या **एकलिंगजीनं औरंगजेबा**सारख्या दुष्ट अंतःकरणाच्या बादशहाला तुला तीन महिनेपर्यंत तरी त्रास होऊं नये असा हुकूम देण्याची बुद्धि दिली, तोच तुला पुढेंही त्या दुष्टाच्या तडाक्यांतून सोडवणार नाहीं ह्मणून कशावरून ? तूं असलं हें मनांतसुद्धां आणूं नकोस. माझी मनोदेवता तर मला असं सांगते आहे कीं, तुझी सुटका होणार. आणखी मला कां असं वाटतं हेंही पण तुला सांगितलं. त्याचा तरी काय नेम ? तुझा हा असा निःसीम निश्चय पाहून भगवान् **एकलिंगजी** त्या **उदयभानू**च्या अंतःकरणांतसुद्धां सद्बुद्धि उपजवील. जो प्रसंग आला आहे, त्यांतून कसं तरी निघून गेलं पाहिजे. तुला मी एक मोठी गुपित गोष्ट सांगणार आहें. पण बाई इथें कोण ऐकेल आणखी कोण नाहीं याचा नेम नाहीं, ह्मणून

आपली बोलत नाहीं. वेळप्रसंग पाहून मी तुला ती सांगेन; पण तूं हे उपासतापास करण्याचं सोडून दे कसं. असे उपास करून करून आत्महत्या करून घेतली, तर उपासाचं पुण्य लागायचं एकीकडेच राहून तुला आत्महत्येचं पातक मात्र लागेल. याचा विचार कर कायतो. नाहीं तर मी सांगतें त्याप्रमाणें तूं वाग. माझ्या जिवांत जीव आहे तोंपर्यंत मी तुझ्या केंसालासुद्धां धक्का लागूं द्यायची नाहीं. कोणी तुझा छळ करायला आला, तर माझं आधीं प्रेत पाडील तेव्हांच पुढें तुझ्याकडे येईल, असं पक्कं समज. "

कमलकुमारीनें यावर कांहीं उत्तर दिलें नाहीं. तिचें रडणें चालूच होतें. **उदयभानु** दुष्ट अंतःकरणाचा तर खराच, परंतु तिचें तें ओकसाबोकशीं रडणें आणि तिच्यावरली त्या **देवलदेवी**ची निःसीम भक्ति, हीं पाहून त्यास तेथूनच आपण परतावें, पुढें मागें केव्हां तरी आपल्याला पुनः असला प्रकार करतां येईल, असा विचार करून त्यानें त्यावेळीं तेथून आपले पाय माघारी वळविले. परंतु **देवलदेवी**च्या बोलण्यापैकीं एक गोष्ट त्याच्या चित्ताला लागून राहिली. ती **कमलकुमारी**ला एक गुपित गोष्ट सांगणार होती ती काय असावी? आपल्याला घातक असें तर कांहीं त्यांत नसावें? आपल्या छावणींतल्या छावणींत कोणाला फितूर करून तर ही कांहीं व्यूह रचीत नसेलना? आपल्याला ठार मारण्याचा तर तिचा संकेत नसेलना? कदाचित् ती व **कमलकुमारी** यांनीं पळून जाण्याचा तर बेत केला नसेलना? असे नानाप्रकारचे कल्पनातरंग त्याच्या मनांत येऊं लागले, आणि त्यानें असा बेत केला कीं, आपण त्या दोघींवरले पहारेकरी रोज निरनिराळे नेमावयाचे. कोणचाही पहारेकरी लागोपाठ दोन दिवस असूं द्यावयाचा नाहीं. आपल्याजवळ पहारे बदलण्याला लागतील तितकीं माणसें आहेत, तेव्हां ती पंचाईत मुळींच पडूं नये. हें सारें मनांत येण्याचा अवकाश कीं, लागलीच स्वारींनीं त्याप्रमाणें हुकूम सोडले. आणि असाही हुकूम सोडला कीं, प्रत्येक पहारेकऱ्यानें पहारा सोडण्याबरोबर आपल्याकडे येऊन आलबेल द्यावी! इतकें जरी केलें, तरी काय उपयोग होता? **देवलदेवी**चें गुपित काय, तें आपल्यास समजावें ह्मणून त्याची जी उत्कट इच्छा होती, ती कायमची कायमच. तें गुपित काय हें कळण्याला त्याला कांहीं मार्गच सुचेना. ह्मणून त्यानें एके दिवशीं **देवलदेवी**लाच गांठून तिच्याकडून काय निघेल तें काढून घेण्याचा विचार केला. दोन वेळां **देवलदेवी**ला भेटण्याची आपली फार इच्छा आहे एवढाच त्यानें तिला निरोप पाठवला. परंतु **देवलदेवी**नें तिकडे लक्ष्य दिलें नाहीं.

तेव्हां स्पष्टपणें एकदां तिला बोलावणें पाठविलें, तेव्हां तिनें असा निरोप पाठविला कीं, " तुझ्या ताब्यांत आह्मी सध्यां आहों, तेव्हां तूं जिकडे बोलावशील तिकडे जाणें-येणें आह्मांला भाग आहे, पण **कमलकुमारी**ला एकटीला सोडून मी क्षणभर-सुद्धां दुसरीकडे येणार नाहीं. ज्या दिवशीं मला तिच्याजवळून ओढून नेऊन कोणी ठारच करील, ते दिवशीं माझा इलाज नाहीं. तुला कांहीं आह्मांला सांगायचें असलें तर तूंच इकडे ये, आणि काय सांगायचें तें सांगून जा. " या तिच्या कठोर निरोपानें **उदयभानू**स अतोनात राग आला, परंतु त्या रागाचा उपयोग काय ? एकदम तिला पकडून आणून **कमलकुमारी**पासून दूर ठेवण्याची छाती त्याला होईना. तेव्हां त्यानें आपणच एकवार त्यांच्याकडे जाऊन कांहीं सामोपचाराचीं भाषणें बोलून त्यांचें गुपित कायतें काढून घेऊं असें ठरविलें, आणि तो खरोखरीच एके दिवशीं त्यांच्या डेऱ्यांत गेला. त्यास पहाण्याबरोबर त्यांची भीतीनें अगदीं गाळणच उडाली.

इकडे **कमलकुमारी**ला पाहून **उदयभानू**च्या पाषाणहृदयासही अतोनात वाईट वाटलें. आपल्या धास्तीनेंच हिची अशी दुर्दशा झाली असेल काय, असें एकदम त्याच्या मनांत वाटून तो आपल्याशींच कांहीं विचार करीत स्तब्धपणें उभा राहिला. **कमलकुमारी**ची स्थिति इतकी वाईट झाली होती कीं, केवळ अस्थिपंजर मात्र राहिलें होतें. अंगकांति इतकी फिक्की झाली होती कीं, तिच्या-पेक्षां निस्तेज व फिक्कें असें जगांत दुसरें कांहींसुद्धां नसेल. अशा स्थितींत तिला पाहिल्याबरोबर त्याचे सगळे कठोर हेतु जागच्या जागीं जिरले तर त्यांत नवल काय? आतां आपण सध्यां हिच्या वाटेस मुळींच न जातां जर कांहीं दिवस जाऊं दिले, तरच ती कांहीं तरी अंग धरील किंबहुना जिवंत राहील, नाहींपेक्षां ती मध्येंच कोठें तरी मृत्यु पावणार असें त्यास खास वाटलें, आणि त्याप्रमाणें वाटल्याबरोबर त्यानें **देवलदेवी**स असें स्पष्टपणें सांगितलेंही कीं, " आजपासून मी तुमच्या वाटेस जाणार नाहीं. इतकेंच नव्हे तर माघ वद्य नवमीच्या दिवशीं फक्त **कमल-कुमारी**ला एकवार विचारीन कीं, तूं माझ्याशीं विवाह करण्याला तयार आहेस का ? ती नाहीं ह्मणाली, तर नुसतें, 'कां नाहींस ! ' असें सुद्धां न विचारतां राजपुता-न्यांत परत पाठवून देईन. पण तूं तिची नीट काळजी घे. तिळतिळ झिजून मरेल असें करूं नकोस. माझ्यानें तिच्याकडे पहावत नाहीं. मी आतांच तिला सोडून दिलें असतें, परंतु माझी आशा सुटत नाहीं." इतकें ह्मणून तो तेथून निघून गेला.

अशा तऱ्हेनें त्यानें तिला आशा दाखविण्यांत त्या वेळीं त्याची सद्बुद्धि होती कीं

दुर्बुद्धि होती, हें सांगणें मोठें कठिण आहे. पुष्कळ वेळां दुष्ट बुद्धीच्या माणसाच्या मनांतसुद्धां सद्बुद्धि जागृत होऊन तो आपल्या दुष्कर्मापासून परावृत्त होतो, व त्यास त्या वेळेपुरता तरी निदान खरा अनुताप होऊन पुनः अशा कर्माला प्रवृत्त व्हावयाचें नाहीं असा निश्चय तो करीत असतो. न जाणों अशा प्रकारचीच ही वेळ **उदयभानू**ला येऊन पडली असेल. त्याचा पश्चात्ताप या वेळीं तरी निदान खरा असेल. **कमलकुमारी**ची स्थितिच या वेळीं अशी झाली होती कीं, तिला पहाण्याबरोबर अत्यंत कठोरहृदयी मनुष्यालाही फार वाईट वाटावें. त्यांतून आपल्या जाचतीमुळें हिची अशी ही अवस्था झाली आहे, असें मनांत आल्याबरोबर तर काळालासुद्धां क्षणमात्र पश्चात्ताप व्हावा. तेव्हां **उदयभानू**च्या मनाची स्थिति वरच्याप्रमाणें झाली, तर त्यांत नवल नाहीं. तो पश्चात्ताप खरोखर टिकतो कितपत एवढेंच काय तें आतां पहाणें होतें. किंवा न जाणों, आपल्या अशा भुलथापींनें तिनें आपला शोक आवरून जरा आंग सांवरावें, आणि मग आपण आपलें कर्म करण्यास कांहीं मागें पुढें पाहूं नये, असेंही त्याच्या मनांत त्याच वेळीं आलें असेल. कसेंही असो, वर सांगितल्याप्रमाणें त्यानें **कमलकुमारी**च्या डेऱ्यांत येऊन भाषण केलें खरें.

कमलकुमारीची अवस्था काय झाली होती हें वर सांगितलेंच आहे. तिचा एकंदर दिनक्रमच असा होता कीं, त्या दिनक्रमामुळें ती इतके दिवस जगली तरी कशी याचेंच आश्चर्य वाटावें. ती सकाळपासून संध्याकाळपर्यंत आणि संध्याकाळपासून सकाळपर्यंत सगळा वेळ एकसारखी रडतच असायची. आपल्या नवऱ्याच्या पादुका तिनें अगदीं जवळ पोटाशीं बाळगिल्या असून सारा वेळ त्यांच्याकडे पहात, नवऱ्याचें ध्यान करीत आणि त्या पादुकांचें पूजन करीत काळ कंठीत असे. जेवणाचें ताट आलें, तर त्याला शिवायचीसुद्धां नाहीं. **देवलदेवी**नें अतोनात आग्रहच केला, म्हणजे त्यांत दूध असेल तेवढें प्यायची किंवा फारच आग्रह झाला, तर दोन घास खायची, परंतु ते खातांना सुद्धां चार वेळां ओकाऱ्या द्यायची. दुसरें तिसरें कांहीं औषधपाणी दिल्यास घ्यायचीच नाहीं. तिनें असा आत्मघात करूं नये, म्हणून **देवलदेवी**नें आपल्याकडून अतोनात प्रयत्न केला, परंतु व्यर्थ!. **कमलकुमारी** तिचेंसुद्धां ऐकेना. मला आतां जगायचेंच नाहीं असें तिनें नेहमीं म्हणावें. असा प्रकार चालला असतां एके दिवशीं एक चमत्कार घडला.

देवलदेवी सहजगत्या कांहीं कामाकरितां आपल्या डेऱ्याच्या तोंडाजवळ आली आणि तिनें कांहीं कारणानिमित्य बाहेर पाहिलें, तों पहारेकऱ्यांपैकीं एका

माणसावर तिची दृष्टि गेली. आणि क्षणमात्र ती अगदीं जागच्या जागींच थबकून उभी राहिली. परंतु तिचें तें थबकून राहणें केवळ आश्चर्याचें नसून त्यांत बराचसा आनंदही असावा असें तिच्या चर्येवरून कोणासही वाटलें असतें. त्या डोळ्यांत व गालांवर कांहीं विलक्षण तेज चमकूं लागलें. ती त्या माणसाकडे किती वेळ तरी पहात उभी राहिली. नंतर जणूं काय त्या माणसाशीं आपण बोलावें कीं काय या विचारांत ती बराच वेळ घोटाळली, आणि शेवटीं तसें धाडस आपण कधीं केलें नाहीं, तर आतांही करूं नये, भलताच परिणाम व्हायचा, असा विचार करून ती त्या दारापासून परतणार; तोंच तो पहारेकरी इसम त्या डेऱ्याच्या दरवाज्याजवळ आला व अगदीं दार अडविण्यासाठीं पहारेकरी उभा राहतो तसा उभा राहिला. आपण येथें उभ्या आहोंत असें कळून तर नाहींना हे या ठिकाणीं आले, असें क्षणभर तिच्या मनास वाटलें. इतक्यांत तो गृहस्थ डेऱ्याच्या दाराच्या अधिक अधिकच जवळ येत चालला व अगदीं जवळ जाऊन भिडला. तेव्हां त्यानें आपला जोडा नीट करण्याचें मिष करून खालीं वांकून मागच्या मार्गे जोड्यांतून पाय काढून आंतून एक कागदाची फार बारीक घडी तंबूच्या दाराच्या खालींच सारून दिली. आणि पुनः जणूं काय एकाच ठिकाणीं उमें राहून पहारा करण्यांत काय अर्थ आहे, हिंडलें पाहिजे असें मनांत येऊन तो तेथून पुढें गेला.

देवलदेवी हा चमत्कार पहातच होती व ती बारीक घडी घातलेली चिठी तिनें ताबडतोब उचलून घेऊन तिनें उलगडली व वाचून पाहिली. त्याबरोबर तिचा चेहरा इतका प्रफुल्लित झाला कीं, त्यावेळीं जर कोणी तिच्याकडे पाहिलें असतें, तर त्यास खचित असें वाटलें असतें कीं, या मुलीला कांहीं तरी फार फार आनंदाची गोष्ट समजली असावी. त्या आनंदाच्या भरांत ती लागलीच **कमलकुमारी**कडे गेली व तिला ह्मणते, " **कमल**, आपली सुटका खास होणार. तूं आतां अगदीं सुद्धां काळजी करूं नकोस. शहाणी असलीस, तर मी सांगतें तसं ऐक मात्र. मी आतांपर्यंत तुला बोललें नाहीं. पण आज आतां सांगायला मुळींच कांहीं हरकत नाहीं. पण बाई ह्मणतातना, तशांतली गोष्ट. मी इकडे तुला कांहीं सांगायला लागावं, आणखी तितक्यांत कोणी तरी तें ऐकून **उदयभानू**ला जाऊन सांगावं. मग मात्र आपल्या फजितीला पारवार नाहीं असंच होणार. या भयानं तर मी तुला आतांपर्यंत बोललें नाहीं. पण आतां तुला सांगितलं, ह्मणजे तूं आपला हा हेका सोडून दिला पाहिजे हो. नाहीं तर तूं अशी दुबळी, आणखी सुटका होण्याला कुठें अंमळ चालण्याची वेळ आली कीं, तुझ्याच्यानं चालवत नाहीं ह्मणून आपला

सगळाच व्यूह ढांसळायचा. तर असं करूं नकोस. मी आतां तुला सांगणार आहे तें ऐकलंस आणखी त्यांत खरं काय आहे तें सांगितलं, ह्मणजे तुझं तुलाच वाटेल कीं, आपण आतां ही उपासमार सोडून देऊन जरा लठ्ठ व्हावं. ऐक तर मग. मी सांगतें तुला सगळी हकीकत. "

असें ह्मणून तिनें फारच सावधागिरीनें **कमलकुमारी**च्या कानांत कांहीं सांगितलें. तें जसजसें **कमलकुमारी**च्या कानीं पडलें व अंतःकरणांत उतरत चाललें, तसतशा तिच्या चर्येवर निरनिराळ्या विकृतींच्या छाया दिसूं लागल्या. प्रथम संशय उत्पन्न होऊं लागला, नंतर तो संशय जाऊन त्याच्या जागीं आनंद दिसूं लागला आणि त्या आनंदाचाही पुढें हर्ष होतो कीं काय असें वाटण्यासारखी तिच्या चर्येची स्थिति झाली. त्यांतून **देवलदेवी**नें तिला एकामागून एक दोन कागद वाचण्याला दिले, ते पाहून तर तिला खरोखरीच फार हर्ष झाला. आणि एकदम ती उद्गारली, " **देवल**, असं जर होईल आणखी पुनः बाबांना जर मी पाहीन तर तुझे आणखी तुझ्या..." परंतु **देवलदेवी**नें तत्काळ तिच्या तोंडावर हात ठेवून ह्मटलें, "**कमल**, **कमल**, केवढ्या मोठ्यानें बोलतेस ? वा ! एवढ्याकरतां मी आजपर्यंत बोललें नाहीं. आणखी आज बोलतें न बोलतें तों तूं अशा तऱ्हेनें वागतेस कीं लागलीच त्याचा जिकडे तिकडे बभ्रा होऊन आपला सगळा बेत फसावा आणखी सगळाच व्यूह ढांसळावा. तर असं करूं नको. तूं आतां खाण्यापिण्याच्या कामांत अगदीं कमी न करतां आपलं शरीर सुधार. मग चार कोस चालण्याची पाळी आली, तरी हरकत नाहीं ह्मणून ह्मणतें. नाहीं तर तुझ्या अशक्तपणामुळें कुठें तरी अडकून सांपडून जाऊं. तसं होऊं नये ह्मणून ह्मणतें कीं, तूं आतां हें आपलं सगळं सोडून दे कशी! **कमलकुमारी**च्या मनाची त्या वेळची स्थिति अशी होती कीं, तिनें त्यावेळीं **देवलदेवी** सांगेल तें अगदीं कबूल करावें आणि त्याप्रमाणें तिनें तिला, "तूं आणखी ते जर माझ्याकरितां इतके श्रम घेतां, तर मीं तरी कां बरं तुह्मांला दुखवावं ? मीही पण तुमच्या सांगण्याप्रमाणें अगदीं करीन, मग तर झालेंना ? " असें बोलूनही दाखविलें, आणि त्या दिवसापासून तिनें आपला क्रमही बदलला.

अशा प्रकारें एकंदर हकीकती होत होत **उदयभानु** एकदां दक्षिणेंत जाऊन पोहोंचला, आणि त्यानें आपल्याबरोबर आणलेला बादशहाचा खलिता **जसवंतसिंग** व **शहाजादा मुआझिम** यांजकडे पाठवून दिला. त्यांचें सैन्यही त्यानें त्यांजकडे पाठवून दिलें; व आपण **कोंडाणे** किल्ल्यावर जाऊन ठाणें दिलें. आणि

हेर वगैरे पाठवून **शिवाजी**महाराजांचा व **जसवंतसिंगाचा** काय संबंध आहे, तें काढण्याचा उपक्रम चालविला. त्या उपक्रमापासून कांहीं फलनिष्पत्ति होवो न होवो, आपण बादशहाकडे त्या बाबतींत काय लिहून कळवावयाचें हें त्याचें ठरलेंच होतें. त्याप्रमाणें त्यानें तेथें आल्यापासून आठ दिवसांच्या आंतच लिहून पाठविलें कीं, "**जसवंतसिंग** आणि **मुआझिम** या दोघांची **शिवाजीस** फार फूस आहे. **शहाजाद्या**चा इलाज नाहीं, यामुळेंच त्यानें **जसवंतसिंगास** संमाति दिली असेल. **जसवंतसिंग** मात्र पुरा राजद्रोही बनला असून सर्वस्वी **शिवाजीचे** हातांत आहे. आपण मजबरोबर दिलेला खलितासुद्धां त्यानें **शिवाजीला** पाहण्यासाठीं पाठविला असावा, अशी मला शंका आहे. **विजापूरचें** राज्य व **गोवळकोंड्याचें** राज्य घेण्याच्या आणि **शिवाजी**वर नजर ठेवण्याच्या मिषानें तो येथें राहिला आहे. परंतु त्याचा इत्यर्थ एवढाच होणार आहे कीं, बादशाही सैन्याकडून तें राज्य जिंकलें जाऊन **शिवाजी**च्या ताब्यांत जाईल. मी लिहितों यांत तिळप्राय कांहीं कमी व्हायचें नाहीं. **शिवाजी**च्या हातीं सगळा दक्षिण सुभा जाऊन शिवाय अनेक राज्यें जातील, आणि अशा तऱ्हेनें तो प्रबळ झाला ह्मणजे मग प्रत्यक्ष आपण सगळें **दिल्लीचें** सैन्य घेऊन आलां, तरीसुद्धां कांहीं उपयोग होईल कीं नाहीं शंका आहे. **जसवंतसिंगा**च्या फुशीमुळें **शिवाजीचें** हें प्रस्थ माजलें आहे. तें जर वेळींच जेथल्या तेथें जिरवून टाकावयाचें असेल, तर त्याला एकच उपाय आहे. तो उपाय **जसवंतसिंगास** येथून काढून नेणें हा होय. दक्षिणेंत जोंपर्यंत आतां **जसवंतसिंग** आहे, तोंपर्यंत **शिवाजीस** पकडणें किंवा त्याचें बंड मोडणें कोणालाही अगदीं शक्य नाहीं. कारण **जसवंतसिंग** त्याचा मिंधा होऊन बसल्यामुळें त्यानें त्याला वाटेल तसें आतांपर्यंत वागूं दिलें. आतां सगळे मराठे सरदार, जे **बादशाही**चे मोठे निमकहराम ह्मणून नांवाजलेले होते, ते **शिवाजी**ला मिळालेले आहेत. यामुळें अर्थातच आतां तें सर्व दुरुस्त करून पुढें काय करावयाचें तें केलें पाहिजे. **जसवंतसिंग** जर येथेंच राहील, तर तो आतां दुसऱ्या कोणाचें कांहीं चालू देणार नाहीं, उलट त्याच्या मार्गांत अडचणीच आणील. एवढ्याकरितां त्याची आधीं व्यवस्था लावावी. जो प्रकार आहे तो आपल्या चरणापाशीं निवेदन केला आहे. तो ध्यानीं आणून काय ती आज्ञा व्हावी. मी आपल्या चरणाच्या आज्ञेप्रमाणें **कोंडाण्या**वर येऊन राहिलों आहें. आतां त्या किल्ल्याची आपणांस मुळीच भीति नको. **शिवाजीनें** हा किल्ला घेण्याचें आतां स्वप्नांतसुद्धां आणूं नये; आणि

मी गडावर आल्यापासून येथल्या कोळ्यांवर वगैरे जबरदस्त दराराही बसवून टाकला आहे. सर्व बंदोबस्त ठीक आहे. परंतु या एका किल्ल्याचा बंदोबस्त उत्तम प्रकारानें ठेवून उपयोग काय ? सगळ्या दक्षिणेंत हा पुंड **शिवाजी** वाटेल तशी पुंडाई करतो आहे, आणि त्याला **जसवंतसिंगा**चें चांगलें साहाय्य आहे. अशा स्थितींत एक किल्ला आपल्या कबज्यांत बाळगून उपयोग काय होणार ? **बादशहाची** आज्ञा होईल, तर हा बंदा एका महिन्या दीड महिन्यांत या हिकमती **शिवाजी**च्या हुकमतीचा फडशा करून त्याला कैद करून आपल्या चरणापाशीं घेऊन येतों. इकडे येऊन एकंदर व्यवस्था पाहिली, तर मला त्यांत कांहींच अशक्य वाटत नाहीं. मात्र **जसवंतसिंगा**ला येथून तावडतोब उत्तरेकडे नेलें पाहिजे. मग **शहाजाद्यां**ना माझ्या हाताखालीं ठेवलें कीं, त्यांचें मन मी तेव्हांच सुधारून घेऊन आपल्या चरणीं नेहमीं प्रेमभावानें राहतील, असें खचित करूं शकेन. आपल्या विरुद्ध होऊन मराठ्या गनिमाशीं सलोखा करण्वांत कांहींसुद्धां त्यांस वावगें वाटत नाहीं. याचें कारण केवळ **जसवंतसिंग** होय. हुकूम येईल त्या हुकुमाचा ताबेदार आहें. सध्या या **कोंडाण्या**च्या राखणीस राहिलों आहें. ही थैली मुद्दाम सांडणीस्वाराबरोबर पाठविली आहे."

अशी थैली पाठवून आतां पुढें काय होतें, तें पहात व माघ वद्य नवमीस अजून किती दिवस आहेत ते मोजीत **उदयभानु कोंडाण्या**वर राहिला.

प्रकरण ६ वें.

महाराजांची चिंता.

तानाजी, शेलारमामा वगैरेंचें स्नानभोजन झालें, तरी महाराज आपल्या एकांत महालांतून बाहेर येईनात, हें पाहून सर्व मंडळीस फार अचंबा वाटला. महाराजांच्या अंगचा मोठा गुण हा कीं, ते या जेवणाखाणाच्या कामांत आपल्या हाताखालच्या लोकांबद्दल अतिशय काळजी वहात. कोठें मोहिमेवर गेले असले, तरी जेथें तळ पडेल, तेथें पहिल्या प्रथम एकवार सगळ्या छावणीभर हिंडून प्रत्येक शिलेदार, बारगीर, एकंड्या किंवा बाजारबुणग्याची जेवणाखाणाची सोय लागली कीं नाहीं, हें पहावयाचें आणि नंतर मग आपण आपल्या स्वतःच्या जेवणाखाणाच्या चौकशीस लागावयाचें. या बारीक नजरेमुळें त्यांच्यावर प्रत्येक मनुष्याचें

अतोनात प्रेम बसलेलें होतें. प्रत्येकास वाटे कीं, आपल्यावर महाराजांचें प्रेम आहे; आणि या मनोभावामुळें, प्रत्येकजण त्यांची सेवा आपल्या हातून केव्हां कशी होईल, ती करण्यास मोठा तत्पर असावयाचा. प्रत्येकानें आपला जीव महाराजांच्या पायीं अगदीं मनःपूर्वक अर्पण केलेला असे. ज्या कोणाला ते एखादें काम सांगतील, तें काम करण्यास त्यास असा हुरूप यावयाचा कीं, जणूं काय, त्यास त्यापासून तात्कालिक स्वर्गप्राप्तिच व्हावयाची आहे. महाराजांची स्मरणशक्ति फार दांडगी. ज्या माणसास त्यांनीं एकवार पाहिला, त्याचें नांवगांव एकदां ऐकून घेतल्यावर कधीं त्यांना विस्मरण ह्मणून व्हावयाचेंच नाहीं. तो मनुष्य कोठें भेटलारे भेटला, कीं त्यांनीं त्याला हांक मारून, कुशलप्रश्न विचारून त्याचा क्षेमसमाचार घेतलाच ह्मणून समजावा; आणि आपलें नांवगांव महाराजांच्या लक्ष्यांत आहे तेव्हां महाराजांचें विशेष लक्ष्य आपल्यावर आहे, असें अर्थातच त्यास वाटून अंगीं मूठभर मांस चढल्याप्रमाणें त्यास व्हावयाचें.

इतकी नेहमीं बारीक नजर असावयाची आणि आज **तानाजी** व **शेलारमामा** लग्नाला आमंत्रण करायला आलेले असून त्यांच्या भोजनाचे वगैरे बाबतींत चौकशी करण्याला स्वारी कशी आली नाहीं ? असें प्रत्येकास वाटलें. **जिजाबाई**साहेबांसही फार आश्चर्य वाटून, त्यांनीं एकवार आपल्या चोपदारास महाराज अजून काय करताहेत त्याचा शोध करून ये ह्मणून पाठविलेंही–तों असा निरोप आला कीं, महाराज अजून आपल्या एकांत-महालांतच आहेत. कोठून पत्र घेऊन आलेला हेजीबही बाहेर आला नाहीं. तेव्हां अर्थात्‌च ते कांहीं तरी फार महत्त्वाच्या कामांत गुंतले आहेत, असें सर्वत्रांस वाटलें. **जिजाबाई**साहेब स्वतः पाहुण्यांचा समाचार घेत होत्या, तेव्हां महाराज न आल्यामुळें कांहीं कमीपणा झाला, असें नाहीं. अशा संबंधांत महाराज एकपट, तर **जिजाबाई**साहेब दसपट काळजी वाहणारी बायको होती. परंतु महाराज असे इतका वेळ बसले, तेव्हां त्यांस कांहींना कांहीं तरी चिंतेचें कारण झालें असावें, असें तत्काळ **तानाजी**च्या मनांत आलें; आणि काय आहे तें आपल्यास केव्हां एकदां कळेल व कळल्याबरोबर पुढें सरसावून महाराजांची काळजी केव्हां एकदां दूर करूं, असें त्यास होऊन गेलें. त्यानें आपलें जेवण उरकलें, परंतु तें जेवण जेवीत असतांना आपण काय काय खाल्लें, किंवा पानांत काय काय होतें इकडे त्याचें लक्ष्य मुळींच नव्हतें ह्मातार्‍या **शेलारमामां**शीं **आईसाहेब** एकसारख्या बोलत होत्या, धाकट्या **रायबा**लाही कांहीं मौजेचे प्रश्न विचारून त्यानें उत्तरें दिलीं ह्मणजे त्या उत्त-

रांचें कौतुक करीत होत्या. मधूनमधून **तानाजी**लाही त्यांनीं प्रश्न विचारले, त्यांचीं त्यानें उत्तरें दिलीं, परंतु त्याचें लक्ष्य जेवणाकडे किंवा आपल्या बोलण्याकडे मुळींच नाहीं, दुसऱ्याच कोठें तरी तें आहे, असें **जिजाबाई**साहेबांच्या लक्ष्यांत आल्याखेरीज राहिलें नाहीं. आणि महाराज अजून एकांत महालांतच आहेत, तेव्हां त्यांस कांहीं तरी मोठा विचार येऊन पडला असावा, असें यास वाटूं लागल्यामुळेंच हा एवढा शून्यहृदय झाला आहे, हेंही पण **जिजाबाई**-साहेबांच्या मनांत येऊन चुकलें. अर्थात्‌च आपल्या पुत्राच्या ठिकाणीं **तानाजी**-सारख्या वीराची इतकी निःसीम भक्ति पाहून तिला कौतुक व समाधान वाटलें. ही त्याची भक्ति त्या प्रेमळ मातुःश्रीला आजच कळली असें नाहीं, परंतु त्या भक्तीचें माहात्म्यच असें आहे कीं, ती जेव्हां जेव्हां निदर्शनास येईल, तेव्हां तेव्हां तिच्याबद्दल कौतुकच वाटावयाचें.

परंतु **तानाजी**रावांचा विनोद करण्याच्या उद्देशानें **जिजाबाई**साहेब त्यास ह्मणतात, " **तानाजी**राव, आह्मी इतका वेळ आपल्याशीं बोलतों, पण आपलं लक्ष्य तिसरीकडेच दिसतं आहे. महाराज जवळ नसले, ह्मणजे आमच्या बोलण्याकडेसुद्धां लक्ष्य नसावं वाटतं ? का ते आज आपला समाचार घ्यायला नाहींत, ह्मणून आपल्याला फार संकोच झाला आहे ? आह्मीं समाचार घेतला, तरी तो कांहीं उपयोगाचा नाहींना ? **शेलारमामा**, तुमचं तसं दिसत नाहीं पण. तुह्मी आह्मी ह्मातारीं माणसं. तुह्माला आपला आह्मीं समाचार घेतला तरी पुरे. "

" छे. छे. **आई**साहेब आपण असं मनांतसुद्धां नका आणूं, " **तानाजी**-राव एकदम थोडे भानावर येऊन ह्मणतात " हें काय आज आपल्या मनांत आलं हें ? आपल्यापेक्षां महाराज तो काय माझा समाचार घेणार ? पण. महाराज अजूनपावतर एकांतांत बसले आहेत, ह्मणून जरा असं मनांत आलं आहे कीं, कांहीं तरी चिंतेचं कारण त्यांच्या कानीं आलं आहे...... दुसरं कांहीं नाहीं, **आई**साहेब ! आपण प्रत्यक्ष अंबाबाई आमचा समाचार घेत असल्यावर आणखी कोण पाहिजे ? आईसाहेब, या **तानाजी**ला नेहमीं असं वाटतं कीं, कांहींना कांहीं तरी महाराजांची सेवा सदोदित आपल्या हातून घडत असावी. त्यांना कधीं कसली चिंता ह्मणून राहूं नये. कां मामा, असं जर आपल्या मनाला वाटून आपण नेहमीं सेवेला तत्पर नसलं, तर मग आपण त्यांचे सेवक ते काय ? "

इतकें बोलणें जों होतें आहे, तों महाराज आपल्या एकांत महालांतून इकडे येण्यास निघाल्याची वर्दी आली आणि महाराज येऊन पोहोंचतात, तों **तानाजी**

व **शेलारमामा** यांचें जेवण संपलेंही होतें. तें पहातांच महाराजांस थोडेंसें आश्चर्य वाटलेंसें दिसलें व ते **तानाजीस** व **शेलारमामास** ह्मणतात, " वा! आह्मांला थोडा उशीर झाला, ह्मणून आपण जेवणसुद्धां नीटपणें जेवलां नाहीं! आमचीच चूक खरी त्यांत, पण मामासाहेब, आपण आमचा लेंकरांचा समाचार घ्यायचा, का आह्मी आपला समाचार घ्यायला आलों नाहीं ह्मणून रागावून लवकर लवकर जेवण आटपायचं? घर कोणाचं आहे? आपलं आहे. आपल्या घरांत आपला समाचार आपण घेणार नाहीं, तर कोण घेणार? अन् आई-साहेब होत्याच ना इथें? शिवाय मामासाहेब, आज **तानाजी** इथें आला आहे, तर तो आमचा आहे, तुमचा नाहीं. त्यानं तुमचा समाचार घेतला पाहिजे. आई-साहेब, जेवले का हे नीटपणें? कायहो, छोटे सुभेदार? तुमचं कसं काय! तुह्मी आतां आमच्याबरोबर मोहिमेवर येणार ना? पण आधीं लगीन करून घेणार का, आधीं मोहिमेवर येणार?"

" महाराज, मोहिमेवर नेत असाल, तर आधीं मोहिमेवर येणार." **रायबा** अगदीं ऐटीनें ह्मणाला व लागलीच आपल्या तलवारीला हात घालून आणखी ह्मणतो, " पण महाराज, या धाकट्या तरवारीनं मोंगलाशीं लढतां येईल काहो? नाहीं तर मोंगलांचीं मुलंच आपलीं माझ्याशीं लढायला द्या. त्यांच्याशीं लढायला ही तरवार पुरेल. मी बाबांच्या जवळ एक तरवार मागतों आहें, पण बाबा देतातच कुठें?"

" अरे, बाबांनीं नाहीं दिली तर आह्मी देऊं. मग तर झालं कीं नाहीं तुझं काम?"

" हो. वा! तुह्मीं दिली ह्मणजे मग—पण बाबांना तुह्मीच दिली होती काहो?" **रायबा** विचारतो. इतक्यांत **शेलारमामा** मध्येंच ह्मणतात, " महाराज, त्याची वटवट कधीं संपायची नाहीं. आपण जें काय बोलाल, त्याच्यावर तो कांहीं तरी विचारायचाच. पण मग महाराज, आमच्या गांवाला आणखी घराला आपले पाय लागणार ना? आमची गांवची मंडळी कशी अगदीं टपून बसली आहे बघा आपले पाय लागणार ह्मणून!"

" हो. हो. मामासाहेब आमचे पाय लागण्याची काय गोष्ट सांगतां आपण? आपण आमंत्रणाला आलां आणखी मी नाहीं ह्मणणं हें कांहीं शोभणार आहे? पण सध्याचे दिवस कसे आहेत आपण जाणतांच आहां. कोण्या वेळीं काय कामगिरीवर जावं लागेल याचा नेम नाहीं. **औरंगजेब** बादशहाचा एका क्षणाचासुद्धां भरंवसा नाहीं. याक्षणीं जें बोलेल, त्याच्या अगदीं उलट कृति त्याच्या पुढच्या क्षणीं करील.

त्याचा पोरगा, आणखी तो **जसवंतसिंग** हे तरी आह्मांला मिलाफ दाखवतात खरे, पण त्यांचा काय नेम सांगावा? आमच्याशीं मिलाफ दाखवावा असा बादशहा-चाच त्यांना सल्ला असेल, नाहीं कशावरून? हे मोंगल काय आणखी कशा प्रका-रच्या दगलबाज्या करतील, याचा मुळींसुद्धां पत्ता नाहीं. एक वेळ, मामा, सापाचा सुद्धां भरंवसा धरावा, पण या मोंगलांचा आणखी त्यांच्या लोकांचा धरूं नये. हें आपण जाणतांच आहां. ठीक आहे. आपण आतां थकून भागून आलां आहां, जरा पडा, मग आपण बोलूं याच्यासंबंधानं. **तानाजी**राव, तुह्मी पाहिजे तर घटकाभर स्वस्थ पडा."

महाराज वरील भाषण करीत असतां **तानाजी** स्वस्थपणें ऐकून घेत होता. त्याचे कान त्यांच्या मुखांतून पडणारा प्रत्येक शब्द आंत घेत होते, आणि डोळे त्यांच्या चर्येवर लागून राहून तीवरून त्यास पक्कें समजून आलें कीं आप-ल्यापासून ते कांहीं तरी लपवून ठेवीत आहेत. शेवटीं "तुह्मी पाहिजे तर पडा," हें शब्द कानीं पडतांक्षणीं हात जोडून महाराजांस ह्मणतो, "सरकार, बोलण्याची माफी असावी. पण हेजीब मधाशीं आला, त्यानं कांहीं तरी चिंता उपजविणारी बातमी आणली असावी. महाराज चिंतेंत असतां तिचं कारण विचारण्याचं सोडून हा **तानाजी** घटकाभर नाहीं क्षणभर तरी कसा स्वस्थ पडेल?"

तें **तानाजीचें** बोलणें ऐकून महाराज किंचित् हंसले, आणि ह्मणाले, "**तानाजी**, तुला मी सांगणार नव्हतों. तूं इथून जाईपर्यंत त्यासंबंधाची गोष्टच बाहेर फोडणार नव्हतों, पण तूं माझ्या चर्येवरूनच ताडलंस, तेव्हां आतां सांगित-ल्याखेरीज कसं चालणार? **आईसाहेब**, आपण तिकडे माझ्या दिवाणखान्यांत आलां तर सांगतों. मामा, आपणही चला. ह्मणजे आपण आतां बोलत होतों त्याची आपल्याला प्रचीति दाखवितों." असें ह्मणून महाराज पुढें झाले आणि त्यांच्या मागो-माग **तानाजी** व **शेलारमामा** हे चालले व सगळ्यांच्या मागून **जिजाबाई-साहेब** आल्या. खासमहालांत येण्याबरोबर भालदारचोपदारांस बजावून सांगितलें कीं, कोणीही आलें तरी सध्यां कांहीं वेळ नुसती वर्दीसुद्धां द्यायची नाहीं. आणखी **बाळाजी आवजींस** मात्र इकडे पाठवून द्यावें. त्याप्रमाणें चिटणीसही आल्या-वर पांचहीजणें बसलीं, आणि महाराजांनीं **दिल्लीहून** आलेला एक कागद काढून चिटणिसांस वाचून दाखविण्यास सांगितला.

परंतु या कागदांत मजकूर काय होता, हें सांगण्यापूर्वीं हा कागद कोठून व कोणा-कडून आला हें सांगणें अवश्य आहे. **जयसिंगाच्या** भरीनें व **बादशहाच्या**

दिलखुष पत्रांमुळें **शिवाजी**महाराज **दिल्ली**स गेले व **बादशहानें** तेथें त्यांचा अपमान करून दगलबाजीनें त्यांना नजर-कैदेंत ठेवलें. त्या कैदेंत असतांना **शिवाजी**महाराजांच्या गोड स्वभावामुळें व **औरंगजेबानें** त्यांच्याशीं केलेल्या दगलबाजीबद्दल वाटलेल्या तिटकाऱ्यामुळें दरबारच्या पुष्कळ रजपूत व एकदोघां मुसलमान अधिकाऱ्यांचेंही मत **शिवाजी**महाराजांस अनुकूल असें झालें होतें. एकदोघांशीं तर फार उत्तम स्नेहही झाला. या स्नेह्यांपैकीं एका रजपुतानें त्यांस रोजच्या रोज बादशहाकडल्या बातम्या पोंहोचवाव्या. पुढें महाराज **दिल्ली**हून निघून गेले, तेव्हांपासून तसाच कांहीं मजकूर कळविणें असल्यास मुद्दाम एक **हेजीब** पाठवून तो यांस तिकडल्या बातम्या पाठवीत असे. त्याच रजपूत अधिकाऱ्याकडून आज हा **हेजीब** पत्र घेऊन आला होता.

या पत्रांत **औरंगजेबानें** ज्या कांहीं हेतूनें **उदयभानू**ला इकडे पाठविलें होतें तें सर्व लिहून कळविलें होतें. **उदयभानु कोंडाण्या**वर येऊन पोहोंचला, त्याच सुमाराला हा **हेजीब** इकडे येऊन पोंहोंचावयाचा, परंतु वाटेंत कांहीं दिवस तो थोडासा आजारी पडल्याकारणानें त्यास एके गांवीं मुक्काम करावा लागला. **उदयभानु** नांवाचा कोणी मुसलमान झालेला सरदार अगदीं एकाएकीं **कोंडाण्या**वर येऊन राहिला आहे व त्याचेबरोबर दहा पांच हजार सैन्य आहे असें महाराजांना कळलें असून त्याच्या इकडे येण्याचा हेतु वगैरे काय, आणि त्यानें आणखीही बरेंचसें सैन्य आणलें आहे, तें **जसवंतसिंगा**कडे पोंचतें केलें यांतही हेतु काय, तें सर्व इत्थंभूत समजण्यासाठीं महाराजांनीं आपल्याही हेरांना पाठविलें होतें. त्यावरून त्यांना बहुतेक बातमी लागलीच होती. परंतु आजच्या या पत्रानें त्यासंबंधीं कांहीं शंकाच ठेवली नाहीं. **बाळाजी आवजीं**नीं तें पत्र वाचून दाखविल्यानंतर कांहीं वेळ महाराज व बाकी सर्व मंडळी अगदीं स्तब्ध बसली होती. तितक्यांत **जिजाबाई**साहेब ह्मणतात, " मला वाटलंच होतं एकदां हा **कोंडाणा** आपल्याला घेतला पाहिजे. बादशहा पक्का लबाड, ह्मणूनच त्यानं तो आपल्या ताब्यांत ठेवून घेतला. कीं तो हातीं असला, ह्मणजे आजूबाजूचा प्रांत जरी शत्रूच्या हातांत असला, तरी हरकत नाहीं. वाटेल त्यावेळीं मारा करतां येईल. परवांच्याच दिवशीं मी अशी उभी होतें, आणखी सहज माझी नजर समोर **कोंडाण्या**वर गेली आणखी वाटलं कीं, तुला एकदां सांगावं कीं, हा किल्ला एवढा घेऊन आपलं लष्कर त्यावर ठेव. त्याखेरीज कांहीं आपला बंदोबस्त ठीकठाक बसायचा नाहीं, "

" आईसाहेब, आपण ह्मणतां त्या गोष्टी खऱ्या; पण आजपर्यंत तह मोडण्याला कांहीं सबब नव्हती. आतां या **उदयभानू**बरोबर मुद्दाम लष्कर देऊन पाठवलं आहे, तेव्हां आपला हेतु बरा दिसत नाहीं, असं ह्मणून आपल्याला काय करायचं तें करायला मुळींच हरकत नाहीं. शिवाय या **उदयभानू**ला बादशहानं आपल्या-वर नजर ठेवायला ह्मणून पाठवला आहे, असं या पत्रावरून **जसवंतसिंगा**ला आणखी **शहाजाद्या**ला कळलं, ह्मणजे ते मुळींच याला मदत करायला यायचे नाहींत हें उघडच आहे. बादशहाचा आपल्यावर किती विश्वास आहे तें पहा ह्मणून लिहून मी मुद्दामच हें पत्र त्या दोघांकडे पाठविणार आहें. ते दोघे चार दिवस स्वस्थ बसले, ह्मणजे माझं काम झालं. चार दिवसांनीं हा किल्ला आपल्या हातांत आल्यावर मग त्यांनीं जरी आपल्याविरुद्ध गडबड सुरू केली तरी आपण कांहीं त्यांचं चालूं देणार नाहीं. ते बहुतकरून तसे लबाड दिसत नाहींत. बादशहाच्या विरुद्ध आपल्याशीं मिलाफ असावा अशा बुद्धीच्या माणसां-पैकीं आहेत. पण न जाणों, आपण आपलं सावधपणानं रहावं. तेव्हां आतां पहिलं काम हा **कोंडाणा** परत घ्यायचा. तें कसं काय जुळणार तें आतां पहायचं. **उदयभानु** नवीन माणूस आहे, तो येऊन आपली व्यवस्था वगैरे नीट लावून स्वस्थ होण्याच्या आंतच त्याला इथून हांकून दिला पाहिजे. त्याला पक्की व्यवस्था लावायला तशी फुरसत देतां उपयोगी नाहीं. तेव्हां मी आतां स्वतःच या कामाला पुढें होणार, त्याखेरीज चालायचें नाहीं. "

तें महाराजांचें बोलणें ऐकून **तानाजी** एकदम जरा पुढें सरून ह्मणतोः " सरकार, आपल्याला मी फार दिवस विनंति करणारच होतों कीं, आपण आतां कोणच्याही मोहिमेंत पुढें होत जाऊं नये. माझ्यासारखे नौकर बाळगायचे ते कशाला ? महाराज, आपण आघाडीला जाऊन जर कांहीं वेडंवांकडं झालं, तर केवढा घात होणार आहे ! ती आरंभीं आरंभींची गोष्ट निराळी होती. आणखी आतांची गोष्ट अगदीं निराळी ! आतां आपल्यावर केवढं स्वराज्य अवलंबून आहे ! आतां आपण इथें नाहीं, तर **राजगडा**वर स्वस्थ बसून माझ्यासारख्यांना हुकूम करीत जावे. "

" **तानाजी**राव, तुमच्यासारख्यांचे प्राण आणखी माझे प्राण यांत काय अंतर आहे ?"

" महाराज, माझ्या प्राणांत आणि आपल्या प्राणांत अंतर विचारतां होय ? सरकार आपल्या प्राणांचं बरंवाईट झालं, तर ही स्वराज्याची एवढी थोरली

प्रचंड इमारत शत्रूला मोडून तोडून टाकायला यत्किंचित्सुद्धां वेळ लागायचा नाहीं. ती आपोआपच ढांसळून पडूं लागेल. आपल्या शिराचा या सर्व इमारतीला मुख्य आधार आहे. आणखी माझ्यासारखा गेला, तर एखादी वीट पडल्यासारखें देखील वाटायचें नाहीं. आपण आहांत तोंवर माझ्यासारखीं लाखों माणसं आपल्याला मिळतील. तर आपण मला आज्ञा करा. मी जाऊन हा किल्ला सर करून देतों. "

" **तानाजी**राव, तुह्मी कराल कीं नाहीं याबद्दल मला मुळींच शंका नाहीं. पण तुह्मी आपल्या मुलाचं लगीन काढलं आहे, तेव्हां तें कार्य होईपर्यंत आपल्याला मी कांहीं सांगणार नाहीं. किल्ला हस्तगत करून घ्यायचाच, तर तो आतांच घेतला पाहिजे आहे, थांबून उपयोग नाहीं, हीही गोष्ट खरी, पण त्याकरितां मीं स्वतःच जाण्याचा विचार केला आहे. "

" लगीन ! महाराज, आपल्यासारख्या स्वामींच्या कार्यापुढें मुलाचं लगीन ह्मणजे काय गोष्ट आहे ? सरकार आधीं **कोंडाण्या**चं लगीन उरकीन, मग **रायबा**च्या लग्नाला आपल्याबरोबर जाईन. **शेलारमामा**, तूं परत जा आणखी **सूर्याजीला** ह्मणावं आपलं सगळं लष्कर घेऊन इकडे ये. महाराज, **कोंडाणा** किल्ला सई करून येईन, मग आतां पुढें काय बोलायचं तें बोलेन. पण माफी असेल, तर एक विनंति आहे, ती ऐकून घेतलीच पाहिजे... "

"काय विनंति आहे!" महाराज अत्यंत कौतुकानें **तानाजी**कडे पहात ह्मणाले.


" विनंति एवढीच कीं, मी किल्ला सई करीपर्यंत आपण या **राजगडा**वरून हालायचं नाहीं. मी काय काय युक्त्या करीन, कुठून काय संधान बांधीन, तें आपल्याला वेळोवेळीं कळवीन, आपला सल्ला घेतल्याखेरीज कांहीं करणार नाहीं. पण आपण मात्र अगदींसुद्धां इथून हालतां कामा नये. केवळ माझ्यावर सोंपवून आपण स्वस्थ बसून पहा. मी फत्ते करून येईन. एवढी ही स्वामीसेवा केवळ माझ्यावर टाकून आपण करून घ्यावी. आपल्या पायावर हात ठेवून प्रतिज्ञा करतों कीं, **कोंडाणा** आजपासून दहा दिवसांच्या आंत घेऊन आपल्या पायापाशीं येतों. माझ्यासारख्याच्या जीवाची किंमत काय, आपण सुरक्षित, तर माझ्यासारखे लाख लोक आपल्याला मिळतील. पण आपल्या केंसाला धक्का लागला, तर तो राज्याला धक्का होणार आहे. "

तानाजीचें हें बोलणें इतकें आवेशयुक्त होतें कीं, **शिवाजी**महाराज देखील क्षणभर अगदीं स्तब्ध बसले. नंतर **तानाजीस** ह्मणतात,"तुझ्या घरीं लगीन निघालं

ह्मणून तूं आमंत्रण करायला आलास, आणखी इथें येण्याबरोबर तें लगीन एका बाजूला ठेवून तुला असल्या कामगिरीवर पाठवलं तर लोक ह्मणतील तरी काय ? हे **शेलारमामा**च काय ह्मणतील विचार कीं यांना. तें कांहीं नाहीं. ...."

परंतु **शेलारमामां**नीं त्यांस पुढें कांहीं बोलूं दिलें नाहीं. ते एकदम त्यांस ह्मणतात, " मी होय ? महाराज ? अन् मी कुठं आतां परततोय्. **तान्या**, आपल्या कुळाचं नांव राखलंस पोरा ही कामगिरी घेऊन, महाराज, सोराज्याचं काम आधीं का पोराचं लगीन आधीं ? मी **तानाजी**बराबरच जाणार गड घ्यायला. सरकार, गड आपला झाला ह्मणून समजा. गड घेऊन लगीन कांहीं होत नाहीं व्हय् ? त्या गडाशींच आतां आधीं लगीन असं **तानाजी** ह्मणाला तें खरं. आधीं तेंच लगीन आतां. आतां महाराज आपण अगदीं निश्चित असा. मी बघा आतां पंचायशी वर्सांचा झालों, चार दोन वर्सं अधिकच पण कमी नाहीं. पण बघा कसा गड घेतों तें. पर हा **तानाजी** सांगतो तसंच हां ! आपण इथून अगदीं हालतां कामा नये. अगदीं इथ्थं बसा. गड काबीज झाला, मग तिथें मोठी थोरली होळी करूं ह्मणजे गड काबीज झाला असं आपण समजावं. आणखी मग आपल्याला काय करायचं तें करावं. कायरे **तान्या**, असंच कीं नाहीं ? महाराज, आज या **तान्या**चं मला फार कौतुक वाटतं आहे. आज यानं आपल्या कुळाचं नांव राखलं. अरे, दुसऱ्या कोणाला तरी पाठव **सूर्याजी**ला बोलवायला. मी तुझ्याबरोबर येणार. ह्मणजे ह्माताऱ्या मुरलेल्या हाडांत तरी किती पीळ असतो, न् किती ताकद असते, तें समजेल. त्या मोंगलांची मुंडी मुरगाळायला माझ्यासारखा कसलेला ह्माताराच चांगला. "

ह्माताऱ्याची वीरश्री पाहून तर **शिवाजी**महाराजांस फारच आश्चर्य वाटलें. त्यांना असें वाटत होतें कीं, हा ह्मातारा **तानाजीस** तूं आपल्या लग्नाचें टाकून या भरीस काय पडतोस, दुसऱ्या कोणाला तरी पाठवीत असले महाराज, तर पाठवूं दे असें ह्मणेल; पण पहावें तों ह्माताऱ्याची वीरश्री सर्वांच्यावर ताण. " वेळ प्रसंग पडला तर माकडासारखा गड चढून जाईनना, " असें मध्येंच तो **तानाजी**कडे वळून ह्मणाला. ते वेळचा ह्माताऱ्याचा आविर्भाव तर फारच विलक्षण होता. तो पाहून **जिजाबाई**साहेबांस किंचित् हंसूं सुद्धां आलें. आणि त्या आपल्या मुलाकडे पाहून ह्मणतात, " बाबारे, असल्या या लोकांच्या हिंमतीनं आणखी आशीर्वादानं तुझं राज्य चाललं आहे बरं. आपल्या राज्याचे हे खांब. हे किती जुने झाले, तरी त्यांची किंमत फार मोठी. " **शेलारमामा** लागलीच त्यावर


झुंजारबुरुज
दरी (तानाजी चढला ती)
कलवंतिणीचा बुरुज
उदयभानुचें थडगें
कल्याणदरवाजा
लाती
तानाजीची समाधी
बालेकिल्ला
ढालकाठी
पुणेंदरवाजा
खानकडा
सिंहगड

म्हणतात, “ मावली, हें सारं तुझ्या आशीर्वादाचं फळ आहे. तुझा कुसवा धन्य. त्यांत हा असा हिरा उपजला म्हणून आमच्यासारख्यांचं तरी मोल झालं. बरं आहे. आतां आम्ही इथून जाणार. **रायबा** तिकडे निजला असेल, तर त्याला आतां आपल्या ओंस्यांत घातला आहे. गड सर करून येऊं, मग त्याला नेऊं. ”

तितक्यांत **तानाजी** उठलाच. त्यानें एकवार महाराजांना व आईसाहेबांना दंडवत घातलें, आणि आशीर्वाद व **महाराजां**च्या हातचा विडा घेऊन तो व मामा दोघेही जाण्यास सिद्ध झाले.

महाराजांनींही त्यांस आनंदानें निरोप दिला.

प्रकरण ७ वें,

कोंडाणें किल्ल्यावर.

—o—

आतां आपलें कथानक पुढें चालविण्यापूर्वी वाचकांच्या सोयीकरितां या किल्ल्याची थोडीशी पूर्वीची हकीकत व रचना वर्णन करून सांगतों, ह्मणजे वर घडणारे नानाप्रकारचे प्रसंग कोठें कोठें कसे कसे घडले तें समजण्यास ठीक पडेल.

हा किल्ला **पुण्या**पासून सुमारें सात कोसांवर नैर्ऋत्य दिशेस आहे. **सिंहगड** व **भुलेश्वर** या नांवाची जी डोंगराची ओळ आहे त्या ओळीपैकीं अतिशय उंच अशा एका शिखरावर हा बांधलेला आहे. दक्षिणेस व उत्तरेस हा किल्ला ह्मणजे नुसतां प्रचंड सुळक्यासारखा असून तेथून त्या किल्ल्यावर हल्ला करणें केवळ अशक्यच ह्मटलें तरी चालेल. हा किल्ला केव्हां व कोणीं बांधला याची माहिती मिळणें आजमित्तीस शक्यच दिसत नाहीं. परंतु ज्या वेळीं महंमदी लोकांचा इकडे मुळींच शिरकाव नव्हता, किंबहुना हिंदुस्थानांत त्यांचा शिरकाव झाला नव्हता व ज्या वेळीं स्थळांना, गडांना व पुरांना संस्कृत नांवें देण्याचा परिपाठ होता, तेव्हांचा हा असावा असें त्याच्या नांवावरून व दंतकथेवरून दिसतें. या किल्ल्याचें नांव **सिंहगड** होण्यापूर्वी **कोंडाणा** असें होतें. आणि याच्या एका अंगाला एक लहानसें गांव आज आहे, त्याचें नांव **कोंडणपुर** असें आहे. दंतकथा असें ह्मणते कीं, **कोंडणपुर** ह्मणजे **कौंडिन्यपुर** व **कोंडाणा** ह्मणजे **कौंडिन्य** ऋषीचें आश्रमस्थान होय. अजून या किल्ल्याच्या घेऱ्यांतील कोळी लोकांस विचारलें असतां ते

असेंच सांगतात कीं, हा किल्ला ह्मणजे **कौंडिन्य** किंवा शृंग ऋषीचें तपश्चर्येचें स्थान होय. तें कसेंही असलें तरी **कोंडणपुर** या नांवांतील '**पुर**' या शब्दावरून असें खास वाटतें कीं, मागला **कोंडण** हा शब्द मुसलमानी उपजेचा शब्द नव्हे, मग **कोंडणपुर** ह्मणजे **कुंडिनपुर** असो किंवा **कौंडिन्यपुर** असो. त्याचप्रमाणें **कोंडाणा** ह्मणजे **कुंडिनगड** असो किंवा **कौंडिन्यगड** असो. तेव्हां हा किल्ला मुसलमानांनीं बांधला असेल, अशी कल्पनाही कोणी घ्यावयास नको. हा मूळचा **यादव** किंवा **शिलाहार** किंवा त्याच्याही पूर्वीच्या कोणा पराक्रमी राजांनीं बांधलेला असावा. इतिहासांत या किल्ल्याचें नांव प्रथमतः **महमद तघलका**च्या कारकीर्दीचे वेळीं येतें. **नागनाईक** नांवाचा कोणी कोळी राजा या प्रांतीं राज्य करीत होता, त्याच्या ताब्यांत हा होता. व **महमद तघलकानें** या प्रांतीं स्वाऱ्या केल्या तेव्हां कोळी राजाला पराजित करण्याचा उपक्रम करून त्यानें त्यास त्राही त्राही करून सोडलें असतां तो राजा आपल्या लोकांसकट किल्ल्यांत शिरला. किल्ल्यावर शस्त्रास्त्रप्रयोग करून किल्ला घेण्याचें केवळ अशक्यच होतें, आणि **महमद तघलकास** त्याप्रमाणें अनुभवही आला तेव्हां त्यानें किल्ल्यांच्या भोंवतीं वेढा देऊन आठ महिने काढले आणि शेवटीं किल्ल्यावरचा दाणागोटा संपला तेव्हां राजानें किल्ला सोडला.

पुढें **अहमदनगर**च्या राज्याचा संस्थापक **मलिक अहमद** याच्या ताब्यांत तो किल्ला गेला असल्याचेंही इतिहासांत आढळून येतें. **अहमदनगर**च्या अमदानींत **शहाजी** राजांच्या ताब्यांत हा किल्ला होता व **त्रिंबक**च्या सुभेदारानें **जिजाबाई**साहेबांस कैद करून नेऊन सोडून दिल्यानंतर त्या **कोंडाण्या**वरच येऊन राहिल्या होत्या. **विजापुरकर** पाठीस लागल्यामुळें **शहाजीराजां**ना एकवार याच किल्ल्याचा आश्रय करावा लागला व पुढें त्यांनीं **विजापुरकरां**कडे नौकरी पतकरल्यानंतर अर्थातच तो किल्ला **विजापुरकरां**च्या ताब्यांत गेला. **पुणें** प्रांताला संभाळून राखण्याला अतिशय उत्तम असा किल्ला हाच होय. यामुळें ज्याचें त्याचें लक्ष्य साहजिकपणेंच या किल्ल्यावर जात असे. **शिवाजीमहाराजांनीं** स्वराज्यस्थापनेला प्रारंभ केला, तेव्हां अर्थातच इतर किल्ल्याबरोबर नव्हे, तर कांहीं आधींच ह्मणजे **तोरणा** किल्ल्यावर आपल्या पराक्रमाचें तोरण बांधल्याबरोबर लागलीच हा किल्ला घेतला व तेथून आपल्या स्वराज्यस्थापनेचा उपक्रम सुरू केला. पुढें पुष्कळ वर्षें हा किल्ला **महाराजां**च्या ताब्यांतच होता आणि **पुण्यास** **शाहिस्तेखान** येऊन त्यानें गडबड चालविल्याबरो-

वर **महाराज** या **कोंडाण्या**वरच गेले व **षाहिस्तेखाना**स कसें काय मारावयाचें, त्याच्यावर घाला कसा घालावयाचा याचा सगळा बेत तेथून त्यांनीं करून तो लवकरच पार पाडला. हा बेत कसा काय पार पाडला हीही एक मोठी मौजेचीच हकीकत आहे. **महाराजां**नीं आपल्याबरोबर यावेळीं फक्त २५ मावळे, **तानाजी मालुसरे** व **येसाजी कंक** इतकीच मंडळी घेतली होती. आणि रात्रीं मशालीच्या उजेडांत एक लग्नसमारंभ चालला होता, त्यांत एक इथें, एक तिथें असे मिसळून लपत छपत ती मंडळी **षाहिस्तेखाना**च्या वाड्याजवळ जाऊन पोहोंचली. ज्या वाड्यांत लहानपणीं **दादोजी कोंडदेवां**च्या शिक्षेंत **शिवाजीमहाराज** रहात असत तोच वाडा हा होय, यामुळें त्या वाड्याची त्यांस अगदीं पक्की माहिती होती, आणि त्यांनीं एकदम **षाहि-स्तेखाना**च्या महालांतल्या एका खिडकीचा मार्ग पकडून ते त्याच्या महा-लांत शिरले. खान चैनींत होता. तो हें काय लचांड एकाएकीं आलें असें वाटून घाबरला व **महाराजां**चा आणि **येसाजी कंका**चा घाव चुकवून पळूं लागला. तो खिडकींतून जातां जातां त्यास एक वार लागून त्याचीं बोटें तुटलीं आणि तो खालीं पडला. त्याबरोबर दोघी दासींनीं त्यास फरपटीत ओढून नेऊन कोठें **सुर-**क्षित स्थळीं ठेविलें. इकडे त्या वाड्यांत एकच हलकल्लोळ झाला. तेव्हां या मंड-ळींनीं पाय काढून **कोंडाण्या**चा मार्ग धरला. पुढें मोंगलांनीं तो किल्ला मिळ-विण्यासाठीं व त्या लबाड मराठ्यांस शासन करण्यासाठीं कांहीं स्वार व शिबंदी पाठविली, परंतु किल्ल्याजवळ जातात तोंच वरून बंदुकीच्या गोळ्यांचा वर्षाव झाला, आणि त्यांतून बचावून निघून परत **पुण्या**कडे फिरतात तों वाटेंत दबा धरून बसलेल्या मावळी सैन्यानें त्यांजवर भडिमार करून त्यांची अगदीं फट-फजिती केली! तेव्हांपासून पुढें बरेच दिवसांत पुनः त्या किल्ल्याच्या वाटेस कोणी गेलें नाहीं. इ. स. १६६४ सालीं **सुरत** लुटून आल्यानंतर **शहाजी-**राजांच्या मरणाची वार्ता ऐकून विव्हल झालेले **महाराज** या किल्ल्यावरच येऊन राहिले आणि **शहाजी**राजांची सर्व क्रिया त्यांनीं येथेंच उरकली.


त्यानंतर १६६५ सालीं **जयसिंगा**नें मात्र त्यांजपासून मोठ्या शर्तीनें तो किल्ला घेतला आणि तेथें आपले लोक ठेविले. पुढें **औरंगजेबा**नें महाराजांस " **राजा** " ही पदवी दिली व त्यांच्याशीं तह केला. त्यांत सगळे किल्ले परत दिले, परंतु **कोंडाणें** व **पुरंदर** हे दोन मात्र दिले नाहींत; कारण हे दोन किल्ले ह्मणजे त्या प्रांतींचें नाक होत. ते आपल्या हातचे गेले ह्मणून **महाराजां**स त्याबद्दल फार

वाईट वाटत होतें. कांहीं केलें तरी आपण हा किल्ला जरूर परत घेतला पाहिजे असें त्यांच्या मनांत फार. परंतु **औरंगजेबा**शीं तह केला आहे, तो मोडण्यासाठीं कांहीं तरी कारण सांपडल्याखेरीज आपण एकदम तह मोडूं नये अशा बिचारानेंच ते केवळ राहिले होते. तेव्हां **उदयभानू**च्या येण्यानें आणि त्याच्याबरोबर ज्या बातम्या आल्या त्यांवरून **महाराजां**ना आयतेंच कारण सांपडलें. **कोंडाणा** घेतला कीं, मोंगलांचें थोडेंसें नाक छाटल्याप्रमाणेंच होणार आहे असा अभिमान वाटूनच त्यांनींही या प्रसंगाचा फायदा घेण्याचें ठरवून मागील प्रकरणांत सांगितल्याप्रमाणें **तानाजी**ची त्या कामावर योजना केली. **महाराजां**चे मनांत एवढी मोहीम आपण स्वतः करावी असें होतें, परंतु **तानाजी** बिलकुल ऐकेना. आपण जागचें हलूं नये अशी अटच त्यानें घातली व आपण दहा बारा दिवसांचे आंत किल्ला सर करतों अशी प्रतिज्ञा केली, यामुळें त्यांस खरोखरीच फार आनंद झाला. **तानाजी** अमुक काम करणार ह्मणून प्रतिज्ञा भोगून गेल्यावर तें काम झालेंच ह्मणून समजावें इतका त्याजवर **महाराजां**चा विश्वास.

कोंडाणा हा प्रचंड किल्ला समुद्राच्या सपाटीपासून सुमारें ४३०० फूट व **पुण्या**चे सपाटीचे वर कोठें २३००, कोठें २५०० फूट उंच आहे. आणि यास कोठूनही सोपी अशी वाट नाहीं. सोपी असो कीं कठिण असो, वाटच नाहीं ह्मटलें तरी चालेल. हल्लीं याचे दोन दरवाजे दिसतात, परंतु पूर्वीं आणखी एक दरवाजा होता असें कळतें.

एक **पुणें** दरवाजा, ज्या दरवाज्यानें **पुण्या**कडून लोक जाऊन गडावर चढतात तो व दुसरा **कल्याण** गांवच्या बाजूला **कल्याण** दरवाजा ह्मणून आहे. हे दोन दरवाजे आजमित्तीस स्पष्ट उभेच आहेत, परंतु पूर्वीं झुंजार बुरूज व कलावंतीणीचा बुरूज या दोन बुरुजांच्या दरम्यान असणाऱ्या सोंऱ्याच्या दक्षिणेस झुंजार बुरुजाचे बाजूस आणखी एक दरवाजा असे. त्या दरवाज्याचा आतां कोठें मागमूससुद्धां नाहीं.

या किल्ल्याच्या घेऱ्यांत कोळी लोकांची वस्ती होती. व त्याच लोकांपैकीं **रायाजी** नांवाचा एक कोळी आमच्या कथानकाच्या वेळीं **घेरेसर**नाईक होता. **उदयभानु** किल्ल्यावर येईपर्यंत या किल्ल्याच्या संरक्षणाची विशेष काळजी घेतली जात नसे. कारण किल्ला अगदीं दुर्गम अशी सर्वत्रांची खात्री होती. परंतु **उदयभानु** येऊन राहिल्यापासून त्यास एक मोठी भीति होती कीं, कोणी तरी दगलबाजीनें येऊन **कमलकुमारी**ला आपल्या ताब्यांतून पळवून नेईल, तेव्हां त्यानें किल्ल्यावर पाऊल



सिंहगड—पुणें दरवाजा.

घातल्या वेळेपासून त्या बाबतींत अतिशय काळजी घेण्यास सुरुवात केली. आधीं **घेरेसर**नाईक **रायाजी** याला व **डोणजें, कल्याण, कोंडणपूर,** वगैरे ठिकाणच्या पाटीलकुळकर्ण्यांस आणि मुख्य कोळ्यांस व महार, रामोशी, वगैरेंस बोलावून आणून असा हुकूम सोडला कीं, "कोणी परकी मनुष्य– मग ती स्त्री असो, पुरुष असो किंवा एखादें लहान पोर असो, जर किल्ल्याच्या घेऱ्यांत राहणाऱ्या कोणाकडे पाहुणें येत असेल, तर आधीं किल्ल्यावर माझ्यापर्यंत वर्दी आली पाहिजे. आणखी माझा लेखी हुकूम मिळाला ह्मणजे मग त्याला आंत घ्यावें. हुकुमांत जितके दिवस लिहिले असतील तितकेच दिवस त्यानें रहावें. आणि त्या हुकुमाप्रमाणें किल्ल्याच्या हद्दीच्या पार माणूस गेल्याबरोबर किल्ल्यावर मजकडे वर्दी यावी. जो मनुष्य जितके दिवस रहायचा असेल, तितके दिवस रोज सकाळीं आणि संध्याकाळीं तो तेथें असल्याबद्दलची वर्दीही आपल्याकडे यावी. या हुकुमाविरुद्ध जो कोणी कोणास किल्ल्याच्या हद्दींत आणील त्या आणणारास व तो आणील त्यास दोघांसही कडेलोट करून मारण्यांत येईल."

असा सक्त हुकूम दिल्याकारणानें सर्व मंडळी अगदीं घाबरून गेली होती. ही कोणाही येणाराजाणारासंबंधानें तजवीज केली होती. खालीं वाड्यांतून तर गस्तीची तजवीज केलीच होती. परंतु मध्यंतरीं सर्व किल्ल्याच्या सभोंवार जीं बारा मेटीं आहेत त्यांवरही दर मेट्यावर कोळ्यांचा एक एक पहारा असून दर प्रहरांतून निदान तीनदां गस्तीचा शब्द करून आपल्या उजव्या व डाव्या हातच्या मेट्यावरल्या लोकांचा साद घेतला जावा असा सक्त हुकूम असे! शिवाय दर मेटावरून तीन इसम निघून त्यांनीं आपल्या उजव्या अंगच्या मेटावर चालून जावें. नंतर तेथून तिघांनीं निघून आपल्या पलिकडल्या मेटावर जावें व गस्त पोंचवावी, असें सगळ्या रात्रभर चालत असे. अर्थातच त्या कोळी लोकांस आतां अगदीं जागृतीनें रहावें लागत असे. परंतु कोळी लोक तेवढेच या किल्ल्याचे बाहेरचे रखवालदार नसत, तर किल्ल्याच्या तटापासून सुमारें दीड पुरुष खोलीवर बाहेरले अंगास सगळ्या किल्ल्याच्या सभोंवार सुमारें चार पांच हात रुंदीची जागा केलेली होती. या जागीं महार लोकांचीं झोंपडीं असून तेथें त्यांचा पहारा असे. सगळ्यांत जागता पहारा याच लोकांचा आणि यांची पहाऱ्याची जागाही फार बिकट.

उदयभानूनें या सर्व लोकांस एकवार आपल्या समोर बोलावून ताकिदी

दिल्या आणि तो स्वतः एकदां ती महारांची पहाऱ्याची जागा व कोळ्यांचीं मेटीं आणि सगळा तो घेरा हिंडून सर्व स्थिती आपल्या नजरेखालीं घालून आला.

ज्याप्रमाणें किल्ल्याच्या बाहेरची त्याचप्रमाणें वरचीही बंदोबस्ती त्यानें केली.

प्रकरण ८ वें.

तोताराम गोंधळी.

रायाजी घेरेसरनाईक यांचे घरीं त्यांचे मुलीचें लग्न निघालें, तेव्हां अर्थातच पुष्कळ वऱ्हाडी जमावयाचे. त्या वेळीं या बाजूच्या मावळांत **रायाजी**च्या जातीच्या कोळी लोकांचीच वस्ती फार. तो प्रांत त्यांचाच झाला होता ह्मटलें तरी चालेल; आणि त्यांत **घेरेसर**नाईक ह्मणजे केवढें प्रस्थ, आपल्या जातीपुरते राजेच ते ! तशांत त्यांच्या येथें त्यांच्या लेंकीचें किंवा लेंकाचें लग्न निघालें ! मग काय विचारतां ? आजूबाजूचे पांच पंचवीस गांव लोटावयाचे; इकडे **उदयभानू**ची तर सक्त ताकीद कीं, किल्ल्याच्या घेऱ्यांत कोणी चिटूपाखरूंसुद्धां आपल्या हुकुमावांचून आंत येऊं नये. अर्थातच आपलें लग्नाचें वऱ्हाड चार आठ दिवस येणार-जाणार तर त्याला मुभा असावी, अशी विनंति करण्यास **रायाजी उदयभानू**-कडे गेला. पहिल्या सपाट्यास **उदयभानू**नें त्यास, अशी सरसहा परवानगी दिली जाणार नाहीं, असें सांगितलें. **रायाजी**ला अतोनात वाईट वाटलें, थोडासा रागही आला, परंतु एकदम रागावून बोलण्यांत कांहीं अर्थ नाहीं, प्रथम सवलतीनें घ्यावें, असें मनांत आणून तो **उदयभानू**स ह्मणाला, " सरकार, परवानगी देणं न देणं आपल्या मर्जीची गोष्ट आहे. पण आमच्या घरीं कार्य, आणखी आमच्या जातवाल्यांनासुद्धां लग्नाला यायला परवानगी नाहीं. याचा अर्थ काय ? मूळ सोयरीकच जर **पुण्यां**तली आहे, तर आह्मांला आमच्या सोयऱ्यांना आणखी त्यांच्या सोयऱ्याधायऱ्यांना आंत आणल्याखेरीज कसं चालेल ? आपली मर्जी नसली तर, चार दिवस आम्ही सगळे कोळीच बाहेर जातों. लग्नकार्य उरकल्यानंतर येऊं. तोंपर्यंत आपला पहारा आपण संभाळा. आतां दुसरी गत आम्हांला नाहीं. "

रायाजी उदयभानूस हें बोलला तें उघड उघड रागावून जरी बोलला नाहीं तरी इतक्या निकरानें व खेदानें बोलला कीं, त्याच्या बोलण्याची खोंच

उदयभानूच्या लक्ष्यांत आल्याखेरीज राहिली नाहीं आणि त्यानें क्षणभर विचार केल्यावर त्याचा त्यालाच थोडा पश्चात्ताप झाला. तेव्हां तो **रायाजीस** ह्मणतो, " परवानगी द्यायला तशी माझी कांहीं हरकत नाहीं, पण तुमच्या सगळ्या लोकांची मोजदाद कशी रहावी ? "

" सरकार, तशी मोजदाद रहायची नाहीं. उगीच खोटं कशाला सांगावं ? आमचे सगळे कोळी आहेत मोजलेलेच, पण केव्हां किती येतात, आणखी किती जातात त्याचं काय सांगावं ? त्यांत जर भलतासलता आलेला सांपडला, तर त्याच्याबद्दल जबाबदारी माझ्याकडे. पण आपण मुळींच येऊं देऊं नये ह्मटलंत तर तें कसं व्हायचं ? मग आमची सगळ्या लोकांचीच चार दिवस सुट्टी समजून आह्मांला जाऊं द्यावं. आपल्या घरीं लगीन, आन् ह्मणे कोणी येतां कामा नये कोणी जातां कामा नये. असं कसं होणार ? "

आपली ताकद काय आहे आणि किल्ल्याच्यावर संरक्षणार्थ ठेवलेल्या मस्त रजपूत लोकांस आपली जरूर किती आहे हें चांगलें पूर्णपणें माहिती असल्यामुळेंच **रायाजी**ला असें निक्षून बोलतां आलें हें उघड आहे. आणि **रायाजी**नें असें निक्षून सांगितलें असतांही **उदयभानु** संतापळा नाहीं किंवा संतापला असला तरी त्यानें आपला संताप बाहेर दिसूं दिला नाहीं, याचें कारण तरी तेंच. हे लोक जर खरोखरीच एकदम सोडून गेले, तर आपली स्थिति काय होणार ? आणि यांना सोडून जाण्याला तरी आपण काय ह्मणून संधि द्यावी हें त्यास समजेना. लग्नकार्याच्या वेळीं अर्थातच त्यांचे जातभाई त्यांच्याकडे आले पाहिजेत आणि अशा वेळीं विनाकारण त्यांची नाखुषी करणें ह्मणजे आपल्याला भलतीच गैरसोय करून ठेवणें होय, इत्यादि विचार त्याच्या मनांत आले. परंतु आतां आपण यास उत्तर काय द्यावें याबद्दल त्याला मोठें गूढ पडलें. जर यांस आपण ताबडतोब सवलत दिली, तर अर्थातच आपल्या वजनाला कमीपणा येईल व न दिली तर हे लोक सोडून जाण्याचा संभव. अशा वेळीं आपला बोज राखून त्यांचें मन दुखवावयाचें नाहीं अशी कांहीं तरी युक्ति केली पाहिजे, असें त्यास वाटूं लागलें आणि तो **रायाजीस** ह्मणतो, " अरे, तुमचीं लग्नकार्यें इथें होऊं नयेत किंवा तुमचे जातभाई कोणी तुमच्याकडे येऊं नयेत, असं कोण तुह्माला ह्मणेल ? बादशाहतीचे तुह्मी पिढीजाद नौकर, तुह्मांला असें ह्मणेल कोण आणि तुमच्यावर गैरभरंवसा करील कोण ! मी तुह्माला थोडा बजावून बोललों याचं कारण इतकंच कीं, न जाणों आतांचे दिवस कांहीं तसे स्वस्थतेचे नाहींत, तो पुंड **शिवाजी** नेहमीं डोळ्यांत तेल घालून

बसलेला आहे. केव्हां पटकन् येईल आणि आपल्या गबाळीपणाचा फायदा करून घेईल याचा नेम नाहीं. **रायाजी**, तुझ्यासारख्या विश्वासू नौकरानं दुसऱ्या कोणालाही आपल्या गोटांत येऊं दिलं नाहीं, तितकी ती काळजी घेतली म्हणजे झालं. आणखी काय पाहिजे ? तेवढ्या बाबतींत तुला एकदां सावध करून ठेवावं म्हणूनच मी तरी इतकं बोललों, नाहींतर दुसरं कांहींच कारण नाहीं. बेलाशक तुझ्या घरचं लग्न चालूं दे. तुझ्या घरचं लग्न तें माझ्या घरचं लग्न, असं समजून मी तुला थोडी सावधगिरी राखण्यासाठीं जरा बोललों. **रायाजी** तुझ्यासारख्या माणसांना जरा चीड येण्यासारखं बोललं म्हणजे बरं असतं, दुसरं काय ? बाकी पिढीजाद नौकरांच्या घरीं लग्न आहे, आणखी म्हणे त्याच्या सोयऱ्याधायऱ्यांना लग्नाला येऊं द्यायचं नाहीं, असं कोठें कोणी बोललं आहे ? वाटतील तितकी तुझी मंडळी आण, ने, येऊं दे, जाऊं दे, त्याबद्दल तुला यत्किंचित्सुद्धां कांहीं हरकत नाहीं. पण त्या मंडळींतून गफलतीनें कोणी भलताच आपल्या शत्रूचा हेर आंत येऊं देऊं नको. त्याबद्दल काळजी घे म्हणजे झालं, दुसरं काय आहे माझं म्हणणं ? ''

रायाजी कांहीं कमी वस्ताद होता असें नाहीं. आपल्या निःस्पृहपणाच्या भाषणानें मऊ येऊन स्वारीनें हें लांबलचक गुळचटपणाचें भाषण केलें हें त्यास समजलें. आणि तो त्यास म्हणाला, "आम्ही पिढीजाद नौकर तर खरे. पण जर आपण आह्मांला मानलं आणखी आमच्यावर पूर्ण भरंवसा टाकला तर त्याचा उपयोग. अहो, याच्यापूर्वी सगळे किल्लेदार बघा, आमचा भरंवसा ठेवून रातचे स्वस्थ किल्ल्यावर घोरत पडत होते घोरत ! पर कोणाची माय नाहीं व्याली इकडे किल्ल्याकडे यायला, कीं ढुंकून बघायला ! जो कोण येईल त्याचा आम्ही खालच्या खालीं मारे धुवा उडवून त्याला हांकून लावतोना ! मला बघा कांहीं फार दिवस नाहीं लागायचे. फक्त शिवरात्रीपावतर. शिवरातीचा दिवस गेला म्हणजे मग पुनः आपलं जसं आहे असं काइम करून सगळ्या लोकांची झाडून अगदीं हजिरी आपल्याकडे देऊन आपल्याला अगदीं निश्चित करूं. पर सरकार, आज जर आपण आह्माला सवड दिली नाहीं, तर आमचा बोज काय राहिला ? आमच्या जातभाईवर आमचा दरारा काय राहिला ? आह्मी आपल्या विश्वासांतले नौकर म्हणून जिकडे तिकडे मिरवतों, अन् वेळवखत आला तर आमच्या सोयऱ्याधायऱ्यालासुद्धां आह्मांला आणतां येत नाहीं. तेव्हां आतां काय म्हणायचं ? म्हणून आपल्याला म्हटलं दुसरं कांहीं नाहीं. आपण य्र परवानगी दिली, आमची विनंति मानली, आतां आह्मांला बघा मुठभर मास आलं दुसरं कांहींबी नाहीं. ''

रायाजीच्या या बोलण्यानें **उदयभानू**ही खुष झाला व त्यानें त्याला पुनः एकदां काळजीपूर्वक वागण्याबद्दल निक्षून सांगून **खडकवासलें, डोंणजें, कल्याण, कोंडणपुर,** वगैरे सर्व सभोंवतालच्या अधिकाऱ्यांना देण्यासाठीं हुकूम लिहून दिले कीं, " शिवरात्रीपर्यंत **रायाजी**च्या घरीं जे कोण लोक येतील त्या लोकांना अगदीं खुशाल येऊं जाऊं द्यावें. कोणच्याही प्रकारचा अडथळा करूं नये." ते हुकूम **रायाजीनें** आपल्या मेटयावर आल्यावर सर्व अधिकाऱ्यांकडे पाठवून दिले आणि **रायाजी**च्या सोयऱ्याधायऱ्यांस येण्याजाण्याला कोणच्याही प्रकारें अडथळा होणार नाहीं अशी व्यवस्था झाली. **घेरेसरनाइका**च्या घरचें लग्न, मग काय विचारतां? जिकडून तिकडून वऱ्हाडमंडळी जमूं लागली आणि लगीनसोहाळा सुरू झाला व जेवणीखाणींही सुरू झालीं.

या कोळी लोकांत अनेक कुळाचार वगैरे असावयाचे व निरनिराळ्या देवांप्रीत्यर्थ अनेक तऱ्हेचे समारंभ व्हावयाचे. त्यांतून **रायाजी** थोडासा उधळ्या स्वभावाचा असल्यामुळें त्यानें आपल्या मुलीच्या लग्नाचे संबंधांत अमुक एक ह्मणजे कमी झालें असें कोणी ह्मणूं नये ह्मणून फारच उधळपट्टी चालविली. त्या लग्नसोहाळ्याचें येथें वर्णन करण्याचें आपल्यास कांहीं प्रयोजन नाहीं. एक विशेष गोष्ट मात्र सांगावयाची आहे.

रायाजीचा व्याही **दौलतराव पुण्या**चा होता. त्यानें आपल्या व्याह्यास ह्मणजे **रायाजी**स असें सांगितलें कीं, " बाकी आपण कार्य केलें, तें तर फार उत्तमच झालें. आपण आतां गोंधळ घालावयाचा तो आमच्या शिफारशीच्या गोंधळ्याकडून घालवावा. आमचा गोंधळी असा छान शाहीर आहे कीं, त्याच्या लावण्या आणखी पवाडे तुह्मी ऐकले, तर त्याला आपल्याजवळ नेहमींच ठेवून घ्यावासा वाटेल." **रायाजी**ला आपल्या पिढीजाद गोंधळ्याचा अभिमान होताच. तेव्हां तुमचा गोंधळी चांगला कीं आमचा चांगला, याबद्दल वाद होऊन शेवटीं दोन दिवस दोघांचेही गोंधळ व्हावे असें ठरलें. या गोंधळाबद्दल भाषणें चाललीं असतां **रायाजी**चा एक चुलतचुलता **बाबाजी** ह्मणून तेथें जवळच बसला होता तो हलकेच ह्मणतो, " **राया**, गोंधळी असावा, तर तो त्या **तुळशा** गोंधळ्यासारखा असावा. तुला आठवतं आहे आपण त्या **कोंडणपुराला** जत्रेला गेलों होतों अन् तिथं त्या पलीकडल्या झाडाखालीं मागल्या बाजूला एक गोंधळी घट मांडून आपला गोंधळ घालीत होता. आन् त्यानं जेव्हां का सूर काढला आहे. वा! वा! वा! त्या झाडाखालींच जणूं जत्रा भरली, जो येतो तो तिथं

घुसतो. जो आला तो तिथें आला. देवळांत चिलकुल गर्दीच नाहीं. तसा गोंधळी असला तर खरा. नाहीं तर भाराभर गोंधळी करायचे काय ते? "

दौलतराव एकदम मध्येंच ह्मणतो, " बस् बस् बस्. **बाबाजी**राव, अगदीं बराबर बोलतात. आमचा हा गोंधळी मी ह्मणतों हा त्या **तुळशा**चा सख्खा भाऊ. हा त्याच्यामागं नेहमीं असे. **तुळशा** चार महिने झाले गमावला. पण हा त्याचा भाऊ **तोताराम** अगदीं त्याच्यावर ताण आहे. त्याचा तुम्हांला येईलच आतां अनुभव. **तुळशा** असता तर **तुळशा**लाच आणला असता. पर तो गमावला याला काय इलाज नाहीं. राव, गोंधळी ह्मणजे काय कमी असतात काय ? या **तोतारामा**ला तर **तुळशा**नंच–त्याच्या भावानंच–तयार केलेला. त्याला सुपारी द्या. अगदीं मागं पुढं पाहूं नका. तो आह्मी आपल्याबराबरच आणणार होतों, पण म्हटलं तुम्हांला सांगून विचारून मग काय करायचं तें करावं. "

रायाजी त्यास उत्तर करतो, " आणला असतं तर काय झालं असतं ? चार दिवस आधीं जरा बसून बसूनच चार लावण्या, चार पवाडे त्याच्याकडून आज पांच सहा रोज म्हणून घेतले असते ! मंडळीला तेवढी गंमत. "

" बरं, आतां एकदां ऐकल्यावर मग पांच चार दिवस त्याला ठेवून घेऊन ह्मणून घ्या, मग तर झालं! त्याला काय, तो कांहीं आपल्या बाहेर जाणारा माणूस नाहीं."

अशा रीतीनें **तोताराम** गोंधळ्याचा गोंधळ करण्याचें ठरून त्यास सुपारी देण्याचेंही ठरलें. त्या काळीं **तुळशीदास** व **अज्ञानदास** नांवाचे दोन गोंधळी **शाहीर** फार नामांकित होते. मोठमोठ्या लोकांच्या घरीं जेथें जेथें गोंधळ घालण्याचा प्रघात असे, तेथें आपली या दोघांपैकीं एकाला सुपारी दिलेली असायाची. त्यांतही **तुळशीदास** शाहीर गाण्याच्या व वीरश्रीचे पवाडे म्हणण्याच्या कामांत फार फार प्रवीण असे. तो **तुळशीदास** गमावला यामुळें पुष्कळ लोकांस वाईट वाटलें, परंतु लवकरच त्याचा भाऊ पुढें येण्याच्या खटपटीस लागला व आपल्या भावाच्या ओळखीच्या सर्व ठिकाणीं त्यानें आपलीं संधानें बांधण्याचा यत्न चालविला. अद्यापि फार ठिकाणीं तो गेलेला नव्हता, यामुळें कोणास तो तसा प्रत्यक्ष माहिती झाला नव्हता. **दौलतरावा**च्या घरीं लग्न आहे आणि ते आपलें सगळें वऱ्हाड घेऊन **कोंडाण्या**कडे जाणार आहेत, ही संधि आपल्याला फार चांगली आहे, असें वाटून त्यानें **दौलतरावा**ची गांठ घेऊन आपल गोंधळ करविण्याविषयीं गळ घातली. पिढीजाद गोंधळ्याला अर्थातच त्याब

द्दल वैषम्य वाटलें आणि त्यानें **तोतारामा**च्या आमंत्रणांत मोडता घालण्या-करितां पुष्कळ खटाटोप केला. परंतु **दौलतरावानें** त्याची समजूत घालून त्याला **पुण्यास** परत आल्यावर तुझाही गोंधळ घालीन, असें अभिवचन देऊन लावून दिलें.

रायाजीनें आपली संमति देण्याबरोबर **दौलतरावानें** आपला एक माणूस मुद्दाम पाठवून **तोतारामास** आपल्या सगळ्या मंडळीनिशीं बोलावूं धाडलें आणि त्याप्रमाणें **तोताराम** आलाही. लग्नसोहळा होऊन गेला होता, आणि गोंधळ घालावयाचा तेवढाच काय तो लग्नसंबंधाचे बाबतींतला समारंभ राहिलेला होता. **रायाजीनें** आणि **दौलतरावांनीं** फार नामांकित पोवाडे व लावण्या गाणारा गोंधळी शाहीर बोलावला आहे, असें जिकडे तिकडे कळतांच काय विचारतां, त्या रात्रीं फार गर्दी झाली; आणि नजीकच्या व लांबच्या मिळून पांचपन्नास गांवचीं माणसें त्या गोंधळ्याचें गाणें ऐकण्यासाठीं आलीं. गोंध-ळ्याची तयारी तर खूप होती. त्याच्यामागें असणारीं माणसें उभीं राहिलीं, घटाची सामग्री घेऊन घट मांडला. ऊंस तीन तिकोनी उभे करून मधून माळ सोडून ती त्या घटावरल्या नारळाच्या शेंडीला भिडेशी लोंबत बांधिली, तुणतुण्याचा कर्णमधुर आवाज निघूं लागला, संबळ्या संबळ कडाक्यानें वाजवूं लागला आणि गोंधळ्यानें पहिल्या प्रथम आपलें नमन करण्यास सुरुवात केली. गोंधळ्याचा आवाज खडा पहाडी, परंतु त्यांत ह्मणावी तशी आरंभींच गोडी वाटेना. नमन होतांच रीतीप्रमाणें निरनिराळ्या देवतांनीं गोंधळास यावें ह्मणून आवाहनास सुरवात झाली.

मोरगांवच्या मोरेसरा गोंधळा ये गोंधळा ये। जेजुरीच्या खंडोबा गोंधळा ये।
पंढरपुरच्या विठोबा गोंधळा ये। कोल्हापुरचे अंबाबाई गोंधळा ये।
निमगांवच्या खंडोबा गोंधळा ये। तुळजापुरचे तुकाई गोंधळा ये।
जाखाई जोखाई गोंधळा ये। कवठ्याची यमाई गोंधळा ये।
रानवनच्या देवता गोंधळा ये। तुमचा गोंधळ मांडिला हो! गोंधळ।

अशी सगळी देव मंडळी गोंधळास निमंत्रित करून पुढें **गणराजाचें**ही पुनः आवाहन '**गण**' ह्मणून झालें. नंतर नेहमींप्रमाणें

सुदिन सुवेळ तुझा मांडिला गोंधळ हो ॥
पंचप्राण दिवट्या दोनी नेत्रांचे हिलाल हो ॥

घटस्थापना केली तुळजापुर महाद्वारीं हो ॥
उदोकार गर्जती उडविती किति कुंकू भंडारा हो ॥

अशी सुरुवात झाली. रीतीप्रमाणें असे गोंधळ यापूर्वी कुठें कुठें झाले त्याबद्दलची नांवनिशीही झाली. असा एकंदर प्रारंभींचा प्रस्ताव झाला. नंतर कोणची कथा लावावी त्याबद्दल विचारपूस होऊन कोणी **जाय**राणीची कथा सुचवली, कोणी **काळ्या चांफ्या**ची सुचवली, कोणी **आगनपासोड्या**ची सुचवली. शेवटीं यजमानाच्या मर्जीप्रमाणें एक कथा ठरून कथानकही सुरू झालें. गोंधळ्यांत दिवट्या ह्मणजे एक मुख्य पात्रच होय. त्याचीही यथास्थित विटंबना झाली, त्यामुळें सगळ्यांस हांसून हांसून पुरेवाट झाली. त्याचप्रमाणें कथा चालली असतां गोंधळीबोआंनीं **जायराणी**च्या 'शिणगाराचें' वर्णन 'नेसली जरतार पाटावाजी' वगैरे फार बहारीनें केलें. होतां होतां मध्येंच एक लढाईचा प्रसंग आणून तेथें तर गोंधळ्यानें आपल्या वर्णनानें फार फार बहार केली. शेवटीं आतां कांहीं वेळ बसून पोवाडे व लावण्या ह्मणण्याचा बूट निघाला. तेव्हां ज्याबद्दल या गोंधळ्याची विशेष आख्या ऐकली होती, तें जवळ आलें ह्मणून पुष्कळांस फार आनंद झाला. दिवट्याच्या विटंबनांनीं व संबळ्याच्या पागोटें पडण्यापर्यंतच्या चेष्टांनीं हंसून हंसून मंडळींना कंटाळा आला, तेव्हां बसून पोवाडे लावण्या ह्मणण्याची सूचना होतांच सर्वत्रांचे कान तिकडे लागले. **तोताराम** खालीं बसला, त्यानें तें आपलें तुणतुणें नीट लाविलें आणि पहिल्याच खड्या तानेला मंडळीचें चित्त आपल्याकडे आकर्षून घेतलें. इतका वेळ उभा राहून गोंधळ घालणारा **तोताराम**च आतां गातो आहे काय ? अशी शंका येऊन मंडळी त्याच्याकडे पाहूं लागली. त्यानें एक दोन लहान लहान फटके ह्मटले आणखी मग विशेषच सहा सूर काढून एका पोवाड्यास सुरुवात केली. या वेळीं त्यानें आपला आवाज इतका चढविला होता कीं, तो तेथें जमलेल्या मंडळींपैकीं अगदीं कान्याकोंपऱ्यांतल्या माणसाला ऐकूं जात असला पाहिजे. इतकेंच नाहीं, तर सगळ्या त्या दरीभर तो भरून ती दुमदुमून गेली व मंडळी त्यामुळें तटस्थ झाली.

प्रकरण ९ वें.

थूः त्येच्या जिनगानीवर.

आपल्याकडे आतां सर्व श्रोते मंडळींचें लक्ष्य पूर्णपणें लागलें आहे, असें पाहून **तोतारामानें** पुढील पोवाडा म्हणण्यास प्रारंभ केला.

पोवाडा.

उदे उदे ग अंबाबाई । भक्तासाठीं धांवत येई ॥
नमन करूं तो शिवशंकर । घेतल किती त्यानं अवतार ॥
मारून टाकल किती असुर । सोडविल देवाच भार ॥
धरत्री दैत्यांनीं गांजिली । अहो धरत्री दैत्यांनीं गांजिली ॥
त्यानं त्यांचीं कुळं निर्दाळिलीं । हो त्यानं त्यांचीं कुळं निर्दाळिलीं
तो का आह्माला विसरल । बाहूं त्याला तरि धांवत येईल ॥
त्यानं मारला भस्मासूर । त्यानं मारला तो त्रीपुर ॥
त्यानं मारला तो जटासुर । किती किती मारलं त्यानं असुर ॥
असा मोठा दयेचा सागर । त्याचा उदे बोला र सत्वर ॥
असुरांनिं मांडिला कहार । धर्मांचा करिती संहार ॥१॥ उदे उदे ग॥

कलयुगीं हे मोंगल राक्षस । केला गाईब्राह्मणांचा सत्यानास ॥
गोरगरिबांचा छळ करती । पतिवर्तांच्या इजती घेती ॥
अहो घरची बाइल ओढून नेती। आह्मां टकटका बघाया लाविती॥
चरचरा गाई धरून कापीती । अन् घटघटा आइच रगात पीती ॥
ह्ये का त्या अंबाबाईला खपत । ह्ये का त्या गिर्जावराला खपत ॥
ह्मण मग अंबाबाई अपुल्या वरा । जाहो पृथिमीवर घ्या अवतारा॥
सोडवा धरत्री वेगि जाउन । काय करीतां इथं बसून ॥
झाला धर्मांचा हो चुरा । झाला साधूचा हो चुरा ॥
देती पतिवर्ता प्राण । कां हो झांकितां हे नयन ॥
येऊं द्या तुम्हांला हो करुण । नका झाकुं अपुले नयन ॥ उदे उदे ॥२॥

ऐकुन ह्या मातेच्या बोला । भोळा शंकर जागा झाला ॥
सांग घेउं कुठे ग अवतार । करतों दुष्टांचा संहार ॥

बोले अंबा मग शंकरा । तुह्मी जाव हो गड शिवनेरा ॥
तिथं माझी मोठी भक्त । जिजा भोसल्याची राहत ॥
घ्या हो तिच्या पोटीं अवतार । करा दुष्टांचा संहार ॥
मग घेतला त्रिशूळ पाश । मग घेतला त्यानं अंकुश ॥
वाजवि मोठ्यानं डमर । बोलावि आपुल गण सार ॥
शिव काय बोल मग त्यांना । चला चला र कापु दुष्टाच्या माना ॥
मी होतो शिवाजी राणा । तुह्मीं माझ मावळ जाणा ॥
चला आतां र भरभरा । घेऊ पृथ्वीवर अवतारा ॥ ३ ॥ उदे उदे ॥

गड शिवनेर किती भाग्याचा । शिव झाला पुत्र जिजाबाईचा ॥
मावळचे लोक किति भाग्याचे । गण झाल पुत्र मावळ्यांचे ॥
तस महाडच तळकोंकण । भाग्यवान खर उपजति तेथें गण ॥
वैशाख शुद्ध पंचमीचा तो सुदिन । शके पंधराशे पन्नासा-
मधि एक उण ॥
संवत्सर तो प्रभव जाण । उगवला तो सूर्येनारायण ॥
बाईचं लागलं पोट दुखायाला । गडबडा लोळण घे पृथिमीला ॥
पर काय बोल आपुल्या मुखानं । कापिन सार दैत्याच रान ॥
घेईन हातामधि तरवार । दुष्टाच्या मुंडक्याचं पाडिन भार ॥
मध्यानि आला सूर्येनारायण । अवतरला तो गिरजारमण ॥
सगळ्या गडावर तेज किती फाक । उपजला जवा तो
शिवबाळक ॥ ४ ॥उदे उदे ॥

बाळ वाढला दिसमास । आनंद देतसे जिजाबाईस ॥
कौतुक वाटल पंत दादोजीस । असा नामि हिरा अपुल्या जतनेस ॥
बाळ आला ती वर्साला । दुडुदुडु धाव साऱ्या किल्ल्याला ॥
माग तरवार जिजाबाईला । ह्मण जातो लुटपुट्या लढाईला ॥
बाळ पांचा वर्सा आला ॥ लागला खेळ कसा खेळायाला ॥
जमवि सौंगड्याचा मेळा । ह्मण घालु विजापुरावर घाला ॥
अर मी होईन तुमचा राजा । तुह्मी व्हा सारी माझी प्रजा ॥
आणु दुष्टांना धरून । टाकु मुंड्या त्यांच्या मुरगाळुन ॥
मी करीन गाईब्राह्मणांचा सांभाळ । मी मोंगला मारीन बखळ ॥
अस त्याच खेळ नाना गुणी । आईसाहिब संतोषल्या मनीं ॥५॥उदे उदे

बाळ धा वर्साचा झाला । राजानं नेला विजापुराला ॥
ह्मण शहाजी राजा काय बाळाला । चल पाच्छायाच्या दरबाराला॥
बाळ बोल महाराज येईन दरबाराला । पर कुर्निसा करनार नाई
पाच्छायाला ॥
नमावं एक त्या देवाला । नमावं आपल्या आईबापाला ॥
नमावं आपल्या हो गुरूला । पर नमूं नव्ह त्या मोंगलाला ॥
ऐकुन बाळाचे बोल । त्याला महाराजांनीं दटावल ॥
बळंच संगाती घेऊन गेल । पाच्छायापुढ नेऊन उभ क्येल ॥
पर नाहीं त्यानं मानगुट वाकवल । नाहीं त्यानं हातच उचलल ॥
कुर्‍यानं पाच्छायाकड पाहिलं। सार लोक टकटका बघाया लागल
बोल पाच्छाय कुर्निसा करावा बाळा । बोल बाळ " नमन करावं
देवाला "
नमन काय करावं तुह्माला । नमन करावं त्या देवाला ॥
मी जातों दरबारांतून । महाराज या तुह्मी मागाहून ॥
मला नाहीं इथं बसवत। आई वाचून नाहीं मला करमत ॥६॥ उदे उदे

असं बोलुन बाळ निघाला । रस्त्यामंधि काय दिसलं त्याला ॥
एका गाय ब्राह्मणा कालवड मिळाली दान । आनंदानं चालला
त्येंना घेऊन ॥
लाग रस्त्यामंदी खाटकाच दुकान । बघुन गाय खाटिक आडवी
ब्राह्मण ॥
ह्मण मला वोप रे ही गाय । ऐकुन ब्राह्मण मोकलितो धाय ॥
खाटिक घेऊन धावला सुरा । पळाली गाय, धरल त्यानं वासरा ॥
ब्राह्मण झाला दीन जोडिले करा । विनवितो नको मारु रे आइ-
च्या लेंकरा ॥
पर खाटिक बोलला हंसून । अर अस कितीक पाहिल बामन ॥
कापिन वासरू तुझ्या पुढ ह्ये चरचरा । रगतान भरीन तुझ्या
तोंडाचा दरा ॥
धरलं वासरूं त्यानं पाडलं धरणीवर । घाव घालाया हात केला
वर ॥ ७ ॥ उदे उदे ॥
तो काय झाली ऐका मात । त्याचा तुटून पडला हात ॥
माग एक बाळक धा वर्साचा । घालितो घाव तरवारीचा ॥

पाहुन जन झाले हो विस्मित । राहिल उभ त्याकड पाहात ॥
ब्राह्मणास दिली एक मोहोर । जाहो घेऊन वासरूं घरिं निर्घोर ॥
बोलुन बाळ चढला पालखित । जन उभे टकटका पाहत ॥
झाला बाळाचा ते दिशीं निर्धार । नाहीं विजापुरामधि राहणार ॥
सांगितलं शहाजीराजाला । मला लावून द्या हो पुण्याला ॥
बाळाचा निश्चय ऐकून । शहाजीराज ग्येल संतापुन ॥
पर बाळानं टाकिलं खाणं पिणं । पुण्याला दिलं मग लावुन ॥
तवापासून लागल ध्यान । करूं कशी गाइची सोडवन ॥
बाळपनच सौंगडी जमवुन । गाई ब्राह्मणाला राखीन ॥
मोंगलांनि देश केला खस्त । त्यांना मी करीन कव्हा फस्त ॥
जमविल कोकणच हेटकरी । शिकविली त्यांना शिलेदारी ॥
जमविल मावळचे मावळ । त्यांच शूर शिपाई बनविलं ॥ ८ ॥

अशि घेऊन आपली सेना । काबिज केला गड तोरणा ॥
बांधिल स्वराज्याचं तोरण । उभ क्येलं मऱ्हाठ्याचं निशाण ॥
गड दुसरा तो चाकण । घ्येवा ऐसं झालं मन ॥
तिथ नरसाळा तो फिरंगोजी । गडकरी खरा सूर गाजी ॥
त्याला पाठिवलं सांगुन । काय ऐका हो शिवरायानं ॥
गाईब्राम्हणाच्या रक्षणा । कराया स्वराज्याची रचना ॥
जे जे येतील मजकड धावुन । त्येंचं माझं जमलं भाऊपण ॥
पर जे जे होतील मज बेमान । त्येंचं माझं पक्कं शत्रुपन ॥
जे जे मोंगलांचे चाकुर । थूः रे थूः त्येंच्या जिनगानीवर ॥
तुम्ही सूर मर्द फिरंगोजी । कुठ अभिमान तुमचा ग्येलाजी ॥
करितां कुनाची तुम्ही चाकरी । करा करा विचार थोडा तरी ॥
अर गाय आपली माता खरी । पर मोंगल तिची मान चरचर चिरी॥
कुठ गेली तुमची ईरेसरी । करितां त्या दुष्टाची चाकरी ॥
गेली लाज तुमची का र ? । थूः तुमच्या जिनगानीवर ॥
आपल्या आया बहिनी तरी सांभाळा । का त्यावी घेता मोंगलाला ॥
गेली लाज तुमची का र ? । थूः तुमच्या जिनगानीवर ॥
अर कोनी बुडविली आपुली घर । कोनी आनून बसविला मों-
गल वर ॥

गेला का र सारा विचार। थूः तुमच्या जिनगानीवर ॥
सरजा शिवाजी अस बोल। तवा फिरंगोजीचं मन फिरलं ॥
म्हण राया मी आजपासून। गेलो तुझा दासच बनून ॥
गड घेतला चाकण। केलं फिरंगोजिशीं भाऊपण ॥

\+ \+ \+ \+ \+ \+ \+ \+
\+ \+ \+ \+ \+ \+ \+ \+

गोंधळी जसजशीं आपल्या पोवाड्याचीं कडवीं ह्मणत जाई तसतसें त्याचें अवसान खूपच वाढत चाललें, आणि त्याच्या अवसानाच्या संसर्गानेंच जणूं काय तेथें बसून ऐकणाऱ्या प्रत्येक व्यक्तीचे बाहू स्फुरण पावूं लागले. आपल्या श्रोत्यांच्या मनांवर ज्या कडव्यांचा विशेष परिणाम व्हावा अशी त्या गोंधळ्याची इच्छा, किंवा जीं कडवीं ह्मणतांना त्याचा स्वतःचा आवेश फारच वाढे, तीं कडवीं तो अस्तन्या वगैरे सारून आणि मिशांवर ताव देऊन ह्मणत असे. होतां होतां जेव्हां तो "थूः त्येच्या जिनगानीवर" पालुपदाच्या कडव्यावर येऊन एका मागून एक चरण ह्मणून शेवटीं "थूः त्येच्या जिनगानीवर" असें अत्यंत आवेशानें ह्मणे, तेव्हां श्रोतेमंडळीपैकीं बहुतेकांच्या अंगांत वीरश्री चढली. प्रथम जे वेडेवांकडे अघळपघळ बसले होते ते नीट उठून जरा सावरून व वीरासनें घालून बसले. हे सर्व कोळी लोक मोंगलांची चाकरी करीत होते खरे, परंतु बहुतेकांचें मन त्या गोष्टीविषयीं मोठीशी भक्ति किंवा आस्था बाळगून नव्हतें. श्रीशंकरानें स्वतः अवतार घेतला आहे, आणि दुष्ट मोंगलांना दंड करण्यासाठींच त्याचा सर्व प्रयत्न आहे. त्यानें आतांपर्यंत जेवढे प्रयत्न केले तेवढे त्याचसाठीं केले. गोब्राह्मणांचा आणि गरीबगुरीबांचा जो छल होत आहे तो नाहींसा करण्याकरितां त्याचा सगळा खटाटोप. तेव्हां अशा पुरुषाला तशा कामीं जे कोणी मदत करीत नाहींत, उलट आपला छळ करणारांनाच मदत करितात ते कृतघ्न, त्यांच्या "जिनगानीवर थूः" अशा अर्थाचीं कडवीं ह्मणतांना तर आमच्या **तोतारामाला** इतका आवेश आला कीं, तो उठून उभा राहिला आणि त्यानें आपले दोनी हात उभारून एक गिरकी मारून सगळ्यांकडे ते हात करून जणूं काय "हें **शिवाजी**महाराजांनीं **फिरंगोजी**ला म्हटलें इतकेंच नव्हे, तर मीही तुह्मांला तसेंच म्हणतों आहें. तें ऐकून तुह्माला कांहीं लाज वाटते आहे काय? नसेल लाज वाटत तर "थूः तुमच्या जिनगानीवर" असेंच ह्मणतो आहे असें दिसलें. त्या त्याच्या आविर्भावाबरोबर सर्वांचीं अंतःकरणें थरारून गेलीं. कविता कशीही असली, तरी ती म्हणणारा

जर त्यांत आपलें अंतःकरण पूर्णपणें ओतील तर श्रोत्यांस आपलेसे करून घेईल, असें जें ह्मणतात त्याचा अनुभव त्या वेळीं तेथें जमलेल्या त्या लोकांना आला. प्रथम जिकडे तिकडे शांत झालें, जो तो त्या **तोतारामा**कडे टकटका पाहूं लागला आणि थोड्याच वेळांत ती शांतता मोडून आपापसांत कुजबुज सुरू झाली. **रायाजी**चें तर भान अगदीं नाहींसें झालें. **दौलतरावा**ची तीच अवस्था झाली. त्यानें गोंधळ्यास कांहीं खूणही केली व गोंधळी आतां पुढें आपल्याच्यानें ह्मणवत नाहीं ह्मणून मधेंच आपला पोवाडा थांबवून स्वस्थ बसला. गोंधळ संपला कीं पुढें कांहीं आहे हें कोणासच कांहीं समजेना. " परंतु आतां पहाट झाली, आतां पुरे असें म्हणून " गोंधळ्याच्या दुसऱ्या एका साथीदारानें रीतीप्रमाणें गोंधळ संपवला व पुढें रीतीप्रमाणें विधि होऊन लोक उठून जाऊं लागले. परंतु प्रत्येकाच्या अंतःकरणावर त्या पोवाड्याच्या शेवटल्या कडव्यानें फार विलक्षण परिणाम झाला. जो तो आपण मोंगलांची नौकरी करतों हें फार वाईट, आपल्या जिनगानीवर तो **तोताराम** गोंधळी थुंकला, हें अगदीं वाजवी होय. आपणसुद्धां आपल्या जिनगानीवर थुंकलें पाहिजे, असेंच आपल्या ठिकाणीं ह्मणत व आत्मनिंदा करीत. आणि आपण आतां पुढें काय करावें, याबद्दल विचार करीत आपापल्या स्थानाला गेला. **रायाजी घेरेसरनाइका**च्या मनावर तर त्या पोवाड्याचा फारच विलक्षण परिणाम झाला. इतकेंच नव्हे, तर हा पोवाडा ह्मणणारा जातीचा गोंधळी नसून स्वतः **शिवाजी**महाराज किंवा त्यांच्या पदरचा कोणी तरी शूर मर्द असावा असेंही त्याला वाटलें. या गोष्टीची शहानिशा करून काय खरें आहे तें शोधून काढावें अशीही त्यास इच्छा झाली व गर्दी थोडीशी कमी होतांच त्यानें **तोतारामा**स खूण करून एकीकडे नेलें आणि धीटपणें एकदम त्यास तो ह्मणतो, " **तोताराम**, तूं जातीचा गोंधळी दिसत नाहींस. गोंधळ्याच्या वेषानें आलेला दुसरा कोणी आहेस. माझ्याजवळून चोरून ठेवूं नकोस. काय असेल तें खरं सांग. "

तोताराम जणूं काय हीच संधि पहात होता. **रायाजी**नें आपल्याला एकांतांत नेऊन एवढें विचारलें पुरे कीं, आपण धिटाईनें त्यास सर्व सांगून मोंगलांची चाकरी करण्याबद्दल त्याची खूप निर्भर्त्सना करूं आणि जर जुळलें तर त्याला फितुर करून घेऊं, असा त्याचा पक्का निश्चय दिसला. तेवढ्यासाठींच त्याचा सारा खटाटोप. तेव्हां असा खटाटोप करून सरतेशेवटीं इष्टसंधि आली असतां जसा एखादा माणूस तिच्यापासून इष्ट फलाची प्राप्ति करून घेतो, त्याप्रमाणेंच त्या गोंधळ्याचें वर्तन दिसलें.

रायाजीनें त्यास एकांतांत नेऊन वरील प्रश्न विचारण्याचा अवकाश– किंबहुना **रायाजीस** त्यानें आपलें बोलणें पुरेंसुद्धां करूं दिलें नाहीं; तोंच तो एकदम त्याला ह्मणतो, " **रायाजी**नाईक, तुमच्यापासून चोरून ठेवायचा जर माझा हेतु असता तर एवढा खटाटोप केला तरी असता कशाला ? मी अगदीं कांहींसुद्धां आपल्यापासून चोरून ठेवीत नाहीं. घ्या, मी स्पष्ट सांगतों कीं, **तुळसीदास** गोंधळ्याचा भाऊ ह्मणून आलेला हा **तोताराम**, खरा **तोताराम** नाहीं. मी **शिवाजी**महाराजांचा नौकर आहें.— मला ह्या माझा पेशा सांगायला किती तरी अभिमान वाटतो म्हणतां ! माझं नांव **तानाजी** आणखी मी आपली भेट घ्यायला आलों आहें. सरळपणानं येऊन भेट घेण्यापेक्षां आपल्याला आणखी आपल्या या सगळ्या लोकांना थोडंबहुत जागं करून मग भेटावं, असा विचार करून ही गोंधळ्याच्या सोंगाची बतावणी केली. आतां तुम्हांला जागें केलें आहे. मीं आपलें कर्तव्य केलें आहे. तुह्मी आतां वाटेल तें करा. "

' **तानाजी** ' हें नांव ऐकतांच **रायाजी**चे डोळे एकदम विस्तृत झाले. जणूं काय आपण पहातों आहोंत हें जागेपणींच कीं स्वप्नांत, याचाच त्याच्या मनांत विचार चालला होता. सुमारें पांच मिनिटें याप्रमाणें गेल्यानंतर तो **तानाजीस** हलकेंच ह्मणतो, " **तानाजी**राव, तुमचें धाडस जबर. समजा कीं, माझ्या जागीं मी नसतों, दुसरा कोणी पुरा मोंगलांचा भक्त असता, तर त्यानें आपल्याला ताबडतोब किल्ल्यावर नेलें असतें आणि त्या **उदयभानू**च्या पुढें उभें करून वेड्यावांकड्या तऱ्हेनें आपला जीव घेतला असता. "

" **रायाजी**नाईक " **तानाजी** शांतपणें व स्मित करून ह्मणतो, " धन्यानं सांगितलेली कामगिरी करितांना आपल्या जिवाला काय होईल याचा विचार करायाचा असतो काय ? "

" अलबत्, केव्हां केव्हां करावाच लागतो." **रायाजी**नें त्यास उत्तर दिलें आणि तो काय ह्मणतो तें पहाण्यासाठीं अगदीं स्तब्धपणें तो त्याच्या चर्येकडे पाहूं लागला.

तानाजी त्यावर पुनः त्यास म्हणतो, " केव्हां केव्हां करावा लागतो, नेहमीं नव्हे. पण सध्यांची वेळ तो विचार करण्याची नव्हती, आणि आपण सर्वस्वी मोंगलांना वाहिले नाहीं अशी माझी खात्री होती. "

" कशावरून ? " **रायाजी**नें त्यास पुनः प्रश्न विचारला.

" मनुष्याचा स्वभाव जाणण्याची कला माझ्या अंगीं अगदीं लहानपणापासून– उपजतांच आहे म्हटलं तरी चालेल." **तानाजी**नें पुनः त्यास हंसत हंसतच उत्तर

दिलें. नंतर तो किंचित् स्तब्ध बसला. आणि पुढें **रायाजीस** म्हणतो, " बरं, हें आपण विचारलंत तें ठीक झालं. मी त्याला उत्तरही दिलं. आत्तां पुढें काय करायचं तें बोला. मी आलों तो कांहीं तरी धीटपणा करून काम फत्ते करून तरी जायचं, नाहींतर प्राण द्यायचा अशा बेतानं आलों. नानाप्रकारच्या युक्त्या करून आपल्यापर्यंत पोंचलों आहें. आपल्याला सध्यांची मोंगलांची ताबेदारी आवडत असली तर माझं बोलणं नाहीं. मला वर नेऊन गुजरा, माझा कडेलोट होऊंद्या. आवडत नसली, तर गड काबीज करण्याला मदत करा. आपली मदत आम्हांला इतकीच पाहिजे कीं, वर चढायला सोपीशी जागा शोधायला सवड सांपडावी, आणखी दोनचारशें माणूस इकडे व दोनचारशें माणूस तिकडे दुसऱ्या अंगाला गपचुप येऊन उभं राहिलं तर बातमी वर जाऊं नये. बस इतकं झालं कीं, पुढें छापा घालायचं काम आमचं आह्मी करतों. **रायाजी**नाईक, आतां मनाचा एक निश्चय करा. महाराजांना मदत करून आपला हिंदुधर्म राखण्याला मदत केल्याचं समाधान घ्या, नाहीं तर मला गिरफदार करून वर घेऊन जा कसे. मी अधिक पाल्हाळानं बोलतच नाहीं. "

तानाजीचें तें बोलणें ऐकून **रायाजी** अगदीं स्तब्ध झाला. नंतर म्हणतो: " ठीक आहे. मी तुह्मांला मदत करतों. तहामध्यें महाराजांनीं हा किल्ला मोंगलांना परत दिला, तेव्हांच आह्मांला अतिशय वाईट वाटलं. पण महाराजांचा तरी इलाज नसेल, त्यांनीं काय करावं ? ठीक ठीक. **तानाजी**, तुमचा धीटपणा जबर. इतक्या मंडळींत तुह्मी तो पोवाडा ह्मणावा, आणखी अस्तन्या वर चढवून उठून उभं राहून मोठ्या त्वेषानें आमच्या सगळ्यांच्या " जिनगानीवर थूः " करावं, यापेक्षां आणखी शौर्याची गोष्ट ती काय पाहिजे ! चला, ह्या घेऱ्यांतले सगळे कोळी आणखी वरचे महार तुह्मांला अनुकूळ झाले ह्मणून समजा. आज येथून गेलेला प्रत्येक इसम याच विचारांत असेल. त्याला जाऊन बोलण्याचा अवकाश, तो कबूलच होणार. पंधरा दिवस झाले असतील नसतील, माझी आणखी महारांचा नाईक **गोंदनाक** याची गांठ पडली होती, तेव्हां आह्मी हेंच ह्मणत होतों कीं, **कोंडाणा** महाराजांनीं परत द्यायचा नव्हता. त्याला मी तुमच्यासाठीं बोलावून आणतों, आणखी मग पुढें काय काय कसं कसं करायचं तें ठरवूं. **दौलतराव-नाइकांची** मदत ह्मणूनच तुह्मी इथें आलां. त्यांनाही आपण या मसलतींत घेऊं."

तें ऐकून **तानाजी** हंसला आणि ह्मणतो, " ते या मसलतींत आहेतच. मी कोण हें त्यांनां ठाऊक असून त्यांनीं मला असा इकडे आणला. त्यांची आमची बाळपणापासूनची **पुण्याची** मैत्री ! "

प्रकरण १० वें.

ज ग त्सिं ग.

माघ वद्य पंचमीच्या मध्यरात्रीं **कोंडाण्या**वरील फौजेंतला एक रजपूत शिपाई **झुंजार**बुरुजावर पहाऱ्याला होता. त्याचे इतर सोबती स्वस्थ निजले होते. ते रजपूत शिपाई व मुसलमान शिपाई असेच निजत. आपल्यापैकीं एका दोघांना आळीपाळीनें जागत ठेवून बाकीच्यांनीं स्वस्थ घोरत पडावयाचें, हा त्यांचा क्रमच असे. एक दोघे तरी जागे ठेवावयाचे, त्याचा हेतु एवढाच कीं, **उदयभानु** मध्येंच एखाद वेळ पहारे वगैरे जेथल्या तेथें आहेत कीं नाहीं तें पहावयासाठीं येत असे. त्याची दूर चाहूल लागल्याबरोबर या जागे असलेल्या लोकांनीं बाकीच्यांस उठवावें. त्या रजपूत शिपायाच्या मतें हा किल्ला इतका मजबूत व कोणीकडूनही चढून येण्याला अशक्य असा होता कीं, त्याकरितां पहारा ठेवणें हें अगदीं केवळ अनवश्यकच होतें. तेव्हां **उदयभानू**ची चिरचिर चालेल ह्मणूनच कोणी कोणी तरी जागत बसून बाकीच्यांनीं खुशाल झोंपा काढाव्या. अशी त्या शिपाई लोकांनीं व्यवस्था केली होती. **उदयभानू**नें खालीं कोळ्यामहारांच्या पहाऱ्याची खूप सक्ती केली खरी, परंतु वरच्या लोकांवर त्याचें वजन मुळींच नव्हतें ह्मटलें तरी चालेल. जे त्याच्या आधींपासूनच तेथें होते, त्यांस आपल्यावर आणखी शिपाई आणले ह्मणून वैषम्य वाटून त्याचा व त्या नव्या शिपायांचा तिरस्कार वाटूं लागला होता. आणि जे त्याच्याबरोबर नवीन आलेले होते, त्यांना त्याच्याबद्दल कधींच सन्मान वाटत नव्हता. त्यांतून त्यानें मोठ्या कुलीन घराण्यांतली सती आपला धर्म आचरीत असतां तिला आडवून आणलें, ह्मणून तर सर्वांस फारच त्याचा तिरस्कार वाटे. यामुळें त्याच्या सक्तीचा कांहीं उपयोग न होतां उलट त्या शिपायांचीच त्याला थोडीबहुत भीति वाटे ! तथापि तो तें कधीं बाहेर दिसूं देत नसे. वेळवखत पडली, तर आपण वाटेल त्याला वाटेल ती शिक्षा करण्यास कमी करणार नाहीं, असेंच तो सर्वत्रांस दाखवी. यामुळें शिपाईही बाह्यतः आपण आपल्या कामांत अगदीं दक्ष आहोंत असें दाखवीत असत. **झुंजार**बुरुजावर जी शिपायांची टोळी ठेवली होती त्यांत वर सांगितलेला शिपाई मात्र अगदीं रोज पहारा करीत असे. आपल्याला झोंप येतच नाहीं, सबब आपण हें रात्रीच्या पहाऱ्याचें काम घेतों, असें म्हणून त्यानें तें काम घेतलें होतें. हा शिपाई दिवसा कधीं डोकें वरसुद्धां करावयाचा नाहीं. स्वस्थ

कोठें तरी पडलेला असावयाचा. एखाद्या चतुर माणसास असेंसुद्धां वाटावयाचें कीं, हा कांहीं कारणाकरितां दुपारीं तोंड लपवीत असतो. त्याच्या बरोबरीचे इतर शिपाई त्यास हा आपला एक विक्षिप्त प्राणी आहे असें समजून त्याची चेष्टाही करीत. परंतु त्यानें त्यांस कधींही उलट उत्तर दिलें नाहीं किंवा रागानें त्यांच्या विनोदाचा वगैरे प्रतिकार केला नाहीं. कोणी कांहीं काम सांगो, **जगत्सिंग** हट-कून त्याचें तें काम करून टाकायचा, कधीं नाहीं म्हणून म्हणायचा नाहीं, या-मुळें कोणीही त्याला ' हा नको ' असें म्हणत नसे. ज्याला त्याला तो आपल्या-जवळ हवा. परंतु **जगत्सिंगा**चा परम स्नेही **विशाळदेव** म्हणून एक होता. त्याच्याजवळ मात्र तो मनाची गोष्ट सांगावयाचा.

विशाळदेवही यावेळीं निजलाच होता. एकटा **जगत्सिंग** जागा होता आणि **झुंझार**बुरुजापासून तर **कलावंतिणी**च्या बुरुजापर्यंत लांबवेरी तो येरझरा घालीत होता. तेथून तितक्यांत सुमारें पांच चौक्या होत्या; परंतु याच्या एकट्याच्या जिवावर त्या पांची चौक्यांचे लोक अगदीं चैनींत होते, आणि " तुह्मी बिलकुल काळजी करूं नका. तसाच प्रसंग आला, जर **उदयभानु** इकडे येतोसा दिसला, तर मी तुम्हांला खचित उठवीन. " असें त्यांस तो बजावीत असे. आजपर्यंत पांचसात वेळां त्यानें याप्रमाणें निरनिराळ्या ठिकाणच्या चौक्यांच्या लोकांची अब्रू राखली होती. तेव्हां मग काय, त्याच्या जिवावर हे अगदीं बिनघोर असत.

वर सांगितल्याप्रमाणें तो हिंडत असतां ठिकठिकाणीं दबके, कानोसा घेतल्या-प्रमाणें करी आणि पुनः आपल्या वहिवाटीप्रमाणें हिंडे. करतां करतां एकवार तो एका ठिकाणीं थांबला आणि त्यानें तटाच्या अगदीं जवळ जाऊन एकवार खालचे बाजूस डोकावून पाहिलें. त्यास कांहीं दिसलें नाहीं. नंतर त्यानें एकवार हलकेच चुटक्या वाजविल्या. त्याला खालून तसेंच प्रत्युत्तर आलें. त्याबरोबर याचा चेहरा खूप प्रफुल्ल झाला आणि तो पुनः खालीं डोकावून पाहूं लागला. नंतर त्यानें आपल्या-जवळची एक मेख काढून ती तेथें किल्ल्याच्या आंतल्या बाजूला जमिनींत चांगली ठोकून बसविली. नंतर पुनः त्यानें एक चुटकी वाजविली. त्याबरोबर खालून एक भला जाडी दोरखंड वर फेंकला गेला. त्याचें जें टोंक हातीं लागलें, तें त्यानें धरलें, आणि तें तो मेखेला बांधूं लागला. त्यानें तें भक्कम बांधलेंही आणि मग तटावरून दोर अर्थातच टांगत राहिला. त्या दोराला धरून तो चट्कन् खालीं उतरून जाण्याच्या बेतांत होता, इतक्यांत त्याला कांहीं चाहूल लागली म्हणून तो इकडे तिकडे जों पाहतो, तों कांहींच दिसेना, म्हणून पुनः त्यानें

इकडे तिकडे पाहिलें व आपला पुढला क्रम चालविण्याचा हेतु धरून पुनः एकदां दोर धरून खालीं उतरून जाण्याचा आपला यत्न आरंभला. त्यानें दोर धरून तट तर ओलांडला आणि आतां सरसर खालीं जाणार, तों त्याला असें वाटलें कीं, आपल्याखालीं दरींत कोठें तरी कोणी कांहीं बोलतें आहे. कोण असावें, काय असावें, याचा विचार त्याच्या मनांत येतो न येतो, तों त्याच्या पायाला एक तीर बसून त्याच्या दुःखानें त्यानें झटका दिला. त्यासरशी वरून मेखही उपटली गेली आणि तो दोरासकट खालीं चालला. खालीं पडतांना त्याच्या तोंडून " हाय, हाय. आतां मी त्यांना कसचा सोडवणार ! " एवढे शब्द अचानक बाहेर पडले. दैववादी असतात ते नेहमीं असें ह्मणत असतात कीं, तारत्यापुढें मारत्याचें कांहीं चालत नाहीं. तीच अवस्था या रजपूत शिपायाची झाली. तो ज्या स्थानापासून निसटून पडला, त्या स्थानापासून सरळ न पडतां जरा वांकडा पडला असता, तर त्याचा कपाळमोक्ष होऊन प्राणच जावयाचा. परंतु सध्याच्या प्रसंगीं तसें झालें नाहीं. तो जो पडला तो एका गर्द छायेच्या वृक्षावर पडून त्या वृक्षाखालीं असणाऱ्या दोन माणसांच्यापुढें असा लोंबत राहिला. या माणसांपैकींच एकानें तीर मारला होता त्यामुळें त्यांस हें काय पडलें ह्मणून भय वाटलें नाहीं. हीं माणसें कोण आणि यावेळीं तेथें कां, हें सांगून मग पुढच्या कथेकडे वळूं. त्यांच्या हकीकतीबरोबरच आपल्यास त्या रजपुताची हकीकत कळेल.

हे दोघे झाडाखालीं लपलेले गृहस्थ **तानाजी** व **रायाजी** होत. मागील प्रकरणांत सांगितल्याप्रमाणें **रायाजी**नें आपली मदत देण्याचें अभिवचन दिल्याबर **शेलारमामा, रायाजी**नाईक, **दौलतराव** व **तानाजी** यांची एक बैठक होऊन शपथक्रिया झाली आणि **शेलारमामा तानाजीस रायाजी**च्याबरोबर पुढें काय काय करावयाचें तें ठरविण्यास ठेवून आपण आपले मावळी लोक घेऊन येण्यास गेला. आतां होईल तितकी त्वरा करण्याचें त्यांचें ठरलें त्यामुळें एवढी तांतडी. **शेलारमामा** गेल्यानंतर दुसरेच दिवशीं आपण **घेरेसरनाईक** या नात्यानें एकदां घेरा हिंडून कशी काय व्यवस्था आहे तें पाहूं, असा बहाणा करून हिंडावयास निघून **रायाजीनें तानाजी**ला एकवार आपल्या सगळ्या बाराही मेस्यांवरून हिंडवून आणून किल्ल्याच्या सर्व बाजू दाखविल्या आणि कोणीकडून कसें चढणें शक्य आहे, हेंही त्यांनीं ठिकठिकाणीं उभें राहून पाहिलें. नंतर अमुक ठिकाणीं घोरपड लावून चढून जाणें शक्य आहे, असें त्यांनीं एकांतीं बसून ठरविल्यावरून आपण एकवार प्रयत्न करून पहाण्याचें

ठरविलें. ज्या रात्रीं त्यांनीं प्रयत्न करण्याचें ठरविलें त्याच रात्रीं तो प्रयत्न करण्याकरितां ते विवक्षित ठिकाणीं गेले असतां आपल्या नेमल्या ठिकाणीं कांहीं तरी गडबड आहे, आपली बातमी बाहेर फुटली असून आपल्यास पकडण्यासाठीं तटावरून कोणी तरी मुद्दाम अलगत उतरतो आहे किंवा कोणी महार फितुर आपली बातमी फोडण्यासाठीं वर जात आहे, असें या दोघांसही वाटलें. अशा प्रसंगीं आपण नुसतें पळून जाण्यापेक्षां त्या आपल्यास पकडावयास येणारास शिक्षा करावी, असें **रायाजी**च्या म्हणण्यांत आलें. **तानाजी**नें " तसें करणें चांगलें नाहीं. एखादा माणूस तसा जायबंदी झाला, तर विनाकारण **उदयभानू**ला शंका येऊन तो इथें विशेष बंदोबस्त ठेवील आणि आपली संधि मात्र वायां जाईल. तेव्हां आपण येथून निघून जाऊं. त्यांना खालीं उतरून कांहीं नाहीं असें पाहून जाऊं द्या, ह्मणजे उद्यां पुनः यत्न करण्याच्या वेळीं कोणी यायचेंसुद्धां नाहीं. आपलें काम ठीक होईल, " असें ह्मटलें. परंतु **रायाजी**ला तें पसंत पडलें नाहीं. तो ह्मणे, " तुह्मी घाबरूं नका. वरचा शिपाई कांहीं कोणी नसावा. माझ्या मतें हा खालचा कोणी तरी महार चुगली करायलाच जातो आहे, त्याला पाडला, तर दाद ना फिर्याद. समजा कीं आपल्याला फितलेल्या महारांपैकींच कोणी हा असला आणखी आपलीं नांवंगांवं सायसंगीन वर जाऊन कळवलींन तर भलताच प्रकार व्हायचा. " असें बोलत बोलत त्यानें वर न्याहाळून पहात एक तीर सोडलाच. तोच तीर **जगत्सिंगा**ला लागून तो वर सांगितल्याप्रमाणें खालीं पडला व यांच्या समोर झाडावर लोंबत राहिला. त्याला तसाच लोंबत टाकून जावें हा त्यांचा पहिला विचार. तेथेंच झाडावर लोंबूं दिला असतां वरून पडला ह्मणून कोणी विशेष चौकशी करणार नाहीं, तेव्हां आपण आपलें निघून जावें, असें **रायाजी**नें प्रथम सुचविलें. परंतु त्यास तीराची जखम आहे तेव्हां कोणी खालून तीर मारून त्यास पाडला असें ह्मणून आपला संशय घेतील; सबब त्याला नुसता कड्यावरून ढकलून द्यावा असें मग त्यानें सुचविलें. परंतु **तानाजी** ऐकेना. जखमी झालेल्यावर पुनः वार करणें, त्यास तसेंच मरूं देणें हें त्यास मुळींच पसंत पडेना व शिवाय त्यास असेंही वाटलें कीं, न जाणों यास जीवदान दिल्यास याच्यापासून आपल्यास किल्ल्याच्या वरच्या बंदोबस्ताची आणखी माहिती मिळेल. तेव्हां त्यांनीं त्यास उतरून घेऊन मेस्याबर आपल्या झोंपडींत न्यायचें असेंच ठरविलें.

तानाजीचें हें बोलणें **रायाजी**स पसंत पडून त्यानें त्याप्रमाणें करण्याचें

कबूल केलें आणि **जगत्सिंगास** झाडावरून उतरून आपल्या मेट्यावर दोघांनीं मिळून नेलें. **जगत्सिंगा**च्या आयुष्याची दोरी बळकट होती.

तानाजी आणि **रायाजी** यांनीं **जगत्सिंगास** उचलून नेलें त्या वेळीं तो बेशुद्ध होता. ज्या ठिकाणीं त्याच्या पायाला तीर लागला, तेथून एकसारखा रक्ताचा स्राव चालला होता. परंतु **रायाजी**च्या झोंपडींत गेल्यानंतर त्याच्या पाया-ला औषध लावून ती जखम कसल्या पाल्याच्या चोथ्यानें भरून वरून फडक्यानें बांधल्यापासून सुमारें दोन तीन घटकांत रक्तस्राव बंद होऊन तो शुद्धीवर आला. कोळी, मावळी, वगैरे लोकांस असल्या जखमा वगैरेंचीं औषधें कशीं पूर्णपणें ठाऊक; त्यांतून **रायाजी** व **तानाजी** तर या कामांतले मोठे बहादर दर्दी. हजारों वेळां असल्या तीरांच्या जखमा बऱ्या करण्याकरितां औषधोपचार करण्याचे त्यांना प्रसंग. तेव्हां एक तीर लागून कोठें जखम झाली, तर तीवर उपचार करण्याला त्यांना काय दुरापास्त ? वस्तुतः आधीं **जगत्सिंग** स्वतःच असा खंबीर वीर कीं, एका जखमेनें विव्हल होऊन पडायचा नव्हे. तोही आजपर्यंत अशा कितीक जखमा खाल्लेला मनुष्य होता. परंतु आपण एका उद्योगांत असता, अगदीं अनपेक्षितपणें कोठून तरी तीर येऊन मर्मीं लागणें आणि तोही आपण अधांतरीं लोंबत असतां ! बरें, नुसता तीर लागूनच राहिला नाहीं, तर त्या तीराबरोबरच वरली मेख उपटून निघून आपण किती तरी उंचीवरून आतां डोंगरकड्यावरून आदळत हापटत जाणार अशा समजु-तीनें खालीं पडणें, इतकी सामग्री असल्यावर मनुष्य बेशुद्ध होण्यास आणखी पाहिजे तरी काय ? हाच **जगत्सिंग** समरांगणांत, शत्रु समोरासमोर असतां त्याला कितीही तीर लागले असते, तरी त्याची त्यानें मुळींच परवा केली नसती. दहा जखमा अंगावर घेऊन पुनः अगदीं निकरानें लढण्यास तयार असता.

वर सांगितल्याप्रमाणें त्या दोघांच्या औषधोपचारामुळें रक्तस्राव बंद होऊन तो शुद्धीवर आला, तेव्हां प्रथम त्याला आपण कोठें आहों याचाच बराबर अंदाज होईना. तो इकडे तिकडे पाहूं लागला, तों ओळखीचा चेहरा मुळींच नाहीं. इतकेंच नव्हे, तर आपल्या जातभाईंच्यापैकींसुद्धां त्यांत कोणी दिसेना. तेव्हां तो अतिशय गोंध-ळल्यासारखा होऊन त्या दोघांच्या चेहऱ्यांकडे पाहूं लागला. त्याच्या मनाची स्थिति **तानाजी**चे लक्ष्यांत आली व या गृहस्थाशीं बोलून वरची हकीकत निघाल्यास पहावें या हेतूनें **तानाजी** त्यास हिंदुस्थानी भाषेंत ह्मणतो, “ आह्मी तिथें अगदीं अम-क्याच जागीं येऊं, असं आपल्याला कोणीं सांगितलं ? कोणी सांगितल्यामुळंच आम्हांला ऐनवेळीं पकडण्यासाठीं आलां कीं नाहीं. पण आह्मी तरी काहीं कच्चे

नाहीं समजलांत? बोलून चालून आह्मी किल्ला चढून घेण्यासाठीं सोपी व सहज अशी जागा पहाण्यासाठीं त्या ठिकाणीं आलों होतों आणखी आमच्या उद्योगाला प्रारंभ करणार न करणार तोंच आपल्याला अचानक पकडण्यासाठीं कोणी येतो आहे, हें पाहून त्याला तीर मारून पाडण्याचा आह्मीं यत्न केला. आह्मी तरी काय करणार? आमचं संरक्षण आम्हांला केलंच पाहिजे."

"तुम्ही किल्ला घेण्याच्या हेतूनं तिथें आलां होतां?" **जगतसिंग** आनंदल्या आवाजानें उत्तर करतो, "वा! मग माझी तुह्माला मदतच झाली असती. किल्ल्यावरून चोरून उतरायला किंवा किल्ला चढून वर जाण्याला तेवढी एकच ओघळ आहे. तुमचा हेतु जर मला आधीं कळता, तर किती चांगलं झालं असतं. माझा फायदा केवढा झाला असता! पण आज मला अशा वेळीं तुह्मी पाडलंत, यानं मात्र फार मोठा घात झाला. एका रजपूत सतीच्या पातिव्रत्याचा नाश होणार आहे, त्यांतून तिला वांचविण्यासाठीं मी यत्न करतों आहें, आणखी तिला सोडवून तेथून उतरवून नेण्याला कांहीं अडचणी आहेत कीं काय, तें पहाण्यासाठीं मी दोर सोडून खालीं उतरून जात होतों. माझ्या सुदैवानं मला त्या वरच्या पहाऱ्यावरला **मल्हारबा** महार अनुकूल होऊन त्यानं मदत करण्याचं कबूल केलं. किल्ल्यावरच एक दोर मी मोठ्या मिनतवारीनं मिळवून, आपल्याजवळ ठेवला. पण माझ्याजवळ कोणी पाहिला ह्मणजे रिकामी शंका येईल ह्मणून तो मी त्याच्याजवळ दिला होता—तो त्यानं आज अगदीं नेमक्या खुणेबरोबर वर फेंकून दिला आणखी मी मोठ्या आनंदानं खालीं उतरण्याला आरंभ केला; तोंच तुमचा तीर येऊन लागला. माझं नशीब ह्मणून मी जिवंत राहिलों असं दिसतं, नाहीं तर त्या उंचीवरून पडल्यावर कोणाचाही कपाळमोक्ष होऊन पुरता निकालच व्हायचा. पण आतां तसं झालं नाहीं ह्मणून आनंद तरी काय करायचा?"

"कां बरं? आनंद काय करायचा! असं कां ह्मणतां? जीव वांचला हें काय वावगं झालं?" **तानाजी** त्याचें बोलणें ऐकून आश्चर्यचकित होऊन त्यास ह्मणाला.

"वावगें काय व्हायचें राहिलें? सगळेंच वावगें झालें. ज्या सतीला मी त्या दुष्ट **उदयभानू**च्या हातून सोडविण्याची प्रतिज्ञा करून येथपर्यंत येऊन ती प्रतिज्ञा पार पाडण्यासाठीं चांगला व्यूह रचीत आणला होता, तो सगळाच ढासळला कीं नाहीं आतां? आतां तो कामांध नवमीच्या दिवशीं रात्रीं आपल्या हेतूप्रमाणें बळजबरीनें तिच्याशीं निका लावणार. त्यानें **औरंगाबादे**हून मुद्दाम काजीसुद्धां

बोलावून आणून ठेवला आहे. आज काल काय चमत्कार आहे आह्मां हिंदूंच्या दैवाचा ! जें काय करावं, तें फसायचंच, फत्ते ह्मणून व्हायचीच नाहीं. भगवान् **एकलिंगजीमहाराज**, आपल्या मनांत आहे तरी काय ? आतां आमचं हिंदूंचं डोकं वर ह्मणून निघूंच द्यायचं नाहीं काय ? आमच्या मातांचा, पत्नींचा असाच छळ होऊन त्या आमच्या डोळ्यांसमोर भ्रष्ट झालेल्या आह्मी पाहायच्या काय ? आणखी **उदयभानू**सारख्या अधमाधमांचा, धर्मभ्रष्टांचा, देशशत्रूंचाच जय होत जायचा ? काय तुझ्या मनांत असेल तें खरं ! " इतकें बोलून त्यानें एक दीर्घ उसासा टाकला. **जगत्सिंगा**च्या या बोलण्यानें **तानाजी** व **रायाजी** यांस विशेष वाईट वाटलें. आणि हा **उदयभानू**ला शिव्या देणारा शिपाई आहे कोण ? कोणा पतिव्रतेची सोडवणूक करण्याकरितां यानें काय खटाटोप चालविला आहे, त्यांच्या कांहीं लक्ष्यांत येईना ह्मणून त्यांनीं त्यास तें सांगण्याची विनंति केली. तेव्हां त्यानेंही त्यांना **कमलकुमारी**ची सर्व हकीगत सांगून **बादशहा**च्या लहरीपणामुळें ती त्या अत्यंत अनिष्ट प्रसंगापासून आजपर्यंत तरी वांचली, नाहीं तर केव्हांच त्या दुष्टाच्या कामाग्नीला तिची आहुती तरी पडायची; किंवा आत्महत्या करून तिनें प्राण तरी दिला असता. पण **औरंगजेबा**च्या लहरीमुळें तिला माघ वद्य नवमीपर्यंत अवधि तरी सांपडली. माझी पत्नी तिची फार मैत्रीण. **कमलकुमारी** सती जाण्यास निघाली, तेव्हां ती तिच्याबरोबर त्या अरण्यांत गेली होती. या दुष्टानं त्या सतीला पकडून नेलं त्या वेळीं तो तिला परत पाठवीत असतांही तिच्याबरोबर तिला वेळ प्रसंगीं मदत करायला ह्मणून राहिली. मला ही बातमी लागतांच त्यांच्या पाठोपाठ **दिल्लीस** गेलों. **दिल्लीस** जाऊन **उदयभानू**च्या घराचा पत्ता लावून आपल्या पत्नीशीं किंवा **कमलकुमारी**शीं कांहीं संकेतव्यवहार होऊन त्यांस आपण आल्याचें कसें कळवावें याचा विचार करीत **उदयभानू**च्या वाड्याच्या दाराशीं उगीच वेड्यासारखा हिंडत होतों. तों अकस्मात् काय चमत्कार झाला कीं, **उदयभानु कमलकुमारी**ला व तिच्या बापाला पालखींत घालून बादशहाकडे घेऊन जाण्याला निघालेला दिसला. आणि माझी पत्नी आपल्या मैत्रिणीला धीर देण्यासाठीं ह्मणून दारांत आली होती. तिचें माझ्याकडे लक्ष्य गेलें. लागलींच तिनें मला थांबण्याला खूण केली व आपण वर जाऊन पडद्याआडून झरोक्यांतून एक चिठी टाकली. त्यांत तिनें दुसरे दिवशीं सकाळीं मला पुनः त्याच जागीं बोलावला. तिनें लिहिल्याप्रमाणें भिकाऱ्याच्या वेषांत मी तिथें गेलों तेव्हां तिनें माझ्या पदरांत एक सबंध भाकरी टाकली. त्या

भाकरीच्या पोटांत एक कागद असून त्यांत सगळी हकीकत लिहिली होती व "बादशहानें तीन महिनेपर्यंत अवधि ठेवली आहे, तेव्हां त्याच्याआंत जर आमच्या सोडवणुकीचा कांहीं प्रयत्न झाला तर पहा, नाहींपेक्षां आपल्या कुळाचें नांव राखण्यासाठीं आह्मांला दोघींनाही कांहीं तरी करणें भाग पडेल. मग एखाद्या कड्यावरून उडी टाकून आह्मीं आपला प्राण देऊं, कीं त्या वैतागाच्या लहरींत आणखी कांहीं करून प्राण देऊं कांहीं सांगवत नाहीं." असें लिहिलें होतें. तेव्हां मला अतिशय संताप येऊन मी तत्काळ प्रतिज्ञा केली कीं, "मी खरा रजपुताचा बच्चा असेन, तर या अवधीच्याआंत या दुष्टाला नाहींसा करून यांची सोडवणुक करीन." आणि ती प्रतिज्ञा पूर्ण करण्याकरितां त्यांच्या त्या स्वारीबरोबर निघालों. मी कोण काय याची विशेष माहिती कोणालासुद्धां न होऊं देतां **उदयभानू**च्या त्या अजस्र सेनासमुद्रांत शिरलों. एके दिवशीं वाटेंत नर्मदा तीरीं तळ दिला असतां कांहीं मंडळी डोहांत पोहावयास उतरली. त्यांत **विशाळदेव** नांवाच्या एका रजपूत शिपायाला बुडतांना—नव्हे अगदीं बुडाला असतां—त्याचे स्नेहीसोबती पहात असतां त्याला काढण्यासाठीं नदींत उडी टाकण्याची कोणाची छाती झाली नाहीं. ते नुसते मजा पहात उभे राहिले अशा वेळीं—मी उडी टाकून त्याला जिवंत काढला. तेव्हांपासून तो **विशाळदेव** माझा फार मोठा स्नेही झाला. त्यानंच मला पुढें शिपाईलोकांतही घुसडून देऊन खाशा पहाऱ्यांत शिरण्याचीसुद्धां सोय करून दिली. तेव्हांपासून कांहींना कांहीं तरी युक्त्या काढून मी त्या दोघींस खूप धीर देत आलों आहें. आणखी त्याही पण माझ्या आश्वासनावरच काय तो आपला जीव ठेवून आहेत. नाहीं तर केव्हांच आपल्या जिवाला त्यांनीं बरेंवाईट करून घेतलें असतें. वरल्या सैन्यांत एक तर एकी नाहीं आणि **उदयभानू**नें किती जरी सक्ती केली, तरी त्या लोकांना ह्मणून त्याच्याबद्दल कांहींच वाटत नाहीं. जुने लोक जे किल्ल्यावर आहेत ते हा नवा आला आहे व फार ऐटी करतो, ह्मणून त्याचा द्वेष करतात; नवे त्याच्याबरोबर आले आहेत ते हा हीन कुळांतला असून फार चढेली करून आपल्याशीं वागतो, आणखी अस्सल रजपुतांचा द्वेष करतो ह्मणून त्याच्याशीं द्वेषबुद्धीनें वागतात. त्यांत आणखी सतीला अशी ऐनप्रसंगीं गांठून पकडून आणून तिचा छळ करतो आहे, ह्मणूनच्र पुष्कळांची त्याच्यावर नाखुषी आहे. तेव्हां मी तिला सोडवून खालीं उतरून जाऊं लागल्यावर जरी त्याला कळलं, तरी माझा पाठलाग होण्याचा संभव कमी, मी कोण आहें आणखी कोणच्या उद्देशानं इकडे आलों आहें, याची माहिती एकट्या

विशाळदेवाला मात्र आहे. त्याची मला पूर्ण मदत आहे, परंतु आतां मी असा येऊन पडलों असतां माझ्या हातून काय होणार आहे ! भगवान् **एकलिंगजी**ची मर्जी ! "

जगत्सिंग आपली हकीकत सांगत असतां **तानाजी** व **रायाजी** अगदीं तटस्थपणानें ऐकून घेत होते. सती **कमलकुमारी**ला ती आपल्या नवऱ्याच्या पादुकांबरोबर सती जात असतां ओढून आणल्याच्या प्रसंगाची हकीकत तो सांगत होता, तेव्हां **तानाजी**चे बाहू स्फुरण पावूं लागले, नेत्र आरक्त झाले, चर्या क्रूर झाली, दांतांशीं दांत आंवळले गेले, कमरेच्या तरवारीकडे अगदीं साहजिकपणें हात गेला आणि गोंधळ्याच्या वेषांत त्यानें ह्मटलेल्या कडव्यांतून

कुठ गेली तुमची ईरेसरी। करितां त्या दुष्टाची चाकरी ॥
गेलीं लाज तुमची का र। थूः तुमच्या जिनगानीवर ॥
आपल्या आया बहिनी तरी संभाळा। का त्यावी घेता मोंगलाला
गेली लाज तुमची का र। थूः तुमच्या जिनगानीवर ॥
अर कोनी बुडविल आपल घर। कोनी आनून बसविला मोंगल वर
गेला का र सारा विचार। थूः तुमच्या जिनगानीवर ॥

या ओळी कांहीं वेळ त्याच्या मनांतल्या मनांत घोळून शेवटीं एकदम तोंडांतून मोठ्यानें बाहेर पडूं लागल्या. **रायाजी**चीही तशीच अवस्था झाली होती. त्याच्याही भुवया वर चढल्या होत्या, दृष्टि क्रूर झाली, मुठी वळूं लागल्या, नागपुड्या विस्तृत होऊं लागल्या होत्या आणि खालचा ओंठ अगदीं साहजिकपणें वरच्या दांतांनीं चावण्याला सुरुवात केली होती. इतक्यांत **तानाजीरावा**च्या मुखांतून घनगर्जनेप्रमाणें निघालेल्या त्या शब्दांची वृष्टि कानावर होतांच तो उठून उभा राहिला. असें वाटलें कीं, जणूं काय तो आतां तेथून किल्ल्यावर उडी मारून **उदयभानू**ला ठार करून त्या साध्वीला सोडवून आणण्यालाच जातो आहे. **तानाजी**चे ते शब्द संपतांच त्यानें **जगत्सिंगा**चा हात धरून त्याला ह्मटलें: " **जगत्सिंग**, आह्मीं तुझा खरोखर घात केला. पण कांहीं हरकत नाहीं. माझ्या लोकांची पहिली तुकडी इथें परवां ह्मणजे अष्टमीला रात्रीं किंवा रात्र उलटल्यावर पहाटे नेमल्या जागीं येईल. दुसरी दुसऱ्या दिवशीं पहाटे यायची आहे. ती आली, तर फार उत्तमच होईल. पण नाहीं आली तरी हरकत नाहीं. पहिल्या तुकडींत जितके लोक येतील– पांच येवोत, पंचवीस येवोत पन्नास येवोत– तितकेच लोक बरोबर घेऊन मी किल्ल्यावर छापा घालीन. आणखी नवमीची मध्यरात्र उलटण्याच्या आधीं

— त्यानं त्या सतीशीं लग्न लावावयाच्या आधीं— माझ्या या महाराजांनीं दिलेल्या तरवारीशीं त्याचा निका लावून देईन. आतां ज्यास्त बोलत नाहीं. या सतीच्या पुण्यानं मला माझ्या पन्नास लोकांनिशींच जय मिळेल."

इतकें ह्मणून **तानाजी** अगदीं स्तब्ध बसला. त्याच्या मनांत कांहीं तरी विलक्षणं विचार येत असावे. किती वेळ झाला, एक अक्षरसुद्धां त्यानें तोंडावाटे काढलें नाहीं, आणि त्याची चर्या पाहिल्याबरोबर याच्याशीं या वेळीं कांहीं बोलूं नये, असेंच दुसऱ्यांनाही वाटणें साहजिक होतें.

प्रकरण ११ वें.

दिल्लीचें पत्र.

जों जों माघ वद्य नवमीचा दिवस जवळ येत चालला, तों तों **उदयभानूचें** चित्त अत्यंत व्यग्र होत चाललें. तशांत आतां त्याला विशेष असा उद्योग कांहींच नव्हता. **जसवंतसिंग** व **मोआझिम शहाजादा** यांचेसंबंधानें जें काय ल्याहावयाचें तें त्यानें लिहून बादशहाकडे रवानाही केलें. आपल्या मतानें किल्ल्याची वरची जी काय व्यवस्था व बंदोबस्ती करावयाची, तीही सर्व केली. आतां बादशहाचें पत्रच काय तें येऊन आपली बदली **जसवंतसिंगा**च्या जागीं व्हावयाची; ती झाली, ह्मणजे मग आपण दक्षिणचे सुभेदार झालों. मग आपल्याला कांहींसुद्धां कमी नाहीं. वर्ष सहा महिन्यांत त्या **शिवाजीला** पकडून बादशहाच्या स्वाधीन करून इकडली बंदोबस्ती बरोबर झाली असें बादशहाच्या निदर्शनास आणून दिलें, ह्मणजे बादशहा आपल्यावर खचित खुष होईल; व असा तो खुष झाला ह्मणजे आपण एकदां **उदेपुरा**वर स्वारी करण्याची परवानगी घेऊं आणि ज्यांनीं आपल्याला अगदीं तुच्छ करून पदोपदीं आपला अपमान केला त्यांची चांगली खोडकी जिरवूं. अशा तऱ्हेचें मनोराज्य तो करूं लागला होता. तशांत माघ वद्य नवमीचा दिवस अगदीं नजीक येऊन ठेपला. त्या दिवशीं मध्यरात्रीच्या ठोक्याला आपण **कमलकुमारी**शीं लग्न लावून तिच्या बापाला एक, महाराजा **राजसिंहाला** एक व इतर जे जे रजपूत लोक आपली चेष्टा करीत होते तितक्या सगळ्यांना एक एक पत्र लिहून आपला बडेजाव किती वाढला आहे हें दाखवूं, असें त्यानें मनांत योजिलें होतें. जसजसा तो दिवस जवळ आला, तसतशा त्याच्या

कमलकुमारीकडल्या खेपाही अधिकाधिक वाढत जाऊन दर खेपेस तो तिला अमुक दिवस राहिले, आतां अमूक राहिले, असें सांगून हिणवीत असे. **देवलदेवी** जर **कमलकुमारी**ला नेहमीं उत्तेजन देण्याला नसती, व "आपल्याला दोराव-रून कदाचित् किल्ला उतरून पळावें लागेल तेव्हां तूं अशी झुरत जाऊं नकोस, अंगांत ताकद पाहिजे, असें झुरून अशक्त झाल्यावर मग आपल्या कामांत आपल्याला सिद्धि कशी येणार?" असें घटकोघटकीं सांगून व रोज "आज आपल्या नवऱ्यानें– **जगत्सिगा**नें– असें असें सांगितलें. आज अमुक महार त्यांना मदत करण्यास प्रवृत्त झाला आहे, उद्यां अमूक कोळ्यानें मदत देण्याचें कबूल केलें आहे, असें सांगून कोणीकडून तरी तिला हुशार ठेवण्याचा तिनें प्रयत्न चालविला होता व त्यांत तिला बरेंच यशही पण आलें होतें. "माघ वद्य पंचमीच्या दिवशीं मध्यरात्रीस मी स्वतः एकवार तटावरून दोर टाकून पहातों आणि बरोबर जुळलें ह्मणजे नेहमींप्रमाणें महालाच्या बारद्वारींत जाऊन पडेल, अशा बेतानें रात्रीं चिठीची गोळी फेंकून देऊन पुढची तजवीज कळवितों. महालाचे पहारेकरी मला वाटेल तेव्हां तेथें येऊं देतात, यामुळें आतां आपल्या चि-ठ्या मला किंवा माझ्या चिठ्या आपल्याला पोंचायला मुळींच अडचण नाहीं. मात्र रात्रीं नेमक्या वेळीं चिठ्या टाकाव्या. भलत्याच वेळीं चिठ्ठीचपाटी टाकली असतां सगळेंच बिंग बाहेर पडावयाचें, आणि मग सगळा व्यूह पार ढासळून जायचा." अशा अर्थाचा मजकूर **जगत्सिगा**नें **देवलदेवी**ला कळविला होता. त्यामुळें तिला व **कमलकुमारी**ला अतोनात हर्ष झाला होता. **जगत्सिग** ह्मणजे सामान्य पुरुष नव्हे. त्यानें एखादी गोष्ट करतों ह्मटलें कीं तो ती करणारच. कधीं ह्मणून त्यांत चूक व्हायचीच नाहीं, हा दोघींच्याही मनांचा दृढविश्वास अस-ल्यामुळें त्यांना आपण आतां सुटलोंच असें वाटूं लागलें, आणि **कमल-कुमारी**ला तर हर्षच होण्याची पाळी आली. त्या दिवशीं ह्मणजे पंचमीच्या दि-वशीं तिसरे प्रहरीं **उदयभानु** तिच्या महालांत गेला असतां तिचा प्रफुल्ल चेहरा पाहून त्यास फार आश्चर्य वाटलें. आज कित्येक दिवसांत अशा प्रफुल्ल स्थितींत तिचा चेहरा त्यास कधींच दिसला नव्हता आणि आज दिसला, तेव्हां त्याचें कारण त्यानें आपल्या मनाप्रमाणें कल्पिलें. आतां दोन तीन दिवस उरले, या दोन दिवसांत कांहीं आपल्याला कोणी सोडवायला येईल अशी मुळींच शक्यता दिसत नाहीं. मग विनाकारण कुरटून, झुरून, रडूनकढून आपल्या जिवाला कशाला त्रास करून घ्यावा? आनंदानेंच लग्नास तयार व्हावें, असें वाटून तिनें आपला खेद, चिंता व

दुःखावेग हीं सर्व सोडून दिलीं असावीं ! आणि तिनें आनंदाचा चेहरा केला असावा, असें **उदयभानु**महाराजांनीं आपल्या मनाला सांगून आपलें मनोराज्य अधिक मनोरम करण्याचा प्रयत्न चालविला. मात्र तूं इतकी आनंदली आहेस हें पाहून मला संतोष होतो, वगैरे कांहीं एक तो तिच्याजवळ बोलला नाहीं. न जाणों तेवढ्यानेंच बिघडावयाचें ! असा विचार करून स्वारींनीं तेथून आपला मोर्चा त्या दिवसापुरता तरी निदान काढला. परंतु तो सबंध दिवस, त्याला फार फार आनंद होऊन आपल्या मनोराज्यांतल्या राजमहालाला अत्यंत उंच उंच असे कळस करण्यांत तो गढून गेला.

इकडे पंचमीच्या दुसरे दिवशीं काय काय कसें कसें करावयाचें, त्याबद्दल चिठ्ठी आली असेल, अशा आशेनें **देवलदेवी** नियमित ठिकाणीं जाऊन पहाते, तों चिठ्ठीचपाटी कांहीं नाहीं. त्याबरोबर तिचे काळजांत एकदम चर्र झालें. जी व्यवस्था व्हायची ती झाली नसली, तरीसुद्धां " आज झाली नाहीं, उद्यां होईल. " एवढेंच लिहून गोळी टाकलेली असावयाची, ती ज्या अर्थीं नाहीं, त्या अर्थीं सुचिन्ह नव्हे, असें मनांत येऊन तिला काळजी लागली. तिनें ती आपली नियमित बारद्वारी बारीक दृष्टीनें पाहिली. कांहींसुद्धां कोठें सांपडलें नाहीं. कांहीं घात तर झाला नसेलना ? किंवा दोर सोडून खालीं उतरण्याच्या वेळीं हात वगैरे सुटून तर कांहीं झालें नाहीं ? कदाचित् बेत बाहेर फुटून त्या दुष्ट **उदयभानू**ला तर सारें कळून त्यानें तुरुंगांत टाकलें नसेलना ? असे एक ना दोन. पंचवीस हजार खेदकारक व भीतिजनक विचार तिच्या मनांत उभे राहिले; आणि अर्थातच तिला कांहीं सुचेनासें झालें. झाला प्रकार **कमलकुमारीला** अर्थातच सांगणें अगदीं अनवश्यक व अनिष्ट; तेव्हां तिच्याजवळ हें कांहीं बोलावयाचें नाहीं असा तिनें बेत केला. परंतु बहुत वेळां असें होतें कीं, शब्द सांगत नाहींत, तें चर्या सांगते. ज्याप्रमाणें **देवलदेवी** त्याचप्रमाणें **कमलकुमारी**ही आशा धरूनच बसली होती. तेव्हां **देवलदेवी**च्या चर्येकडे पाहतांच तिलाही असें स्पष्ट दिसून आलें कीं, आज कांहीं तरी अनिष्ट बातमी आहे. अर्थातच तिनें **देवलदेवी**ला 'काय झालें, काय कळलें !' असे प्रश्न विचारले. तिनेंही तिला आज अजून कांहीं कळलें नाहीं असें उत्तर देऊन कशी तरी टाळाटाळी केली. परंतु ज्या वेळीं कांहीं तरी कळणें अत्यंत जरूरीचें, त्याच वेळीं कांहीं कळलें नाहीं ह्मणजे प्रत्यक्ष वाईट कळण्यापेक्षांही फार वाईट. कारण प्रत्यक्ष वाईट कळलें असतां मनुष्याची एकदम निराशा होऊन तें स्वस्थ तरी बसेल. पण जेव्हां कांहीं तरी

कळणें अगदीं जरूर. तेव्हां जर तें कळलें नाहीं, तर त्यापासून चिंता व खेद हीं मात्र उत्पन्न व्हावयाचीं. तशीच आतां आमच्या नायिका व उपनायिका यांची स्थिति झाली होती.

त्या दिवशीं दर घटकेस त्या दोघींच्या मनांची कशी कशी स्थिति होत चालली याचें वर्णन करून सांगणें फार कठीण आहे. **देवलदेवी**ला तर असें वाटूं लागलें कीं, आपल्या सौभाग्याचा घात झाला असावा. आपला नवरा दोरावरून खालीं उतरून जात असतां हात निसटून किंवा दोरेच निसटून जाऊन तटावरून किंवा कड्यावरून पडला असावा. **सिंहगड**चे कडे ह्मणजे कोण भयंकर! त्यांवरून कोणी जर घसरून पडला, तर त्याचे खालीं राईराई एवढे तुकडे होऊन जाऊन कांहींसुद्धां हातीं लागावयाचें नाहीं. असें आपल्या नवऱ्याचें झालें काय? असा भयंकर विचार मनांत येतांक्षणींच **देवलदेवी**च्या अंगावर शहारे उभे राहिले. ज्या आशेवर आतांपर्यंत ती **कमलकुमारी**स धीर देत होती, ती आशाच आतां तुटली. आतां **कमलकुमारी**ला धीर देण्याच्या ऐवजीं **कमलकुमारीनें**च तिला धीर देण्याची वेळ आली. स्त्रियांना सौभाग्य ह्मणजे जीवितसर्वस्व–त्यालाच आपण आतां मुकणार हा विचार किती दुःखकर, किती भयंकर! जें असलें तर या जगांतील वाटतील तीं दुःखें, वाटतील त्या अपेष्टा भोगण्यास त्या तयार असतात, तेंच गेलें, ह्मणजे मग काय उरलें! जें गेलें असा कलंक लागूं नये म्हणून त्या प्राण देण्यासही तयार होतात, तेंच नष्ट झालें किंवा होणार, ही कल्पनाच त्यांच्या काळजाचें अगदीं पाणी करून सोडते! **देवलदेवी**ची अशीच अवस्था झाली. तिच्या काळजाचें पाणी झालें. परंतु, ती फार धीराची. तिनें असा विचार केला कीं, आतांच आपण जर अगदीं निराश होऊन बसलों, तर **कमलकुमारी** तत्काळ प्राण सोडील, ह्मणून आपलें दुःख गिळून बसावें. एका क्षणीं तिला हें असें वाटलें. परंतु लागलींच दुसऱ्या क्षणीं तिला वाटलें, "पण आतां तिनें व आपण दोघींनींही प्राणघात करून घेतला, तर हरकत कोणची? जर आपल्या पतीचें कांहीं अनिष्ट झालें असलें, तर आतां आपल्याला सुटकेची आशा करण्यास आधार काय? आतां आपली दोघींचीही सुटका ह्मणजे प्राणघात करून मिळेल तीच सुटका. दुसरी सुटका नाहीं. या देहांतून एकदां प्राण निघून गेले, ह्मणजे देहाचीच काय विटंबना होईल ती होईल. असा विचार करून त्या प्रकारानें दोघींनींही सुटका करून घेण्यास काय युक्ति करावी त्याबद्दल तिनें आपल्या मनांत खल चालविला. परंतु निश्चयानें कोणचीच अद्यापि

माहिती नसल्यामुळें तिला असें वाटलें कीं, आपण आपल्या व **कमलकुमारी**च्या जिवाचें कांहीं बरेंवाईट करून घेतलें आणि आज रात्रीं किंवा उद्यां रात्रीं आपल्याला कांहीं निरोप आला, तर आपल्या नवऱ्याची केवढी निराशा होईल. आज तीन महिनेपर्यंत नानाप्रकारचीं संकटें भोगून त्यांनीं जो व्यूह रचला, तो केवळ एक दोन दिवसांच्या आपल्या उतावळीमुळें निर्फळ करणें ह्मणजे केवढा मूर्खपणा होणार आहे! त्यापेक्षां आपला प्राणघात करून घेण्याला लागणारीं साधनें जय्यत ठेवून नवमीच्या संध्याकाळपर्यंत वाट पहावी. तोंपर्यंत जर कांहीं कळलें नाहीं, तर खुशाल देह ठेवावे. हा विचार मनांत येण्याबरोबर तेंही तिच्या मनास बरोबर वाटलें आणि त्याप्रमाणेंच करावें असें तिनें मनांत ठरविलें. सध्या तिच्या मनाची व विचारांची स्थिति, अत्यंत क्षुब्ध अशा महासागरांत सांपडलेल्या तावांप्रमाणें झालेली होती. एखाद्या प्रचंड लाटेच्या तडाख्यांत तीं तावें सांपडलीं म्हणजे तिच्या शिखराबरोबर वर वर जावयाचीं आणि त्या लाटेची उसळी ओसरली कीं तेथून ताड्कन् खालीं पडून दुसऱ्या एखाद्या लाटेच्या तडाख्यांत सांपडावयाचीं ! तशीच हुबेहुब तिच्या मनाची व विचारांची स्थिति झाली होती. आशेला आधार सांपडला म्हणजे तिला अतोनात धीर यावयाचा व निराशेचा अतिरेक झाला म्हणजे तो सगळा धीर पार खचून जाऊन ती अगदीं हताश होई. अशा मनःस्थितींत कोणच्या बाजूस आतां तिचा कल जातो आहे हें तिचें तिलाच समजणें मोठें कठिण होतें. परंतु शेवटीं विकारापेक्षां विचारानें तिच्या मनावर अधिक पगडा बसविला आणि तिनें असें ठरविलें कीं, माघ वद्य नवमीच्या सूर्यास्तापर्यंत आपण वाट पहावयाची. त्या वेळेपर्यंत जर सुटका होण्याचें कांहीं चिन्ह दिसलें नाहीं, तर दोघींनींही आपले प्राण देऊन त्या रात्रीं आपली विटंबना करावयास येणाऱ्या **उदयभानू**साठीं शवें ठेवावयाचीं !

अशा प्रकारें **उदयभानु** व **कमलकुमारी** आणि तिची मैत्रीण **देवलदेवी** या तिघांच्या मनाची स्थिति असतां माघ वद्य नवमीचा दिवस उगवला. पंचमीच्या दिवशीं रात्रीं आपल्या किल्ल्यावरील एक शिपाई नाहींसा झाला, त्याचा पत्ता नाहीं असें षष्ठीच्याच दिवशीं तिसरे प्रहरीं **उदयभानू**ला कळविण्यांत आलें, परंतु " कोणी कड्याबिड्यावरून उतरतांना पाय घसरून किंवा कुसुंबा पिऊन तटावरून झुकांडे खात चालतांना झोंक जाऊन पडला असेल नीट शोध करा. इकडून एखादा माणूस गेला तर त्याची मोठीशी परवा नाहीं. सावध कां नव्हता गुलाम ! पहा कुठें असेल. बाहेरून कोणी अधिक आला, तर मात्र माझ्यापुढें आणा, " असें तुच्छपणें उत्तर देऊन त्यानें तिकडे अगदीं दुर्लक्ष्य केलें. हीच बर्दी षष्ठीला

न देतां कोणी आठ चार दिवसांपूर्वी त्याला दिली असती, तर त्यानें इतक्या तुच्छतेनें तिचा निरवा केला नसता.

परंतु या वेळीं एखादा शिपाई नाहींसा झाला, तर त्याची मोठीशी चौकशी करण्याच्या मनःस्थितींत तो नव्हता हें उघडच होय. आणि त्याप्रमाणेंच ती बातमी त्यानें अगदीं तुच्छ करून टाकली. त्याचें सर्व लय **कमलकुमारी**कडे लागलें होतें. केव्हां, **औरंगाबादे**हून मुद्दाम बोलावून आणलेल्या काजीशीं बोलण्यांत त्यानें वेळ घालवावा; आणि **कमलकुमारी** आपली पत्नी झाली असतां आपल्याशीं कशा प्रकारें वागेल याच्याबद्दल विचार करावा, असें चाललें होतें. **उदयभानू**चें ह्मणजे त्या पत्नीवांचून अडलें होतें असें नाहीं. मुसलमानी धर्माबरोबर मुसलमानी रिवाजही त्यानें स्वीकारला असल्यामुळें त्याचा जनाना होताच. परंतु **कमलकुमारी**शीं विवाह करणें हें अटीचें काम होतें. **राजसिंह** व त्याच्या पदरचे सरदार हे फार ऐटा मारतात, आपण अस्सल नाहीं ह्मणून आपल्याला तुच्छ मानून कुलीनाची कन्या आपणास मिळूं देत नाहींत, तर आपण हटकून त्याच्या पदरच्या उत्कृष्ट व मोठ्या अभिमानी सरदाराची कन्या करून घेऊं, ह्मणजे त्यांच्या गुलामांच्या तोंडांत मारल्याप्रमाणें होणार आहे, या बुद्धीनेंच त्यानें **कमलकुमारी**ला पकडून आणलें; या बुद्धीनेंच पुढें त्यानें तिचा अभिलाष धरला, त्यांत पुढें जें कधीं व्हायचें नाहीं तें झालें, ह्मणजे बादशहा कधीं असल्या बाबतींत अट घालावयाचा नाहीं ती त्यानें घातली! अर्थातच तिची प्राप्ति होण्याला अधिक विघ्न झालें. जी वस्तु आपल्याला प्राप्त होण्याला फार विघ्नें येतात, किंवा मिळावयाची नाहीं असें वाटण्याला कारणें होतात, तीच वस्तु मिळविण्याचा अट्टाहास करावा अशी आपल्यास नेहमीं बुद्धि होते. त्याप्रमाणेंच **उदयभानू**ची गोष्ट झाली होती. **कमलकुमारी**चा अभिलाष धरण्याला त्याला ती दुर्लभ हें मोठें कारण. परंतु आज तीन महिने तिचें सांनिध्य झाल्यानें त्याच्या मनांत त्या अभिलाषापेक्षां अधिक उदात्त असा विकार उद्भवला. ज्याला प्रेम ही संज्ञा देतां येईल, अशा प्रकारचें कांहीं त्याच्या मनांत उपजलें आणि त्या विकारानें तो आतां तिच्या प्राप्तीची इच्छा करूं लागला. शुद्धता ही फार दुर्लभ आहे. कसाही अशुद्ध व अपवित्र माणूस असो, त्यालासुद्धां आपल्याला शुद्धता व पवित्रता प्राप्त व्हावी असें वाटत असतें. आपल्या स्वतःच्या अंगीं ती आली नाहीं, तरी ज्याच्या अंगांत ती असेल, त्याची प्राप्ती, त्याचें सांनिध्य, त्याचें प्रेम आपल्यास लाभावें असें त्यास वाटूं लागतें. तशीच

उदयभानूची या वेळीं स्थिति झाली. केवळ अटीकरितांच नव्हे, तर प्रेमामुळेंही आतां तो तिचा अभिलाष करूं लागला.

माघ वद्य नवमीचा दिवस उगवला. त्यावेळीं तर त्याच्या आनंदाला पारावार नाहींसा झाला. आतां पांच सहा प्रहरांचा अवकाश, कीं इतके दिवस जें आपल्यापासून दूर दूर राहूं पाहतें आहे तें आपलें होणार ! या विचारानेंच त्याचा चेहरा फार प्रफुल्लित झाला. आतांपर्यंत येथून सुटण्याच्या आशेनें जरी ती आपल्यापासून दूर राहिली, तरी एकदां आतां तिची निराशा झाली व आपल्याशीं विवाह झाला, म्हणजे मग ती आपल्या दैवीं हेंच आहे असें म्हणून आपल्याशीं प्रेमभावानें वागूं लागेल. आणि थोडेच दिवसांत तेंही तिच्या मनांतून जाऊन आपल्या ठिकाणीं ती आपलें तनमनधन अर्पण करील, असें त्यास वाटलें. आणि त्या वाटण्यामुळें होणाऱ्या आनंदांत तो होता. इतक्यांत **दिल्ली**हून कोणी सांडणीस्वार थैली घेऊन आला आहे, अशी चोपदारानें वर्दी दिली. आपण येथें आल्यानंतर पाठविलेल्या पत्राचें उत्तर तर हें खास नव्हे, असें त्यास वाटलेंच. कारण आपला हेजीब कितीही जलदीनें गेला, तरी तो परत येण्याइतका वेळ अजून झालाच नव्हता. अर्थातच बादशहानें दुसऱ्याच कांहीं कारणानें हा स्वार पाठविला असेल, काय आहे तें पाहूं, असें मनाशीं म्हणून त्यानें त्या स्वारापासली थैली घेऊन येण्याला सांगितलें. आज माघ वद्य नवमीलाच थैली येऊन पोहोंचावी, अशा बेतानें बादशहानें ती मुद्धाम तर नसेलना पाठविली ? असेंही पण त्याच्या मनांत येऊन त्याचें काळीज चर्र झालें. न जाणों, बादशहाच्या मनांत आणखी कांहीं तरी येऊन त्यानें आपला हुकूम फिरवून **कमलकुमारी**स परत पाठवून देण्याविषयीं तर नवा हुकूम पाठविला नसेलना ? ते दिवशीं **कमलकुमा**-रीला पाहिल्या वेळेपासून तिचा निदिध्यास लागून ती आपल्याला हवी, असें तर बादशहास वाटूं लागून त्यानें पाठोपाठ स्वार पाठविला नसेलना ? असाही पण चमत्कारिक विचार त्याच्या मनांत आला. आणि ती थैली आतांच उघडावी, कीं रात्रीं आपला व **कमलकुमारी**चा विवाह झाल्यानंतर मग उघडावी, याचा त्याला विचार पडला. आधीं उघडली आणि तींत आपल्याला भय वाटतें तसला कांहीं मजकूर असला, तर मग आपल्याला त्या हुकुमाची मुळींच अवज्ञा करतां येणार नाहीं. त्यापेक्षां हुकूम तसाच सध्या दडपून ठेवून, आपलें कार्य झाल्यानंतर मग पहातां येईल, असें मनांत ठरवून त्यानें चोपदारानें आणून दिलेली ती थैली तिरस्कारानें दूर फेंकून दिली. पुनः त्याचें त्यालाच काय वाटलें कोणास ठाऊक ?

त्याच चोपदाराला सांगून त्यानें ती उचलवून आणाविली व तिच्यावरची झिरझिरीत कापडाची पिशवी काढून आंतल्या थैलीकडे पहात व तिच्या गोंड्यांशीं आपल्या हातांनीं खेळत तो विचार करूं लागला. लागलीच त्यानें आपल्याशींच ह्मटलें, "इतकी बादशहाची भीति तरी कशाला पाहिजे? जो माझा भाग ह्मणून ठरला त्याचा जर तो अभिलाष करूं लागेल, तर आपण तरी काय ह्मणून त्याची परवा करावी? वेळवखत पुढें मार्गे तसा आलाच, तर आपण साफ ती थैली मला नवमीच्या दिवशीं पोहोंचली नाहीं असें उत्तर देऊं आणि हा स्वार कदाचित् आपल्या विरुद्ध साक्षीला उभा राहील, तर आजच त्याचा निकाल लावूं. पण आपला भाग बादशहास देणार नाहीं." असें ह्मणून त्यानें चट्कन् ते गोंडे ओढले व आंतला लखोटा काढला. आंत बादशहाचें पत्र होतें. तें सुमारें दोन अडीच बोटें रुंदीच्या घड्या घालून गुंडाळलेलें होतें व वरच बादशहाच्या हस्तमुद्रेचा त्यावर शिक्का होता. तोही त्यानें त्वरित तोडला आणि आंतला कागद उलगडला. सुरेख सोनेरी पत्ती काढलेला कागद आणि त्यावर केवळ मोत्यांच्या ओळीप्रमाणें अक्षरें काढलेलीं. **औरंगजेब** बादशहास स्वतः लिहिण्याची हौस फार. हें त्याचें अथपासून इतिपर्यंतचें स्वदस्तुरचें पत्र होतें. त्याचें अक्षर फार दिव्य होतें. पहिल्या चार ओळी वाचण्याबरोबर **उदयभानू**ची चर्या एखाद्या मोठ्या कमलाप्रमाणें प्रफुल्लित झाली. रीतीप्रमाणें मायना झाल्याबरोबरच पुढील अर्थाचा मजकूर होता. "माझ्या हुकुमाप्रमाणें तूं आजपर्यंत वागला असलास, तर आज तुला मी मोठ्या आनंदानें **कमलकुमारी** अर्पण करतों. तूं व ती येथून गेल्यानंतर पंधरावीस दिवसखुद्दां तिचा बाप जगला नाहीं. सगळ्या काफरांच्या रीतीप्रमाणें मला शिव्या देत देत व आपल्या मुलीच्या नांवाचा जप करीत करीत प्राण सोडून सैतानाच्या राज्यांत गेला. तेव्हां अर्थातच त्या मुलीचें दान करण्याला तिच्या पित्याच्या ठिकाणीं मीच राहिलों आणि ह्मणून ती तुला मी नेमल्या दिवशीं अर्पण करतों. आणि तिच्याबरोबर अंदण ह्मणून तुला अमुक अमुक प्रांतही जहागीर करून देतों. तुझ्यासारखे इमानी नौकर थोडे. आतांपर्यंत वागलास त्याप्रमाणें पुढेंही इमानानें वागून त्या काफिर **शिवाजीला** (सैतान त्याचें निसंतान करो!) पकडून आणून माझे स्वाधीन कर, ह्मणजे आज आहे याच्याहीपेक्षां माझें तुझ्यावर अधिक प्रेम बसेल. तुला सुख होऊं दे, परंतु त्या सुखाच्या उपभोगांत दंग होऊन त्या काफराला किंवा त्याच्या दोस्तदारांना तुझा गळा कापण्याची संधि मात्र देऊं नकोस. त्यानें आजपर्यंत असे कितीक सरदारांचे गळे कापले आहेत! ह्मणून बजावून लिहितों आहें. नाहीं तर तूं अगदीं

सुखाच्या दर्यांत पोहत राहशील आणि त्याच रात्रीं तो येऊन तुझा गळा कापील. अल्ला तुझें त्यापासून पूर्ण रक्षण करो, आणि बादशहातीची चाकरी इमानें इतबारें करण्याची आजपर्यंतची तुझी बुद्धि सदैव अशीच राहो!"

हें पत्र वाचतांक्षणींच **उदयभानू**ला इतका आनंद झाला कीं, आपण कोठें आहोंत, काय करतों आहोंत याचें स्मरणसुद्धां न राहून त्यानें मोठ्यानें हास्य केलें, आणि हाडामांसाचा रजपूत असल्यामुळें त्या हर्षभरांत त्याच्या तोंडून अगदीं नैसर्गिकपणें "**भगवान् एकलिंगजी**! तुझा महिमा अगाध आहे!" असा उद्गार निघाला. आपण मुसलमान झालों आहों हें जणूं काय तो विसरलाच! आतां त्याला स्वर्गसुखाची प्राप्ति होण्यास फक्त काय तो चार प्रहरांचाच अवकाश होता! तो आपल्या त्या भावी सुखाच्या विचारांत अगदीं गर्क होऊन गेला होता. आणि एकवार आतां आपण **कमलकुमारी**च्या महालांत जाऊन यावें असा त्यानें विचार केला व त्याप्रमाणें तो उठून त्या महालाकडे गेलाही.

जो काळ **उदयभानू**ला मोठ्या सुखाचा व आनंदाचा वाटत होता, तोच काळ, तोच प्रहर **कमलकुमारी**ला दुःखाच्या परमावधीचा झाला होता. एखाद्याला वधस्तंभावर नेऊन वध करण्याची शिक्षा सांगितली असतां त्याची जशी अवस्था होते त्याप्रमाणेंच तिची अवस्था आतां झाली होती. दर क्षणीं तिला असें वाटत होतें कीं, आतां आपलें आयुष्य एक एक क्षण कमी कमी होत चाललें असून आपला मृत्युसमय जवळ येत चालला आहे. **जगत्सिंगा**कडून कांहीं कळेल, अशी कांहीं तरी आशा होती, तीही आतां अगदीं नष्ट झाली; आणि आतां दिवस उगवल्यानंतर तर कांहींही कळण्याचा अगदींच संभव नव्हता. तीन दिवसांत जेव्हां कांहीं कळलें नाहीं तेव्हां **जगत्सिंग** नष्ट झाला, याबद्दल **देवलदेवीस** व तिला मुळींसुद्धां शंका राहिली नाहीं आणि त्या दोघी एकसारख्या शोक करीत एकमेकींकडे पहात—त्या नुसत्या पहाण्यानेंच एकीमेकींचें समाधान करीत—स्वस्थ बसल्या होत्या. कारण आतां शब्द उच्चारण्याचें त्यांना सामर्थ्यच राहिलें नव्हतें.

अशा समयाला **उदयभानु** आपल्याकडे येतो आहे, अशी वर्दी आली. त्याबरोबर त्यांचें भान नाहींसें झालें. **कमलकुमारी** तर भीतीनें अगदींच निश्चेष्ट झाली. तिच्या अंगांतलें रक्त जणूं काय अगदीं गोठून जाऊन ती अगदीं पांढरीफटक झाली. तिचें अंग थरथरां कांपूं लागलें. **देवलदेवीनें** तें पाहिलें मात्र आणि तिची अवस्था अगदीं भिन्न झाली. कांहीं व्यक्तींचें धैर्य संकटकाळींच उद्दीप्त होतें. इतका वेळ आपलें सौभाग्यसर्वस्व नष्ट झालें ह्मणून शोकग्रस्त झालेली

ती हा दुष्ट आतां येथें येऊन आपल्यास व आपल्या प्रिय मैत्रिणीस छळणार हें मनांत येऊन एकदम संतप्त झाली. जणूं काय **कमलकुमारी**च्या अंगचें व तिच्या स्वतःच्या अंगचें, अशीं दोनही रक्तें एकदम तिच्या एकटीच्याच अंगांत उसळलीं. ती तांबडी लाल झाली. तिचे ते विशाल नेत्र तर इंगळासारखे लाल होऊन त्यांतून आतां ठिणग्या बाहेर पडतात कीं काय असे ते दिसूं लागले !

उदयभानूनें पडदा एके बाजूस सारून पाऊल आंत घातलें मात्र, ती एकदम संतापानें त्याच्यावर उसळून जाऊन त्यास एकदम ह्मणते, " **उदयभानु** ! एखादा क्रूर वाघ आपल्या तावडींत सांपडलेल्या हरिणीवर झडप घालून तिला ठार मारण्यापूर्वी तिला आपल्या क्रूर नेत्रांचें भय दाखवून ती भेदरली ह्मणजे मजा पहातो, त्याप्रमाणें आह्मांला भेदरवायला घडोघडीं इथें येतोस काय ? तूं रजपूत मर्द आहेस कीं कोण आहेस ? तूं आपल्याकडून वाटेल तितकें कर, पण तुझा बळी तुला जिवंतपणीं कधींच मिळायचा नाहीं, प्रेत मिळेल. मग त्या प्रेताची विटंबना काय तुझ्या मनांत करायची असेल ती खुशाल कर. आधीं तीनतीनदां येतोस कशाला ! .... "

तिचा तो विलक्षण आविर्भाव पाहून **उदयभानु** तर तत्काळ दबलाच. त्याच्या तोंडून एक शब्दही बाहेर पडेना. परंतु त्या तिच्या बोलण्यानें आज त्याच्या मनांत विलक्षण संशय आला. ही आतां ह्मणते आहे त्याप्रमाणें संध्याकाळच्या आंत जर हिनें खरोखरीच **कमलकुमारी**ला प्राणघात करायला लावलें तर कसें होणार ? त्यापेक्षां आपण आतां थोडा कठोरपणा धरून या दोघींची फुटाफूट केली पाहिजे, असा त्यानें विचार केला. परंतु ती कशी करावी हें त्यास सुचेना. शेवटीं आतां दुसरा उपाय नाहीं असें मनांत येऊन त्यावेळीं अधिक उणें कांहीं एक न बोलतां त्यानें **देवलदेवी**स उचलून दुसरीकडे टाकण्याचा निश्चय केला. व आपल्या दुसऱ्या अंतःपुरांतल्या चार हबशिणी दासी पाठवून त्यानें तिला बळजबरीनें तिच्या मैत्रिणीपासून दूर करून कोंडून ठेविलें. असें केलें नाहीं तर रात्रीच्या आंत **कमलकुमारी** आत्महत्या करून घेणार अशी त्याच्या मनाची तिच्या बोलण्यानें खात्री झाली, ह्मणूनच त्यानें तिला दूर केलें व **कमलकुमारी**सही **बालेकिल्ल्यां**तल्या आपल्या महालांत नेऊन ठेवून तिजवर दोन हबशिणींचा पहारा ठेविला. दुष्ट माणसास, आपला दुष्ट हेतु फसतो असें भय पडतांच चट्कन् युक्त्या सुचतात आणि त्या युक्त्या अमलांत आणण्यास वेळही लागत नाहीं.

प्रकरण १२ वें.

माघ वद्य नवमी.

—:o:—

त्या दिवशीं **उदयभानू**चा असा उद्योग चालला असतां खालीं **रायाजी**च्या घरांत **तानाजी** अगदीं सचिंतपणें बसला होता. तो कोणाची तरी वाट पहात होता हें उघड दिसत होतें. तीनतीनदां तो उनाकडे बघे आणि अजून कांहीं बातमी कशी नाहीं असें जवळ बसलेल्या **जगत्सिंगा**ला ह्मणे. **जगत्सिंग** तसाच अगदीं चिंतातुर दिसला. आपल्याकडून कांहीं बातमी नाहीं तेव्हां आपली बायको आतां काय विचारांत असेल ? आतां आपली सुटका होत नाहीं असें वाटून दोघीही आपल्या जिवाला कांहीं तरी करून घेतील याबद्दल त्याला कांहींच शंका उरली नाहीं. आज रात्रीं बाराची वेळ होईपर्यंत त्या जिवंत राहतीलच असेंसुद्धां त्यास वाटेना. आणि आतां जों जों दिवस वर येत चालला, तों तों आज रात्रीं **तानाजी**च्या माणसांच्या हातून किल्ला घेण्याचें होईल कीं नाहीं, याचीही त्याला जबर शंका वाटूं लागली. तथापि त्यानें निराशेचा एकही उद्गार तोंडावाटे काढला नाहीं. **कमलकुमारी**स सोडविण्याची उत्कंठा आपल्यापेक्षां **तानाजी**-लाच विशेष आहे, असें त्याच्या आतां अनुभवास आलें होतें. " माझे लोक आले नाहींत, तर ऐन वेळीं तूं आणखी मी, **रायाजी** आला तर **रायाजी**, असे तिघेच वर चढून जाऊन त्या साध्वीला सोडवूं. तिला सोडवल्यावर तो दुष्ट तिच्या पाठीमागें लागला, तर तिथल्या रजपुतांना चिथावून देऊन त्याला लंबे करूं. निदान तिची विटंबना तरी होऊं देणार नाहीं. वेळच तशी आली तर दोघींनाही रजपूत– क्षत्रियांच्या स्त्रियांना योग्य असा मृत्यु तूं दे. " असें **तानाजी**नें त्यास सांगितलें होतें. तेव्हां आतां आपण निराशेचे किंवा त्यास दूषण देण्याचे उद्गार काढणें अगदीं अप्रशस्त, असें समजून **जगत्सिंगा**नें अगदीं मौन धरलें होतें. **तानाजी**नें त्यास धीर दिला व प्रसंग पडल्यास जें करूं ह्मणून त्यानें सांगितलें तें अक्षरशः केलें असतें यांत शंकाच नाहीं. परंतु आपण एकट्यानें वर जाण्याचें धाडस केल्यानें शूरास योग्य अशा मृत्यु-खेरीज दुसरें कांहींही लाभणें शक्य नाहीं, हें **तानाजी** जाणूनच होता. आदले दिवशीं सकाळीं एक तुकडी यायची; निदान आज सकाळीं तरी यायची असें असतां कांहीं पत्ता नाहीं, ह्मणून त्यानें **रायाजी**ला शोधाला पाठविलें.

त्याचासुद्धां अजून कांहीं पत्ता नाहीं, यामुळें तर त्याची काळजी विशेषच वाढली. त्याच्या मनांत नानाप्रकारचे विचार येत होते आणि त्या विचारांपैकीं कोणच्याही विचारानें त्याचें समाधान होईना. आतां आपण स्वतः शोधासाठीं बाहेर पडावें, असाही त्यानें विचार मनांत आणला. परंतु **रायाजीनें** त्याला निक्षून सांगितलें होतें कीं, तुह्मी घराच्या बाहेर पडतां कामा नये. **जगत्सिंगानें**ही त्याला तसाच सल्ला दिला. तेव्हां तो नुसता चुळबुळ करीत बसला. हट्टानें आपण गेलोंच, तर अधिक काय होणार हें त्याचें त्यालाच समजेना. अर्थातच तो संशयमग्न होऊन पुनः आपल्या मनांत अनेक प्रकारचे तर्कवितर्क करीत बसला. गड घ्यायचा एवढेंच काम असतें, तर तो आज नाहीं उद्यां घेतला जाईलच. गड घेण्याच्या प्रतिज्ञेनें आलों, तर तो घेतल्याखेरीज आपण थोडेच परत जातों ! पण तो **आज** घेण्यांत जें काय आहे तें कसें साधणार, ही मोठी काळजी त्याला लागली होती. तशांत दुसरा इसम त्या साध्वीची सुटका करण्याच्या उद्योगांत असतां आपल्या हातून त्याच्या त्या कार्यांत व्याघात झाला, यामुळें तर त्याला फारच वाईट वाटूं लागलें होतें. एक प्रहर झाला, दोन झाले, तीन झाले, तरी **रायाजी**चा किंवा दुसऱ्या कोणाचा कांहींच पत्ता नाहीं. मग मात्र **तानाजी** अगदीं निराश झाला. परंतु वेळ पडली तर आतां आपण एकट्यानें रात्रीं नेमल्या ठिकाणीं घोरपड लावून चढून जाऊन, महालाचा पहारा कापून काढून, तिला सोडवून, त्या तेथल्या रजपूत शिपायांच्या स्वाधीन करून, ' ही तुमची सगळ्यांची बहीण आहे, हिचें पातिव्रत्य राखा, ' असें सांगून काय होईल तें पहायचें, असा त्यानें आपल्या मनाचा निर्धार केला. हा निर्धार ह्मणजे आपण किल्ल्यावर जाऊन मरावयाचें एवढाच निर्धार करण्यासारखें होतें. परंतु बोलल्या वचनासाठीं तेवढें करणें अगदीं अवश्यक, असें त्याच्या मनानें घेतलें. त्यावेळीं त्याच्या मनाला होणाऱ्या वेदना त्याच्या त्यालाच माहिती. शूर, अभिमानी व करारी पुरुषानें, एकदां जी आपण वाणी काढली, त्या वाणीप्रमाणें आपल्या हातून होत नाहीं, त्या वाणीला बट्टा लागतो, असें पहातांक्षणींच त्याला मृत्यु बरा असें वाटणें किती साहजिक होय ! जें कार्य आपण करूं ह्मटलें, तें कार्य आपल्या हातून होवो न होवो, आपण निदान त्या कार्याकरितां झटून प्राण तरी द्यावा, असा निर्धार त्यानें करणें हेंही किती साहजिक ! तसाच मनाचा निर्धार करून **तानाजी जगत्सिंगास** ह्मणतो: " **जगत्सिंग**, तुह्मी आपल्या पत्नीच्या आणि त्या सतीच्या सोडवणुकीसाठीं निघालां, तेव्हांच आपलें शीर आपल्या हातावर घेतलेंत आणि ज्या दिवशीं

मी तुमच्याजवळ "आपण माघ वद्य नवमी उलटून जाण्याच्या आंत त्या साध्वीची सोडवणूक करूं" असें ह्मटलें ते दिवशींच मींही पण आपल्या हातावर आपलें शिर धरलें. तर आतां काळोख पडतांच आपण दोघेच घोरपड लावून वर चढून जाऊं आणखी जिथें **कमलकुमारी**ला ठेविलें आहे, त्या महालाच्या दारापर्यंत जाईतों जो मध्यें येईल त्याला कापून काढीत तिची सुटका करूं. मग त्यांत आपलं काय होईल तें होईल. प्रतिज्ञाभंग होण्यापेक्षां मृत्यु आला तर तोच फार चांगला. दोघे तर दोघेच!"

"पण असं कां? दोघे कां? मी नाहीं का तिसरा?" असें बाहेरून आंत येणारा एक गृहस्थ ह्मणाला व **तानाजी** तो शब्द ऐकून वर डोळे करून पहातो, तों "आणखी मी बी एक ह्मातारा पाहिजे तर चवथा ह्मणा. मी पन कांहीं तरी करीन. सगळ्यांच्या आधीं गड चढून जाईन. ऐशीं वर्षं कांहीं उगाच नाहीं गेलीं," असें एक ह्मातारा ह्मणाला.

त्या दोघांचे ते शब्द ऐकण्याबरोबर व ते दृष्टीस पडण्याबरोबर **तानाजी**ची चर्या फारच प्रफुल्लित झाली. तो एकदम त्या ह्मातार्‍यास ह्मणाला, "**शेलारमामा**, अन् तुह्मी इतक्यांत आलां! **रायाजी**नाईक, इतका उशीर हो कां झाला? सकाळपासून माझं तर धैर्य अगदीं नाहींसं झालं होतं. वाटलं आतां काय होतं आहे कोणाला ठाऊक? मामा, **सूर्याजी** आला का? तो तेवढा आणखी आला, ह्मणजे मग आणखी कोणी आलं नाहीं तरीसुद्धां हरकत नाहीं. मामा, तुह्माला फार दगदग झाली."

शेलारमामा लागलीच त्याला उत्तर करतो, "अरे, दगदग कसली त्यांत? **येसा कणेकर** एक पन्नासाचीच लहानशी तुकडी घेऊन आला आहे, तो मला पुढें जाऊंच देईना. '**सूर्याजी** पुष्कळ लोक घेऊन पाठोपाठ येतोच आहे. तुह्मी नका आतां रिकामी दगदग करायला जाऊं, चला माघारी,' असं ह्मणून त्यानं मला माघारी आणलं. **सूर्याजी** रातच्या दहा वाजायच्या आधींच येऊन पोहोंचतो खचीत, त्याची काळजी नको, असं **येसा कणेकरा**नं तुला सांगायला सांगितलं आहे. आतां आपल्या पुढल्या बेताला लागा कसे." असें ह्मणून ते चौघेही विचार ठरविण्याला बसले. **तानाजी**नें **शेलारमामा**ला तो गेल्यापासून आपण काय काय केलें तें सांगण्यास सुरुवात केली, तेव्हां ह्मातारा स्वस्थ चित्तानें ऐकूं लागला. **रायाजी**नें आपल्यास सगळ्या किल्ल्याच्या सभोंवतीं हिंडविलें, तेव्हां पश्चिम बाजूला **डोणागिरी** ह्मणून जो कडा आहे, तेथें तेवढी सोल लावायला जागा आहे असें पाहिलें

व तेथूनच **जगत्सिंग** उतरून येण्याची खटपट करीत होता, कारण त्याच्याही मतानें तीच जागा उतरण्याला योग्य असें दिसलें, वगैरे मजकूर व **जगत्सिंग** कोण, काय व येथें कां आला, वगैरेही सांगून दिलें. तेव्हां **शेलारमामा**ला तर फारच स्फुरण येऊन तो **उदयभानू**ला अतोनात शिव्या देऊं लागला. **रायाजी** व **तानाजी** यांना त्याला 'हो, हो' करतां करतां पुरेवाट झाली. शेवटीं एकदां तो गप्प बसल्यानंतर **रायाजी, जगत्सिंग** व **तानाजी** तिघांच्याही विचारानें असेंच ठरलें कीं, ज्या ठिकाणाहून **जगत्सिंग** उतरत होता, तेवढीच घळ चढणीला उत्तम आहे. बाकी कोठूनही किल्ल्यावर चढून जाणें शक्य नाहीं. **तानाजी** व **रायाजी** यांनीं ती विवक्षित घळच नव्हे, तर विवक्षित जागाच आपल्या कार्याला उपयोगी ह्मणून निवडून काढली होती. तेव्हां आतां कोठून चढावयाचें याच्याबद्दल विचार मुळींच राहिला नाहीं. नंतर कसें चढावयाचें आणि प्रथम कोणीं कोणीं चढावयाचें हा प्रश्न निघाला. त्याबरोबर **शेलारमामा** पुढें होऊन ह्मणतो, "मी, मी पहिल्यानं चढून जाऊन तो मधला **झुंजार**दरवाजा उघडतों. माझ्या अंगावर येऊं द्या किती रजपूत येतात ते. ह्मातान्याच्या अंगांत पीळ कसा असतो, तें तरी बघा पोरांनो!" हें बोलत असतांना ह्मातान्याचा चेहरा अगदीं पहाण्यालायक होता. तो पुढें ह्मणतो, "पोरा **तान्या**, हंसतोस होय? ह्मातान्याची बडबड उगच वाटती तुला? पर लेका, हीं ह्मातान्याचीं हाडं जेव्हां घोरपडीच्या सासळदंडाला धरून चटाचट चढून जातील, तेव्हां समजेल मग कसा काय ह्मातारा आहे तो! माझी बाही आज आतांपासूनच फुरफुरती बघा." ह्मातारा इतकेंच बोलून थांबला नाहीं. **रायाजी**कडे पाहून ह्मणतो, "आणा तो पेटारा. आपल्या **यशवंता**बाईला पाहूं एकदां, अन् तिला शेंदराचं न्हाण घालून तिची मोत्यांची जाळी तिच्या डोकीवर घालूं. अरे **तान्या**, असा कां बसलास आतां? सोल पहिली माझी ह्मणतोंना?"

तानाजीनें मामाला जरा हलके बोलण्याबद्दल खूण केली. पण ह्मातान्याची जीभ ती काय अशी आवरते? त्यानें त्यास "मामा, पुढचा विचार कायतो कायम करायचा आहे. आतां त्याबद्दल आधीं बोलूं. वर चढण्याची वेळ आली ह्मणजे तुह्मीच पुढें, मी मागें," असें सांगून कसेंबसें गप्प केलें. ह्मातान्याला स्फुरणच फार विलक्षण चढलें होतें. पुढें आणखी वाटाघाट होऊन **येसा कंकरा**ला असा निरोप पाठवावयाचा ठरला कीं, तूं स्वतः व तुजबरोबरचे अठ्ठेचाळीस लोक असे संध्याकाळ होण्याबरोबर **द्रोणागिरी**च्या बाजूला या; आणि तुझ्या बाकीच्या दोघां इसमांनीं

रात्रीं **सूर्याजी**ची टोळी कोणीकडून येईल तिला वाटेंतच अडवून दुसऱ्या बाजूनें **कल्याण**दरवाजाखालीं जाऊन उभे राहण्यास सांगावें." **तानाजी, शेलारमामा** व **जगत्सिंग**–तिघांसही खात्रीनें असें वाटलें कीं, आपल्या पन्नास लोकांसकट आपण गुपचुप किल्ला चढून गेलों, ह्मणजे **कल्याण**दरवाजा उघडण्यास मुळींच अडचण पडणार नाहीं. एकदां दरवाजा उघडला कीं कामच झालें. **सूर्याजी** व त्याचे लोक खालीं जय्यत उभे असतील, ते वर येऊन वाटेल तसा गहजब करूं शकतील. सर्वानुमतें हा विचार ठरल्यावर **रायाजी**नें लागलीच आपल्या अत्यंत विश्वासांतील एका माणसाला, ज्या ठिकाणीं **येसाजी कणेकरा**ची टोळी येऊन दबा धरून बसली होती, तेथें त्याला ठरलेला निरोप सांगण्याकरितां पाठविलें. इतकें सगळें होतें आहे, तों अगदीं तिन्हीसांजा झाल्या. अंधार पडत चालला. **तानाजी**नें आज सगळ्या दिवसांत तोंडांत पाणीसुद्धां घातलें नव्हतें. तथापि त्याला या वेळीं तहानभूक ह्मणून कांहीं विकार असतात हें तरी माहिती होतें कीं नाहीं, असें त्याचें वर्तन दिसलें. त्यानें कांहीं खाल्लें कीं नाहीं याची चौकशी तरी कोण त्यावेळीं करतो? पण **शेलारमामा**ला कांहीं शंका येऊन त्यानें सहज विचारलें असतां, "गड हातीं येऊन त्या सतीची सुटका होईपर्यंत तोंडांत पाणी घालावयाचें नाहीं, असा मीं आज निश्चय केला आहे," असें त्यानें उत्तर दिलें. **जगत्सिंगा**नेंही तसेंच उत्तर दिलें. शिवाय आतां जेवणाखाणाच्या पायीं घालविण्यास वेळच नसल्यामुळें मग त्याबद्दल अधिकउणा कोणीं विचार केला नाहीं. संध्याकाळ झाली. सूर्यास्त झाला आणि अंधकार आपल्याकडून सर्व पृथ्वीवर आच्छादन घालूं लागला. त्याबरोबर **शेलारमामा**नें आपल्याबरोबर आणलेल्या पेटाऱ्यांतून घोरपड बाहेर काढली. या घोरपडीच्या साहाय्यानें **शिवाजीमहाराजां**नीं आणि **तानाजी मालुसरे, येसाजी कंक**, वगैरेंनीं किती तरी किल्ले चढून जाऊन सर केले होते. तिचें नांव त्यांनीं कांहीं लीलेनें, कांहीं शुभदायक म्हणून **यशवंती** असें ठेवलें होतें. तिला बाहेर काढिलें आणि तिच्या मस्तकावर शेंदराचा लेप थापला. नंतर तिच्याकरितां एक मोत्यांची जाळी केली होती ती नेहमींप्रमाणें तिच्या मस्तकावर घातली व तिला किल्ल्यावर सोडण्यास तयार केली. सुमारें पांच घटका रात्र झाली असेल नसेल, तोंच **येसाजी कणेकर** आपल्या पन्नास लोकांना घेऊन येऊन उभा राहिला. त्यांना वाट दाखवून आणण्याला **रायाजी**चा माणूसच गेला होता. अंधारी रात्र आणि भयंकर जंगल. खिबारी, आळवी, साग यांनीं आणि वेळूच्या बेटांनीं सगळं रान गर्द, शिवाय



सिंहगड—तानाजी चढला ती दरी—द्रोणागिरी

जनावरांचें भय. परंतु **शिवाजीमहाराजांचे** मावळे ते. ते काय असल्या रानावनातल्या संकटांना दाद देतात ? हां हां ह्मणतां त्यांनीं वाट काढली. एक दोन ठिकाणीं एखाद् दुसरा माणूस जरा अडखळून पडे. परंतु वीरश्रीनें पुनः उठून मार्गाला लागे. असें करीत करीत सुमारें सहा सात घटका रात्रीला **डोणागिरी**-च्या कड्याखालल्या दरींत ते लोक येऊन उभे राहिले. आमच्याही वीरांची चौकडी येऊन आधींच खालीं उभी राहिली होती. त्यांची व यांची गांठ पडतांच त्या अठ्ठेचाळीस लोकांपैकीं कांहींना भान न राहून त्यांनीं आपल्या वीरश्रीच्या व आनंदाच्या भरांत एकदम ' हर हर महादेव ' केला. त्याबरोबर **रायाजीनें** व **तानाजीनें** त्यांना दाबलें. तरी पण वर किल्ल्यावरून गस्तीच्या शिपायांनीं खालीं गलबला काय आहे ह्मणून विचारलें असतां महारांनीं व मेट्यावरल्या कोळ्यांनीं " कांहीं नाहीं. तुह्मी स्वस्थ असा. ह्या **रायाजी**च्या लग्नाचा घोंटाळाच अजून चालला आहे. त्याचे लोक जेवण जेवून ओरडताहेत. बाकी गस्त सगळी बराबर आहे, " असें उत्तर देऊन त्यांस स्वस्थ केलें ! त्या लोकांना अधिक चौकशी करण्याचें कारणही नव्हतें, कारण आज किती दिवस तो लग्नाचा धुमाकुळ चालला होता खराच. शिवाय त्या लोकांच्या अंगीं तेवढा चौकसपणाही नव्हता.

इकडे **तानाजीनें** त्या लोकांच्या अविचाराबद्दल त्यांस पुनःएकदां बजावून घोरपड काढली आणि तिला नमस्कार करून व तोंडानें " जय अंबाबाई, तुझी रुपा असूंदे " ह्मणून **शेलारमामा**च्या हातीं तिचा सोल देऊन ह्मटलें, " मामा, तुह्मी ह्मातारे माणूस. तुमच्या हातूनच **यशवंती**ला सोडली पाहिजे. करा वंदन आणखी द्या लावून मी सांगतों त्या बेतानं ! "

मामांनीं सोल धरला आणि तिला वंदन केलें. तिच्या माथ्यावरल्या शेंदराची तीट आपल्या व सर्वत्रांच्या कपाळाला लावली आणि अंबाबाईचें नांव घेऊन, **तानाजीनें** दाखवून दिलेल्या जागेच्या सुमारानें घोरपड लावून दिली. परंतु काय त्या घोरपडीला ते दिवशीं झालें असेल तें असो, ती वर न चढतां परत माघारी आली. तें पहाण्याबरोबर **शेलारमामाचें** काळीज चर्र झालें. वर पाठवलेली घोरपड पाठीमागें फिरणें ह्मणजे फार मोठें अशुभ. आजपर्यंत किती तरी किल्ल्यांवर तिला चढविलें होतें, परंतु आजच्याप्रमाणें एकाही किल्ल्यावरून ती कधीं मागें फिरली नाहीं. आणि आजच फिरली तेव्हां कांहीं तरी अपघात होणार, असें ह्मातान्याच्या मनानें घेतलें; आणि लागलीच तो **तानाजीस**

ह्मणतो, " **तान्या**, आज शकुन चांगला नाहीं. आज तूं या भानगडींत पडूं नकोस. आजपावतर ही आपली **यशवंती** कधीं अशी परत फिरली नाहीं. आज फिरली, तर शकुन वाईट. भलतंच कांहीं झालं ह्मणजे पंचाईत ! "


परंतु **तानाजी**ची तर प्रतिज्ञा कीं, आजच रात्रीं बारा वाजण्याचे आंत किल्ला सर करून त्या साध्वी **कमलकुमारी**ला सोडवावयाची. तेव्हां तो **शेलारमामा**च्या अशा बोलण्याला ऐकतो ? त्यानें संतापानें घोरपडीच्या साखळदंडाला एक हिसडा मारला आणि तोंडानें ह्मटलें, " **यशवंते**, आज कांहीं नाहीं तरी सत्तावीस किल्ले तुझ्या जोरावर चढून घेतले, आणखी आज अशा ऐन वेळीं जर तूं दगा दिलास, तर तुझं मी कसं चालूं देईन ? आतां पुनः एकदां तुला वर लावतों. जर चांगली खबदडी पाहून बिलगलीस तर बरं आहे, नाहीं तर याच पट्यानं तुझीं अठरा खांडोळीं करून तीं या सगळ्या लोकांना शिळ्या भाकरीबरोबर खायला देईन. " असें ह्मणून त्यानें घोरपडीस पुनः सोडिलें. आपल्यास केवढा धाक घातला हें जणूं काय त्या **यशवंती**सही समजून तिनें आतां माघार घेतली नाहीं. सरसर वर चढून जाऊन ती एका खबदडींत नखें रोंवून भक्कम बसली. त्याचें तें जोराचें भाषण ऐकतांच इतर लोकही स्फुरण पावले व सोल बसला कीं नाहीं, हें पहायला कोण पुढें होतो का मी होऊं असें **तानाजी**नें ह्मणण्याबरोबर **मोहिता, चवाण, माहडिक, कंक, कणेकर, जाधव, शेलार**, यांपैकीं प्रत्येकजण पुढें होऊन सोलाला हात घालायला धावला. परंतु **तानाजी**नें तें विचारून फक्त सर्वांची परीक्षा पाहिली. प्रथम तो स्वतःच पुढें झाला. आपण पुढें झाल्याखेरीज इतरांस पुढें होण्यास स्फुरण यावयाचें नाहीं, हें तो जाणूनच असल्यामुळें सोलास त्यानें हात घातला आणखी **मामास** बजावून सांगितलें कीं, मी वर जाऊन पोंचून काय करायचें तें करतों. पण तुह्मी एक माणूस वर जाऊन पोंचेपर्यंत दुसऱ्याला सोलाला हात घालूं देऊं नका. नाहीं तर सोलावर भार फार होऊन तो मधेंच तुटावयाचा. **शेलारमामा**, ' आपण आधीं जातों, तूं जाऊं नको, ' असें ह्मणणार तों **तानाजी** आपला पट्टा तोंडांत धरून ढाल धनुष्य व बाणभाता नीट सांवरून घेऊन हां हां ह्मणतां वर जाऊन पोंचला. **जगत्सिंगा**नें नंतर दुसऱ्या कोणासही पुढें होऊं दिलें नाहीं. " मी पुढें होऊन तुह्मांला इषारा करतों, वर काय आहे तें पहातों, मी तेथला माहितगार, माझा उपयोग **तानाजी**रावाला फार होईल. " असें ह्मणून त्यानें सोलाला हात घातला. बिचाऱ्याच्या पायाची जखम अजून पुरती भरूनसुद्धां आली नव्हती. परंतु शूर रजपुताचा बच्चा तो,

कच्चेपणाचें वर्तन कसा करील ? 'जय **एकलिंगजी**महाराज,' असें ह्मणून त्यानें तोंडांत पट्टा धरला आणि तो हातोहात वर चढून गेला. वर जाऊन त्यानें आपण पोंचल्याबद्दल इषारा दिला. मग एकामागून एक ते सर्व लोक चढून जाऊं लागले.

तानाजी वर गेला तो तेथेंच उभा होता आणि **जगत्सिंग** मात्र किल्ल्यावर काय हालहवाल आहे ती कळण्यासाठीं इकडे तिकडे हिंडावयास गेला. कोठेंही कोणीं विचारलें तर त्यानें रजपुती भाषेंत उत्तर द्यावें, यामुळें कोणी दगा करून आला असेल असें वाटणें संभवनीयच नव्हतें. इकडे **तानाजीनें** आपला प्रत्येक इसम येण्याबरोबर त्यास आपलें शस्त्र सज्ज करून जमिनीच्या सरपट पडून राहण्यास सांगावें. असा क्रम चालून सुमारें बारा मावळे चढून वर आले, तेव्हां त्यांनीं मेखा ठोकून आणखी दोन दोरही बांधले. पण इतक्यांत **झुंजार**बुरुजाच्या अलीकडच्या बाजूला एक रजपूत शिपाई आला होता, त्याला या **डोणागिरी**च्या दरींत कांहीं तरी चळवळ आहे, अशी शंका आली व त्यानें मोठ्यानें दरडावून खालच्या महारांस व कोळ्यांस खालीं काय गडबड आहे ह्मणून विचारलें. तों पुनः आधीं उत्तर दिलें होतें त्याप्रमाणेंच उत्तर आलें. परंतु त्या उत्तरानें त्याचें समाधान झालेंसें दिसलें नाहीं. यामुळें तो बरोबर कोठें गलबला ऐकूं येतो आहे, त्याचा खुगावा काढण्यासाठीं **तानाजी**च्या चढणीच्या बाजूला येऊं लागला. अंधाऱ्या रात्रीमुळें **तानाजीला** तो माणूस कोठें आहे, काय आहे, कांहीं दिसलें नाहीं हें उघडच आहे. परंतु कोणाच्याही अंगावर नेमका तीर मारण्यास **तानाजीला** मनुष्य पहावेंच लागत होतें असें नाहीं. त्यास शब्दवेधाचें ज्ञान चांगलें असल्यामुळें त्यानें नुसत्या चाहुलीवरून नेम धरला आणि तीर सोडला, त्याबरोबर तो तीर त्या माणसाला लागून तो धाड्कन् खालीं पडला. तो मनुष्य आपल्याकडे चालून येत असतां साधारणतः त्याची छाती कोठें असेल त्याचा अंदाज करून मारलेला तीर इतक्या नेमानें त्याच्या काळिजावरच लागला कीं, तो निपचित पडला, तो पुनः उठलाच नाहीं. यामुळें पुनः बराच वेळपर्यंत कोणापासून कांहीं त्रास न होतां **तानाजीचे** सगळे पन्नासचे पन्नास मावळे कांहीं घोरपडीच्या सोलावरून व कांहीं नव्या दोरांवरून वर चढून आले.

ते वर चढून आल्यानंतर पहिलें काम अर्थातच **झुंजार** दरवाजा रोखून **झुंजार**बुरुज आपल्या ताब्यांत घेण्याचें व दुसरें काम **कल्याण**दरवाजा उघडण्याचें; **झुंजार**बुरुज आपल्या ताब्यांत घेण्याचें मुख्य कारण त्या बुरुजावर

एक चक्री तोफ ठेवलेली होती, ती हस्तगत करून घ्यायची. तोफ जर हस्तगत झाली नाहीं आणि तिचा उपयोग रजपुतांनीं केला तर आपली दशा फारच वाईट होणार, तशी होऊं नये हें **तानाजी**रावांचें पहिलें धोरण. यामुळें त्यांनीं प्रथम आपल्या लोकांस अगदीं मुकाट्यानें **झुंजार** दरवाज्यावर नेलें. मागें सांगितलेंच आहे कीं, ज्या दरींतून **तानाजी**राव आपले मावळे वीर घेऊन वर चढले, त्या दरीच्या व **झुंजार**बुरुजाच्या दरम्यान एक दरवाजा होता, तो दरवाजा रोखून **झुंजार**बुरुज स्वाधीन करून टाकणें जरूर होतें. तेव्हां मंडळी आधीं त्या दरवाज्यावर गेली आणि तेथल्या पहारेकऱ्यांस त्यांनीं कापून काढण्याचा सपाटा चालविला. मोठ्यानें "हरहर महादेव किंवा जय भवानी आई !" असें सुद्धां त्यांनीं ह्मटलें नाहीं. किल्ल्याच्या या बाजूस काय चाललें आहे, हें दुसऱ्या बाजूस कळूं न दिलें तरच आपणास जय मिळण्याची खात्री हें **तानाजी**रावांचें धोरण. शब्द करून गडबड झाली तर सगळा किल्ला सावध होईल. आणि **कल्याण**दरवाजा उघडून आपल्या भावास आंत घेईपर्यंत तें होणें मुळींच इष्ट नव्हतें. यामुळें त्यांनीं आपल्या निवडक लोकांस काय करावयाचें तें गडबड न करितां करावयाचें अशी सक्त ताकीद दिली होती व शिस्तीनें वागावयास शिक-लेल्या त्या मावळे वीरांनींही अगदीं त्याप्रमाणेंच केलें. तोंडावाटे शब्द न काढतां, इतकेंच नव्हे तर सुस्कारेसुद्धां मोठ्यानें न टाकतां त्या **झुंजार** दरवाजावरील गा-फिल लोकांचें त्यांनीं चंदन उडविलें. अशा प्रकारें तो दरवाजा रोखला. तेथला चट्‌ सारा पहारा कापून काढला, परंतु पलीकडे **झुंजार**बुरुजावर एक शब्द जाऊं दिला नाहीं. ही एकाएकीं सैतानाची मंडळी आपला नाश करण्याकरितां जमिनींतून वर आली कीं काय ? असें त्या दरवाज्यावरल्या पठाणांस वाटून ते घाबरून जाऊन दगडाप्रमाणें स्तब्ध झालें. जवळचीं शस्त्रें उचलण्याचें किंवा उपसण्याचें सुद्धां त्यांस भान नाहींसें झालें. या लोकांचें चंदन काढून ती अशा कामीं कसलेली व आतां खून चढल्याकारणानें विशेष क्रूर दिसूं लागलेली वीर मंडळी तितक्याच मुकाट्यानें **झुंजार**बुरुजाकडे गेली. **झुंजार**बुरुजावरले पहारेकरीही नेहमींच्या रीतीप्रमाणें चंडोल ओढून व कुसुंबा घेऊन चैनींत घोरत होते, किंवा आपापसांत खिदळत होते. त्यांच्यावर या पन्नास करड्या माव-ळ्यांनीं हल्ला करून त्यांना कापून काढलें. त्यांनाही शस्त्रें शोधण्याला किंवा जवळ होतीं तीं उचलण्यालासुद्धां फुरसत दिली नाहीं. नाहीं कोणाच्या बंदुका किंवा कडाबिनी भरलेल्या, दारूचीं तोस्दानें वगैरे गळ्यांतून काढून उशाला



सिंहगड—झुंजार बुरूज.

घेतलेली. अशा गयाळी स्थितींत मावळ्यांसारख्यांचा हल्ला! मग काय विचारतां? त्या बुरुजावर तर एक माणूससुद्धां जिवंत राहिलें नाहीं; आणि तोफेच्या कान्यांत एका मावळ्यानें मेख मारून ठेवली. ती अशी कीं, कोणाच्या बापालासुद्धां निघूं नये. एका बुरुजाची अशी बेमालूम व्यवस्था लावून तेथून मंडळी निघाली, ती **कल्याण** दरवाजाकडे गेली. परंतु इतका यांचा दंगा चालला असतां, किल्ल्यावर कोणाला कांहींच थांग लागूं नये हें अशक्य होतें. अर्थातच कांहीं तरी नेहमींपेक्षां निराळें चाललें आहे असें वाटून दुसरीकडले लोक काय आहे, काय आहे, अशी चौकशी करूं लागले होते. शिवाय आज माघ वद्य नवमी आहे तेव्हां आतां मध्यरात्रींच **उदयभानु कमलकुमारी**शीं निका लावणार आहे, असें ज्यास त्यास आठवून जो तो आपापलीं हत्यारें इकडे तिकडे टाकून जणूं काय, काय होतें त्याचा शोध घेण्यासाठीं **बाले**किल्ल्याच्या बाजूला गेला होता. तेथें कोणी एकानें जाऊन "किल्ल्याच्या दुसऱ्या बाजूला गडबड आहे" असें सांगतांच मंडळी हंसली, आणि त्यांनीं आधीं त्याचीच टर उडवली! इकडे त्याच वेळांत **तानाजी** व त्याच्या लोकांनीं दरवाज्यावरला पहारा पार मारून दरवाजा उघडून दिला, आणि खालीं आपला भाऊ **सूर्याजी** आपल्या मावळ्यांस घेऊन वर येतो केव्हां, याची तो वाट पहात बसला. तो येईपर्यंत हजार दोन हजार शत्रूंवर आपल्या एकूणपन्नास लोकांनिशींच चाल करून जाण्यांत शहाणपणा नाहीं असा त्यानें योग्य विचार केला. एक चक्री तोफेचा तो **झुंजार**बुरूज व दोन दरवाजे रोखलेच होते. आतां किल्ल्याच्या मध्यावर चाल करून जाणें तें आपला भाऊ निवडक लोक घेऊन वर आल्याखेरीज अगदीं योग्य नव्हतें. आपण आतांपर्यंतचा सर्व कारभार मुकाट्यानें केला, परंतु आतां पुढें तितक्याच मुकाट्यानें काम होणें शक्य नाहीं. ह्मणून त्यानें आपल्या लोकांस आतां **सूर्याजी** येईपर्यंत तेथेंच दबा धरून बसण्याचा हुकूम केला. इतक्या दोनही चकमकींत सुदैवाची गोष्ट ही, कीं मावळा काय तो एकच पडला.

इकडे **जगत्सिंग** हिंडत हिंडत गेला तो **बाले**किल्ल्याच्या तेथें गेला. तों त्यास त्याचा मित्र **विशाळदेव** भेटला. त्यानें त्याला अर्थातच पहिल्या सपाट्याला तूं आज तीन चार दिवस कोठें होतास ह्मणून विचारलें. परंतु **जगत्सिंगानें** त्यास "या प्रश्नाचें उत्तर देण्याची ही वेळ नाहीं, आधीं मला **कमलकुमारी**ची हकीकत काय आहे ती सांग" असें ह्मटलें. तेव्हां त्याला कळलें कीं, **उदयभानूनें देवलदेवीस** बळजबरीनें **कमलकुमारी**पासून दूर केलें व तिला इकडे

किल्ल्यावरील राजमहालांत आणून ठेवलें आहे. तिच्याशीं आतां कोणत्याही प्रकारचें दळणवळण होणें शक्य नाहीं; आणि **कमलकुमारी**ला **बाले**किल्ल्यांतल्या त्याच महालांत ठेवलें आहे. तें कळतांच **जगत्सिंगा**स फार वाईट वाटलें व तो एकदम तेथून निघाला. मध्यरात्रीला अजून वेळ होता ही गोष्ट खरी, परंतु तो **उदयभानु** आतां तास दोन तासांची वाट पाहीलच, असें सांगवत नाहीं असें वाटून त्यानें **तानाजी**साठीं **कल्याण**दरवाजाकडे धांव घेतली. इतक्या वेळांत **कल्याण**दरवाजापर्यंत मंडळी खचित आली असेल, असा त्यानें तर्क केला.

प्रकरण १३ वें.

मध्यरात्रीं.

इकडे **बाले**किल्ल्यांतल्या महालांत **कमलकुमारी** अगदींच हताश होऊन, आतां आपली विटंबनेची वेळ क्षणोक्षणीं जवळ आली ह्मणून रडत बसली होती. तिला कोणच्याही तऱ्हेनें कांहीं करतां येऊं नये ह्मणून तिजवर आतां हबशिणींचा आणि खोजांचा सतत पहारा ठेविला होता. आपल्या नेसत्या वस्त्राचा फास गळ्याला लावून प्राण देईन ह्मणेल, तरीसुद्धां तें आतां तिला शक्य नव्हतें, तिजवर एकसारखा अतिशय करड्या प्रकारचा पहारा होता. त्या हबशिणी व ते हबशी खोजे दिसण्यांतच इतके भेसुर होते कीं, त्यांना एकसारखें आपल्यापुढें पाहण्यानेंच बिचारीला अर्धमेल्याप्रमाणें होऊन गेलें. **देवलदेवी**ला तिच्याजवळून दूर केल्या वेळेपासून तिच्या डोळ्यांतून एकसारखे अश्रू चालले होते व शेवटीं इतकी स्थिती झाली कीं, आतां तिच्या डोळ्यांत अश्रु ह्मणून राहिला नाहीं. मुठीसारखे डोळे सुजले. तिचा मोठा आधार काय तो **देवलदेवी**. तीच आतां जवळून दूर झाल्यावर आणखी काय राहिलें? अशा स्थितींत सुमारें प्रहर रात्र होऊन चार घटका झाल्या. मध्यरात्रीला चार घटकांचा अवकाश असेल नसेल. तोंच **उदयभानु** व त्याच्याबरोबर तो काजी, असे दोघे तिच्या महालांत आले. त्यांस पहाण्याबरोबर **कमलकुमारी**स हींव भरल्याप्रमाणें होऊन ती भयानें थरथरां कांपूं लागली. प्रत्यक्ष मृत्यूला पाहूनसुद्धां तिला इतकी भीति वाटली नसती इतकी त्या काळाहूनही कठोरहृदयी पुरुषाला पाहून तिला भीति वाटली. ती लागलीच उठून उभी राहूं लागली; परंतु तिला उभें राहण्यास ताकद कोठली? बिचारी तशीच

बसून उसासे टाकीत, आतां पुढें काय होतें त्याची जणूं काय वाट पहात राहिली. **उदयभानु** अगदीं धिटाईनें तिच्यापुढें गेला आणि कपटपूर्ण अशा वाणीनें ह्मणतो, " **कमलकुमारी**, तुझा माझा विवाह होण्याला आतां दोन तीन घटकांचा अवकाश राहिला आहे. विवाहाच्या वेळीं नवऱ्या मुलीनें आनंदांत असायचें, तें हें काय तूं वेड्यासारखें आरंभलें आहेस ? ऊठ, आतां हा शोक सोडून दे. हे **काजीसाहेब** आले आहेत, यांच्यापासून आधीं मुसलमानी धर्माची दीक्षा घे. ह्मणजे लागलीच आपला निका लावून घेऊं. अजून का तुला वाटतं आहे आपली कोणी सुटका करील ह्मणून ? अग तो तुमचा रजपुतांचा **एकलिंगजी** आला तरीसुद्धां तुझी आतां माझ्या हातून सुटका होणार नाहीं. मग उगीच आपल्या जिवाला कां त्रास करून घेतेस ? चल अशी ये. हे पहा **काजीसाहेब** तुझ्यासाठीं खोळंबले आहेत. "

उदयभानु आपल्याकडून मोठें गोड असें भाषण करीत होता व विलक्षण सौम्यपणा त्यानें आतां धारण केला होता, परंतु त्याचा प्रत्येक शब्द तापलेल्या तेलाच्या बिंदूप्रमाणें **कमलकुमारी**च्या कानांतून भाजत जाऊन केवळ हालाहल विषाप्रमाणें तिच्या हृदयांत भिनला. तिच्या मनांतून त्याला हजार प्रकारांनीं बोलून, त्याची निर्भर्त्सना करावी असें आलें, परंतु तोंडून एकसुद्धां शब्द निघेना. कसा निघणार ?

आपण इतकें मवाळपणें बोलतों आहोंत पण ती एक शब्दसुद्धां उलट बोलत नाहीं हें पाहून **उदयभानू**ला विशेषच चीड आली. आणि तो दुष्ट आणखी पुढें जाऊन तिच्या अंगाला धरून तिला उठविण्यासाठीं हात पुढें करणार, तों जणूं काय तिचें सर्व नष्ट धैर्य परत येऊन ती तट्कन् उठून उभी राहिली व ह्मणतेः " **उदयभानु**, तुझ्या जिवाला कांहीं दयामाया असली, मनाला कांहीं लाज असली, तर तूं मला छळूं नकोस. आतांपर्यंत मला धैर्य नव्हतं पण आतां आलं. आतां मी वाटेल तें करीन पण तुझा तो दुष्ट हात मी आपल्या अंगाला लागूं देण्यापूर्वीं या कुडींतून हा प्राण घालवून देईन. " ती इतक्या झटक्यानें उठली व तिनें वरील शब्द इतक्या त्वेषानें व आवेशानें उच्चारले कीं, ते ऐकतांच **उदयभानु** क्षणमात्र दचकून मागें सरला. त्या वेळीं त्या ह्मातार्‍या काजीस सुद्धां तिला पाहून दया आली. तो पुढें होऊन तिला ह्मणतोः " मुली **कमल**, तूं कां या भलत्या वेडांत शिरते आहेस ? असं चांगलं तुझं सुंदर शरीर, तें काय लांकडाच्या जोड्याबरोबर जाळायला अल्लानं निर्माण केलं आहे ? या अल्ला ! या अल्ला ! काय हा या हिंदु लोकांचा वेडेपणा ! हा बघ. हा **उदयभानु** कसा शूर मर्द, खुपसुरत, तुझ्याच जातीचा

रजपूत आहे. त्याला वरण्यानं तूं केवढ्या इतमामाला चढशील! दक्षिणची सुभेदारीण होशील! ये बेटा. असा हट्ट करूं नको. मी तुझा बाप आहें असं समज. माझी उमर तितकीच आहे. तेव्हां माझं ऐक."

'बाप' हा शब्द ऐकण्याबरोबर **कमलकुमारी**चें सगळें धैर्य गळालें, आणि ती एकदम " **पिताजी, पिताजी**! काय हो तुमच्या या लाडक्या **कमलकुमारी**ची अवस्था! तुमची तरी त्या दुष्ट बादशहानं काय अवस्था केली असेल! भगवान्, भगवान्!" असें अत्यंत दुःखावेगानें उद्गारून कपाळाला हात लावून खालीं बसली. बापाची आठवण होतांच तिचा तो आवेश ओसरला. तितक्यांत **उदयभानु** तिला आणखी ह्मणतो, " **कमलकुमारी**, आतां तुला तुझ्या पिताजींची बिलकुल काळजी नको. त्यांनीं केव्हांच स्वर्गाची वाट सुधारली. आतां माझ्याखेरीज तुला कोणाचासुद्धां आधार नाहीं. पण मौज ही कीं, मी तुला जवळ करीत असतां तूं आपली माझ्यापासून दूरदूरच पळतेस, त्या तुला काय ह्मणावं? ये. आतां तुला मीच काय तो मालक!" असें ह्मणून तो पुनः निर्धारानें पुढें सरून तिला आपल्या हातांनीं उठवणार, तोंच खालून "तोबा. तोबा!" असा ओरडा त्याच्या कानीं पडला आणि तो त्रासून, 'काय आहे?' ह्मणून विचारतो, तों एका रजपूत शिपायानें आंत येऊन त्यास ह्मटलें, ' **हजरत**, हे तर सारे सैतान जिकडे तिकडे पसरले! या सैतानांनीं सगळ्या किल्ल्याभर खूनच खून केले. ही मराठ्यांची अवलाद भयंकर, कसे आले, कोठून आले, किती आले, कांहीं समजत नाहीं; आणि आपले सगळे शिपाई पळ काढताहेत. एकजण जागेवर रहात नाहीं. कितीकांनीं कड्याखालीं उड्या टाकल्या, कितीकांनीं खालचा रस्ता धरला. आतां आपण स्वतः येऊनच कांहीं झालें तर होईल. नाहीं तर आपण मेलों, आणखी किल्ला गेला!"

आजपर्यंत कोणाचेंही इतकें लांबलचक बोलणें **उदयभानू**नें ऐकून घेतलें नाहीं. दुसऱ्या एखाद्या वेळीं जर कोणी येऊन असलें कांहीं सांगता, तर त्या सांगणाराचीच त्यानें पहिल्यानें गर्दन उडविली असती. परंतु यावेळीं सर्वच प्रकार इतका आकस्मिक होता कीं, कोण काय सांगतो आहे आणि आपण काय ऐकतों आहों, याचें त्याला मुळींच ध्यान राहिलें नव्हतें. त्या बातमी आणणाराचें आणखीही चऱ्हाट चाललें असतें, परंतु **उदयभानु** मध्येंच त्याला ह्मणतो, "ऐ बदमाष,- कोण मराठे! कसे किल्ल्यावर आले! का या माझ्या ऐन आनंदाच्या वेळीं विघ्न आणायचें म्हणून कांहीं तरी येऊन सांगतां? तें कांहीं नाहीं. मी हिच्याशीं

निका लावीन तेव्हां बाहेर पडेन.– ' **काजीसाहेब**, व्हा पुढें, आणखी–' परंतु त्यास पुढें बोलण्याची फुरसतच राहिली नाहीं. ' तोबा ! तोबा ! अल्ला ! अल्ला ! ' असा शब्दांचा गलगा आतां त्यालाच ऐकूं आला. त्याबरोबर संतापानें वेडा होऊन तो आणखी ह्मणतोः " हा सारा फितावा त्या **रायाजी**चा असला पाहिजे. मी आतां त्या काफरांच्या गर्दना उडवून त्या **रायाजी**च्या जातीचा तर उद्यां निःपात करून टाकतों. " असें ह्मणून तो संतापून आपली तरवार उपसून तेथून बाहेर पडला. पहातो तों जिकडे तिकडे धांवाधांव, पळापळ आणि आरडाओरड ! **बाले**किल्ल्याच्या सभोंवतालीं मंडळीची नुसती दाटी आणि जिकडून तिकडून मराठ्यांच्या 'हरहर महादेव' या रणगर्जनेचा प्रचंड ध्वनि ! अंधारामुळें धड कांहीं दिसेना, ह्मणून **बाले**किल्ल्यांतल्या लोकांस पलिते पेटविण्याचा हुकूम केला. आपला घात झाला असें पाहून त्यानें एकच गर्जना करून आपल्या रजपूत शिपायांस धीर दिला व आपला पट्टा फिरवीत तो **बाले**किल्ल्यावरून खालीं आला– नव्हे त्यानें उडी टाकली ह्मटलें तर विशेष शोभेल. **कमलकुमारी**च्या महालांत त्याला त्या हाहाकाराची बातमी देणारा रजपूत शिपाई त्याच्यामागें क्षणभरच उभा राहिला, आणि " **कमलकुमारी**, तूं भिऊं नकोस. तुझी सुटका झाली. मी तुझ्या मैत्रिणीला सोडविण्याला जातों " असें ह्मणून **उदयभानू**च्या पाठोपाठ निघाला. **कमलकुमारी**नें त्याचा आवाज ओळखला आणि तितक्यांत आनंदानें वर पाहिलें, तों तो तर कोणीकडे गेलाच परंतु तिचा छळ करणाराही तिच्या समोर नाहीं. आणि काजीसाहेब तर अगदीं भिऊन जाऊन एका कोपऱ्यांत स्वस्थ बसले आहेत !

इकडे **तानाजी**नें **कल्याण**दरवाजावर **सूर्याजी**च्या तुकडीची बराच वेळ वाट पाहिली. परंतु ती लवकर आली नाहीं. तेव्हां आपल्या शेलक्या लोकांनिशींच **बाले**किल्ल्यापर्यंत मार्ग काढून हल्ला करण्याचें धाडस आरंभिलें. त्याच्याबरोबर **जगतसिंग** होताच. ह्मातान्या **शेलारमामा**नें तर त्या रात्रीं कमालच करून सोडली. असा त्यांचा तडाखा सुरू झाल्यावर थोड्या वेळांत रजपूत शिपाई सावध होऊन त्यांनीं आपलीं शस्त्रें सावरलीं आणि चकमकीस सुरवात झाली. शूर **तानाजी**नें पुढें होऊन **बाले**किल्ल्यापर्यंत शत्रूंस हाणीत नेलें. इतक्यांत **जगतसिंगा**नें तर किल्ल्याच्या आंत जाऊन सर्व शिपायांना घाबरवूनच सोडलें. " **उदयभानु** कोठें आहे, त्याला वर्दी दिली पाहिजे. किल्ला काफरांनीं सफा केला. तोबा तोबा. हे मराठे नाहींत हे सैतान आहेत. " असें ह्मणत ह्मणत **कमलकुमारी**ला ठेवलेल्या

महालांत त्यानें आपला शिरकाव करून घेऊन ऐन वेळीं **उदयभानू**ला घाबर-विण्यासारखी वर्दी देऊन त्याच्या रंगाचा बेरंग केला व आपण त्याच्या मागोमाग बाहेर पडला. **उदयभानू**स वर्दी देणारा **जगत्सिंग**च होय. तो **उदयभानू**च्या मागोमाग बाहेर पडला तो सरळपणें **देवलदेवी**ला ज्या महालांत ठेवलें होतें त्या महालाकडे जाण्यास निघाला, तों त्याला तिकडे जाण्यास कोठेंच वाव दिसेना. आतां **सूर्याजी**ची टोळी वर येऊन दाखल झाली होती व रजपूतही सावध झाले होते. आणि **बाले**किल्ल्याच्या भोंवतालच्या पटांगणांत एकच धुमश्चक्री सुरू झाली होती. मनुष्याशीं मनुष्य भिडून लढाई चालली होती. तरवारीवर तरवारी वाजत होत्या. बाणाचे सूं सूं असे आवाज निघत होते. कित्येक रजपुतांच्या डाव्या हातांत पलिते आणि उजव्या हातांत तरवारी होत्या ! ते तसेच लढण्याचा यत्न करीत होते. त्यांस अंधक उजेडांत लढतां येईना यामुळें त्यांस हिलाल लागले ! अर्थात् त्यांचे एकेक हात गुंतून राहिले. आणि त्या हिलालांच्या उजेडांचा उपयोग मराठ्यांस मात्र चांगला झाला. इतक्यांत **बाले**किल्ल्याच्या व **कल्याण**दरवाज्याच्या मध्यें **भैरवा**च्या देवळाजवळ खुद्द **उदयभानू**ची व **तानाजी**ची चकमक उडून राहिली. दोघेही अगदीं शिकस्तीनें लढताहेत, असें **जगत्सिंगा**च्या दृष्टीस पडलें. **तानाजी** व **उदयभानु** दोघेही विलक्षण लढवय्ये, तेव्हां त्यांचें तें युद्ध पाहून त्या तसल्या वेळींही **जगत्सिंगा**स अत्यंत आश्चर्य वाटून तो जरा जागच्या जागींच उभा राहिला. विजेचा चमचमाट जसा क्षणभर दिसायचा, क्षणभर नाहीं, पुनः क्षणभर दिसायचा, तसे त्यांचे तरवारीचे हात चालले होते. ढालीवर कचाकच आवाज होत होते. आजूबाजूलाही लोकांच्या अशाच चकमकी चालल्या होत्या. दोन्हीकडची मंडळी आपापल्या परीनें आपापल्या लोकांना धीर देऊन लढाईंत जय मिळवि-ण्यासाठीं उत्तेजन देत होते व शत्रूवर घाव घालीत असतांना तोंडानें कांहीं तरी उत्साह उत्पन्न करणारे शब्द निघतच होते. इकडे **तानाजी** व **उदयभानु** यांची तर परस्परांस चीत करण्याची अगदीं अशी स्पर्धा चालली होती कीं कांहीं विचारूं नये. नाटकांतील वीरांप्रमाणें ते एकमेकांना व्याख्यानें देऊन शब्दांची वृष्टि करीत नव्हते, तर आपल्या वरच्या दांतांनीं खालचे किंवा खालच्या दांतांनीं वरचे ओंठ चावून मनगटांत जितका जोर असेल तितक्या जोरानें व अंगीं जितकी कुशलता असेल तितक्या कुशलतेनें आपल्या हातच्या खड्गांनीं एकमेकांस चीत करण्यास झटपटत होते. दोघांनाही पांच पांच सात सात वार लागून दोघांच्याही अंगांतून रक्ताच्या धारा चालल्या होत्या. इतक्यांत **उदयभानू**चा एक वार—फार

जोराचा वार–**तानाजी**च्या ढालीवर लागून त्यामुळें ती पार तुटून जाऊन त्यास टाकावी लागली. आयत्या वेळीं दुसरी ढाल कोठली येते ? तेव्हां त्यानें उजव्या हातानें पट्टा फिरवून शत्रूचा मार चुकवितां चुकवितां कमरेचा शेला डाव्या हातानें सोडून व तो त्याच हाताला गुंडाळून घेऊन त्या हाताची ढाल केली. परंतु तशानें कसा निभाव लागणार ? **उदयभानू**नें तर शत्रूच्या संकटाचा पूर्ण फायदा घेण्यासाठीं आपल्याकडून शिकस्त केली, पण त्यास लवकर यश आलें नाहीं. तथापि थोड्याच वेळांत **तानाजी** पडतो असें **जगत्सिंगा**स वाटलें. **उदयभानू**चा दम ताजा, **तानाजी** कांहीं नाहीं तरी प्रहरभर एकसारखा जिवापाड लढतच होता. त्याच्या मदतीला आपण गेलेंच पाहिजे, असें ह्मणून **जगत्सिंग** आपल्या जाण्याची दिशा बदलून त्या दोघांची चकमक चालली होती तेथें जाण्यास मार्ग काढूं लागला. इतक्यांत **तानाजी**च्या उजव्याही हाताच्या कोंपराच्या खालच्या बाजूस **उदयभानू**चा एक वार बसून त्याचा तो तरवारीचा हात पार उडून गेला. तो हात उडाला असें पहातांच **उदयभानू**नें आणखी एक वार त्याच्या कंठाजवळ मारून त्यास खालीं पाडलें व लागलाच तिसरा वार त्याच्या छातींत मारला. तो वर्मी लागला व **तानाजी**नें " हाय ! **महाराज** ! ही आजची आपली सेवा शेवटास जाईल असें वाटत होतें, पण नाहीं, आजच आपल्या सेवेचा ऋणानुबंध संपला ! देवाची इच्छा ! " इतकेच शेवटले शब्द बोलून प्राण सोडला. आपल्या प्रतिपक्ष्याला मारल्यानें **उदयभानू**ची तृप्ति झाली नाहीं. इतका वेळ गप्प असलेल्या तोंडानें त्यास अपशब्द बोलून त्याच्या पवित्र शवाला लाथेची ठोकर मारावी अशी त्या दुष्टाला इच्छा झाली. आणि " ऐ काफिर, जा नरककुंडांत जा– सैतानाच्या राज्यांत जा. आणखी मी तुला तिथें धाडला असें सांग " असें मोठ्यानें ह्मणून तो आपली लाथ उचलून त्या शवास ठोकर देणार, तोंच त्याच्या पायावर एक जबर तरवारीचा घाव बसून त्याच्या त्या पायाचा तुकडा पडला व कानावर पुढले शब्द पडले:– " अरे दुष्टा, रजपुताच्या कुळांत येऊन किती प्रकारचीं नीच कृत्यें करशील ? समरांगणांत समोरासमोर उभा राहून चार घटका ज्याच्याशीं बरोबरीनं झुंजलास, तो मरून पडल्यावर त्याच्या शवाला वंदन करायचं सोडून लाथ मारायला पाय पुढें करतोस ? आतां असं इकडे तोंड फिरव. पाहूं दे तुझं शौर्य. " हे शब्द ऐकल्याबरोबर **उदयभानु** वर पाहूं लागला तों बोलणारा माणूस ओळखीचासा वाटेना. जातीचा तर रजपूत, कारण तो अस्सल मेवाडी भाषेंतच बोलला. मराठ्यांच्या तर्फे हा रजपूत लढणारा–

आणि इतक्या अभिमानानें त्यांचा पक्ष घेणारा हा कोण, त्यास कांहीं तर्क होईना. कारण **जगत्सिंगास** त्यानें कधींच पाहिलें नव्हतें. तेव्हां त्याची समजूत अशीच झाली कीं, आपल्या सैन्यापैकींच कोणी तरी आपला द्वेष करणारा शिपाई फितूर होऊन आपल्यावर या वेळीं सूड घेण्याला आला आहे. तेव्हां संतापून तो त्यास शिव्या देऊं लागला. परंतु **जगत्सिंग** त्या शिव्या ऐकून नुसता हंसून ह्मणतो, " **उदयभानु,** तुझा पराक्रम ह्मणजे शिव्या देण्यांत आणि कोणी साध्वी स्त्रिया सती जात असल्या तर त्यांना आडवून त्यांच्या पातिव्रत्याचा भंग करण्यांतच असेल असें वाटत नव्हतं. पण तें तसंच आहे, असा आज अनुभव आला. मग ती तरवार तरी कशाला हातांत धरतोस ? देईनास फेंकून ? " **जगत्सिंगा**चें हें उपरोधिक बोलणें अर्थातच **उदयभानू**स खपलें नाहीं. " देईनास फेंकून ? " असे शब्द ऐकण्याबरोबर त्याला चेव येऊन त्यानें **जगत्सिंगा**च्या अंगावर एकदम तरवारीचा एक हात फेकला व तोंडानें त्यास तो मराठ्यांस फितूर झाल्याबद्दल शिव्या देऊं लागला. त्या ऐकून **जगत्सिंग** नुसता तिरस्कारानें हांसला. तो सावधच होता, त्यानें तो हात आपल्या ढालीवर घेऊन आपला बचाव केला. आणि त्यांची चकमक सुरू झाली. **तानाजी**ची व **उदयभानू**ची लढाई चालली असतांना जो प्रकार झाला त्याचीच पुनरावृत्ति आतां पुनः सुरू झाली. मात्र या वेळीं **उदयभानू**चें तोंड शिव्यागाळी करूं लागलें होतें.

तानाजी पडल्याबरोबर ती बातमी वणव्याप्रमाणें पसरून काय आहे तें पहाण्यासाठीं शोध करीत करीत **शेलारमामा** त्या चकमकीच्या ठिकाणीं आला. तों **उदयभानू**ची व **जगत्सिंगा**ची चकमक चालली असून **उदयभानु जगत्सिंगास** 'त्या तुझ्या **तानाजी**ला कंठस्नान घालून नरकांत पाठविला, तसा तुलाही पाठवितों' असें ह्मणतो आहे आणि **जगत्सिंग** त्याला "तूं मला पाठवतोस कीं मी तुला पाठवतों तें पाहूं." असें उत्तर देतो आहे ! **तानाजी** आणि नरक हे दोन शब्द ऐकण्याबरोबर **शेलारमामा**स अत्यंत उद्वेग व संताप आला आणि तो एकदम त्या दोघांच्यामध्यें पडून **जगत्सिंगा**स ह्मणतो, " **जगत्सिंग,** माझ्या शूर भाच्याला मारणाऱ्या या दुष्टाला मारण्याचें काम माझें आहे. तूं दूर हो. मराठा गडी ऐशीं वर्षांच्या उमरीचा झाला, तरी त्याच्या कसलेल्या हाडांत काय ताकद आहे ती या बारगळलेल्या रजपुताला दिसूं दे. ए लंडे, चल ये असा. " इतकें बोलून एखाद्या पिसाळलेल्या वाघाप्रमाणें **शेलारमामा उदयभानू**च्या अंगावर धांवून गेला. त्याचा तो विलक्षण त्वेष पाहून **जगत्सिंग** तर मागें

झालाच, परंतु खुद्द **उदयभानू**ही क्षणभर चकित होऊन स्तब्ध उभा राहिला. तो **शेलारमामा**च्या पट्ट्याच्या पहिल्या सपाट्यानें झट्कन् शुद्धीवर आला. आणि त्या ऐशीं वर्षांच्या म्हाताऱ्याचें व तीस पसतीस वर्षांच्या तरुणाचें झुंज सुरू झालें.

तानाजी पडल्याची बातमी पसरत चालली तसा मराठे शिपायांचा धीर खचत चालला आणि रजपूत शिपाई जरा जोर करूं लागले. ज्या बाजूला दोर घोरपडी वगैरे लावून मंडळी आली होती त्या बाजूला आतां **सूर्याजी** लढत होता व **येसा** कणेकर **कल्याण**दरवाजा राखून होता. मराठे शिपायांचा धीर आतां इतका खचला कीं, ते दोरावरून आल्या वाटेनें परत जाण्याच्या बेतांत येऊन तिकडे धांव घेऊं लागले. आणि ते पळताहेत असें पाहतांच जिंकणाऱ्या एडक्याप्रमाणें रजपूत शिपाई त्यांच्या पाठीमागें लागले. **सूर्याजी** आपल्या बाजूला लढण्याची अगदीं शिकस्त करीत होता, **तानाजी** पडल्याचें त्याच्या कानीं आलें, तरी त्यानें आपलें स्थान सोडलें नाहीं, एकसारखी कापाकापी चालविली होती. परंतु आपला भाऊ पडण्याबरोबर हे आपले विश्वासाचे शिपाई पळताहेत असें पाहतांच त्यानें सगळ्यांच्या आधीं त्या दोरांच्या जागीं जाऊन ते दोर भराभर कापून टाकले आणि तेथेंच उभा राहून त्या पळून जाऊं इच्छिणाऱ्या आपल्या मावळ्यांस ह्मणतोः "अरे पंढानो, जा मरा. कड्यावरून उड्या टाकून मरायचं असलं तर मरा. मीं दोर कापून टाकले आहेत. तुमचा बाप तिथें मरून पडला आहे, त्याला महारांच्या हातून कुत्र्याची मोहोती मिळेल याचा मात्र विचार करा."

झालें, त्या त्याच्या हृदयभेदक शब्दांनीं पक्केंच काम झालें. कड्यावरून उड्या टाकून मरण्यापेक्षां लढून मरणें किंवा किल्ला घेणें या दोन गोष्टीच त्यांच्यापुढें राहिल्या. तिकडून **उदयभानू**शीं लढतां लढतां **शेलारमामां**नींही आपल्या लोकांवर शिव्यांचा वर्षावच केला. त्या ह्मातार्‍याच्या पराक्रमानें व वीरश्रीनें तर ते पळून जाऊं इच्छिणारे मराठे फारच लाजले आणि ते पळून जाण्याच्या बुद्धीनें दोराकडे जात असतां त्यांच्या पाठोपाठ आलेल्या रजपूत शिपायांकडे एकदम तोंडें फिरवून त्यांनीं त्यांजवर निकराचा मारा केला. इतक्यांत म्हाताऱ्याच्या पट्ट्याचा एक कचका **उदयभानू**च्या कानशिलावर बसून तेथल्या शिरा तत्काळ तुटल्या व तो उलथून पडला. मग काय विचारतां? **उदयभानु** पडल्याची बातमी सर्व किल्ल्यावर ताबडतोब पसरली. व अशीही

बातमी आली कीं, मराठ्यांची आणखी एक तुकडी खालून वर चढून येते आहे. आपला पुढारी पडला, आणि त्याची जागा घेण्यास दुसरा कोणी नाहीं. शिवाय मराठ्यांचें सैन्य वाढतें आहे अशी बातमी ! मग काय ? थोड्या वेळापूर्वी जी स्थिति मराठ्या शिपायांची झाली होती तीच स्थिति आतां रजपुतांची झाली. आणि ते खरोखरीच सैरावैरा धावूं लागले. त्या त्यांच्या धावण्यांत मजा ही झाली कीं, मराठे शिपाई थोडे असून तीन ठिकाणीं फांकल्यामुळें ते नाहींत कोठें याचाच त्या रजपुतांस पत्ता लागेना. **कल्याण**दरवाजाकडे जावें, तों तेथें आपल्या थोड्याशा शिपायांना घेऊन **येसा** कणेकर बसलेलाच. त्यानें कितीक रजपूत मारले. मधें **शेलारमामा** वाघासारखा गर्जना करीत हिंडत होता. **सूर्याजी** सगळीकडे वावरतच होता आणि दुसऱ्या बाजूस ते आतां निकरानें लढणारे मराठे तयारच ! अशा स्थितींत बिचारे हताश रजपूत काय करणार ? कोणी कड्यावरून चुकून उड्या टाकल्या. कोणी हतवीर्य होऊन शस्त्रें टाकून बसले. शेवटीं आतां शत्रु अगदीं हताश झालासा दिसल्याबरोबर **सूर्याजीनें** **जगत्सिंगा**कडून अशी द्वाही फिरविली कीं, " जो कोणी शस्त्र टाकून स्वस्थ बसेल त्याला आतां याउपर कांहीं दुखापत केली जाणार नाहीं. लढाई बंद. " त्याबरोबर सर्व रजपूत शिपायांनीं भराभर शस्त्रें आणून त्यांच्यापुढें टाकलीं व रुमालांनीं हात बांधून एकवार लवून रामराम केले. त्यांस **सूर्याजी**नें अभयवचन देऊन आपल्या जागीं जाऊन बसण्यास सांगितलें. गड काबीज झाला. महाराजांस ही वर्दी लागली पाहिजे म्हणून **शेलारमामां**नीं **येसा कणेकरा**स सांगून पागेंतल्या एका गवताच्या गंजीला आग लावून दिली, आणि **तानाजी**च्या अकालीं मृत्यूनें झालेला शोक खऱ्या शूर शिपायांना योग्य व स्वाभाविक अशा आत्मसंयमनानें आतांपर्यंत त्या तिघांनीं आवरून धरिला होता, तो स्वस्थता होऊन तिघेही एकत्र मिळाल्याबरोबर अनावर होऊन अश्रूरूपानें बाहेर येऊं लागला. **सूर्याजी** तर **तानाजी**चा भाऊ, **शेलारमामा** त्याचा **मामा**, तेव्हां त्यांना अपरिमित शोक होणें हें सहाजिकच होय. परंतु **जगत्सिंगास** त्यांच्याहीपेक्षां अतोनात दुःख झालेंसें दिसलें.

प्रकरण १४ वें.

महाराज.

तानाजीराव, **महाराजां**ची आज्ञा व **जिजाबाई**साहेबांचा आशीर्वाद घेऊन गेल्या दिवसापासून रोज काय काय हकीकत झाली ती त्यांचेकडे कळविण्यास मुळींच कसूरी करीत नसत, परंतु शेवटल्या चार पांच दिवसांत घडलेल्या गोष्टी इतक्या एकामागून एक गर्दीनें झाल्या कीं, त्या कळविण्यास **तानाजी**रावांस मुळींसुद्धां वेळ मिळाला नाहीं. एक तर त्यांचे बरोबर त्यांनीं कोणी कारकून आणलेला नव्हता. आणि दुसरें शेवटल्या चार पांच दिवसांत **महाराजां**कडे पाठविण्याजोगा कोणी माणूसही त्यांच्याजवळ नव्हता. गोंधळ्याच्या रूपानें आपण कोळ्यांच्या गोटांत शिरून त्यांचा भेद केला व त्यांची आपल्याला मदत आहे, आतां थोडक्यांत किल्ला सर करतों अशी हकीकत कळविल्यानंतर पुढली हकीकत **महाराजां**ना मुळींच कळली नाहीं. रोज रात्रीं त्यांनीं किल्ल्याकडे पहात असावें. कोळ्यांच्या गेटांत शिरल्यानंतर कांहीं कळविण्याजोगें झालें नसेल, ह्मणून त्यानें कळविलें नसेल. किंवा प्रसंग इतक्या एकामागून एक घडत असतील कीं, ते कळविण्यास त्यास फुरसत होत नसेल, असें ह्मणून त्यांनीं आपल्या मनाचें समाधान करून घेतलें. परंतु दोन दिवस या प्रकारानें समाधान झालें. तिसरे दिवशीं त्या समजुतीनें समाधान होईना. **शिवाजी**महाराजांची आज्ञा जी काय होईल ती–अगदीं अक्षरशः पाळणारा जर त्यांचा कोणी सेवक असेल, तर तो एक **तानाजीच** होय. त्यांनीं केलेल्या आज्ञेबाहेर एक रतिभरसुद्धां आजपर्यंत तो गेला नाहीं. अमुक वेळीं अमुक इतकें काम झालें पाहिजे, ह्मणजे तें तितकें झालेंच पाहिजे, असा त्यांचा बाणा असे. रोजची हकीकत जासुदाच्या तोंडीं किंवा पत्रानें कळविली पाहिजे ह्मणजे ती नेमक्या वेळीं यायचीच; असें असून आज तीन दिवसांत जेव्हां त्याच्याकडून पत्र नाहीं किंवा कांहीं बातमी नाहीं, तेव्हां कांहीं तरी दगा झाला असावा. कोळ्यांनीं त्याला फितल्याचा आव दाखवून आंत घेऊन वर **उदयभानू**कडे नेला असावा आणि त्या दुष्टानें त्याचा कडेलोट केला असावा. त्याखेरीज दुसरें कांहीं झालें असतें, तरी हरतऱ्हा करून तो माझ्याकडे हकीकत कळविता. **तानाजी** हरहुन्नरी माणूस असे, त्याला वाटेल तीं सोंगें घेऊन त्या सोंगांची बतावणी करतां येत असे आणि त्याची जिव्हा इतकी मधुर कीं, कोणाचेंही मन आपलेकडे ओढण्यास त्याला कधीं प्रयासच पडत नसत. लहानपणापासून त्यानें

काय काय सोंगें करून कोठें कोठें प्रवेश केला तें सर्व **महाराजांस** ठाऊक होतें. कधीं गोसाव्याचें, कधीं किनरी वाजविणाऱ्या कानफाट्याचें, कधीं कडक लक्ष्मीचें, कधीं जख्ख ह्मातारीचें अशीं सोंगें घेऊन कोठकोठून तरी त्यानें बातम्या काढून आणाव्या. तें सर्व **महाराजांस** आठवलें. आणि गोंधळ्याचें सोंग घेऊन पोवाडा ह्मणून कोळ्यांना वीरश्रीला पेटवून, आपण त्यांना आपल्याकडे मिळविले आहेत असें पत्र व त्यांत तो पोवाडा लिहिलेला जेव्हां त्यानीं वाचला तेव्हां तर त्यांना त्याच्या युक्तिवंतपणाची फार कमाल वाटली. चिटणीसांकडून त्यांनीं तें पत्र आपल्या आईला वाचून दाखविलें, तेव्हां **जिजाबाई**साहेबांनींही आश्चर्यानें थक्क होऊन तोंडांत बोटच घातलें. त्यांच्या डोळ्यांत प्रेमाश्रु उभे राहिले व त्या **शिवाजी**महाराजाला ह्मणतात, "अशीं सोंगं घेऊन दुसऱ्याच्या गोटांत शिरून हा त्यांच्या पोटांत शिरतो, याला आपल्याला कोणी ओळखून पकडील, आणखी जिवं मारील, असं भय कसं वाटत नाहीं बाई ! काय पण कवन केलं आहेन् ! आतां तो परत आला कीं नाहीं ह्मणजे त्याला 'या गोंधळीबोआ' ह्मणून मी त्याच्या पाठीस लागून तें त्याचं कवन ह्मणून घेईन. **शिवबा**, तुझ्या ठिकाणीं त्याची अगदीं खरी खरी भक्ति बरं का."

महाराज त्यावर ह्मणतातः- "आईसाहेब, मी काय तें जाणून नाहीं ! आज माझ्याभोंवतीं इतका परिवार आहे, पण त्यांत वेळप्रसंग पडला तर आपला जीव पुढें करून माझा वांचवील असा कोणी असेल तर तो एकटाच आहे. अगदीं **तोरणा** किल्ला घेतल्याच्या आधींपासून मी पहातों आहें. संकटाची वेळ आली कीं मला ह्मणायचा, "**शिवबा**, तूं मागें हो. मी तें वारतों. (तेव्हां तो मला 'अरे तुरे' ह्मणत असे. आतां तसं ह्मण ह्मटलं तर ह्मणत नाहीं!) **श्रीधर-स्वामी**ला **पुरंदरा**वरून सोडवायला आपण पुढें होत होता. मी होऊं दिलं नाहीं. **अफ्जुलखाना**च्या स्वारीच्या वेळीं मला ह्मणे 'तुम्हाला कांहीं तो ओळखीत नाहीं. तर मी तुमच्या जागीं जातों आणखी त्यानं कांहीं गडबड केलीच तर त्याचं कंदन काढतों.' **दिल्ली**हून निघतांना हीच अवस्था. वाटेंत सुद्धां हीच स्थिति. संकटाची वेळ आली कीं, मला मागें सारून, स्वस्थ बसायला सांगून आपण आपली मान पुढें द्यायचा, तो आहे तोंपर्यंत मला कशाची काळजी वाटत नाहीं याचं कारण काय ! एकदां त्यानं एखादी गोष्ट करतों ह्मटलं कीं, मग तिकडे पहायलाच नको. इतकंही असून कधीं 'मीं आपल्यासाठीं असं केलं, मीं तसं केलं' असा उद्गार ! छे ! नांव सुद्धां नको. त्याची कांहीं गोष्टच निराळी आहे."

इतकें बोलून **महाराज** थांबले. त्यांना लहानपणाच्या कित्येक आठवणी होऊन त्यांचें अंतःकरण सद्गदित झालें. ते किती वेळ तरी स्तब्ध बसले, आणि पुनः ह्मणतात, "आईसाहेब, आज मला चैन पडत नाहीं. तृतीयेपर्यंतच्या हकीकतीचं त्याचं पत्र आलं. आज नवमी. चतुर्थी, पंचमी, षष्ठी, सप्तमी आणखी अष्टमी, पांच दिवसांचीं हकीकत कांहीं नाहीं. तो हकीकत कळवणार म्हणून मी आपला हेर पाठविला नाहीं. आणखी आज उठल्या वेळेपासून माझ्या मनाला हुरहुर लागल्या-सारखं वाटत आहे. काय आहे, कांहींच कळत नाहीं. आतां आजचा दिवस वाट पहातों, नाहीं तर संध्याकाळीं निघून **कोंडाण्या**कडे जातों. तो जर संकटांत पडला असला, तर त्याला सोडवायला मला स्वतःलाच गेलं पाहिजे. किल्ला सर करण्याच्या घाटांत असला, तर माझी त्याला मदत होईल. पण आतां इथें उगीच वाट पहात, माशा मारीत बसणं उपयोगी नाहीं. गेलोंच म्हणजे काय असेल तें समजेल. माझ्यानं आतां राहवतच नाहीं."

महाराजांचें हें बोलणें, वरून आईसाहेबांना उद्देशून होतें खरें, परंतु खरोखर तें त्यांचें आत्मगत भाषणच होतें ह्मटलें तर विशेष शोभणार आहे. आपला परम मित्र आणि अत्यंत एकनिष्ठ सेवक, कांहीं तरी संकटांत असला पाहिजे ही शंका त्यांच्या मनांत आल्या वेळेपासूनच, आपण आतां इथें स्वस्थ बसतां उपयोगी नाहीं, त्याच्या सोडवणुकीला, त्याच्या साहाय्याला गेलें पाहिजे, असें त्यांच्या मनानें घेतलें. जसा **तानाजी** हा आपल्या स्वामीचा परम भक्त होता तसेच **महाराज**-ही आपल्या खऱ्या सेवकांचे परम भक्त होते.

तें बोलणें ऐकून **जिजाबाई**साहेबांना असें वाटलें कीं, वास्तविकपणें पहातां **महाराजां**नीं इतकी उतावळी करून जाण्याचें कांहीं कारण नाहीं. परंतु अशा कामांत त्या माउलीचेंसुद्धां कांहीं चालत नसे. एक वेळां अमुक हें करणें रास्त आणि केलें पाहिजे असें ठरलें ह्मणजे त्याप्रमाणें झालेंच पाहिजे. त्यांत कधीं अंतर पडावयाचें नाहीं. **महाराजां**च्या मनानें घेतलें कीं, आपला **तानाजी** कांहीं तरी विलक्षण संकटांत पडल्यामुळेंच त्याच्याकडून आपल्याला बातम्या या-यच्या त्या आल्या नाहींत. आणि अशा संकटकाळीं आपण त्याला साहाय्य कर-ण्याला गेलें पाहिजे. मग काय विचारतां! लागलीच आपल्या खास तैनातीच्या सरदारांपैकीं दोघे व बारगिरांपैकीं पंधरा असामींना त्यांनीं हुकूम सोडला कीं, आज संध्याकाळीं **राजगड** सोडून **कोंडाण्या**कडे जायचं आहे. तुह्मी तयारींत असावं. खरोखर काय तिकडली हालहवाल आहे ही समजण्यासाठीं आपला एक हेर-विशेष

हुशार असा हेरही त्यांनीं पुढें पाठविला, त्यानें तेथें जाऊन बातमी काढून आपल्याला रात्रीं अर्ध्या वाटेंत अमुक ठिकाणीं येऊन सांगावी. तेथें त्याची वाट पहात आपण बसूं. असे सर्व हुकूम दिवसासच देऊन ठेविले. आणि **तानाजी**वर कोणचें संकट आलें असेल, काय झालें असेल याबद्दल कल्पना करीत स्वारींनीं तो दिवस काढिला. क्षणोक्षणीं, आतां कोणी तरी बातमीदार येईल, मग येईल, असेंही त्यांस एकसारखें वाटतच होतें. त्याचप्रमाणें **कोंडाण्या**वर जर **तानाजी**ला कैद करून ठेवलें असलें, तर त्याला सोडविण्यासाठीं आपण काय काय तजविजी कराव्या याबद्दलही विचार स्वारींच्या मस्तकांत चाललेच होते.

होतां होतां सूर्यास्त होऊन अंधार पडूं लागला. **महाराजांचें** लक्ष्य त्या रात्रीं पहिल्या एका प्रहरांत कमींत कमी दहा बारा वेळां तरी **कोंडाण्या**कडे गेलें असेल; परंतु विशेषसा उजेड कांहीं दिसेना. तेव्हां अर्थातच त्यांनीं आपल्या बेताप्रमाणें करण्याचें ठरवून आपल्या आवडत्या काळ्या घोडीवर खोगीर चढविण्यास सांगितलें. या घोडीवर **महाराजांचें** फार प्रेम. तिनें त्यांस कित्येक चकमकींत पाठीवर वाहून यश मिळविलें होतें व संकटांतून दूरही नेलें होतें. या घोडीचें नांव त्यांनीं '**कृष्णघोडी**' असें ठेविलें होतें. त्या घोडीवर खोगीर कसण्याचा हुकूम देऊन त्यांनीं आपली सुरवारी तुमान चढविली. अंगांत पातळ कापडाचा सदरा घालून वर लहानसें चिलखत चढविलें आणि पुनः वर एक किनखापी बिनबाह्यांचें कुडतें घालून वरून जाळीदार कपड्याचा पायघोळ झगा चढविला. नंतर डोक्यावर जिरे टोप बसविला. त्याच्यावर फार हलका असा पटका बांधून त्यांत त्यांचा नेहमींचा तुरा बसविला होता. हातांत वाघनखें चढविलीं, सोनसोळ्या पट्टा घेतला, पाठीवर ढाल कसली आणि दोन सरदार, पंधरा बारगीर व **बाळाजी आवजी चिटणीस** अशा मंडळीसकट स्वारी **राजगडाहून कोंडाण्या**कडे जाण्याला निघाली. **महाराजांची** स्वारी कधीं मोठी ऐटीनें अशी होतां होईतों निघतच नसे. त्यांतून आज तर हलके हलके बेतानेंच तिकडे काय आहे, काय नाहीं, याची चौकशी करण्याला जायचें होतें. **महाराज** निघाले तेव्हां सुमारें १६ घटका रात्रीचा सुमार होता. चांदणें निघण्याच्या बेताला होतें. **राजगड किल्ला कोंडाण्या**पासून सुमारें बारा किंवा तेरा मैल आहे. तेव्हां मंडळी जर तडक निघाली असती, तर अर्ध्या पाऊण प्रहराच्या आंत गडाच्या घेऱ्यांत जाऊन पोहोंचती, परंतु तितकी गर्दी करण्याचें त्यांना कांहीं कारण नव्हतें. वाटेनें इतकी मंडळी बरोबर होती, परंतु **महाराज**

कांहीं कोणाशीं बोलले नाहींत. आपले सावकाश चालले होते. बिनीला एक सरदार व पांच बारगीर होते. ते जिकडे जातील तिकडे जायचें, असा जणूं काय त्यांच्या मनाचा विचार होता. सुमारें अर्ध्या वाटेवर मंडळी गेली. तों एकदम पुढला एक बारगीर मोठ्यानें ओरडून ह्मणतो, " **महाराज** ! **कोंडाण्या**वर या इकडल्या उगवत्या बाजूला कांहीं पेटून आग लागल्यासारखं दिसतं आहे. " **महाराजां**नींही पाहिलें तों खरेंच. तो जाळ कशाचा आहे आणि ज्या बाजूला जाळ करूं, होळी करूं, असें त्यांना **शेलारमामा** वगैरेंनीं सांगितलें होतें, तिकडेच आहे कीं नाहीं, असें एकवार नीट पाहून, तिकडेच आहे, अशी खात्री होतांच " शाबास **तानाजी** ! खरा शूराचा बच्चा आहेस ! " असा एकदम त्यांच्या तोंडून उद्गार निघाला. इतका वेळ त्यांच्या चित्ताला जें अस्वास्थ्य झालें होतें तें एकदम नाहींसें होऊन, जीव खालीं पडल्याप्रमाणें झालें. आणि आतां पुढें जावें कीं परत **राजगडा**ला जावें या विचारांत ते होते. इतक्यांत ज्या गांवाला जाऊन आपण वाट पाहूं ह्मणून त्यांनीं दिवसा पुढें पाठविलेल्या आपल्या हेराला सांगितलें होतें, त्या गांवापाशीं स्वाऱ्या आल्या. तेव्हां साहजिकपणेंच, तो येईपर्यंत येथें वाट पहावी, आणि तो काय हकीकत सांगेल त्याप्रमाणें पुढें जायचें कीं परत **राजगडा**वर जायचें तें ठरवावें, असा त्यांनीं विचार करून एका आंबराईकडे आपलीं घोडीं वळविलीं. नौकरांनीं लागलींच जागा झाडून गाशे टाकून मशाली पेटवल्या. **महाराजां**ची चर्या आतांपर्यंत अगदीं कोमेजल्याप्रमाणें दिसत होती, ती आतां जरा प्रफुल्लित झाली. आणि **चिटणिसास** व **हिरोजी फर्जंदास** ते ह्मणतात, " हा गड हातीं आला यांत आपलं फार काम झालं. बादशहाशीं तह केल्याखेरीज इलाज नव्हता ह्मणूनच मी हा गड आणखी **पुरंदर** हे दोनही गड त्याच्या ताब्यांत ठेवण्याचं कबूल केलं. नाहीं तर **पुणें, सासवड** आणखी **सुपें** हे प्रांत मला देतो, पण त्यांतले किल्ले तेवढे आपल्या ताब्यांत ठेवतो याचा अर्थ काय ? जसा कांहीं आह्मांला त्याचा कावा समजतच नव्हता ? पण काय करायचं ! **जसवंतसिंग** व **जयसिंग** या दोघांच्या आग्रह पडला कीं, हा तह तुह्मी बेलाशक सध्या कबूल करा. मग पुढें त्याच्याबद्दल विचार करायचा तो पहातां येईल. ह्मणून मीही त्यांचं ह्मणणं कबूल केलं. पण बादशहाला आमचा कोठें विश्वास ! इकडे आमच्याशीं तह करून पुनः आह्मांला विश्वासघातानं पकडण्यासाठीं माणसन् हुकूम पाठवतोच आहे. आतां तहाचं कांहींच राह्मलं नाहीं. मला मोठी काळजी पडली होती कीं, हा गड

पुनः हातीं घ्यायच्या वेळीं काय त्रास होईल आणि काय नाहीं. पण माझा **तानाजी** मोठा बहाद्दर **सिंह** खरा. त्या **सिंहानं** छाती केली म्हणूनच **गड** हातीं आला. **बाळाजीपंत**, आजपासून या गडाला आपण **सिंहगड** हेंच नांव ठेवूं. या नांवाला सगळ्या अर्थांनीं हाच **किल्ला** योग्य आहे."

शिवाजीमहाराज साधारणतः फार बोलणारे नसत. जीं कार्यकर्तीं माणसें, तीं बहुशः अल्पवाक् असावयाचीं. तसाच **महाराजां**चा स्वभाव होता आणि त्यामुळें **महाराज** इतके बोललेले आज ऐकून त्या बरोबरीच्या मंडळीला थोडेंसें आश्चर्य वाटलें. तथापि आजची वेळच विलक्षण होती. इतका वेळ काळजीनें त्यांचें अंतःकरण अगदीं व्याप्त झालें होतें. अर्ध्या वाटेंतच आपल्याला गड घेतल्याचें समजेल असें त्यांस वाटत नव्हतें. उलट गड घेण्यांत कांहीं तरी अडचणी उत्पन्न झाल्या असून **तानाजी** कांहीं तरी संकटांत सांपडला असावा, अशी बातमी येईल, असेंच त्यांना वाटत होतें. तें सव जाऊन गड घेतल्याची ठरलेली खूण दिसल्याबरोबर एकदम ती सारी चिंता पार नाहींशी झाली. मनावरचें दडपण दूर होऊन झालेला आनंद व **तानाजी**विषयींचा प्रेमादर हीं एकदम शब्दरूपानें बाहेर पडली.

अशा स्थितींत सुमारें चार घटका गेल्या, पहाट झाली, कोंबडे आरवूं लागले व खेड्यांतील बायकांची दळणाची वेळ होऊन त्या जात्यावर बसून गाणीं म्हणूं लागल्या; चंद्र निस्तेज झाला आणि पूर्व दिशेच्या आकाशभागाला तांबूस तांबूस छटा दिसूं लागल्या. **महाराज** त्या आपल्या हेराची एकसारखी वाट पहात बसले होते; परंतु त्याचा मुळींच ठिकाण नाहीं. तेव्हां **महाराजां**च्या मनाला पुनः चिंता उत्पन्न झाली. आपण जो जाळ पाहिला, तो नुसता भास तर नव्हे ! किंवा जाळ जरी असला, तरी तो कदाचित् आपल्या ठरलेल्या खुणेचा नसेल दुसराच कसला असेल, असें त्यांच्या मनांत आलें व आपण हळू हळू **कल्याणा**च्या बाजूपर्यंत तरी जावें. तेथेंच गेल्यावर कांहीं तरी खरी बातमी आपल्याला समजेल. आतां हेराचीन् बातमीदारांची वाट पहात बसण्यांत कांहीं अर्थ नाहीं, असें म्हणून स्वाऱ्या पुनः निघाल्या. थोडासा वळसा घेऊन **कल्याण** गांवाच्या बाजूला स्वाऱ्या गेल्या. त्या गांवाजवळ जातात तों गांव अगदीं घाबरून गेलेला दिसला! एका माणसाला जवळ बोलावून गांवांत काय गडबड आहे? म्हणून विचारतां त्याला नीट कांहींच ठाऊक नव्हतें. त्यानें एवढेंच उत्तर दिलें कीं, "रात्रीं दोन प्रहराला गडावर कांहीं गडबड झाली खरी. कोणी म्हणतात मराठे लोकांनीं गड घेऊन **उदे-भानाला** मारलं. कोणी म्हणतात **उदेभानानं तानाजी** मालुसऱ्याला मारून

सगळ्या मराठ्यांना कापून काढलं ! काय आहे काय नाहीं अशा धाकानं सगळा
गांव असा बसला आहे. अजून कांहीं कोणी खालीं येईना. मग काय असेल तें
परमेश्वराला ठाऊक."

हें तो इसम बोलल्याबरोबर **महाराजां**च्या काळजाचें एकदम पाणी झालें
आणि तशांत आपला डावा डोळा लवतो आहे असा त्यांना भास झाला. **महा-**
राजांचा शकुनावर विशेष विश्वास असे, त्यामुळें त्यांस तें दुश्चिन्ह वाटून कांहीं
तरी दगा आहे असें वाटलें. आतां पुढें आपण काय करावें ! हा प्रश्न त्यांच्या
मनांत उभा राहिला. परंतु त्यांची वृत्तीच अशी होती कीं, कोणचाही
प्रश्न मनांत फार वेळ कधीं टिकावयाचा नाहीं. ताबडतोब त्याचें काय तें
उत्तर ठरवून ते त्याप्रमाणें वागावयाचे. उगीच हें करूं, का तें करूं, असा
विचार करीत ते बसावयाचे नाहींत. किल्ल्याच्या पायथ्यापर्यंत—**कल्याण**दरवा-
जाच्या पायथ्यापर्यंत तर रेटायचेंच असा निश्चय करून ते पुढें चालले. **हिरोजी**
फर्जंदानें व **बाळाजी आवजीं**नीं पुढें होऊन त्यांस विनविलें कीं, "किल्ल्याची
खरी स्थिती कळेपर्यंत **महाराजां**नीं पुढें जाण्यास धजूं नये. अनिष्ट स्थिती
असली, तर आयतेंच मोंगलांच्या हातांत गेल्याप्रमाणें होईल. त्यांना आपण स्वतः
सांपडल्यावर आणखी काय पाहिजे ? तर **महाराजां**नीं परतून कांहीं लांब जावें.
आह्मी दोघे शोध करून येऊन **महाराजां**कडे वर्दी देतों. परंतु **महाराजां**नीं
त्यावर एकच उत्तर दिलें: " खुद्द **दिल्ली**स मोंगलांच्या तडाख्यांतून मला जिवं सोडवलं
तीच **भवानीमाता** आतांही मला कां नाहीं सोडवणार ! **तानाजी**सारख्याला
संकटांत टाकून परतणं ह्मणजे काय !" असें ह्मणून त्यांनीं आपल्या त्या
कृष्णघोडीला जरा जोरानें चाबूक केला व ते किल्ल्याच्या पायथ्याशीं गेले.
जातात तों तेथें मराठ्यांचा पहारा! त्या ग्येटावरल्या लोकांनीं उठून खडी ताजीम देऊन
जोहार केला. किल्ला केव्हां पडला म्हणून विचारतां ' पडला दोन प्रहर रात्रीला '
असें उत्तर आलें. किल्ला मिळाला, जय झाला, परंतु माणसांच्या तोंडावर
जयाची कळा म्हणून दिसेना. तेव्हां **महाराजां**स कांहींच उलगडा होईना.
इकडे डावा डोळा तर फारच जलद जलद लवूं लागला; तेव्हां कांहीं तरी मोठें
अनिष्ट आहे अशी खात्री वाटून **महाराज** अधिकउणी चौकशी न करितां थेट
गड चढूं लागले. ठिकठिकाणीं पांच पांच चार चार मावळ्यांचीं गेटें बसलीं होतीं.
त्यांनीं **महाराजां**ना ओळखून रामराम करावा, मुजरा करावा, परंतु लागलीच माना
खालीं घालाव्या. असा प्रकार चालला होता. **महाराजां**च्या गळ्यांतील केवळ ताईत
असा **तानाजीराव** पडला ही बातमी कोणीं आपल्या तोंडानें बोलावी ! को-
णाच्या जिभेला एवढें धैर्य ! **महाराज** पायऱ्या चढूं लागतात, तों जिकडे तिकडे
रक्ताचा शिपडा व प्रेतांचा खच ! दरवाज्यांतून आंत जातात तों सगळी जमीन
तांबडीलाल ! ठिकठिकाणच्या टांक्यांतलें पाणी सुद्धां लाल झालेलें. असा एकंदर
भयंकर देखावा दिसला. सगळे **रजपूत** शिपाई अगदीं निःशस्त्र होऊन एका
बुरुजाच्या बाजूला जमा होऊन बसलेले. **महाराज** पुढें जातांच जणूं काय
अंतःप्रेरणेनें त्या रजपुतांनीं त्या महाविभूतीस ओळखून मुजरे केले. **महारा-**
जांनीं ते घेऊन ते पुढें गेले. प्रेतें पडलीं होतीं त्यांत बहुतेक रजपूतच दिसले.

परंतु **तानाजी**, **सूर्याजी**, किंवा **शेलारमामा** यांपैकीं कोठें कोणीच दिसेना. जरा आणखी पुढें गेले, तों राजमहालाच्या बाहेरचे बाजूला एका प्रेतावर बारीक पांढरा शेला घालून **सूर्याजी** व **शेलारमामा** बसलेले ! **महाराज** मनांत चरकून अंमळ पुढें होतात तों **शेलारमामा**ची दृष्टि त्यांच्यावर गेली, आणि तो एकदम " **महाराज** ! माझा **तानाजी** गेलाहो ! आपला **तानाजी** गेला ! " असें ओरडत त्यांच्यापुढें गेला. ते ह्मातान्याचे हृदयभेदक शब्द कानीं पडतांच **महाराजांचें** सर्वांग थरारलें आणि त्यांनीं एकदम त्या ह्मातान्याला आपल्या बाहूंनीं कवटाळलें. किती वेळ तरी ते त्याच स्थितींत राहिले. नंतर त्यांनीं **शेलारमामास** सोडलें. आणि आपल्या डोक्याचा टोप व तुरा खोंवलेला पटका उतरून टाकून अंगावरला पांढरा शेला डोक्यास गुंडाळला, पायांतले जोडे काढून ते **तानाजी**च्या प्रेताजवळ गेले व त्याच्या अंगावरला शेला आपल्या हातांनीं दूर करून किती वेळ तरी त्याच्या त्या आकाशाकडे लागलेल्या दृष्टीकडे ते एकसारखे पहात राहिले. त्यांच्या डोळ्यांवाटे अश्रुधारा वहात राहिल्या. ते **तानाजी**कडे इतक्या तटस्थपणें पहात होते कीं जणूं काय तो निद्रित आहे कीं मृत आहे, याबद्दल त्यांना शंकाच वाटत असून तिचें चक्षुर्वै सत्यं असें निराकरण ते करून घेत आहेत.

नंतर कांहीं वेळानें **सूर्याजी**कडे वळून डोक्यास गुंडाळलेल्या शेल्याच्या खांद्यावरून लोंबणाऱ्या पदरानें डोळे पुशीत अत्यंत सद्गदित कंठानें म्हणतात, "**सूर्याजी, गड आला, पण सिंह गेला** अं ! असो; त्या अंबाबाईची मर्जी ! **मामा**, आतां आपल्याला मी समाधानाच्या गोष्टी काय सांगूं ? '**शिवाजी** मेला आणखी **तानाजी** आहे, असं तुम्ही आणखी **सूर्याजी** समजा. **जानकी** आकालाही तसाच माझा निरोप सांगा. तिला ह्मणावें जसा माझा **शंभु** आणखी **राजाराम** तसाच तिसरा **रायाबा**."

प्रकरण १५ वें.

उ प सं हा र.

महाराज तानाजीच्या प्रेताजवळ गेले तेव्हां **जगत्सिंग** तेथें नव्हता हें वाचकांच्या लक्ष्यांत आलेंच असेल. तो आंत राजमहालांत आपल्या पत्नीच्या प्रेताजवळ बसून स्तब्धपणें शोक करीत होता. **कमलकुमारी**ही आपल्या मैत्रिणीच्या प्रेताजवळ बसून हृदय पिटून आक्रोश करीत होती. **तानाजी**च्या शवाला लाथ मारूं इच्छिणाऱ्या **उदयभानू**चा पाय छाटून व त्यास शेवटचें कंठ स्नान घालण्यासाठीं **शेलारमामा**च्या स्वाधीन करून तो त्या म्हातान्याच्या हातून इहलोकांतून गेल्यामुळें, किल्ल्यावर स्थिरस्थावर झाल्याबरोबर **जगत्सिंग** आपल्या पत्नीच्या शोधाकरितां राजमहालांत गेला व तिला कोठें ठेविलें आहे याचा शोध करूं लागला. तेव्हां प्रथम त्याला कोणी दादच लागूं देईना. शेवटीं त्यानें अंतःपुर फोडून आंत शिरण्याचा धाक घातला, तेव्हां एका भेसूर हबशिणीनें **देवलदेवी**चें प्रेत त्याच्यापुढें आणून ठेविलें ! आणि " आपला

ा मेला व **कमलकुमारी**चा **उदयभानू**शीं निका लागला. " असें कळल्या-
र तिनें आपल्या ओढणीचा गळफांस करून आत्महत्त्या केली असें त्याला तिनें
ांनलें. परंतु तिनें स्वतःच आत्महत्त्या केली कीं, तिच्या गळ्याला फांस लावून
हबशिणींनीं तिला मारलें याबद्दल त्यास शंका आली. विशेष निकरानें व चापून
कशी करतां त्या हबशिणी केव्हां आपण तिला मारलें ह्मणून कबूल करीत, केव्हां
ण मारलें नाहीं, तिनें स्वतःच गळफांस घेऊन प्राण दिला असें ह्मणत. कसेंही
असो, आपली बायको आपल्याला नाहींशी झाली एवढें खरें, असें ह्मणून **जगत्सिं-
गा**नें आणखी चौकशी करण्याचें सोडून दिलें.

पुढें **कमलकुमारीस** ती हकीकत कळतांच ती हाय हाय करीतच तेथें आली. आणि आपल्या मैत्रिणीचें प्रेत पाहून तिनें भयंकर आक्रोश मांडला. शेवटीं **शिवाजी** महाराज आले आहेत असें कळतांच, तिनें हात जोडून **जगत्सिंगाला** ह्मटलें: " **जगत्सिंग**, माझ्यामुळें तुमचा सर्वस्वी नाश झाला आहे. तेव्हां तुमच्या-जवळ कांहीं मागणं मागायचं तें मी कोणाच्या तोंडानं मागूं? पण आतां मागतें हें शेवटचं मागणं आहे. मला तुह्मीं जशी त्या दुष्टाच्या हातून सोडवली, तशीच तावडतोब सती जाण्याचीही परवानगी मिळवा. **शिवाजी**महाराज हिंदुधर्माचे रक्षक आहेत. ते सतीला एवढी भिक्षा घालतील. नाहीं ह्मणणार नाहींत. "

तिचें तें बोलणें ऐकून **जगत्सिंग** फारच गहिंवरला आणि तेथून उठून बाहेर गेला. नंतर **महाराजांची** भेट घेऊन त्यानें आपली हकीकत सांगून **तानाजीनें** काल रात्रींच बारा वाजण्याचे आंत किल्ला कां घेतला, तेंही सांगून **कमलकुमारीला** सती जाण्याची परवानगी देण्याविषयीं विनंति केली. **शिवाजी**महाराजांनीं तत्काळ हो ह्मटलें नाहीं, " तिचें मन वळलें तर पहा. जीव देणें मोठें कठीण आहे," असें ह्मणून तिजकडे त्यास परत पाठविलें. परंतु तिचा पक्का निश्चय झालेला, ती काय ऐकते! तिनें **महाराजांस** परत निरोप पाठविला " **महाराज**, माझ्यासारख्या दुर्दैवी प्राण्याला जीव देणें काय कठीण आहे! माझा पति वारला. पुढें माझ्यामुळें अनेक हालअपेष्टा भोगून माझा पिता वारला. संकटांत मला एकटीला सोडूं नये ह्मणून माझ्या गळ्याशीं गळा बांधून येथपर्यंत आलेली माझी मैत्रीण अशा तऱ्हेनें मेली. फार तर काय? पण मला सोडवण्यासाठीं ह्मणून केवळ पन्नास माणसं बरोबर घेऊन हजार रजपुतांवर तुटून पडणारा आपला सरदारसुद्धां वारला! तेव्हां मी जगांत आणखी रहाण्यानेंच किती अनर्थ ओढवतील कोणाला ठाऊक! मला सती जाऊं दिलीत, तर आपल्याला आशीर्वाद देईन आणखी महापुण्य जोडीन. माझ्याकरितां दुःख करायला आतां या जगांत कोणी नाहीं. इतक्याउपर आपण परवानगी नाहींच दिली, तर माझ्या मैत्रिणीनं मला उदाहरण घालून दिलंच आहे."

असा निरोप आल्यावर **महाराजांनीं** तिचा कृतनिश्चय जाणून सती जाण्यास तिला परवानगी दिली व सर्व तयारी करण्याविषयीं त्यांनीं **बाळाजीस** सांगितलें. **कल्याणाहून** एक भिक्षुक बोलावून आणला. माझ्या मैत्रिणीला अग्नि दिल्या-नंतर मी अग्निप्रवेश करीन, असें **कमलकुमारीनें** ह्मटलें. तेव्हां **देवल-देवीच्या** चितेची आधीं तयारी केली. तिचें प्रेत उचलतांना **कमलकुमारीनें**